# आठवणीतील किशाभाऊ...





# आठवणीतील किशाभाऊ

**संपादक मंडळ**

*श्री. जयंत कवठेकर* *श्री. शिरीष पटवर्धन*

*श्री. राम डिंबळे* *श्री. विश्वास कुलकर्णी*

**प्रकाशक**
**'स्व'-रूपवर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे ४११०११.
दूरभाष : २६१२१७०४
**ई-मेल : wardhinee@gmail.com**
**वेबसाईट : www.swaroopwardhinee.org**

■

© **'स्व'-रूपवर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे ४११०११.

■

**मुद्रक**
**प्रबोध उद्योग**
१२४८, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

■

**प्रकाशन**
१५ मे, २०११

■

**किंमत ₹ १००/- फक्त**

# स्मरणांजली

वर्ष १९४० ते १९६० या काळात ज्यांचे भावविश्व जोपासले गेले, त्या आधारावर ज्यांनी आयुष्यभर सामाजिक कामात स्वत:ला बांधून घेतले अशा कार्यकर्त्यांची मोठी पिढी अस्तंगत होत चालली आहे. स्व. किशाभाऊ पटवर्धन हे अशा पिढीचे प्रतिनिधित्व करतात. विविध विचारधारांच्या मुशीतून हे कार्यकर्ते घडले. समाजजीवनातील एखादा प्रश्न जाणून त्याला भिडले, व तो प्रश्न सोडविण्यासाठी झोकून देऊन त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी आवश्यक ती संघटना बांधली, अशी ही उदाहरणे आहेत. स्व. किशाभाऊंनी रा. स्व. संघातून हा मूलभूत संस्कार घेतला. स्व. आप्पासाहेब पेंडसे यांचे सान्निध्य व ज्ञानप्रबोधिनी या संस्थेतील अनुभव, यांचे आधारावर समाजातील नाहीरे' (Have-nots) गटातील उपेक्षित गटात–समाजात, काम करण्याचे व्रत घेतले. ते आयुष्यभर निभावले. या कार्यकर्त्यांचे भांडवल म्हणजे जिद्द व श्रद्धा यांचा मीलन, तळमळ व समर्पणभाव यांचे दर्शन, यामुळेच कार्यकर्त्यांचा संच व परंपरा यांची निर्मिती झाली. व्यापक सामाजिक समर्थन व सहकार्य हेही उभे राहू शकले.

अनेक वेळा विचार मनात येतो, की अशा स्मृतिग्रंथाचे प्रयोजन काय? आपल्या प्रिय, मार्गदर्शी, आदर्श वाटणाऱ्या व्यक्तीच्या स्मृती जागवणे, अक्षरबद्ध करणे हे स्मरणरंजन तर असतेच. त्यापलीकडे बरेच काही असते. समाजाच्या भल्यासाठी जे कार्य उभे राहिले आहे, ते ज्यांनी केले, त्याविषयी उचित माहिती अशा ग्रंथातून मिळते. केलेले परिश्रम, आलेले अनुभव, विकासाचे टप्पे हे मार्गदर्शी राहतात. त्यातून प्रेरणा मिळते. मिळत असलेला कार्याचा वारसा अधिक दृढ होतो. संपर्कात येणाऱ्या वर्तुळाबाहेरील लोकांना कार्याची यथार्थ जाणीव होऊ शकते. हे वर्तुळ अधिक व्यापक होत जाते. त्यातून कार्याची गती व विस्तार दोहोंना चालना मिळते. समाजहिताच्या दृष्टीने एक उत्तम दस्तऐवज (Document) उपलब्ध होतो. अर्थात् लेखनकर्त्यांची आत्मीयता व कृतज्ञताही

या लिखाणातून प्रकट होत असते.

माझा किशाभाऊंचा खूप दीर्घकाळचा परिचय असला, तरी कार्यक्षेत्र भिन्न असल्याने सातत्याचा सहवास फार होऊ शकला नाही. एकमेकांची– कामाची माहिती नित्य असे. अनेक उपक्रम–कार्यक्रम–बैठकी या माध्यमातून सहवास–संवाद होत राहिला. अगदी सहज जाणवत असे ती त्यांची कामासंबंधीची विलक्षण तळमळ. त्यापोटी घेतलेला ध्यास, केलेला विषयांचा पाठपुरावा. याची अनेक उदाहरणे या स्मृतिग्रंथात सापडतील. म्हणूनच जेथे सहजसंबंध ठेवणेही समाजात रूढ नव्हते, अवघड समजले जात होते, अशा स्तरात त्यांचे देवस्वरूप स्थान निर्माण झाले. व्यक्तिगत संवादात कळवळून ते विचारत– 'का हो, होणार ना आपल्या कल्पनेतील बलशाली राष्ट्रनिर्माण आणि संघटित समाज?' त्या त्यांच्या विचारण्यात एखाद्या बालकाची निकड, कार्यकर्त्यांची वेदना, व्याकुळता याची प्रचीती येत असे. सहवासातील व्यक्तीवर त्याची अमिट छाप पडत असे.

'स्व'–रूपवर्धिनीच्या रूपाने एक आगळेवेगळे काम उभे राहिले आहे. पुढची पिढी सक्षमपणे ते पेलत आहे. किशाभाऊंनी ते 'याचि देही याचि डोळा' अनुभवले– व्यक्त केले. त्यांचे जीवन सफल झाले. ही 'समाजनिष्ठांची मांदियाळी' राष्ट्रनिष्ठेची ध्वजा घेऊन वरचेवर समर्थ होत असली, तरी किशाभाऊंच्या कल्पनेतील चित्र साकारणे अजून दूर आहे. या स्मृतिग्रंथाच्या रूपाने आपणा सर्वांना त्यांचे दीपस्तंभासारखे जीवन अखंड प्रेरणा देत राहील असा विश्वास वाटतो.

***देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती***
***वाळवंटातून सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती।।***

(कविवर्य बा. भ. बोरकर)

**– डॉ. अ. ल. कुकडे**

# ऋणनिर्देश

*'ध्येयधुंद' हा स्वर्गीय किशाभाऊंच्या बोलण्यात सतत सहजपणे येणारा सुंदर शब्द. 'स्वच्छ हातांचे, समर्थ खांद्यांचे, तल्लख बुद्धीचे, विशाल मनाचे, सामाजिक बांधिलकी मानणारे तरुण सेवाभावी कार्यकर्ते मला घडवायचे आहेत.' हे असेच एक अत्यंत अर्थवाही वाक्य त्यांच्या संवादात सतत येत असे. किशाभाऊंचे वेगळेपण, मोठेपण हे केवळ या शब्दांच्या उच्चारण्यात नव्हते तर त्यानुसार त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत आचरणात आणलेल्या त्यांच्या कर्मयोगी साधनेत होते. म्हणूनच सतत 'ध्यास पंथाचे' भान राखणारी त्यांची पाऊले देखणी आणि वंदनीय झाली आहेत, त्यांच्या आठवणी प्रेरक ठरल्या आहेत. त्या आठवणींच्या आधारे त्यांच्या जीवनक्रमाचा वेध घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. किशाभाऊंचा जनसंपर्क प्रचंड होता. त्यांच्या दैनंदिनींचं पान न् पान याची साक्ष पटवतं. सर्वांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणं आणि त्यांना 'लिहितं' करणं याला मर्यादा होत्या. म्हणूनच 'अल्पसा प्रयत्न' असं म्हटलं आहे.*

*वर्धिनीने केलेल्या आवाहनाला अनेकांनी मन:पूर्वक प्रतिसाद दिला आणि कै. किशाभाऊंच्या सहवासातील त्यांचे सोनेरी क्षण, त्यांचे अनुभव आत्मियतेने ओथंबलेल्या शब्दात लिहून वर्धिनीला सुपूर्द केले आहेत. या सर्वांची 'स्व'-रूपवर्धिनी अत्यंत ऋणी आहे. आठवणींचा हा ठेवा पुस्तक रूपात आपल्यापर्यंत पोहोचवण्यासाठी अनेकांचे कळत-नकळत आधाराचे हात लागले आहेत. त्या सर्वांबद्दलही मनात कृतज्ञतेची भावना आहे. मदत करणाऱ्या सर्वांचे वर्धिनीशी कौटुंबिक जिव्हाळ्याचे नाते आहे, त्यामुळे औपचारिक आभाराचे शब्द त्यांना रुचणार नाहीत. तरीही मुखपृष्ठावरील कै. किशाभाऊंची आकर्षक छबी टिपणारे श्री. उदयराव गुजर, त्या छबीला सुंदर मुखपृष्ठात सजविणारा अवधूत फडणीस, मुद्रक प्रबोध उद्योगचे संचालक व सेवक यांच्या नावांचा उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. याव्यतिरिक्तही ज्यांचा ज्यांचा हातभार हे पुस्तक प्रकाशित होण्यासाठी लागला आहे त्यांच्याविषयी आम्ही अत्यंत कृतज्ञ आहोत.*

**-संपादक मंडळ**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ❋ कै. कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन जीवनपट | | १ |
| ❋ किशाभाऊ : एक सच्चा कार्यकर्ता | – *चं. प. भिशीकर* | ४ |
| ● त्यांचे कार्यच प्रेरणा देत राहील. | – *भैयाजी जोशी, सरकार्यवाह–रा.स्व.संघ* | ८ |
| ❋ आशावादाचा झरा... | – *प्रतापराव पवार* | ९ |
| ❋ हसरे गांभीर्य | – *वा. ना. अभ्यंकर* | १२ |
| ❋ आमचे पटवर्धन सर | –*आमदार उल्हासदादा पवार* | १४ |
| ❋ सर्जनशील संघटक | – *कृ. गो. तथा राजाभाऊ लवळेकर* | १७ |
| ❋ 'किशाभाऊ : एक पुण्यस्मरण !' | – *डॉ. जगन्नाथ वाणी* | २३ |
| ● व्रताची पूर्तता करू ! | – *सौ. स्नेहल कुलकर्णी* | २६ |
| ❋ किशाभाऊ – अेक स्मरणांजली | – *सौ. कुन्दा महादेवकर* | २७ |
| ❋ कै.किशाभाऊंची टिपणे–एक दिशा दर्शन | – *र. ज. नरवणे* | ३३ |
| ❋ सेवाकार्याचा निर्मळ झरा | – *गिरीश प्रभुणे* | ३७ |
| ● मैत्रीची ओढ | – *विनायक कानेटकर* | ४३ |
| ❋ किशाभाऊ पटवर्धन–एक झपाटलेले झाड | – *डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले* | ४४ |
| ❋ वृद्धिंगत होणारा सुसंवाद | – *गजानन अनंतराव गद्रे* | ४८ |
| ● जीवनाचे सार्थक झाले. | – *श्रीमती सुलोचना शिंदे* | ५२ |
| ❋ 'मी पाहिलेला कृष्ण' | – *म. शं. जव्हेरी (ॲडव्होकेट)* | ५३ |
| ● सेवाव्रती कर्मयोगी | – *हरिभाऊ शिंदे* | ५४ |
| ❋ एक ध्येयवेडा स्वयंसेवक | – *डॉ. सच्चिदानंद परळीकर* | ५५ |
| ❋ माझे पटवर्धन सर | – *अ. प्र. कुलकर्णी* | ५९ |
| ❋ सदैव सगळ्यांची काळजी करणारे सर | – *ॲड. सौ. भाग्यश्री बोरा* | ६१ |
| ● व्यक्ती नश्वर, कार्य चिरंतन | – *अरविंद हर्षे* | ६३ |
| ❋ 'अध्यात्म' जाणणारे मा. कृष्णराव | – *अशोक निरफराके* | ६४ |
| ● शब्द झाले स्तब्ध मुके। | – *रमेश इनामदार* | ७३ |
| ❋ मी पाहिलेले किशाभाऊ | – *बाळासाहेब दळवी* | ७४ |
| ● सारे.... सारे.... देऊन गेलात | – *अनामिक* | ७५ |

| | | |
|---|---|---|
| ❋ सच्चा माणूस | – *डॉ. श्रीराम गीत* | ७६ |
| ❋ अभ्यासू आणि आग्रही किशाभाऊ | – *सौ. संगिता भंडगे* | ७९ |
| ❋ 'ओवाळणी' 'स्व'-रूपवर्धिनीची | – *श्रीमती कमल टाककर* | ८० |
| ❋ एका देवमाणसाच्या छायेखाली | – *सुभाष भोसले* | ८१ |
| ❋ मनामनातली धग जागवणार-जपणारे 'सर' | – *डॉ. सौ. मनीषा नारकर* | ८२ |
| ❋ किशाभाऊ पटवर्धनरूपी परिसाचा स्पर्श | – *त्र्यंबकराव आपटे* | ८४ |
| ● वंदितो आज तव पदकमला...... | – *मामा मोडक* | ८६ |
| ❋ एक सहृदय मार्गदर्शक | – *विलास कुलकर्णी* | ८७ |
| ❋ 'असे गुरुजी पुन्हा भेटणे नाही!' | – *नारायण श्रॉफ* | ९४ |
| ❋ निगर्वी स्वभावाचे किशाभाऊ | – *शरद घाटपांडे* | ९६ |
| ● कृष्ण कुठे गेला? | – *श्रीमती निर्मला रोंघे* | ९७ |
| ❋ योग्य वेळी कानउघडणी झाली म्हणून... | – *सुहास पंढरीनाथ पवार* | ९८ |
| ❋ त्वमेव माता – पिता त्वमेव | – *डॉ. सोमनाथ सलगर* | १०० |
| ● अंत नव्हे सुरुवात... | – *गोपाळ संत* | १०३ |
| ❋ सहकारी कार्यकर्त्याच्या काही आठवणी | – *मल्लापा सोलापुरे* | १०४ |
| ❋ आधार एका 'सावलीचा' | – *प्रा. गणेश द. राऊत* | १०५ |
| ❋ लोकहितं मम करणीयम् । | – *शरद हरी भिडे* | १०७ |
| ● दीर्घायुष्याचे रहस्य | – *डॉ. विनेश नगरे* | १०९ |
| ❋ कृतिशील कर्मयोगी लोकशिक्षक | – *सोमनाथ दिगंबर पाटसकर (राजीव)* | ११० |
| ❋ भाग्य : मोठ्या सरांच्या सेवेचे | – *अशोक मुटकुळे* | ११३ |
| ❋ प्रेरणा, प्रोत्साहन आणि संस्कार | – *डॉ. सौ. रोहिणी दिघे (तेंडूलकर)* | ११४ |
| ● मनकवडे किशाभाऊ | – *सौ. मेघा नडे-नगरे* | ११५ |
| ❋ सर्वांना सारखे वागवणारे 'सर' | – *राघप्पा गोविंद चौगुले* | ११६ |
| ❋ नित्य प्रेरणादायी कार्यमग्नता | – *डॉ. शांताराम हरी केतकर* | ११९ |
| ❋ स्मृतिगंध | – *सुधाकर मुळे* | १२१ |
| ● देहाकडून देवाकडे जाताना... | – *अनिल काळे* | १२४ |
| ❋ माणूस घडवणाऱ्या कार्यशाळेचा निर्माता | – *श्रीकांत मोहन यादव* | १२५ |
| ● योगसाधना | – *दत्ता शेडगे* | १२९ |

❋ हवाहवासा वाटणारा सहवास – *सतीश श्रीकृष्ण चितळे* १३०
❋ दत्तजयंती ! नव्हे कृष्णजयंती !! – *सतीश माळी* १३२
● प्रोत्साहन देणारे किशाभाऊ – *श्रीमती पुष्पाताई नडे* १३३
❋ सोबत करणाऱ्या आठवणी – सरांच्या ! – *विजय विश्वासराव* १३४
● मुलांच्या भवितव्यासाठी झटणारे सर! – *श्री. दामजी* १३७
❋ एक कृतार्थ जीवन – *आबा अभ्यंकर* १३८
❋ सेवेतून सेवेकरी घडविणारे किशाभाऊ ! – *ॲड. सौ. नीलिमा गोखले* १४०
❋ दर्शन 'गृहस्थ' किशाभाऊंचे – *अरविंद वि. केळकर* १४३
● दूरदर्शन आणि किशाभाऊ – *दत्तात्रय बाळू शेडगे* १४४
❋ माणसांचं मोल जाणणारा 'माणूस' – *डॉ. रा. ल. देवपूरकर* १४६
❋ दर्शन–भावावस्थेतील किशाभाऊंचं – *केदार पारगावकर* १४९
❋ किशाभाऊंचे सलगी देणे कैसे असे ? – *डॉ. प्रदीप आगाशे* १५४
❋ आठवणी म्हणजे सुखद भूतकाळ – *प्रा.सौ. छाया सकटे (गायकवाड)* १५६
❋ Kishabhau : A Genuine Man – *Swami Divasevananda (Milind)* १५८
● नि:स्वार्थीपणाचा संस्कार – *श्रीमती पुष्पाताई नडे* १६०
❋ मूर्तिमंत गुणग्राहकता – *श्रीमती अरुणा द. बर्वे* १६१
❋ किशाभाऊ–एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व – *नंदकुमार कानडे* १६३
❋ वटवृक्षाच्या छायेत... – *मधुकर अ. गद्रे* १६५
● ओळखी न विसरणारे सर – *श्रीमती गीता तांबे* १६७
❋ भाग्यवंत सांज – *श्रीकांत तथा मामा मोडक* १६८
● प्रोत्साहन आणि नकळत प्रशिक्षणही...– *श्रीमती पुष्पाताई नडे* १६९
❋ सहवासातून जाणवलेले किशाभाऊंचे व्यक्तिमत्त्व –*शिरीष पटवर्धन* १७०
❋ सरांच्या धपाट्यातून प्रेरणा मिळत गेली – *सुभाष चलवादी* १७५
❋ मातेच्या ममतेने समाजाला जवळ घेणारे किशाभाऊ – *जयंत कवठेकर* १७७
❋ परि हे तुमचेनि झाले। म्या हे नाही केले।
*(कै.कृ.ल. पटवर्धन यांचे निवृत्तीपत्र)* १८३

# कै. कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन जीवनपट

**कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती ।**

- जन्म दिनांक – २५ डिसेंबर, १९२०  निधन : २९ जुलै, २००४
- शिक्षण – बी एस्सी (ऑनर्स), एम्. एड्.

**कार्य परिचय –**

- १९४२च्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षण सोडून दिले.
- १९४५ ते १९५१ या कालावधीत रा. स्व. संघाचे प्रचारक म्हणून धुळे-चाळीसगाव या भागात काम केले.
- प्रचारक म्हणून काम करायचे थांबविल्यानंतर पुण्याच्या राजा धनराज गिरजी विद्यालयात शिक्षक म्हणून रूजू झाले.
- राजा धनराज गिरजी विद्यालयातून डिसेंबर १९७८ मध्ये मुख्याध्यापक पदावरून निवृत्त.
- ज्ञानप्रबोधिनी या संस्थेच्या स्थापनेपासून कार्यकर्ता या नात्याने विविध कामात सहभाग. ज्ञानप्रबोधिनीचे संपर्क अधिकारी म्हणून १९६४ ते १९७६ या कालावधीत काम केले. विविध क्षेत्रातील गुणी व्यक्तींना प्रबोधिनीच्या संपर्कात आणले.
- शिक्षक म्हणून काम करीत असताना अनेक गुणी परंतु गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी आधार दिला. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे सोने झाले. अशा प्रकारच्या कामातूनच निवृत्तीनंतरच्या कामाची दिशा त्यांच्या मनामध्ये पक्की झाली.
- रामकृष्ण मिशन, विवेकानंद केंद्र, प्रसाद मासिक अशा संस्थांच्या कामातही ते सक्रिय होते.

- डिसेंबर १९७८ मध्ये निवृत्त झाल्यानंतर लगेचच म्हणजे १ जानेवारी १९७९ पासून एका वेगळ्या शैक्षणिक प्रकल्पाची सुरुवात करण्यासाठी स्वतःला पूर्णवेळ झोकून दिले. 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने पुढे हेच काम समाजाला परिचित झाले. 'आर्थिक किंवा सामाजिकदृष्ट्या उपेक्षित/दुर्लक्षित समाजघटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' हे या कामाचे प्रमुख सूत्र नक्की झाले. १३ मे, १९७९ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना. स्थापनेपासून कार्याध्यक्ष या नात्याने संस्थेच्या कामाला वाहून घेतले.
- अनौपचारिक, शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून सुरू झालेल्या या प्रकल्पातून आजपर्यंत अनेक गुणी विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने विकास झाला आहे. अनेक कर्तृत्त्ववान मुला-मुलींना या प्रकल्पाच्या माध्यमातून समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळाली. पूर्णवेळ काम करणारे कार्यकर्तेही यातून निर्माण झाले.
- १९८८ च्या मे महिन्यात संस्थेने स्वतःच्या वास्तूत प्रवेश केला. स्वतःच्या वास्तूचे स्वप्न पटवर्धन सरांनी केलेल्या अफाट कष्टांमुळे सत्यात उतरले. दोन मजल्यांचे बांधकाम असलेली ही वास्तू सुरू झालेल्या विविध उपक्रमांमुळे अपुरी पडू लागली. पाहता पाहता १९९३ मध्ये आणखीन दोन मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले.
- या महत्वाकांक्षी बांधकाम प्रकल्पासाठी कै.पटवर्धन सरांनी वयाच्या पंचाहत्तरीतही पुणे-मुंबईच्या सतत प्रवासातून आवश्यक तो निधी उभा केला.
- कै. कृ. ल. पटवर्धन यांच्या प्रेरणेमुळे अनेक प्रकल्प वर्धिनीत सुरू झाले आणि आकाराला आले.
- वाढत्या विस्तारामुळे निधीची आवश्यताही वाढू लागली. त्यासाठी अधिक काही प्रयत्न करावेत म्हणून वयाच्या अठ्याहत्तराव्या वर्षी त्यांनी इंग्लंड व अमेरिका या देशांचा चार महिने प्रवास केला. शेकडो हितचिंतक मिळविले आणि मोठ्या प्रमाणावर निधीही मिळविला.

* कै. कृ. ल. पटवर्धन यांनी केलेल्या समाजसेवेची दखल शासनाने आणि समाजाने वेळोवेळी घेतली. त्यांच्या विषयीची कृतज्ञता अनेक पुरस्कारांच्या रूपाने प्रकट केली. श्री. पटवर्धन सरांना आजवर अनेक पुरस्कार मिळाले त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत –
* आदर्श शिक्षक पुरस्कार – पुणे महानगर पालिका (१९७८ व १९८८)
* श्रीमती रमाबाई औटी विकास प्रतिष्ठान तर्फे सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल 'देवल पुरस्कार' (हस्ते श्री. अटलबिहारी वाजपेयी –१९९१)
* ॲड. डी. आर. नगरकर फौंडेशनतर्फे सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल मानपत्र व पुरस्कार (१९९१)
* टिळक नगर शिक्षण संस्था, डोंबिवली यांचे तर्फे 'तेजस पुरस्कार' (हस्ते श्री. वि. वि. चिपळूणकर, शिक्षक संचालक)
* ज्येष्ठ नागरिक संघातर्फे पुरस्कार (१९९५)
* शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल श्री. एस. एल. गद्रे पुरस्कृत कै. ल. ग. गद्रे पुरस्कार (महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड, १९९५)
* रोटरी क्लब–पुणे मिड टाऊन च्या वतीने 'सर्विस एक्सलन्स प्रोग्रॅम ॲवॉर्ड'
* विद्या सहकारी बँकेचा 'विद्या व्यास' पुरस्कार (हस्ते श्री. नानाजी देशमुख)
* शारदीय सिस्टिम तर्फे शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार (हस्ते डॉ. श्री. विजय भटकर)
* रमा–श्रीधर स्मृती न्यास पुरस्कार
* स्वामी विवेकानंद स्मृतिशताब्दी समिती, कोथरूड तर्फे पुरस्कार (हस्ते श्री. राम शेवाळकर)
* नानासाहेब दांडेकर चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कार
* फाय फौंडेशन पुरस्कार १९९६ (हस्ते श्री. अर्जुनसिंग)
* रोटरी क्लब– पुणे पर्वती यांचे तर्फे 'चैतन्यदीप' पुरस्कार (२००४) हस्ते श्री. अनंतराव दीक्षित, संपादक दै. सकाळ
* रा. स्व. संघ जनकल्याण समिती तर्फे प.पू. मा. स. गोळवलकर तथा 'श्री. गुरुजी पुरस्कार', २००५ (मरणोत्तर).

# किशाभाऊ : एक सच्चा कार्यकर्ता

**– चं. प. भिशीकर**

श्री. कृष्णराव पटवर्धन (किशाभाऊ) यांच्याशी ओळख खूप जुनी. ज्ञान प्रबोधिनीत ते श्री.अप्पा पेंडसे यांचे सहकारी असल्यापासूनची. पण ही नुसती ओळख. खऱ्या अर्थाने मैत्री नव्हे. ओळख वरवरची आणि औपचारिक असू शकते, तर मैत्रीत जिव्हाळा असतो, हृदयातील भावनांची गुंफण असते. किशाभाऊ माझे मित्र झाले ते गेल्या सुमारे पंधरावीस वर्षात. या मैत्रीलाही भक्कम आधार होता समान जीवनध्येयाचा. या जीवनध्येयासाठी काम केले पाहिजे अशा उत्कट आकांक्षेचा.

**'कार्य' म्हणजे काय ?** कामाची माध्यमे आम्हा दोघांची वेगवेगळी होती. किशाभाऊंचा अधिकांश कार्यकाळ शिक्षण क्षेत्रातील सेवेत गेला होता तर माझी गांठ लेखन, वाचन, भाषण, प्रवचन, चर्चा, बैठक यांच्याशी बांधली गेली होती. पण क्षेत्र वेगळे असले तरी कार्य एकच होते ना ? मला आठवते, माझी किशाभाऊंची पहिली चर्चा झाली ती 'कार्य' म्हणजे काय? या प्रश्नावरच. या प्रश्नावर किशाभाऊंची मते ठाम होती. आता विशेष कौतुकाची गोष्ट ही की त्यांनी स्वत: तसे आचरण करून दाखविले. 'कार्यकर्ता' हे ब्रीद व्यवहारात सिद्ध केले. मी असे पाहिले आहे की अनेकजण निरनिराळ्या क्षेत्रात खूप काम करतात, कष्ट उपसतात पण त्यांची एकांडी शिलेदारी असते. **किशाभाऊंची कल्पना अशी होती की माणसाने स्वत: योजनापूर्वक काम तर केलेच पाहिजे पण जबाबदारी पेलू शकतील आणि कार्य वृद्धिंगत करतील, असे अनेक कार्यकर्तेही त्याने उभे केले पाहिजेत.** डॉ. हेडगेवार किंवा श्री. गुरुजी यांचे खरे मोठेपण त्यांनी देवदुर्लभ कार्यकर्ते, जे देशभर ठायी ठायी उभे केले, त्यात आहे. चार सरसंघचालक काळाच्या पडद्याआड गेले, पण संघाचे कार्य सतत चालू आहे.

**नैतिक प्रभाव –** किशाभाऊंनी 'स्व'-रूपवर्धिनीची जी पायाभरणी

केली व तिचा जो विकास घडवून आणला त्याबद्दलही म्हणता येईल की विविध कार्यक्रम आणि उपक्रम यांच्याद्वारे त्यांनी अनेक ध्येयनिष्ठ कार्यकर्ते उभे केले. त्यांना सतत दिशा दाखविली आणि जिव्हाळा दिला. अकृत्रिम प्रेमाचा ओलावा दिला. 'विकसित व्हावे, अर्पित होऊनि जावे' हे गीत किशाभाऊंचे अत्यंत आवडते होते. अर्पित होऊन जाणे म्हणजे स्वार्थाला तिलांजली आणि कार्याला बाधक ठरणाऱ्या सर्व अवगुणांना मूठमाती ! यात सगळा व्यवहार येतो. 'स्व'-रूपवर्धिनीसाठी किशाभाऊंनी उदंड देणग्या गोळा केल्या, साहाय्यकर्ते मिळविले. हे साहाय्यकर्ते किशाभाऊंच्या कोणत्या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या प्रभावाखाली आले असतील असा विचार माझ्या मनांत नेहमी येतो. त्याचे उत्तर हे आहे की **किशाभाऊंनी कोणालाही व केव्हाही स्वत:साठी काही मागितले नाही**. कार्य प्रत्यक्ष पाहिले व त्यावरून किशाभाऊंची पारख मोठ मोठ्यांनी केली. श्री. प्रतापराव पवार किंवा श्रीमती बानू कोयाजी यांचे किशाभाऊंना लाभलेले सहकार्य, किशाभाऊंसंबंधी पुष्कळ काही सांगून जाते. एवढेच म्हणता येईल की हा प्रभाव मूलत: नैतिक असतो.

किशाभाऊंनी ध्येयवाद आणि वैचारिक अधिष्ठान यासंबंधी कोणालाही अज्ञानात ठेवले नाही. आकाशवाणीवरील भाषणातदेखील त्यांनी अत्यंत ठामपणे डॉ. हेडगेवार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे ऋण कृतज्ञतापूर्वक मान्य केले. 'स्व'-रूपवर्धिनीत शाखा चालते आणि यातून तयार झालेल्या वर्धिका पूर्ण वेळ कार्यकर्त्या म्हणून ईशान्य भारतासारख्या अवघड क्षेत्रात गेलेल्या आहेत. हे सर्वांना ठाऊक आहे. या कार्यकर्त्यांबरोबर किशाभाऊंचा पत्रव्यवहार असे. किशाभाऊंना वर्धकांकडून आलेली आणि किशाभाऊंनी पाठविलेली अनेक पत्रे मी वाचलेली आहेत त्या पत्रातील चैतन्य व संवेदनशीलता यांचे विस्मरण होण्यासारखे नाही.

**एकात्मतेचे दर्शन –** किशाभाऊंनी 'स्व'-रूपवर्धिनीचा जो विकास केला, त्याचा एक लक्षणीय पैलू कोणाच्याही ध्यानांत येण्यासारखा आहे. 'स्व'-रूपवर्धिनीची वास्तूच मुळी पुण्याला मंगळवार पेठेतील, एका उपेक्षित वस्तीत आहे. विभिन्न धर्मीय गोरगरीब बांधवांची घरे या वस्तीत पुष्कळ आहेत. हिंदू

गोरगरिबांचीही घरे आहेत. व्यसनाधीनता बरीच आहे पण हे वास्तव उघड्या डोळ्यांनी स्वीकारून समाजाभिमुख राहण्याचा, भेदाभेद अमंगळ मानून सगळ्यांशी समरस होण्याचा यशस्वी प्रयत्न किशाभाऊंनी केला. किशाभाऊ संघाचे व खरे हिंदुत्वप्रेमी, पण सेवा करताना त्यांची दृष्टी भेद न पाहता आंतरिक एकता व एकात्मता पाहणारी. त्यांच्या हिंदुत्वामुळेच हे घडले, असे मला वाटते. मुस्लिम माताभगिनी व त्यांची मुलेबाळे अगदी आपुलकीच्या भावनेने वर्धिनीत येतात, शिकतात, वेगळेपणाचा भाव कुठेही नसतो. सामाजिक समरसता, सहज व स्नेहपूर्ण व्यवहारातूनच निर्माण होऊ शकते. त्यासाठी तडजोडी कराव्या लागत नाहीत की कोणाची दाढी कुरवाळत बसावे लागत नाही. किशाभाऊंचे स्वयंसेवकत्व या स्नेहपूर्ण वातावरणाच्या आड आले नाही. उलट, त्याला पोषकच ठरले.

आमचे दोघांचे एका गोष्टीवर एकमत होते. ती गोष्ट अशी की 'स्व'-रूपवर्धिनीसारखी संस्था चालवितांना किंवा वृत्तपत्रीय व अन्य लिखाण करताना ऊठसूट संघाच्या नावाचा जप करावा लागत नाही. **आपला व्यवहार, आपली वागणूक व आपले लेखन-भाषण यांत निर्मलता, गुणग्राहकता, सांस्कृतिक गुणवत्ता आणि पारदर्शकता असली म्हणजे झाले.** नुसत्या आक्रमकतेतून काही साधत नाही. अनाठायी आक्रमकता व सौजन्याचा अभाव यामुळे कार्यहानीचाच संभव अधिक.

**आनंददायक सहवास –** विचारांतील या साम्यामुळे आम्ही दोघे खूप जवळ आलो होतो. अलीकडे काही वर्षे तर जागृती व्यासपीठाच्या साप्ताहिक बैठकीच्या निमित्ताने दर शनिवारी त्यांची हमखास भेट व्हायची. दीड तासाच्या बैठकीत अनेक विषयांवरील किशाभाऊंची मते ऐकायला मिळायची. काही कृती-योजना असेल, तर त्यांचे पाऊल पुढे असायचे. त्यांच्याबरोबर खाणे, कॉफी पान तर नित्याचे झाले होते. मैत्रीच्या या साऱ्या कक्षा विस्तारल्या होत्या. हास्यविनोदात, गंभीर चर्चेत आणि खाद्यपदार्थांचा समाचार घेण्यात त्यांच्या सहवासांत घालविलेला वेळ राहून राहून आठवतो. असे मित्र हरपले म्हणजे फार फार जाणवते. त्यांची रिक्त झालेली जागा अन्य कोणी भरून काढू शकत नाही.

**कार्यांची पाठणराखण –** मला राहून राहून किशाभाऊंच्या उदारमनस्कतेचे

स्मरण होते. त्यांनी 'स्व'-रूपवर्धिनीसाठी समाजाकडून पैसा मागितला व तो मिळतो हे तर सगळ्यांना ठाऊक आहे. मला स्वत:ला त्यांचे खरे मोठेपण हे वाटते की **त्यांनी पैसा उभा करताना आपपरभाव ठेवला नाही. 'स्व'-रूपवर्धिनीबरोबरच इतरही अनेक कार्यांना त्यांनी साहाय्य मिळवून दिले.** एक ठळक उदाहरण म्हणून यमगरवाडी येथील भटक्या-विमुक्तांसाठीच्या प्रकल्पाचे सांगता येईल. या प्रकल्पाची दारुण आर्थिक उपासमार होत आहे आणि या प्रकल्पाची जबाबदारी ज्यांच्यावर सोपविली होती ते श्री. गिरीश प्रभुणे अगदी वैफल्यग्रस्त मन:स्थितीमध्ये असल्याचे एका बैठकीत किशाभाऊंच्या प्रत्ययास आले. ते काहीसे बेचैन झाले. कारण हिंदू समाजातील अगदी तळातील समाजाला व्यापक समाजाचे समरस अंग या नात्याने उभे करण्याचे हे थोर कार्य होते. किशाभाऊंनी प्रभुणे यांना हिंमत दिली व लगेच मदत गोळा करण्यास प्रारंभ झाला. गिरीश प्रभुणे संतोषले. आता तर यमगरवाडी प्रकल्पाने व्यापक स्वरूप धारण केले आहे. आर्थिक मदतीचा ओघही आता बऱ्यापैकी आहे. किशाभाऊंनी ऐन बिकट काळी साहाय्याचा दिलेला आधार म्हणजे या संस्थेच्या इतिहासातील क्रांतिकारक टप्पा ठरला.

किशाभाऊंच्या या औदार्याचा अनुभव मी देखील घेतला आहे. आमच्या जागृती व्यासपीठातर्फे हिंदू समाजापुढील एका जिव्हाळ्याच्या प्रश्नावर पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरले. लेखनाचे दायित्व सर्वसंमतीने माझ्यावर येऊन पडले. मी लेखन पूर्ण केले व तसे बैठकीत सांगितले. प्रकाशनाच्या खर्चाचे काय? हा प्रश्न लगेचच पुढे आला. इथेही किशाभाऊंनी नेट लावला व पुस्तक प्रकाशित करता आले. ते वाचकांपर्यंत पोहोचावे म्हणूनही त्यांनी प्रयत्न केले. 'राष्ट्रतेजा, होई जागृत' या पुस्तकाच्या प्रत्येक उपक्रमात किशाभाऊंचा सक्रिय सहभाग होता. मी दर शनिवारी बैठकीसाठी गेल्यावर किशाभाऊंचे स्मरण झाल्यावाचून राहत नाही. योगायोग असा की त्यांची बसण्याची जागा माझ्या शेजारचीच होती. किशाभाऊ खरोखरच एक जागरूक व राष्ट्रनिष्ठ हिंदू होते. त्यांची संघनिष्ठाही प्रखर होती. 'स्व'-रूपवर्धिनीतर्फे भरविण्यात येणाऱ्या अनेक शिबिरांना किशाभाऊ मला बोलवायचे. उत्तम चर्चा व्हायची, लहान वयाच्या युवक-युवतींशी सुसंवाद साधला जायचा. किशाभाऊ

सर्वांच्या ओळखी करून द्यायचे.

किशाभाऊंच्या अखेरच्या दुखण्यात 'रुबी हॉल'मध्ये अनेकदा त्यांना भेटायला जात असे. दुखण्याला सारखा चढ-उतार होता. किशाभाऊ नामक एक सळसळते चैतन्य त्या तशा विकल अवस्थेत अंथरुणाला खिळलेले पाहून नेत्राची मोठी कालवाकालव होई. दोन खोटे खोटे उत्साहाचे आणि आशावादी शब्द बोलून त्यांचा तेवढ्यापुरता निरोप घ्यावा लागे. सगळेच मोठे दु:खद, पण माझ्या किंवा त्यांच्या अन्य मित्रांच्या हाती काय होते ? परमेश्वराला प्रार्थना मात्र मी रोज करीत असे. किशाभाऊंच्या स्मृतीला पुन: पुन्हा नमस्कार.

## त्यांचे कार्यच प्रेरणा देत राहील.

श्री. किशाभाऊंच्या दु:खद निधनाची वार्ता समजली. अनपेक्षित नव्हे पण वेदना देणारी अशी ही वार्ता होती. वयाच्या बालपणी केव्हातरी जाणते-अजाणतेपणी त्यांनी देशसेवेचे व्रत स्वीकारले व जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी त्याचे पालन केले. अशा तपस्वी पार्थिवरूपी शरीराचे दर्शन पुन्हा होणार नाही याचे वाईट वाटते. बोलणे-चालणे, त्यांचा सर्व व्यवहार हा एकाच स्वयंस्वीकृत कार्यासाठी होता. त्यांची ध्येयासक्ती प्रखर व तेजस्वी होती. संस्कार विचार संक्रमित करण्याची अद्‌भुत शक्ती त्यांनी संपादन केली होती. समाजावरील विश्वास ही त्यांची शक्ती होती. अपेक्षित परिवर्तन घडविण्यासाठी लागणारा आत्मविश्वास ही त्यांची खरी संपत्ती होती. आता त्यांच्या अनुपस्थितीची कल्पनाच करता येत नाही. त्यांच्या पावन स्मृती, कणाकणाने झिजून त्यांनी केलेले कार्य हेच तुम्हा-आम्हा सर्वांना सतत प्रेरणा देत राहील.

**भैयाजी जोशी**
**सरकार्यवाह-रा.स्व.संघ**

# आशावादाचा झरा...

**– प्रतापराव पवार**

पुण्यात व्यवसायासाठी आल्यावर अंधशाळेमुळे माझा सामाजिक क्षेत्रात काही अंशी सहभाग सुरू झाला. काळाबरोबर ओळखी वाढू लागल्या. परिचयाचे मैत्रीमध्ये रूपांतर होऊ लागले. ज्यांचा स्नेह हा कायमस्वरूपी मैत्रीमध्ये परिणत झाला, त्या प्रमुख व्यक्तींपैकी एक म्हणजे किशाभाऊ पटवर्धन.

डॉ. अच्युतराव आपटेंप्रमाणेच किशाभाऊंचे आयुष्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी निगडीत झालेले होते. आणि निवृत्त झाल्यावर त्याचे क्षेत्र त्यांनी व्यापक केले. त्यांचा मूळचा पिंड संघाचा होता. त्यांनी समाजातील पीडित मुलामुलींसाठी घेतलेले कष्ट अतुलनीय होते. अभ्यास, संस्कार, प्रगल्भता यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणलेले बदल हे आश्‍चर्य वाटावे इतके मोठे होते. याच त्यांच्या ध्येयवादामुळे मी त्यांच्याकडे आकर्षित झालो. आमच्या २५-३० वर्षांच्या सहवासात त्यांना मी नेहमी उत्साही, आशावादी, प्रयत्नशील या रूपात पाहिले. **अनेकदा सकाळी मला आलेला पहिला फोन किशाभाऊंचा असे. त्यांचा आग्रह, कामाचे स्वरूप, गरज यांबाबत त्यानां होकार देण्याशिवाय माझ्यापुढे पर्याय नसे. हा माणूस इतक्या तळमळीने काम करतो, त्याला आपण आपली अडचण कशी सांगणार, असा विचार काही वेळा मनात येत असे.**

तसे किशाभाऊंनी सतत माणसे जोडण्याचा ध्यास आयुष्यभर घेतला. पुढील पिढी तयार करण्यासाठी ते सातत्याने विचार करीत. आपल्याप्रमाणेच संस्थेला वाहून घेणाऱ्या पिढीबद्दल त्यांना मनापासून समाधान होतं. शिरीष पटवर्धनपासून अनेक तरुण कार्यकर्त्यांची फळी त्यांनी उभी केली. माझ्यानंतर संस्था मागे पडणार नाही असे ते मला नेहमी सांगत. माझ्यासारख्या अनेक हितचिंतकांचा या कार्याला कायमचा पाठिंबा राहील, याबद्दल ते दक्ष असत.

जी व्यक्ती समाजहितासाठी स्वतःला वाहून घेते, चोवीस तास, बारा महिने एकच ध्यास जिला आहे, अशा वेळी त्याला सहकार्य हेही चोहोबाजूंनी मिळते. त्यांच्याबद्दल साशंकता व्यक्त केलेल्या व्यक्तीसुद्धा नंतर सहकार्य द्यायला लागल्या, कौतुक करायला लागल्या.

माझ्या मागे लागून ते डॉ. बानू कोयाजींना भेटले. सुरवातीला त्या तयार नव्हत्या. संघ हा त्यांच्या दृष्टीने काळजीचा भाग होता. पण काम चांगले असल्यास अशा गोष्टी बानूबाई बाजूला ठेवत, याची मला कल्पना होती. संघ अथवा राजकीय पक्ष यापासून मीही दूर राहतो. पण व्यक्तीच्या कामाचे स्वरूप सामाजिक असल्यास कामाला महत्त्व द्यावे ही माझीही भूमिका होती. त्याचमुळे मी त्यांची किशाभाऊंबरोबर आग्रहाने ओळख करून दिली, अर्थातच ज्याचे रूपांतर त्या उभयतांच्या स्नेहामध्ये झाले. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

समाजातील अनेकांचा स्वरूपवर्धिनीशी परिचय व्हावा, तसेच तेथील विद्यार्थ्यांना या लोकांचा सहवास मिळावा, यासाठी किशाभाऊ प्रयत्नशील असत. विद्यार्थ्यांबरोबर एक संध्याकाळ मी घालवावी, त्यांच्याशी संभाषण, प्रश्नोत्तररूपी संवाद व्हावा यासाठी ते आग्रह धरत. किशाभाऊंना नाही म्हणणे मला शक्य होत नसे. त्यांनी सांगितलेली कामे मी आनंदाने प्रयत्नपूर्वक करीत असे, शेवटी हे सर्व ते अडचणीतील विद्यार्थ्यांसाठी करीत असत. त्यात जात, धर्म ही बाब नसे.

'स्व'-रूपवर्धिनीच्या मुलांच्या टीव्ही, रेडिओवरील मुलाखती फारच प्रभावी ठरल्या. विद्यार्थ्यांचे विचार, समजूतदारपणा, प्रगल्भता तोंडात बोट घालावे इतक्या वरच्या दर्जाची होती. घडवणूक केल्याने काय होऊ शकते याचे ते उत्तम उदाहरण होते. धुळीत पडलेले अनेक हिरे शोधून त्यांना पैलू पाडण्याचे काम किशाभाऊंनी स्वतः आणि आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने केले. अशा गोष्टींमुळेही मी किशाभाऊंच्या आणि 'स्व'-रूपवर्धिनीच्या जवळ गेलो तो कायमचाच.

अच्युतराव आपटे, किशाभाऊ या लोकांचा सहवास मला जवळून मिळाला हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांच्यासारखे अनेक कार्यकर्ते पुण्याला लाभले, हे माझ्या मते पुण्याचे भाग्यच आहे. या **मातीची काय जादू आहे हे माहीत**

**नाही; पण इतक्या टोकाची निरलस, प्रामाणिक, पूर्णपणे वाहून घेतलेली मंडळी महाराष्ट्रात – प्रामुख्याने पुण्यात निर्माण झाली. याचमुळे अनेक कार्यक्षेत्रातील संस्था निर्माण झाल्या, विस्तारल्या.** कार्यकर्त्यांची फळी या लोकांभोवती जमा झाली. परंपरा निर्माण झाल्या. याचे निर्विवाद श्रेय या सज्जनांना जाते. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, या लोकांचा प्रचंड आशावाद. त्यांच्या चेहऱ्यावरील हसू कधी मावळले नाही आणि यांना मी कधीच त्रागा केलेले पाहिले नाही.

विचारमंथन, प्रयत्नवाद यांच्या जोरावर अडचणींचा सामना ते करीत असत. अडचण आहे ना, मग ती कशी, कोणाकडून सोडवून घ्यायची हाच विचार ती सुटेपर्यंत अखंडपणे अशा व्यक्तींमध्ये दिसत असे. माझे ते एक शिक्षणच होते. माझ्या आयुष्यातील कोणत्याही प्रकारची तक्रार सांगत बसणे हे मलाही अवघड झाले.

अखेरच्या काळात किशाभाऊंनी आपली जी काही स्थावर मत्ता होती तीही 'स्व'-रूपवर्धिनीला देऊन टाकली. तन-मन-धन अर्पण केलेला तो एक तपस्वी होता. त्यांच्या त्यागाची संस्काराची परंपरा चालू रहावी, यातून अनेक व्यक्ती, संस्था निर्माण व्हाव्यात, हीच किशाभाऊंना आदरांजली होऊ शकते.

*किशाभाऊंच्या बरोबर मी १९४४ पासून स्वयंसेवक म्हणून होतो. पुढे ते आर.डी. हायस्कूलमध्ये तर मी आगरकर स्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करीत होतो. एक कलाकार म्हणून ते माझे मनापासून कौतुक करीत असत. तुळशीबाग सार्वजनिक गणेश मंडळाच्या मिरवणुकीत वर्धिनीची पथके यायला लागल्याने मला पुन्हा त्यांचा सहवास मिळू लागला आणि त्याचा मला खूप अभिमान वाटत होता.*

**डी.एस. खटावकर**

# हसरे गांभीर्य

**– वा. ना. अभ्यंकर**

किशाभाऊंच्या नावामागे 'कै.'चा वापर करायला अजून लेखणी धजावत नाही. १९७७ पूर्वीपासून जेव्हा केव्हा कृष्णरावांची (माझ्या नित्य सरावाचे नाव) भेट होई तेव्हा त्यांचे हातावर टाळी देत खळखळून हसणे नेहमीच अनुभवीत आलो. लक्ष्मीरोडवरील 'जनसेवा दुग्धालयात' त्यांनी आग्रहपूर्वक पाजलेल्या दुधाच्या घोटाबरोबरचे ताज्या बिस्किटांसारखे कुरकुरीत हास्य आज तरी उथळपणा नव्हता. विचारांची व चिंतनाची खोली या प्रसन्न आणि खळाळून हसण्यामुळे वाढतच असे.

कृष्णरावांची भेट झाल्यानंतर त्यांच्या कृष्णलीलांचा, कृष्णकृत्यांचा आणि कृष्णकारस्थानांचा उल्लेख झाला नाही असे क्वचित्‌च घडे. क्वचित् कृष्णशिष्टाईचा किंवा शिष्टपणाचा उल्लेखही त्या संभाषणात येऊन जायचाच. लीलाताई समोर असताना कृष्णलीलेचा श्लेष नक्कीच उल्लेखिला जाई. परस्परांची थट्टामस्करी झाल्यावर मग 'माननीय क्र. १', 'माननीय क्र. २', इत्यादींची खुशाली विचारली जायची. माननीयांच्या या मालिकेतील माझा क्रमांकही लागायचा किंवा वरखाली जायचा. हीसुद्धा एक गंमत अनेकदा चालायची.

१९८५ मध्ये निगडी येथील नवनगर विद्यालयाच्या क्रीडा प्रात्यक्षिकांना कृष्णराव प्रमुख अभ्यागत होते. क्रीडा प्रात्यक्षिकांनंतर मार्गदर्शक विचार मांडतांना ते म्हणाले, ''या नवनगरात नव्हे तर वामनरावांच्या नवनिर्माणनगरात'' असा उल्लेख करून कृष्णरावांनी निगडी येथील उगवत्या कामाचे केलेले मूल्यमापन श्रोत्यांची दाद मिळवून गेले. त्यांच्या भविष्यदर्शी विचारांमधून उच्चारलेले शब्द पुढे झालेल्या महत्त्वपूर्ण कामाची भविष्यवाणी ठरले. वाचमर्थोऽनुधावति। (अर्थ शब्दांमागोमाग जातो) याचाच जणू तो प्रत्यय होता. 'स्व'-रूपवर्धिनीच्या अनेक कार्यक्रमांना, समारंभांना उपस्थित असताना असे जाणवत असे की कृष्णरावांनी इतर अनेकांना व्यासपीठावर बसवून त्यांना मोठ्या कामाची स्वप्ने दिली. ते स्वत: मात्र समारंभात बाजूला कोठेतरी आढळत असत किंवा दिसतही नसत. अनेकांचे कौतुक करीत.

त्यांना दायित्व घेण्याचे शिकवीत, आपण स्वत: हलकेच मागे राहून त्यांना मोठे बनवीत. अखेरच्या क्षणीही ते काळाच्या पडद्याआड जाता जाता अनेकांना मोठे बनवून गेले. त्यांचा आश्वासक हात सतत पाठीवर असताना काम करण्याचा अभ्यास असलेल्या कार्यकर्त्यांना त्यांच्या नास्तित्वामुळे, अधांतरी असल्याचे वाटणार नाही.

कृष्णरावांच्या मृत्युपूर्वी सुमारे एक वर्ष आम्ही दोघे एकत्र त्यांचे घरी असेच हसत खेळत भोजन केल्याची आठवण आजही तितकीच ताजी आहे. आम्ही दोघांनी एका उद्यानात जाऊन एक दिवस मोकळेपणे गप्पा मारीत बरोबरीने आनंदात घालविण्याचे ठरविले होते. पण ते प्रत्यक्षात येण्यापूर्वीच कृष्णराव पडल्यामुळे धराशायी झाल्याचे कानी आले. ते पुन: उठून उभे राहिले की त्यांची इच्छा पूर्ण करावी असे मनात म्हणत होतो. पण मला प्रवेश मिळाला तर स्वर्लोकातील बागेतच ही हौस पूर्ण होऊ शकते. दोघांच्या गप्पा, हसणे-खिदळणे आणि मनातील गंभीर विचारांनी नैराश्याचे, अनुत्साहाचे विचार बुडवून टाकावेत आणि उत्साहाने पुनश्च कामाला लागावे याचा एक भक्कम आधार दुरावला असे काही वेळ वाटले; **पण हसऱ्या गांभीर्याच्या केवळ आठवणीनेसुद्धा तोच आनंद आणि उत्साह मिळत राहील असे विश्वासाने म्हणावेसे वाटते. हसते चिन्तकाय नम: ।**

माझा आणि सरांचा तसा फार उशिरा संबंध आला. आम्ही एकाच शैक्षणिक संस्थेच्या वेगवेगळ्या शाळांमध्ये शिक्षक म्हणून काम करीत होतो. आम्ही एकत्र येऊन काम करण्याचे प्रयोजन होते 'अन्याय निवारण'. संस्थेतील शिक्षक व सेवक यांचेवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी आमचे एकत्र येणे सुरू झाले. त्यातून परिचय वाढत गेला व नंतर घनिष्ठ संबंध आले.

मुळात पेशाने शिक्षक, गणित व शास्त्र विषयात पारंगत, शिकवण्यात हातखंडा, मुलांबद्दल प्रेम, या गोष्टी उत्तम शिक्षक म्हणून लौकिक मिळविण्यास कारणीभूत झाल्या. पुढे शाळेचे मुख्याध्यापक म्हणून उत्तम काम करून निवृत्त झाले. निवृत्तीच्या दुसऱ्याच दिवशी वर्धिनीची स्थापना करुन मुळातील काम अधिक व्यापक करून समाजभिमुख केले. या सर्व कार्यामागील प्रेरणा म्हणजे रा. स्व. संघाचे त्यांचेवर लहानपणापासून झालेले संस्कार.

**श्री. य. ना. गद्रे**

# आमचे पटवर्धन सर

**–आमदार उल्हासदादा पवार**

पुण्याचे भूषण असलेली अनंतचतुर्दशीची विसर्जन मिरवणूक. पुणे महानगरपालिकेने लकडी पूल चौकात उभारलेले स्वागत कक्ष. पुण्याचे महापौर, सन्माननीय नेते, वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत मिरवणुकीतील अनेक मान्यवर मंडळे, पथके यांच्या स्वागताकरिता व सत्काराकरिता उपस्थित. अशा वेळी 'स्व'– रूपवर्धिनीचे पथक येताना दिसले, की मला आदरणीय पटवर्धन सरांच्या आठवणी दाटून यायच्या. स्वागत कक्षामधील सर्व मान्यवरांना मी सरांबद्दल भारावून जाऊन सांगू लागायचो. त्यांच्या सामाजिक सेवेबद्दल, आम्हा सर्व विद्यार्थ्यांवर त्यांनी केलेल्या लोभाबद्दल किती सांगू आणि किती नको असे मला होऊन जायचे आणि प्रत्यक्ष सर समोर दिसल्यावर खूप प्रसन्न वाटायचे.

आज सर आपल्यात नाहीत, पण आम्हा सर्व विद्यार्थ्यांच्या मनात मात्र त्यांच्या आठवणींच्या रूपाने ते जीवंत आहेत.

**सरांचं प्रत्येक विद्यार्थ्यांवर बारकाईनं लक्ष असे. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर त्यांचे जसे लक्ष असे तसेच शारीरिक, मानसिक अशा सर्वांगीण विकासावरही त्यांचे लक्ष असे. विद्यार्थ्यांच्या घरच्या परिस्थितीकडेही ते लक्ष देत.** श्री. नारायण तळेकर हा असाच एक विद्यार्थी. आर्थिक विपन्नावस्थेने ग्रासलेला. सरांनी त्याच्याकरता खूप केले. स्वत: साह्य केलेच, पण अन्य काही जणांना जाऊन ते भेटले. आणि त्यांच्याकरवीही त्याला साह्य मिळवून दिले. पुढे हेच श्री. नारायण तळेकर तैवानमध्ये राष्ट्र संघाच्या 'तांदूळ संशोधन संस्थेचे' संचालक (Director, Rice Research Institute, UNO) झाले. योग्य वेळी सरांनी आपुलकीनं दिलेला आधार किती मोलाचा होता हेच यावरून सिद्ध होते.

सरांचं शिकवणं आजही आम्ही विसरत नाही. त्यांनी करून घेतलेलं बीजगणित – त्यातली सूत्र आणि भूमिती – त्यातली प्रमेये आज इतक्या वर्षांनी देखील आम्हाला केव्हाही पाठ म्हणून दाखवता येतात. इतकं आमचं गणित सरांनी

घटवून घेतलं होतं. आणि याचा परिणाम म्हणजे मला बीजगणित – भूमितीत त्या वेळच्या जरा कठीण दर्जाच्या अभ्यासक्रमात १०० पैकी ९९ गुण मिळाले होते. सरांनी वैयक्तिक लक्ष देऊन आमच्यावर घेतलेल्या परिश्रमांचं हे फळ होतं. काही वेळा विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळत नसे. पण अशा वेळी सर कोणालाही कधीही निराश करीत नसत. त्याची हळूवारपणे समजूत घालून प्रोत्साहन देत असत.

सरांचे शिकवणं वर्गापुरतंच–शाळेपुरतच मर्यादित नव्हतं. शास्त्राच्या तासाला वैयक्तिक आरोग्य कसं राखावं याचं उत्तम मार्गदर्शन करीत. असं मार्गदर्शन करतांना वेचक उदाहरणं देत. आजही त्या मार्गदर्शनाचा विसर पडत नाही. 'आरशा पुढं उभं राहून चेहरा, कपडे याचबरोबर तोंड कसं सुंदर, स्वच्छ राहील हे निरखून पहात चला.' 'उत्तम पचन झालं तरच पोटाचं आरोग्य उत्तम रहातं.' असं म्हणून पोट साफ रहाणं याचं गमकही ते मार्मिक उदहरणांनी पटवून देत.

माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या घरी ते येत. आई–दादांशी मोकळेपणानं बोलत. मंडईतही येऊन दादांना भेटत. कौटुंबिक जिव्हाळ्याचं हे नातं त्यांनी विशेष म्हणजे–शालेय शिक्षण संपल्यावरही कायमचं ठेवलं. त्या नात्यात त्यांनी त्यांच्या जीवनाच्या अखेरीपर्यंत खंड पडू दिला नाही. प्रत्येक वर्गात ४०–५० विद्यार्थी असत. त्यातल्या अनेकांशी, विशेषत: परिस्थितीला टक्कर देऊन उभ्या राहणाऱ्या अनेकांशी, त्यांनी असे संबंध जपले होते.

माझ्या बाबतीत बोलायचे तर त्यांच्या आणि माझ्या राजकीय विचारात भिन्नता होती. तरीदेखील त्याचा यत्किंचितही परिणाम आमच्या आपूलकीच्या नात्यावर झाला नाही. त्यांच्या घरातील समारंभांना ते आवर्जून बोलवत. आग्रहाने जेऊ घालत. मी महाविद्यालयीन शिक्षण–काळात युवक चळवळीकडे ओढला गेलो. मी युवक काँग्रेसच्या पुणे शाखेचा अध्यक्ष झालो. नंतर महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचा सरचिटणीस आणि पुढे अध्यक्षही झालो. पुढे राष्ट्रीय पातळीवर वर्किंग कमिटी सदस्य, अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ (W.M.D.C) आमदार, आणि पुढे जागतिक युवक संमेलनाकरता निवड अशा **माझ्या वैयक्तिक वाटचालीच्या प्रत्येक टप्प्यावर सरांच्या कौतुकाची थाप माझ्या पाठीवर पडे. माझे आणि त्यांचे राजकीय विचार वेगळे असूनही माझ्या राजकीय वाटचालीतील प्रगतीचं त्यांना खूप कौतुक वाटे.** माझ्या पाठीमागे ते

अनेकांकडे माझ्याबद्दल गौरवोद्‌गार काढीत. 'राजकारणातही स्वत:चं अनुकरणीय वेगळेपण दाखवणारा विद्यार्थी' अशा शब्दांनी ते माझा गौरवपूर्ण उल्लेख करीत.

माझ्यावर सरांचा किती लोभ होता याचं एक विलक्षण उदाहरण आहे. दिल्लीला युवक मेळावा होता. परतीच्या प्रवासात काही युवकांनी गोंधळ केल्याच्या तक्रारी आल्या. मात्र मी ज्या युवक गटाचं नेतृत्व करीत होतो त्या संपूर्ण गाडीत असा कुठलाही प्रकार घडला नव्हता. अत्यंत शिस्तीत सर्व प्रवास झाला होता. परंतु पुण्यात मात्र एका निनावी पत्राद्वारे माझ्या विरुद्ध अपप्रचार करण्यात आला. बेशिस्त वर्तन करणाऱ्या गटाचं नेतृत्त्व माझं होतं असा त्या पत्रात आरोप होता. हे पत्र 'तरुण भारत'नं छापलं होतं. मला खूप राग आला. वाईटही वाटलं. निनावी पत्रातले आरोप ग्राह्य धरून माझ्याविरुद्ध प्रचार होणं हा अन्याय होत आहे, असं वाटून मी 'तरुण भारत'ला माझं चारित्र्यहनन झाल्याबद्दलची (डिफमिशन) वकिलाद्वारे कायदेशीर नोटीस पाठवली. नंतर 'तरुण भारतने' दिलगिरी प्रदर्शित केल्यावर प्रकरण मिटले. पण या सर्व प्रकरणात, पटवर्धन सर माझ्या नोटिशीपूर्वीच 'तरुण भारत' चे संपादक श्री. चं. प. भिशीकर (जे अत्यंत साक्षेपी संपादक, संतवाङ्मयाचे अभ्यासक आहेत आणि त्यांच्याबद्दल मला खूप आदर वाटतो.) यांना समक्ष भेटून आले होते. 'उल्हास पवार माझे विद्यार्थी आहेत. मी त्यांना खूप जवळून ओळखतो. त्यांच्या हातून असं वर्तन घडणं शक्यच नाही. माझी खात्री आहे की हे कुणीतरी खोडसाळपणे त्यांच्याबद्दलच्या द्वेषापोटी केलं आहे?' असं सरांनी भिशीकरांना सांगितलं होतं. मी या बाबतीत सरांशी काहीही बोललो नव्हतो. पण तो खोडसाळ मजकूर प्रसिद्ध होताच सर माझ्यावरच्या गाढ्या विश्वासापोटीच माझ्या पाठीशी उभे राहिले. सरांच्या वैचारिक बांधिलकीशी मिळत्या जुळत्या असलेल्या वर्तमानपत्राच्या संपादकांना भेटून माझ्यासारख्या त्यांच्याहून भिन्न बांधिलकी असलेल्या विद्यार्थ्यांची पाठराखण केली हे कधीच न विसरता येण्यासारखं आहे.

# सर्जनशील संघटक

**– कृ. गो. तथा राजाभाऊ लवळेकर**

१९७७ चा सुमार असेल, श्री. तुकाराम माताडे विधान परिषदेचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत होते. त्या मोहिमेचा मी संयोजक होतो. शनिवार पेठेत मेहुणपुऱ्यात, ठाकुरांच्या घरात, निवडणूक कार्यालय होते. संध्याकाळचा सुमार. शिक्षक कार्यकर्ते येत-जात होते. या वेळी साठीकडे झुकलेली एक व्यक्ती कार्यालयात आली आणि पाचशेएक रुपये समोर ठेवले. 'हा माताडे निवडणूक निधी घ्या. ही निवडणूक जिंकली पाहिजे. आणखी लागेल ती मदत केव्हाही मागा' असे त्यांनी म्हटले. हा सुखद धक्का होता. यामागे कामाची तळमळ होती. शेजारी माताडे बसले होते. विषय शिक्षण क्षेत्रातील विधायक कामे उभी करण्याचा होता. विशेषत: विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करणाऱ्या उपक्रमांचा होता. प्रकल्पांचा होता. उपक्रमातील शिक्षकांचा शोध घेण्याचा होता. शनिवार पेठेतील एका शाळेत चालणाऱ्या विद्यार्थी मंडळाचा विषय निघाला.

श्री. माताडे सहज म्हणाले, 'शनिवार पेठेतल्या उपक्रमांचं काय सांगता? आमच्या मंगळवार पेठेत करून दाखवा.' मी म्हणालो, 'अहो, या शाळेत येणारी मुले सोमवार, मंगळवार, कसबा पेठेतलीच आहेत. शनिवार पेठेतल्या शाळेत येतात इतकंच! मंगळवार पेठेतही हा उपक्रम राबवता येईल. तुम्ही जागा द्या, कामाला उभे राहा. उपक्रम आम्ही राबवू.' माताडे यांनी आव्हान स्वीकारले. पुढे निवडणुकीत ते निवडूनही आले. 'आव्हान'चा विषय अधांतरीच राहिला....

पण विषय तसा अधांतरी राहिला नव्हता! निवडणूक निधीसाठी आपणहून पैसे आणून देणाऱ्या त्या व्यक्तीच्या डोक्यात खोलवर हा विषय रुतून बसला होता. ती व्यक्ती म्हणजे कृष्णराव पटवर्धन उर्फ किशाभाऊ! डिसेंबर १९७८ मध्ये मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाले, ते उपेक्षितांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या

प्रकल्पाची उभारणी करण्याचा निश्चय करूनच!

पुण्याच्या पूर्व भागातील उपेक्षित विद्यार्थ्यांचे जीवन त्यांनी जवळून पाहिलेले. त्यांच्या घरच्या समस्या यांना तोंडपाठ! बुद्धिमान आणि हुशार विद्यार्थी या उपेक्षितांच्या भागातही भरपूर. पण ही राष्ट्रीय संपत्ती नागझरीच्या किंवा झोपडपट्ट्यांच्या गल्लीबोळातून वाहणाऱ्या गटारगंगेच्या काठाशीच खेळत आयुष्य घालवणार, म्हणजे राष्ट्रीय संपत्तीचे केवढे मोठे नुकसान! ही आपल्या मनाची व्यथा दूर करण्यासाठी उर्वरित आयुष्यात अशाच वस्तीत, उपेक्षित विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा कार्यक्रम मनात पक्का योजलेला. १९७८ च्या दिवाळीच्या सुमारास संध्याकाळी ते असेच माझ्या शाळेत आले. 'आता काय कार्यक्रम आहे?' त्यांनी प्रश्न विचारला. 'शाळा सुटली की घरी जायचे.' मी उत्तर दिले. ते एका बैठकीचे निमंत्रण घेऊन आले होते. त्यांच्याबरोबर बैठकीला गेलो. कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळातील त्यांचे काही तरुण शिक्षक सहकारी एकत्र जमले होते. अनिता साळुंके, नारायण शहरकर, य. ना. गद्रे आणि गोपाळराव बिडकर यांची भेट झाली. कृष्णरावांनी त्या बैठकीत 'व्यक्तिमत्व विकास केंद्रा'च्या कल्पनेची रूपरेषा सर्वांसमोर मांडली. मला ती विशद करायला सांगितली आणि 'त्या केंद्राचा प्रारंभ केला पाहिजे' एवढेच ठरले. पुढे सामान्यत: दर महिन्याला असेच काही तरुण उत्साही शिक्षक एकत्र येत राहिले. संयोजक अर्थातच श्री. कृष्णराव पटवर्धन. या उत्साही कार्यकर्त्यात शिक्षकांमध्ये दि. रा. भसे, त्र्यंबकराव आपटे, मधू फडके अशीही मंडळी असत. बैठक रविवारात सुगंधी आळीत एका फर्निचरच्या दुकानात असे. योजनेला आकार येत गेला आणि 'व्यक्तिमत्त्व विकास केंद्रा'च्या कामाचा शुभारंभ झाला तो मंगळवार पेठेतील कडबाकुट्टीत, सदानंदनगर झोपडपट्टीच्या परिसरात नागझरीच्या काठावर. या वेळी अण्णासाहेब गोगावले, कांचनभाई शहा, पुरुषोत्तमभाई श्रॉफ असे काही जण प्रारंभीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांत होते.

योजनेत ठरल्यानुसार महापालिकेच्या विविध शाळांतील सुमारे सहाशे

विद्यार्थ्यांना बुद्धिमापन कसोटी दिली होती. वीस-बावीस जणांची निवड झाली होती. बारा मुलं टागोर विद्यानिकेतनमध्ये सायंकाळी एकत्र जमली. सुमारे पाऊण तास खेळ आणि नंतर दीड तास शाळेतील अभ्यासाबाबत मार्गदर्शन, एवढेच त्याचे स्वरूप होते. बाह्यत: मुलांचे अभ्यासातील प्रावीण्य आणि खेळातील कौशल्य वाढवणे एवढेच उद्दिष्ट; पण मनात मात्र कुशाग्र बुद्धीच्या या मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडावा, असे स्वप्न आणि ध्यास होता. कारण त्यांचा बुध्यंक सामान्यत: १२० ते १३० च्या जवळपास. मातीतले सोने उजळून काढणे, त्यांचे अलंकार घडविणे, अशी मनोमन योजना होती. त्यासाठी काही शिक्षकांची निवड झाली होती. पण त्याहीबरोबर या मुलांच्या वर्तनात बदल घडवून त्यांच्या माध्यमातून मुलांचे जीवन, त्यांचे घर, त्यांचे कुटुंब घटक, परिसर आणि त्याप्रमाणे संपूर्ण वस्ती, समाज, या सर्वांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची जिद्द आणि आत्मविश्वास हे कृष्णरावच करू जाणे! श्री. कृष्णराव पटवर्धनांच्या या कल्पनेचा उगम कसा झाला याचा मागोवा घेणे उपयुक्त ठरेल असे वाटते. त्यांचे पूर्वजीवन त्यासाठी साक्षेपाने पाहिले पाहिजे.

श्री. कृष्णरावांचा विद्यार्थिदशेतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आला होता. तेथील शिस्त, सद्‌गुणांची ओढ, अभ्यासप्रियता, देशभक्ती आणि मित्रत्व वाढविण्याची तळमळ अशा गुणांचे बीजारोपण त्यांच्यामध्ये विद्यार्थी जीवनात झालेले होते. शिक्षण पूर्ण करीत असतानाच तारुण्यातील काही वर्षे समाजाकरिता द्यावीत, असा त्यांच्या मनाचा निश्चय झाला होता. संघटनेच्या कामात स्वयंसेवक, गटनायक, शिक्षक, मुख्य शिक्षक, कार्यवाह अशा जबाबदाऱ्या पार पाडता पाडता संघाचे तीनही वर्षांचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. तसेच बी.एस्सी. बी.टी. या पदव्याही त्यांनी उत्तम प्रकारे संपादल्या होत्या. कर्तृत्वाला नवे क्षेत्र देण्यासाठीच ते 'प्रचारक' म्हणून बाहेर पडले व आयुष्याची सहा-सात वर्षे त्यांनी नि:स्वार्थी सेवेत व संघटनकार्यात वेचली. विद्यार्थी जीवन

घडविण्यासाठीच शिक्षक म्हणून ते शिक्षण क्षेत्रात आले. कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या सेवेत रुजू झाल्यावर उत्तम शिक्षक, उत्तम पर्यवेक्षक व उत्तम मुख्याध्यापक असा लौकिक त्यांनी मिळविला. या शाळेत येणारे बहुसंख्य विद्यार्थी हे प्रामुख्याने नाना, गणेश, भवानी, सोमवार, मंगळवार, कसबा याच पेठातील असल्यामुळे एका बाजूला व्यापारी वर्ग आणि दुसऱ्या बाजूला उपेक्षितांचा वर्ग यांच्या जीवनाचे निरीक्षण अधिक सखोल झाले. गुणवान विद्यार्थ्यांना उत्तेजन द्यावे, सुयोग्य शिक्षकांचे, सुयोग्य मार्गदर्शन मिळवून द्यावे, असा त्यांचा नित्याचा प्रयत्न. याच काळात शिक्षण क्षेत्रात प्रायोगिक शिक्षणावर भर देणारी ज्ञानप्रबोधिनी आकाराला येत होती. शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रबोधिनीशी संबंध यावा व त्यांच्या कुशाग्र बुद्धीला झेप घेण्याची संधी मिळावी, असा प्रयत्न त्यांनी केला. अशा पुढे नावाजलेल्या विद्यार्थ्यांपैकी एक नाव म्हणजे शालान्त परिक्षेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेला डॉ. अशोक निरफराके. आज मानसशास्त्र विषयात ते अनेकांचे पीएच.डी.साठी मार्गदर्शक राहिलेले आहेत.

समाजाच्या उपेक्षित वर्गात (आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक) मूलत: असलेली कुशाग्र बुद्धिमत्ता, सुयोग्य वातावरण व संस्काराअभावी गुदमरून जाते, कुजते, नाहीतर वाम मार्गाला लागते. यासाठी काहीतरी केले पाहिजे. असा विचार शिक्षकी जीवनात येत होताच, पण निवृत्त झाल्यावर त्यांनी संपूर्ण जीवन 'स्व'-रूपवर्धिनीसाठी झोकून दिले. आज 'स्व'-रूपवर्धिनी ही एक सेवाभावी अग्रगण्य संस्था म्हणून ख्याती पावत आहे. या कार्यासाठी त्यांच्या सर्जनशील संघटनकौशल्यातून कार्यकर्त्यांची एक फळी अखंड कार्यरत आहे.

कृष्णरावांचे कार्य दुहेरी स्वरूपाचे आहे. एका बाजूला त्यांनी चुणचुणीत, हुशार व बुद्धिमान अशा मुलांचा शोध घेतला, निवड केली. मार्गदर्शक शिक्षक मिळवले. खेळ व अभ्यासासाठी जागा मिळवल्या आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा एक व्यापक नकाशा डोळ्यासमोर ठेवला. खेळ व अभ्यास यांच्या जोडीला शनिवार आणि रविवार या सुट्यांचा उपयोग करून कथाकथन, समूहगान, हस्ताक्षर सुधारणा, वाचनवेगवृद्धी, सेवाभावी संस्थांना भेटी, सेवाभावी कार्यकर्त्यांच्या भेटी, मुलाखती, व्याख्याने, सहली, शिबिरे अशा विविध

उपक्रमांची क्रमाक्रमाने जोड दिली.

*स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास यत्ने*
*बनो शुद्ध बुद्धी ही तेजस्विनी।*
*शरीरासि आरोग्य संकल्प चित्ती*
*नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।*
*पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे*
*घडावी विवेकी कृती, ध्यास हा ।।*

व्यक्तिमत्त्व विकसनाचे असे विविध पैलू 'स्व'-रूपवधिनीच्या या प्रार्थनेच्या रूपाने प्रत्यक्ष आचरणात आले. 'करी आमुची मायभूमी महा' हे प्रार्थनेचे धृपद वर्धिनीचे ध्येयमंत्र बनले आणि क्रमाक्रमाने 'स्व'-रूपवर्धिनीची पन्नास लाख रुपये किमतीची. खऱ्या अर्थाने लाखमोलाची वास्तू उभी राहिली. तेथे व्यायामशाळा, प्रयोगशाळा, ग्रंथालय, अभ्यासिका, अभ्यास वर्ग, आरोग्य केंद्र, महिला स्वावलंबन केंद्र, सभागृह अशा सुविधा उभ्या राहिल्या. सतत एकत्रित येण्यासाठी, कार्यरत राहण्यासाठी, संकल्प आचरणात आणण्यासाठी, सर्वांगाने निर्धाराने उभी आहे एक चैतन्यशक्ती-कृष्णराव पटवर्धन. धनवंतांच्या साऱ्या सद्भावना देणगीरूपाने कृष्णरावांच्या शब्दासरशी 'स्व'-रूपवर्धिनीच्या उभारणीत रुजू झाल्या. वर उल्लेखिलेल्या विविध उपक्रमांसाठी लागणाऱ्या दर वर्षीच्या खर्चासाठी काही लाख रुपयांची कायमची तरतूद त्यातूनच झाली. स्वत:सारखे अनेक कार्यकर्ते त्यांनी त्यांच्या संघटनकौशल्यातून, सर्जनशीलतेतून जोडले-उभे केले. पुणे शहरात मुलींसाठी स्वतंत्र शाखा निघाली. कार्यकर्ते उभे राहिले. असे कार्यकर्ते, ज्यांनी आपले आयुष्य समाजकार्यासाठी देण्याचे संकल्प कार्यवाहीत आणले. 'स्व'-रूपवर्धिनीसाठी पूर्ण वेळ काम करणारा शिरीष पटवर्धन, संजय तांबट, पराग लकडे आणि अरुणाचलमला गेलेल्या मनीषा बोईन व प्रांजली लकडे यांसारखी तरुण मंडळी ही 'स्व'-रूपवर्धिनींची मिळकत आहे. वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र अशा क्षेत्रांत उज्ज्वल यश मिळविणाऱ्या वर्धकांनी 'वर्धिनी'च्या कार्यासाठी आयुष्याची मोलाची वर्षे समर्पित करावीत,

हे व्यवहारी जगाला आश्चर्यकारक वाटले तरी 'वर्धिनी'च्या ध्येयवादाची आणि कार्यकुशलतेची ही स्वाभाविक परिणती आहे. अशी निर्मिती करताना कृष्णराव पटवर्धनांनी अनेक सहकारी आणि मार्गदर्शक मिळवले प्रतापराव पवार, अण्णासाहेब गोगावले, कांचनभाई शहा, पुरुषोत्तमभाई श्रॉफ, श्रीकांत सामळ, बानू कोयाजी, उदय गुजर, सतीश कारा, चंद्राताई दलाया, कुंतीताई मुजुमदार यांचे सक्रिय मार्गदर्शन त्यांच्या संघटन कुशलतेतून मिळाले तसेच दि. दा. जोशी, जयंत कवठेकर, वसंतराव दाते, बागेश्री पोंक्षे, पुष्पाताई नडे, विश्वास आणि विलास कुलकर्णी हे बंधुद्वय यांसारख्या ध्येयधुंद कार्यकर्त्यांची फळी कामाला उभी राहिली आणि त्यांनी भविष्यकाळासाठी कृष्णरावांच्या मनाला दिलासा दिला, ते आश्वस्त झाले.

शरीराने कृश, वयाने वृद्ध, वेषभूषेने आणि व्यवहाराने सर्वसामान्यांसारखे कृष्णरावांचे रूपही सामान्यच; पण त्यांच्या कार्यकर्तृत्वाची उत्तुंगता मात्र समजावूनच घ्यावी लागेल. 'स्व'-रूपवर्धिनी' ही संकल्पना कृष्णरावांच्या जीवनात भिनलेली व साकारलेली जाणवते. स्वत:चे रूप त्यांनी व्यापक रूपात समाजाच्या घटकाघटकात पाहिले. प्रत्येकाजवळ ईश्वराने आणि निसर्गाने काही ना काही बीजरूप उत्तमता दिलेली असतेच. तिचा विकास व्हावा लागतो, करावा लागतो. त्यासाठी अनुकूल वातावरणाची, उत्तेजनाची, मार्गदर्शनाची आवश्यकता असते. कोणीतरी निमित्त व्हावे लागते, त्यांचा विश्वास, आणि श्रद्धा आहे, की परमपूजनीय डॉ. हेडगेवार हे त्यांच्या जीवनात निमित्तमात्र झाले. अप्पा पेंडसे हे आणखी एक निमित्तमात्र ठरलेले दुसरे नाव. 'विकसित व्हावे, अर्पित होऊन जावे, ही 'स्व'-रूप विकासाची परमोच्च अवस्था कृष्णरावांच्या जीवनात दाटून राहिलेली पदोपदी जाणवते. 'स्व'रूपवर्धिनीच्या कार्याची संकल्पना कार्यकर्त्यांच्या आणि वर्धकांच्या समूहातून साकार व्हावी, समृद्ध व्हावी, समानव्यापी व्हावी, अशीच या सर्जनशील संघटकाची आकांक्षा आहे.

*(दैनिक सकाळवरून पुनर्मुद्रित)*

# 'किशाभाऊ : एक पुण्यस्मरण !'

**–डॉ. जगन्नाथ वाणी**

किशाभाऊ पटवर्धनांची आणि माझी पहिली भेट जुलै १९९१ मध्ये धुळ्याला झाली. ह्या भेटीच्या पार्श्वभूमीवर अर्थातच 'स्व'–रूपवर्धिनी होती. त्याचं असं झालं. 'महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशन' ही कॅनडातील आम्ही मराठी मंडळींनी स्थापना केलेली एक संस्था आहे. ह्या संस्थेचे स्वरुप नुसते सांस्कृतिक नाही. भारतभूमीबद्दलची आमच्या मनात असलेली कृतज्ञता व आदरभाव सक्रिय रुपात आणि 'अर्थ'पूर्ण रीतीने व्यक्त करणं हे ह्या संस्थेच्या स्थापनेमागील प्रमुख उद्दिष्ट आहे. कॅनडा शासनाच्या सहकार्याने, महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशन (म्हणजेच M.S.S.O.) च्या माध्यमातून आम्ही महाराष्ट्रांतील गरजू स्वयंसेवी संस्थांना मदतीचा हातभार आणि अर्थभार लावत असतो.

माझे पुण्यातील एक स्नेही डॉ. पी. एस्. कारेकर हे 'इंडिया फाऊंडेशन' ह्या संस्थेचे तेव्हा कार्यकारी सचिव होते. 'स्व'–रूपवर्धिनीला आर्थिक सहाय्य करण्याविषयी त्यांनी एक शिफारसपत्र दिले होते. ते पत्र घेऊन किशाभाऊ मला भेटण्यासाठी धुळ्याला आले. 'स्व'–रूपवर्धिनीच्या उत्कृष्ट कार्याबद्दल मीही ऐकून होतो. मुंबईमधील मंगलाताई अभ्यंकर ह्यांनीही मला 'स्व'–रूपवर्धिनीच्या कार्याबद्दल बरेच सांगितले होते.

'स्व'–रूपवर्धिनीसाठी देणग्या गोळा करण्याबद्दलचा किशाभाऊंना खूप अनुभव होता. त्यांच्या मते, बऱ्याच वेळा अशा प्रकारच्या देणग्या देताना, देणगीदारांना 'देण्याचा' एक प्रकारचा दर्प अथवा गंड असतो. अशा अनुभवांमुळे आमच्याही प्रथम भेटीत किशाभाऊ काहीसे अवघडलेले सकोचलेले होते. पण इथे मात्र देणगी देणे आणि स्वीकारणे ही प्रक्रिया त्यांच्या आत्तापर्यंतच्या अनुभवांपेक्षा खूप वेगळी आणि सुखद वाटली. कारण M.S.S.O. नेहमीच देणगी देण्या–घेण्याच्या प्रक्रियेमध्ये घेणाऱ्या संस्थेचा मानसन्मान अबाधित ठेवत असते. त्याला जपत असते. M.S.S.O. च्या दशकापूर्वी निमित्ताने प्रकाशित

झालेल्या पुस्तिकेत किशाभाऊंनी 'मुलखावेगळी महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशन' हा लेख लिहिला होता. त्यात ते अतिशय मोकळेपणे व प्रांजळपणे लिहितात, 'आमच्या पहिल्या भेटीतच डॉ. वाणींच्या मनमोकळेपणामुळे आणि सौजन्यामुळे माझ्या मनात त्यांच्याबद्दल आपुलकीचा ओलावा निर्माण झाला आणि परकेपणाचा पडदा एकदम दूर झाला.'

'स्व'-रूपवर्धिनी हे किशाभाऊंनी निर्माण केलेलं अतिभव्य कार्यशिल्प आहे. अतिशय उदात्त हेतूने प्रेरित होऊन त्यांनी ही संस्था निर्मिली. दुर्देवाने, कित्येकजण किशाभाऊंवर 'हिंदुत्ववादी' असा शिक्का मारत. मी ह्यांच्याशी अजिबात सहमत नाही. किशाभाऊंनी **'स्व'-रूपवर्धिनीच्या आसपास झोपडपट्ट्यांतून राहणाऱ्या मुस्लिम धर्मीय महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अतोनात प्रयत्न केले. ही वस्तुस्थिती, किशाभाऊ मानवतावादी होते हे दर्शविण्यासाठी पुरेशी बोलकी आहे.**

काही वर्षांपूर्वी आम्ही M.S.S.O.च्या कार्याचे दर्शन घडविणारा या 'Three Faces of Tomorrow' शीर्षकांतर्गत एक लघुपट काढला होता. ह्यात, M.S.S.O. ने अर्थसहाय्य केलेल्या संस्थांपैकी तीन निवडक संस्थांच्या विकासाचा आलेख नाट्यरुपाने चितारला होता. 'स्व'-रूपवर्धिनी ही त्या संस्थापैकी एक होती.

'स्व'-रूपवर्धिनीबद्दलचे कथानक, 'स्व'-रूपवर्धिनीच्या संपर्कात आलेल्या एका कागद - चिंध्या गोळा करणाऱ्या मुस्लिम धर्मीय मुलीभोवती केंद्रित होते. 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये आल्यानंतर ती आत्तापर्यंत चिंध्या गोळा करुन गुजराणा करत असलेली मुलगी एक संगणक तंत्रज्ञ झाली. तिचा हा प्रेरणादायी प्रयत्नांचा प्रवास ह्या वार्तापटात दाखविला आहे. वार्तापटाच्या चित्रीकरणाच्या काळात, ह्या वार्तापटाचे दिग्दर्शक त्या मुलीला व तिच्या बहिणाला आवर्जून भेटलेले आहेत.

किशाभाऊंच्या सामाजिक जाणीवेच्या, सामाजिक बांधिलकीच्या कक्षा 'स्व'-रूपवर्धिनीपुरत्याच सीमित नव्हत्या. त्यांच्या सामाजिक करुणेचं क्षितिज 'स्व'-रूपवर्धिनीपुरतंच मर्यादित नव्हतं. **समाजातील दुर्बल घटकांसाठी, समाजातील दुर्लक्षित आणि उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी जर अन्य कुणी व्यक्ती वा संस्था कार्यरत असेल तर प्रसंगी किशाभाऊ 'स्व'-रूपवर्धिनीच्या**

**आर्थिक गरजा बाजूला सारुन, अशा संस्थांच्या आर्थिक गरजांना प्राधान्य देत. त्यांच्यासाठी देणग्या गोळा करीत.**

गिरीश प्रभुणे हे असेच एक कार्यकर्ते ! भटक्या आणि विमुक्त जमातीतील फासेपारधी वर्गाच्या उन्नतीसाठी ते अविरत कार्यरत असतात. फासेपारधी जात ही सामान्यत: गुन्हेगार म्हणून समजली जाते. उच्चभ्रू समाजाकडून त्यांच्यावर हा एक कायमाचा शिक्का बसलेला आहे. कित्येकदा कोणत्याही प्रकारच्या न केलेल्या गुन्ह्याबद्दलही त्यांना तुरुंगवास भोगावा लागतो.

किशाभाऊंनी मला श्री. प्रभुणे ह्यांच्या कार्याबद्दल माहिती दिली आणि त्यांना M.S.S.O. कडून आर्थिक मदत मिळण्याबद्दल माझ्याकडे शिफारस केली. किशाभाऊंच्या ह्या विनंतीमुळे मी थक्क झालो. इथे मला त्यांच्या निर्व्याज मनाची आणि विशाल हृदयाची साक्ष पटली. श्री. प्रभुण्यांच्या ह्या प्रकल्पाला मी व्यक्तिश: भेट दिली. त्यांच्या कार्याचे अवलोकन केले. हे काम बघून मी अगदी भारावून गेलो. समाजाच्या ह्या एका उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी चाललेले प्रयत्न हृदयाला स्पर्शून गेले. तात्काळ मी M.S.S.O. द्वारा, ह्या मागास आणि भटक्या जमातीसाठी बेकरी प्रकल्प राबविण्याची योजना अंमलात आणली. अर्थात ह्या साऱ्या प्रक्रियेमध्ये, 'स्व'-रूपवर्धिनीने स्वत:च्या आर्थिक गरजा बाजूला सारल्या. स्वत: आर्थिक झळ सोसली, पण दुर्दैवी फासेपारध्यांच्या गरजेला प्राधान्य दिले.

नीलेश आणि सोनल काविया हे आमच्या कॅलगरी (कॅनडा) मधील एक तरुण दांपत्य. भारतातील एखाद्या समाजोपयोगी प्रकल्पासाठी सेवा करण्याची त्यांची मनस्वी इच्छा होती. त्यांना विशेषकरुन लहान मुलांबरोबर काम करायचं होतं. मी त्यांना सरळ किशाभाऊंकडे पाठविले. किशाभाऊंनी ह्या उभयतांना 'स्व'-रूपवर्धिनीच्या अनेक प्रकल्पांपैकी एका प्रकल्पात सामावून घेतलं. साधारणपणे महिनाभर त्यांनी हे काम केलं. पण ह्या अल्पावधीतही बरोबरच्या साऱ्या मुलांशी त्यांची चांगलीच गट्टी जमली. एक अतूट स्नेहबंध निर्माण झाला. ह्याचं प्रत्यंतर, नीलेश आणि सोनल, त्यांच्या ठराविक मुदतीसाठी सेवाकार्य संपवून जेव्हा परत जायला निघाले तेव्हा आलं. सारी मुलं आवर्जून त्यांना निरोप देण्यासाठी रेल्वे स्थानकावर आली. त्यांना हुंदके आवरत नव्हते. त्या लहानग्यांच्या

कोवळ्या गालांवरून मुक्तपणे अश्रू विहरत होते. पुढे निलेश आणि सोनलने 'स्व'-रूपवर्धिनीच्या मदतीसाठी सुमारे ४००० डॉलर्सचा निधी जमविला. M.S.S.O. ने आल्बर्टा येथील वाइल्ड रोज फाऊंडेशनच्या माध्यमातून ह्या निधीत अजून भर टाकली. अंतिमत: जवळजवळ ८००० डॉलर्स एवढा प्रचंड निधी आम्ही ह्या लहानग्यांच्या कल्याणकारी योजनांसाठी 'स्व'-रूपवर्धिनीकडे पाठविला.

दुर्दैवाने आज किशाभाऊ आपल्यात नाहीत. 'स्व'-रूपवर्धिनी त्यांच्या मार्गदर्शनाला, आधाराला कायमची मुकली. परंतु आधारवड कोसळला तरी त्याच्या मजबूत पारंब्या ठामपणे जमिनीत पाय रोवून उभ्या आहेत. किशाभाऊंमधील सच्च्या आणि आदर्श कार्यकर्त्याने, सर्वस्व झोकून तळमळीने कार्य करत राहणाऱ्या कार्यकर्त्यांची एक प्रचंड फळीच निर्माण करुन ठेवली आहे. ह्या सर्वांमुळे किशाभाऊंच्या पश्चातही 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्य असेच उत्कृष्टपणे निरंतर चालणार आहे ह्यात शंका नाही.

किशाभाऊंसारखा द्रष्टा विरळाच !

## व्रताची पूर्तता करू !

आदर्श ठेवलात,
अथक आणि अखंड व्रत साधनेचा ।
बांधून दिलात,
एक सुंदर सेतू, विकसित होत जाण्याचा।
घेऊन आशीर्वाद तुमचा पाठीशी,
मार्ग तोच अखंड आचरू।
व्रताची पूर्तता करू,
आम्ही व्रताची पूर्तता करू।।

**सौ. स्नेहल कुलकर्णी**

# किशाभाऊ - अेक स्मरणांजली

**– सौ. कुन्दा महादेवकर**

तसं पाहिलं तर माझी अन् ‘स्व’–रूपवर्धिनीची ओळख खूप जुनी. अर्थात् सुरुवातीला ही काहीशी अप्रत्यक्ष ओळख होती. – नेमकं वर्ष आठवत नाही. मला वाटतं, ‘स्व’–रूपवर्धिनी मूर्त स्वरूपात नुकतीच अवतरली असावी. वृत्तपत्रात ह्या संस्थेसंबंधी अेक परिचयात्मक लेख आला होता. ही संस्था शहराच्या पूर्व भागातील गरीब वस्त्यांमधील होतकरू शालेय विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करणार असल्याची माहिती त्या लेखावरून समजली. कुणी तरी कृष्णराव पटवर्धन नामक निवृत्त शिक्षकाची ही संकल्पना होती. त्यांच्याच प्रयत्नाने ही संस्था अस्तित्वात आल्याचे कळले.

त्यावेळी मी गव्हर्न्मेन्ट् पॉलिटेक्निकमध्ये प्राध्यापिका होते. शिकवणं मला मनापासून आवडत असे. पण त्याहूनही विद्यार्थ्यांशी संवाद साधणं मला जास्त आवडे. ‘अति शिस्तप्रिय’ म्हणून मी विद्यार्थ्यांमध्ये बरीचशी कुख्यात होते. पण तरीही त्यांच्याशी माझे खूपसे वैयक्तिक पातळीवर संबंध असत. प्रसंगी कान उघाडणी करणे, प्रसंगी गोंजारणे, त्यांच्या अडचणी समजावून घेणे, त्या कशा दूर करता येतील ह्याचा विचार करत रहाणे – या ना त्या कारणामुळे मी विद्यार्थ्यांच्या खूप जवळ असे.

या विद्यार्थ्यांमध्ये ‘स्व’–रूपवर्धिनीशी निगडीत असलेलेही बरेच विद्यार्थी असत. मलाही एकूण ह्या संस्थेबद्दल खूप कुतूहल होते. मग मी अशा विद्यार्थ्यांकडे त्यासंबंधी खोलात जाऊन चौकशी करीत असे. समाजाच्या निम्नस्तरांतून हे विद्यार्थी आलेले असले, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असले तरी ते कधीही केविलवाणे वाटायचे नाहीत, किंवा सामाजिक विषमतेपोटी उद्‌भवणारी कटुताही त्यांच्यात दिसत नसे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामाजिक जाणिवेचा एक विशेषत्वाने जाणवणारा स्पर्श असे. कॉलेजमध्ये एका वर्षी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित

वक्तृत्वस्पर्धा चालू होत्या. नेहमीप्रमाणे मी परीक्षक होते. काय विषय होता ते आता आठवत नाही, पण अेक विद्यार्थी बोलत होता – 'लाखांमध्ये असा अेखादाच किशाभाऊ जन्मला येतो'. मी मनात म्हणलं, हे 'स्व'-रूपवर्धिनी प्रॉडक्ट दिसतंय्.

एकूण 'स्व'-रूपवर्धिनीचं कार्य जाणून घेण्याची उत्सुकता अन् त्या पटवर्धन सरांना भेटण्याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली होती. फोनवरून त्यांच्याशी संपर्क साधला आणि भेटीची वेळ ठरवली.

सांगितलेल्या पत्त्यावर शोधत शोधत मी 'स्व'-रूपवर्धिनीत पोहोचले. शहराचा पूर्वभाग, मंगळवार पेठ, आजूबाजूला श्रमजीवी समाजाची घरं, झोपड्या आणि त्यामध्ये ही भव्य, सहा मजली इमारत. प्रथमदर्शनीच मी प्रभावित झाले. काही वेळानंतर सर आले. त्यावेळी रविवारी सकाळी दूरदर्शनवर 'रामायण' दाखवले जात असायचे. आल्या आल्या सर हसून उद्गारले– 'रामकृपेमुळे ह्यावेळी रस्ते अगदी मोकळे असतात. त्यामुळे फास्ट येऊ शकलो'.

सरांचा मध्यम बांधा, आर्जवी बोलणं, शब्दा-शब्दातून प्रतीत होत असलेला ध्येयवाद, कार्यावरील निष्ठा आणि आत्मविश्वास. त्यांनी थोडक्यात 'स्व'-रूपवर्धिनीच्या संकल्पनेची माहिती दिली. माझी माहिती जाणून घेतली. मी अगदी भारावून गेले होते. संस्थेबद्दलच्या काही परिचय-पुस्तिका त्यांनी मला दिल्या. 'स्व'-रूपवर्धिनी ह्या शब्दातील अवतरण चिन्हांकित 'स्व' खूपसं सांगून गेला. माझ्याबरोबर स्वत: येऊन सर्व इमारत दाखवली. सर्व दालनांचा परिचय करून दिला. मी इमारतीसंबंधी कौतुकोद्गार काढले. त्यावर इमारतीच्या बांधकामासाठी कुठेही सरकारी अनुदान न वापरल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. खरं म्हणजे तेथून पाय निघत नव्हता. निघताना ते म्हणाले – 'कुन्दाताई, संस्था वर्षातील सर्व ३६५ दिवस उघडी असते. तुम्ही तुमच्या सवडीनुसार येत रहा.' अिथून पुढे मला ते किशाभाऊ झाले.

नियमित असा नाही पण किशाभाऊंशी, पर्यायाने 'स्व'-रूपवर्धिनीशी संपर्क घडत गेला.

माझा अेकुलता अेक भाऊ कॅनडामध्ये असे. १९९३ च्या जुलै महिन्यात वयाच्या अवघ्या ५४ व्या वर्षी, त्याचे तेथेच काहीसे अकाली निधन झाले. त्याच्या अंतिम भेटीसाठी मी तेथे गेले होते. माझ्या दिवंगत मातापित्यांच्या स्मरणार्थ पुण्यातील कुठल्या तरी योग्य शैक्षणिक संस्थेस काही मदत करावी ही त्याची इच्छा होती. त्यासाठी त्याने काही रक्कम माझ्या नावे ठेवली होती. त्याचे मित्र व कॅनडातील थोर भारतीय समाजसेवक डॉ. जगन्नाथ वाणी व महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशन ह्यांच्या मदतीने हा अर्थस्रोत मी 'स्व'-रूपवर्धिनीकडे वळवला. किशाभाऊंच्या समर्थ ओंजळीत मी हे अर्घ्य वाहिले आणि निर्धास्त झाले आणि धन्यही !

अेकदा असचं झालं - काहीतरी कारणामुळे मी किशाभाऊंना फोन केला. फोनवर बऱ्याच गप्पाही झाल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी वृत्तपत्रात ठळक बातमी होती - 'स्व'-रूपवर्धिनीच्या श्री. किशाभाऊ पटवर्धनांना 'फाय फाऊंडेशनचा पुरस्कार' मी चक्रावले. कालच मी त्यांच्याशी फोनवर बोलले होते पण त्यांनी कुठेही ह्या पुरस्काराचा साधा उल्लेखही केला नव्हता. मी पुन्हा फोन उचलला. त्यांचे मन:पूर्वक अभिनन्दन केले, आणि जिज्ञासेपोटी, पुरस्कारासंबंधी काल काहीच कसं बोलला नाहीत अशी विचारणा केली. त्यावर ते हसून म्हणाले -''कुन्दाताई, **हे यश सांघिक आहे. माझे एकट्याचे नाही**'' -मनात विचार आला, मला कुणी शंभर रूपयाचे जरी एखादे पारितोषिक दिले असते तर मी त्याचा केवढा तरी गाजावाजा केला असता, जाहिरात केली असती, कौतुक करवून घेतले असते. पण मी 'मी' होते अन् हे 'किशाभाऊ' आहेत. फक्त एवढाच फरक आहे. त्यांच्या नि:स्पृह वृत्तीला मनोमन अभिवादन केले.

'स्व'-रूपवर्धिनीचा विस्तार सतत वाढत राहिला. कार्याचं क्षितिज रुंदावत राहिलं. प्रकल्पामागून प्रकल्प संकल्पित होत होते. यशस्वी होत होते. इथे संस्कारित होणाऱ्या प्रत्येक बालकाचं-कुमाराचं-युवकाचं आयुष्य उजळून जात होतं. त्यातील एकेका दिव्याने असंख्य दिवे लागत होते. संस्कारांच्या आणि शिक्षणाच्या प्रांगणात वर्धिनीची दीपमाळ तेजाळत होती.

नियमानुसार वयाप्रमाणे मी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले. त्यानन्तर काही दिवस मी मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापिका होते. कुठल्यातरी कामासाठी अेक दिवस किशाभाऊ तेथे आले होते. नेहमीच्या सवयीनुसार मी त्यांना चरणस्पर्श केला. त्यावर ते इतक्या तळमळीनं उद्गारले, 'कुन्दाताई, तुम्ही आता निवृत्त झाला आहात. आता तुमचा वेळ तुम्ही आम्हाला द्या. कार्यालयाचं एकूण कामकाज, पत्रव्यवहार तुम्ही पहा. वर्धिनीला तुमची जरूर आहे.' मीही मनापासून होकार दिला. मॉडर्नमधून बाहेर पडल्यावर वर्धिनीच्या प्रवाहात मिसळून जाण्याचा मी मनोमन निश्चयही केला. पण ते घडायचं नव्हतं. मॉडर्नमधून बाहेर पडले अन् त्या 'कर्कासुराच्या' (कर्करोगाच्या) विळख्यात अडकले. त्यातून कशीबशी सुटका करून घेतली अन् दुर्देवानं अेक डोळा निकामी झाला. मी कधी तशी 'मिनाक्षी' नव्हते, पण आता मी 'अेकाक्षी' झाले. किशाभाऊंना दिलेला शब्द मी पाळू शकले नाही– ''उत्पद्यन्ते विलीयन्ते (कर्म) दरिद्राणां मनोरथा:''!

किशाभाऊंचा मानसिक उत्साह वर्धिष्णू होता. पण आता त्याला शारीरिक मर्यादा येत राहिल्या.

सर्वसामान्यांची आयुष्यं कालौघाबरोबर ओघाच्या दिशेने वाहत असतात. आयुष्याच्या लव्हाळी आपसूक पुढे पुढे जात राहतात. शारीरिक अक्षमतेचा, वार्धक्याचा अेखादा कातळ त्या प्रवाहात आला की ह्या क्षुद्र लव्हाळी अडकून पडतात. मनात कुढत राहतात. ह्या लव्हाळ्यांना खरं म्हणजे अजूनही पुढे वाहत राहायचं असतं पण नियती आता त्यांना रोखून ठेवते. त्यामुळे नियतीला दूषणं देत हे सर्वसामान्यजन मरेपर्यन्त जगत राहतात. खरोखर, मनुष्याला कुठे थांबावं हे कळणं अत्यावश्यक आहे.

किशाभाऊंना ते कळलं होतं. उमजलं होतं. ते त्यांनी आनंदपूर्वक स्वीकारलं होतं. आता त्यांनी वर्धिनीच्या दैनंदिन कामकाजातून स्वत:ला मुक्त करून घेतलं होतं.

'स्व'–रूपवर्धिनीचं रौप्यमहोत्सवी वर्ष सुरू झालं. किशाभाऊंनी लावलेलं

रोपटं आता कित्येक जीवांचा आधारवड बनला होता. नव्या नव्या पारंब्या फुटल्या होत्या. रौप्यमहोत्सवी वर्षातील कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी वर्धिनीनं अेक बैठक आयोजित केली होती. मीही निमंत्रितांपैकी अेक होते. तळमजल्यावरच सभेचं आयोजन केलेलं होतं. साधारण उन्हाळ्याचेच दिवस होते. किशाभाऊ प्रवेशस्थानापाशी उभे होते. 'अिथे वारा फार छान येतो हो' असा हसऱ्या मुद्रेनं सांगत तेथेच ते खुर्चीवर बसले. **व्यासपीठावर अध्यक्ष महोदय व अितर मान्यवर स्थानापन्न झाले. किशाभाऊंना व्यासपीठावर येण्याचा खूप आग्रह झाला. पण किशाभाऊंनी नम्र नकार दिला. हे पाहून मी थक्क झाले. भारावून गेले. हा तर भगवद्गीतेतील मूर्तिमन्त अनासक्ति योग !** अशा निमित्तानं होत असणाऱ्या इतर ठिकाणच्या सभा डोळ्यासमोर आल्या. भलं मोठं व्यासपीठही अपुरं पडावं अशा आसनांच्या रांगा आठवल्या. तेथील अेखाद्या स्थानावर तरी प्रवेश मिळण्यासाठी तथाकथित मान्यवरांची होणारी तगमग डोळ्यासमोर आली. आणि इथे होते, आपण स्वत: लावलेल्या - जोपासलेल्या वृक्षाच्या छायेचाही लोभ न धरणारे किशाभाऊ - मी गलबलले. मनोमन त्याना साष्टांग प्रणिपात घातला.

दिवस जात राहिले. दिवस-रात्रींच्या किनाऱ्यांमधून कालौघ वाहत राहिला. अेक दिवस दुपारी वर्धिनीतून फोन आला. - 'किशाभाऊ रूबी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत.' वार्ता अनपेक्षित नव्हती. तरीही पोटात धस्सं झालं. लगोलग हॉस्पिटलमध्ये गेले. दिव्याचं तेज अबाधित होतं. पण आता तेल संपत आलं होतं. आणि काही दिवसांनी पुन्हा सकाळी ती अभद्र दूरध्वनीवाणी झाली. ''किशाभाऊ गेले. अंत्यदर्शन ---''

मागे कुठे तरी अेक कथा वाचली होती. - अेका शहरामध्ये अेक सार्वजनिक कार्यक्रम होता. अेका पुतळ्याचा अनावरण समारंभ होता. अेका कसबी कलाकाराने तो पुतळा तयार केला होता. अनावरणासाठी एका थोर कलाकाराला पाचारण केलं होतं. हा कलाकार तत्त्वज्ञ म्हणूनही विख्यात होता. समारंभाची वेळ झाली. पुतळ्यावर अेक भरजरी अवगुंठन घातलं होतं. सर्वजण

त्या देखण्या शिल्पाकृतीच्या अनावरणाची वाट पहात होते. अवगुंठन दूर झाल्या झाल्या प्रमुख अतिथी नक्कीच शिल्पाकृतीच्या सौंदर्याची तारिफ करणार ह्याची सर्वांनाच खात्री होती.

– अनावरण झालं पण घडलं भलतंच. ते शिल्प पाहून तो तत्त्वज्ञ कलाकार काहीसा नाराज झाला. त्याचा चेहरा हिरमुसला. तो जड आवाजात उद्गारला –'अरेरे ! अेक सुन्दर शिल्प वाया गेलं.' सारेजण अवाक् झाले. त्यांचा फार मोठा अपेक्षाभंग झाला होता. तो उद्घाटक कलाकार पुढे म्हणाला, 'खरं म्हणजे, प्रत्येक शिळेमध्ये, प्रत्येक पाषाणखंडामध्ये अेक सुंदर शिल्प दडलेलं असतं. ती परमेश्वराची निर्मिती असते. शिल्पकाराने छिन्नी हाथोड्याच्या सहाय्याने फक्त त्याच्या भोवतालचे हीण, नको असलेली माती दूर करायची असते. हे अगदी हळुवारवणे करायचं म्हणजे पाषाणातील ते अंगभूत शिल्प अलगदपणे हाती येतं. अस्तित्वात येतं'.

किशाभाऊ हे अेक असेच तत्त्वज्ञ शिल्पकार होते. असंख्य पाषाणखंड त्यानी हाताळले, निरखले. त्या प्रत्येकातील अंगभूत शिल्प त्यांच्यातील कलाकारानं हेरलं, मायेनं गोंजारलं. संस्कारहीनतेची माती हळुवारपणे दूर केली आणि अशी असंख्य शिल्पं घडवली. प्रत्येकातील 'स्व' जागतं ठेवलं. वर्धिष्णू ठेवलं.

बहुधा, परमेश्वरानं किशाभाऊंना साद घातली असेल. 'किशाभाऊ, आजपर्यन्त अनेक जीव मी कुसंस्कारांच्या दलदलीत जन्माला घातले. प्रत्येक गोष्टीचा अभाव हाच त्यांचा स्थायीभाव होता. पण तुम्ही मात्र अशा आयुष्याचं सोनं केलंत. आता जरा माझ्या मदतीला या. आता आपण इथूनच त्याना सुसंस्कारित करून जन्म देऊ या'.

किशाभाऊ, तुम्ही घडवलेल्या असंख्य आयुष्यांच्या वतीने आणि भविष्यातील सुसंस्कारित जीवनांच्या वतीने तुम्हाला सादर प्रणाम!

# कै. किशाभाऊंची टिपणे.....एक दिशा दर्शन

**– र. ज. नरवणे**

वर्धिनीला स्वत:चा स्वतंत्र अभ्यासक्रम असणे जरूर आहे अशा विचाराने माझ्या मनात १९९६–९७ पासूनच मूळ धरले होते. त्यादृष्टीने मी अनेकवार अभ्यासक्रमाची रचना लिहून काढली आणि त्याविषयी इतरांशी आणि युवकांशीही चर्चा केली. याचसाठी कै. किशाभाऊंशीही माझी काही वेळा चर्चा झाली होती. अभ्यासक्रमाच्या संदर्भात त्यांनी काही टिपणेंही काढली होती. त्यावरून कोणते भव्य ध्येय साध्य करण्यासाठी त्यांची धडपड चालू होती आणि त्यातल्या काही धोक्यांविषयी त्यांना काय म्हणावयाचे आहे, ते साधण्यासाठी त्यांना कोणती साधनं, गोष्टी उपयुक्त वाटत होती ते आपल्याला चांगले कळून येते.

त्यांनी काढलेल्या टिपणांचा काही अंशभाग पुढे दिला आहे :

१) पहिल्याच मुद्यातील ६वी साठी आपण ज्या दोन संस्था सुचवल्या आहेत (बालग्राम, कामायनी) त्या माणुसकीचा उच्च गहिवर येण्यासाठी आवश्यक आहेत. ते काम सेवावृत्ती जोपासणारे आहे हे सर्व खरे आहे; पण त्यासाठी त्यागपूर्वक जीवन जगण्याची जी मूळ प्रेरणा असायला हवी ती निर्माण करण्याकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

२) **आपले पूर्ण समाधान केवळ सेवा करण्याने होणार नाही तर आपल्या समाजसेवेतून समाज सेवेकरी उभे राहिले पाहिजेत. त्या आपल्या मुख्य ध्येयाचा कधीही विसर पडता उपयोगी नाही.** आपल्याला केवळ सेवा करणारीच संस्था उभी करावयाची नसून सेवेकरी उभे करण्याची संस्था उभी करायची आहे याकडे दुर्लक्ष होता कामा नये.. मला असे वाटले की ५वी पासून १० पर्यंत(चे) नव्हे तर कॉलेज शिक्षण पूर्ण होईपर्यंत (वर्धक/युवक) यांच्यापुढे हा ध्येयवाद, हा दीपस्तंभ सतत उभा असला पाहिजे आणि (युवकाने) शिक्षण संपल्यावर काही महत्त्वाची वर्षे अशा कामासाठी झोकून देऊन नि:स्वार्थपणे

काम केले पाहिजे... (या दृष्टिकोनातून) वर्धकाची जडण घडण लहानपणापासून करण्याचा प्रयत्न करावा व त्यादृष्टीने सर्व कार्यक्रम आखावेत असे मला वाटते.

३) स्वत:चा विकास हे अगदी बरोबर आहे. गुणी लोकांना आपल्याकडे आकर्षित करता येणार नाही हे सत्य पण त्याचबरोबर हा **सर्व गुणविकास केवळ आपल्या स्वार्थांसाठी नाही हा भाव (वर्धक/युवक) त्याच्या मनात सतत बिंबवला पाहिजे; नाहीतर संघटनेला पुष्कळच त्रास होतो आणि हेच लोक संघटनेपुढे अहंकारापोटी संकटे उभी करतात.**

४) दुर्बल घटकांसाठी झटण्याची जाण निर्माण होण्यासाठी मला खालील उपाय सुचतात. व्यवहारत: जे झेपतील/जमतील त्याचा अंमल करावा.

* दुर्बल घटकांसाठी काम करणाऱ्या संस्थांना भेटी देण्यापूर्वी अशा संस्थाचालकांना त्याची पूर्ण कल्पना द्यावी म्हणजे अपेक्षित परिणाम साधता येईल. शक्य असेल तर आपल्या अपेक्षा त्यांना पत्र लिहून पोहोचवाव्यात.

* 'दुर्बल घटकांचा विकास, प्रगती' हा उद्देश मनी बाळगून जे खरोखरी नि:स्वार्थपणे काम करतात त्यांची व्याख्याने, मुलाखती घडवाव्यात. (Example is better than precepts...)

* अशा दुर्बल वर्गातील लोकांना आपल्या शिबिरात बोलावणे किंवा आपल्या वर्धकांना त्यांच्या शिबिरात भाग घेण्यास पाठवणे (उदा. वाशी येथील वात्सल्य किंवा लोणावळ्याची बालग्राम संस्था) अशा समाजघटकांपाशी जाऊन त्यांच्याशी चर्चा करावी.

* ज्यांनी आपली उभी आयुष्ये अशा वर्गांसाठी वेचली त्यांनी लिहिलेली पुस्तके, आत्मचरित्रे यांचे वाचन, विचारविनिमय व त्यांवर चर्चा.

* अशा दुर्बल घटकांसाठी काम करणाऱ्या संस्थांना भेटी आणि शिबिरात आल्यावर भेटीतील निरीक्षणांवर आधारित चर्चा व लिखाण केले जावे. लिखाण करतांना वर्धकांना जास्तीचे मुद्दे व प्रश्न देणे आवश्यक आहे. शक्य आणि आवश्यक वाटल्यास संस्थेला भेट देण्यापूर्वी वर्धकांना निरीक्षणाचे मुद्दे लिहून द्यावेत.

* प्रत्येक वर्धकाकडून शिबिराचा शोधबोध लिहून घेणे... शिबिरप्रमुखांनी शिबिराचे कार्यवृत्त लिहून कार्यालयात सुपूर्द केल्याशिवाय जवाबदारी संपली असे समजावयाचे नाही. आर्थिक व्यवहाराचाही हिशोब पूर्ण केला पाहिजे व कार्यालयात दिला पाहिजे.

५) अभ्यासक्रमात विक्रयकलेच्या अंतर्भावाविषयी त्यांची टिपणे खास लक्षात घेण्यासारखी आहेत. ते म्हणतात, 'विक्रयकला अत्यंत आवश्यक आहे यात दुमतचं नाही, पण त्यात दोन धोके संभवतात.

अ) मुले त्यातच वाहवत जातात.

ब) पैशाचा अपहार. या सर्वांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

६) दहावीच्या अभ्यासांतर्गत भारतावरील मुसलमानी व युरोपियन आक्रमकांचा संदर्भ येतो. किशाभाऊंना वाटते की, या विषयांच्या जुजबी ओळखीने 'मुलांच्या मनात अपसमज, गैरसमज होऊन त्यांची मने कलुषित होणार नाहीत अशा पद्धतीनेच विषय शिकवले पाहिजेत तर त्या विषयाला योग्य न्याय मिळेल. शिक्षकांनी वस्तुनिष्ठ व बुद्धिनिष्ठ शिक्षण पूर्ण अभ्यास करून मुलांना दिले पाहिजे'.

७) शेवटी त्यांनी म्हंटले आहे 'लिहिलेले सर्व उत्तमच आहे पण त्यासाठी लागणाऱ्या कार्यकर्त्यांची तयारी केव्हा व कशी करायची? तयार केलेल्या कार्यकर्त्यांनाही सर्व काही आत्मसात करायला वेळ मिळणार का? याचाही आधी विचार होणे आवश्यक आहे'.

अर्थातच कै. किशाभाऊंच्या मनात असलेले ध्येय या अभ्यासक्रमाच्या चौकटीतून किती प्रमाणात उतरले जाईल ही गोष्ट काळच ठरवणार आहे. बदलत्या परिस्थितीनुसार त्यात आवश्यक ते बदल करून काळाबरोबर राहणे आवश्यक आहे, नाहीतर या उदात्त कार्याकडेही लोक पाठ फिरवतील अशी शंका येते. कै. किशाभाऊंनी या माझ्या प्रयत्नांना चांगले म्हटले यातच मी समाधानी आहे.

# सेवाकार्याचा निर्मळ झरा

**– गिरीश प्रभुणे**

*सुरूवातीला दाद न देणारे किशाभाऊ हळूहळू मला  समजत गेले. रोज त्यांचा दूरभाष येऊ लागला. नावं, दूरध्वनी क्रमांक, पत्ते देऊ लागले.*

*'मी..... यांच्याशी बोललोय. सुरूवातीला आपण जाऊ.' असं म्हणून ते मला घेऊन जाऊ लागले,  मुंबई अक्षरशः त्यांना तोंडपाठ होती. डायरेक्टर, कंपन्यांचे मालक, मोठमोठ्या पेढ्यांचे शेटजी, अनेक समाजसेवक, व्यापारी. सर्व ठिकाणी ते मला घेऊन जाऊ लागले.*

किशाभाऊ.......

आणि

'स्व'–रूपवर्धिनी...

किशाभाऊ आणि भटके–विमुक्त ....

एक नैसर्गिक नातं निर्माण झालं होतं. काही प्रसंग मनावर कायमचे कोरले गेलेत.

मुंबईत नवयुग निवासमध्ये त्यावेळी किशाभाऊ उतरत असत. डॉ. माधवराव परळकर त्यांच्या शैलीत विचारत.

''काय रे. तू 'स्व'–रूपवर्धिनीत गेलायस....?

''नाही....!'' मला ही संस्था ऐकूनच माहीत होती.

''हेच. तू पक्का पुणेकर दिसतोसं. यांना ओळखतोस...?

मी मूकच राहिलो. मी यांना इथं पाहिलं होतं. भल्या पहाटे सर्वांच्या आधी उठून सर्व उरकून योगासनं करून, थोडीशी ध्यानधारणा करून ते दूरध्वनिदर्शिका  घेऊन दूरध्वनीजवळ बसत आणि मग जो त्यांचा मुक्त संवाद चाले, ऐकतच रहावं ! दहा–पंधरा दूरध्वनी झाल्यावर तिथल्या वहीत त्यांची नोंद करणार, लगेच त्याचे पैसे देऊन टाकणार आणि झटपट बाहेर पडणार. फार

पाल्हाळ न लावणारं बोलणं. वागणं रोकडं, स्पष्टवक्तेपणाचं. पण त्या सगळ्याला एक वेगळाच आपुलकीचा ओलावा. अगदी आतून आलेला. हा ओलावा समाजाविषयीचा. समाजाच्या आत्मीयतेतून आलेला.

त्याच दिवशी मी त्यांचा परिचय करून घेतला. पण जेवढ्यास तेवढं बोलून जुजबी चौकशी करून ते निघाले. आणि वळून म्हणाले, ''काय म्हणालात तुमचं काम... नाव... प्रभुणे नाही का....? एकदा सवडीनं या की 'स्व'-रूपवर्धिनीत. आम्हाला तुमचं काम काय ते नाही समजलं, पण या मग बोलू सविस्तर.''

पुढे माझ्या भेटी होऊ लागल्या मी जाऊ लागलो. एक दिवस ते मोतीबागेत त्यांच्या रिक्षानं आले होते.

म्हणाले, ''चला येता ? कॉफी घेऊ. काही काम असलं तरी राहू द्या थोडं बाजूला...''

मी चिंतेत होतोच. माझं कोणी ऐकूनच घेत नव्हतं. अनेक बैठका झाल्या. निवेदनं झाली. पण प्रश्नाला उत्तर सापडत नव्हतं. तसं पाहिलं तर संघपद्धतीनं ते व्यवस्थित सुरू होतं. प्रत्येक बैठकीत माझं 'पारधी' समाजावरील अत्याचारांच्या संबंधी बोलणं. दोन-चार मिनिटाचं होत होतं. त्याचा योग्य तो परिणाम होत होता. पण समस्या आणि त्यावर होणारी उपाय योजना यांचा मेळ लागत नव्हता. त्यात यासाठी लागणारा पैसा उपलब्ध होत नव्हता. त्यातच किल्लारीचा भूकंप झालेला. मदतीचा महापूर किल्लारीकडे लागलेला. कार्यकर्त्यांची रीघ लागलेली; पण पारधी, भटके-विमुक्तांच्या या प्रश्नांकडे पहायला कुणालाच सवड नव्हती. अशात एक बैठक सोलापूरला शिवस्मारकात झाली. त्या बैठकीतसुद्धा काहीच निष्पन्न झालं नाही.

एक ज्येष्ठ कार्यकर्ते समारोपात म्हणाले होते.

''अगदी आभाळ फाटल्यासारखं झालय. एकीकडे रोज महिलांवर अत्याचार होतायत. गोळीबारात पारधी बांधवांची हत्या होतेय. समस्या गंभीर आहे पण हे काम एकदम होणारं नाही. हळूहळूच होणार. आपण मांडत राहिलं

पाहिजे. होईल ती मदत करायला हवी.''

पण काहीच योग्य तो मार्ग निघाला नव्हता. मी, मधुसूदन व्हटकर, महादेवराव गायकवाड या बैठकीनंतर निराशच झालो होतो. अशा अवस्थेत मी पुण्यात मोतीबागेत आलो होतो. आणि किशाभाऊ म्हणत होते,

''चला कॉफी घेऊ या...''

खरं तर मी चिडलोच होतो. त्यांच्यावरही. ''यांना कॉफी कशी सुचतेय... इकडे मुलं यमगरवाडीत उपाशी आहेत... पोलिसांचे अत्याचार वाढलेत.''

आबा अभ्यंकर, किशाभाऊ, असे आम्ही कॉफी घ्यायला निघालो, 'गंधर्व'ला. तिथं आणखी काहीजण आधीच आले होते. मी त्या दिवशी त्यांच्या गप्पांमध्ये रमू शकलो नाही. पण किशाभाऊंनी माझा सर्वांशी परिचय करून दिला. ''उद्या शनिवार. आपण या गिरीशचं एकणार आहोत, पारधी समाजातल्या संघकामाविषयी.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता चं. प. भिशीकर यांच्याकडे मी आबांच्या बरोबर वेळेवर पोहोचलो. बापूसाहेब भिशीकर यांच्याकडे एकेक जण दोन-चार मिनिटातच जमा झाले. डॉ. पुणतांबेकर, शामराव आपटे, कानिटकर, आळवणी, अप्पासाहेब वज्रम आणखी दोघं-चौघं, प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रातले अनुभवी. त्यांच्या मोजक्या हास्यविनोदात मी अंग चोरून बसलो होतो. बापूसाहेब, दादा पुणतांबेकर आणि आबा यांनाच मी ओळखत होतो. कॉफी पान झाल्यावर 'हं. गिरीश, काय आता सुरू आहे? समन्वयच्या बैठकीत ऐकलं मी. पण फारसं कळलं नाही. सोलापूरकडे काहीतरी सुरू आहे नाही का...? बापूसाहेब म्हणाले.

मी थोडं थांबून बोलायला लागलो. मी जे बोललो त्यामध्ये त्रास, उद्वेग जास्त होता. वैताग अधिक होता. अखेर मी म्हणालो,

''अशा स्थितीत कोणाचीच मदत नाही. काम कसं करणार? मला आता इथून परत जायचं धाडस नाही तुळजापूर-यमगरवाडीला.''

सर्व जण पारधी, त्यांच्यावरचे अत्याचार, त्या विषयीची समाजातील अनास्था, संघ कार्यकर्त्यांची या कामाविषयीची हळहळू वाढत जाणारी जाण,

हे सर्व ऐकून सर्वजण गंभीर झाले.

त्याच बैठकीत प्रत्येकानं पाचशे हजार रुपये गोळा केले. माझ्याकडे दिले. शिवाय लगेचच एक भेट यमगरवाडीला द्यायची ठरले.

किशाभाऊंनी मला परतताना अनेक सूचना केल्या. ''या सगळ्यांना तुम्ही पावत्या द्यायला हव्यात; लगेच. आभाराची पत्रं हवीत. शिवाय हे त्वरित हवं. गिरीश ! एक लक्षात ठेवं ! तीन गोष्टींना उशीर केला तर उपयोग नसतो. त्या त्वरित कराव्यात. एक, एखाद्यानं सहकार्य, मदत केली तर आभार, एखाद्यानं चांगलं काम केलं असेल, तर त्यांच अभिनंदन त्वरित करावं आणि दुःखद घटनेनंतरच्या सांत्वनाला उशीर करू नये. एवढं केलं तर सर्व कामात तुम्हाला कोणतीच अडचण येणार नाही. मित्रपरिवार वाढेल.''

मी या सर्व कृतीनं भारावून गेलो होतो. साडेसात हजार रुपये जमले होते. माझी निराशा कुठच्या कुठे गेली होती. सकाळी मी संतापून बोलत होतो. गेले चार दिवस मी कुणाशीच धड सरळ बोललो नव्हतो, पण या घटनेनं मला अंतर्मुख केलं होतं.

सुरुवातीला दाद न देणारे किशाभाऊ, हळूहळू मला समजत गेले. रोज त्यांचा दूरभाष येऊ लागला. नावं, दूरध्वनी क्रमांक, पत्ते देऊ लागले. 'मी ....यांच्याशी बोललोय. सुरुवातीला आपण जाऊ'. असं म्हणून ते मला घेऊन जाऊ लागले. मुंबई अक्षरशः त्यांना तोंडपाठ होती. डायरेक्टर, कंपन्यांचे मालक, मोठमोठ्या पेढ्यांचे शेटजी, अनेक समाजसेवक, व्यापारी, सर्व ठिकाणी ते मला घेऊन जाऊ लागले.

'स्व'-रूपवर्धिनीत सर्वांना एकत्र करून यमगरवाडीचा विषय त्यांनी मांडायला लावला. बघता बघता. 'यमगरवाडी' प्रश्नाभोवती एक आधारकवच उभं राहिलं. 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवक-युवती यमगरवाडीला येऊ लागले. शिबिरं होऊ लागली. परीक्षांच्या काळात अभ्यास घेण्याकरिता येऊ लागले. निधी, धान्य, कपडे, भांडी, कार्यकर्ते असा ओघ यमगरवाडीकडे सुरू झाला.

यमगरवाडी माहितीपत्रक नव्हते. त्याचा मजकूर आटोपशीर; शिरीष

पटवर्धनांनी तयार केला. पहिलं पत्रक छापून इंग्रजी-मराठी तयार करून दिलं. वर्धिनीत एक टेबल-खुर्ची या कामासाठी उपलब्ध करून दिली. स्वतंत्र फाईल ठेवण्यात आली.

येणाऱ्या-जाणाऱ्याला माझा, यमगरवाडीच्या कामाचा परिचय करून देऊ लागले. ''वर्धिनीला भरपूर दिलयंत तुम्ही. आता यमगरवाडीला द्या.''

कोणतीही बरी-वाईट घटना घडो. किशाभाऊ लगेचच सर्वांना एकत्र करून सर्वांपुढे मांडायला सांगत. त्याचा परिणाम चांगलाच होत असे.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. सकाळीच त्यांचा दूरभाष आला.

''अरे गिरीश, त्या पारध्यांच्या नादात अलीकडे तू आम्हाला विसरू लागलायस. आज एका भल्या माणसाला भेटायला जाणार आहे. अगदी पाचच मिनिटात त्यांना सर्व सांगायचंस... ते जर तुझ्या त्या यमगरवाडीला येऊ शकले तर तुझ्या सर्वच समस्या सुटतील असं नाही, पण बघ कदाचित...''

आणि डॉ. जगन्नाथ वाणींची भेट झाली. यातूनच 'मगर-सांगवी'च्या प्रथम वसनास सुरुवात झाली.

नागपूरच्या पारधी धर्मांतराचे प्रकरण असेच. तिकडून आल्यावर त्यांनी मला बोलावून 'स्व'-रूपवर्धिनीतल्या सर्वांसमोर ते मांडायला सांगितलं. तेवढ्यावर न थांबता संजय तांबट यांना एका युवक-युवतींच्या तुकडीसह तिकडे पाठवलं.

माझी धावपळ ते पहात असत. अधूनमधून ते मला घरी बोलावत. त्या दिवशी दिवसभर सर्व कार्यक्रम रद्द करून त्यांच्याबरोबर जावे लागे. मग ते अनेकांच्या भेटी घालून देत. मला सर्व ठिकाणी यमगरवाडीचा अहवाल, ठळक घटना सांगायला लावीत. अर्ध्या कप कॉफीत दहा-वीस हजार रुपयांचे धनादेश मिळवून देत.

एक दिवस असेच ते मुंबईला जाणार होते. मलाही बोलावून घेतलं. तिथले प्राचार्य डॉ. पाटणकर त्यांच्या परिचयातले. ''गिरीश, हा माणूस अत्यंत महत्त्वाचा. तुझ्या विषयातला बाप आहे. उद्योग प्रशिक्षण, सर्व समस्या मिटून जातील. पण अगदी कमी बोलणारा आहे. तू त्यांना विषय सविस्तर पण नेमकेपणानं सांग''

श्रमिक विद्यापीठातले सर्व कोर्सेस त्यांनी दाखविले. ज्या अगत्यानं डॉ. पाटणकर ते दाखवीत होते, त्यावरून किशाभाऊंचा खूप जुना परिचय असावा. त्यांनी सर्व मदत करण्याची तयारी दर्शवून म्हटले, ''एकदा किशाभाऊंनी करा सांगितलं, मग आता चर्चा नाही. मी आता तुमचा आहे. पण माझा तुम्हाला काय उपयोग होईल मला माहीत नाही''

पुढे डॉ. पाटणकरांनी 'श्रमिक' अचानक सोडलं. पण आपला शब्द पाळला. यमगरवाडीसाठी त्यांनी निधी गोळा केला, अनेकांकडे जाऊन. डॉ. पाटणकर यांचे 'स्व'-रूपवर्धिनीत येणं-जाणं वाढलं. त्यांचे इंग्रजी शिकविण्याचे वर्ग. सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना त्या वर्गाला आग्रहानं बोलावणं. माझ्या मागे लागून, किशाभाऊंनी मला त्या वर्गाला येणं भाग पाडलं. **सामाजिक काम करताना कार्यकर्त्यांनी परिपूर्ण व्हावं यासाठी ते प्रयत्नशील असत. ''इंग्रजांचा द्वेष ठीक आहे, पण इंग्रजीचा कशाला? ती भाषा गिरीश यायला हवी. तिला ओठात ठेवा. मानगुटीवर नको.'' ते म्हणत.**

किशाभाऊंचा उत्साह त्यांच्या वयागणिक वाढणारा होता त्यांनी मला अपरंपार स्नेह दिला. आमच्या वयातलं अंतर पाव शतकापेक्षा अधिक, पण ते मोठे कधीच वाटले नाहीत. अगदी बरोबरीच्या नात्यानं, मित्रापेक्षाही अधिक जवळकीनं ते बोलतं, वागत, सल्ला देत. प्रसंगी कठोर होत.

पावती पाठवली न गेल्यास ते मला बोलावून घेत. समोर बसवून पावती लिहायला लावत असत. आभाराचं पत्र लिहायला सांगत. ते सर्व पाकिटात घालून कुणाला तरी त्वरित पोस्टात टाकायला लावत. माझं भडकणं, समस्यांना जाऊन भिडणं, त्यामुळे हे सर्व पावत्या पाठवणं, पत्र पाठवणं वेळेवर होत नसे. मला ते म्हणत, ''गिरीश, हे तुझं बेचाळीस जातींचं काम काय बेचाळीस प्रकल्प करून थांबणार का? दोन-चार असे प्रकल्प कर की ज्याचा सर्वांना उपयोग होईल. आणि तू कुठवर करणार? तुला जे वाटतंय ते पाहणारा पुढे कोण? त्यासाठी कार्यकर्ता घडविणारं एक केंद्र कर. यमगरवाडी नुसती शाळा नकोस करू. कार्यकर्त्यांचं निर्मिती केंद्र होऊ दे. सेवेतून सेवेकरी तयार झाले पाहिजेत.

त्यातून तयार होऊन पुढे चालविणारे आले पाहिजेत. ही बाहेरची माणसं फार काळ नाही चालणार.

अशाच एका महिला अत्याचार घटनेनंतर मी केलेली धावपळ त्यांना कळली. ते अस्वस्थ झाले. ते माझ्यावर खूप संतापले. मी त्यांना एवढं संतापलेलं कधीच पाहिलं नव्हतं. ‘‘तुझा आगीचा बंब होतोय. तुझ्या भावना बरोबर आहेत. तू हे किती करणार? त्या यमगरवाडीकडे तुझं दुर्लक्ष होतय. आज ‘कोठेवाडी’ उद्या आणखी काही. ‘यमगरवाडी’ – ‘मगरसांगवी’ च्यापुढे तू जाऊ नको. कार्यकर्त्यांनी करावं. आपण जाणीव जागृतीचं केंद्र उभ करावं, कार्यकर्ते उभे राहावेत ते त्या त्या घटकातले. मला हे तुझं मान्य नाही. एकाची नीट व्यवस्था लागत नाही. त्यासाठी लागणारा पैसा उभा रहात नाही. ज्यांनी लक्ष द्यायला हवं ते देत नाहीत. आणि जे तूच करायला हवंय ते तूच करायला हवंस. उद्या हे सगळं बंद पडेल. ते चालणार नाही. हे उठसूठ पेपर वाचून घटनेच्या मागे पळणं आता बंद कर.’’

किशाभाऊ बोलले ते खरं होत. पण मला ते त्यावेळी पटलं नाही. मी त्या क्षणी खूप संतापलो. पुढे मी काही दिवस त्यांच्याकडे गेलो नाही. त्यांचा दूरध्वनी माझा पाठलाग करीत होता. एकदा आबा अभ्यंकरांनी मला न सांगताच त्यांच्या घराकडे स्कुटर वळवली.

‘‘वा... वा... आबा. आज तू खरं काम केलसं. ये गिरीश!’’ मग त्यांनी स्वतः दूध बनवलं. बिस्कीट समोर ठेवली. सफरचंद कापून ठेवलं आणि म्हणाले, ‘‘खूप दिवसांचा उपाशी आहे मी, काही सांग की यमगरवाडीचं. काय म्हणतात मुलं? आणि हो, तुला वेळ आहे ना आज .....’’

मग त्यांनी मधला काळ पुसून टाकला. भराभर अनेकांना दूरध्वनी केले. पुन्हा त्यांचा मायेचा हात माझ्या खांद्यावर पडला. काही वाचलेलं त्यांनी सांगितलं. त्यांच्या बोलण्यात ‘स्व’–रूपवर्धिनीच्या मुला–मुलींचं कौतुक भरभरून येत असे. **कुणाचं कौतुक ते हातचं राखून ‘पुणेरी’ पद्धतीनं करीत नसत. माझ्यासाठी त्यांनी अनेकजणांचा वाईटपणा स्वीकारला.** हे सर्व त्यांनी का

केलं? किशाभाऊंनी आकड्यातच सांगायचं झालं तर वीस–पंचवीस लाख रुपये यमगरवाडी विषयाला मिळवून दिले आणि लाखमोलाची माणसं जोडून दिली. पुष्पाताई–संजय–ज्ञानेशसारखे असंख्य कार्यकर्ते जोडून दिले. **हे सर्व करत असताना कशाचीही अपेक्षा धरली नाही. स्वतःच्या नावाची नाही. आभाराचीही नाही. अपेक्षा एकच. चिंता एकच. संघाची. हिंदुत्वाची. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे हिंदुसमाजाच्या हिताचा विचार असे.**

अर्धा एक कप कॉफी. पण त्यातून भटके–विमुक्तांच्या कामाला आकार आला. मोठ्या गप्पा नाहीत. आश्वासनं नाहीत. जो जोडायचा तो कायमचा आपला करून सोडायचा. किशाभाऊ गेले. मोठी पोकळी निर्माण झाली.

...... हे नक्कीच. पण असंख्य युवकांच्या मनात मातृभूच्या सेवेचे अंकुर फुलवून ते गेले. खांद्यावर हलकेच पडणारा त्यांचा आश्वासक हात जरी आता नसला तरी आधाराचे अनेक हात ते जोडून गेलेत.

(साप्ताहिक विवेकच्या सौजन्याने पुनर्मुद्रित)

## मैत्रीची ओढ

माझा किशाभाऊंशी संपर्क शेवटच्या ५–६ वर्षातच आला; पण एकदा त्यांची भेट झाल्यावर मैत्री अशी काही झाली की आम्ही एकमेकांना अनेक वर्षांपासून परिचित आहोत असे वाटावे. पुण्यात आलो की ज्यांना भेटलेच पाहिजे अशा माणसांच्या यादीत किशाभाऊंचे पहिले नाव असायचे. अभावग्रस्त व उपेक्षित बांधवांच्या कल्याणाचा एक चाकोरी बाहेरचा मार्ग त्यांनी शोधला आणि जीवनभर त्या वाटेने चालले. एकट्याच्या बळावर त्यांनी अनेकांना चालते केले.

**विनायक कानेटकर**
**स्मृतिभवन, नागपूर**

# किशाभाऊ पटवर्धन - एक झपाटलेले झाड

**–डॉ. लक्ष्मण नारायण गोडबोले**

'हॅलो...'

'मी किशा पटवर्धन बोलतो आहे. मुंबईला आलो आहे. भेटून जायचे आहे.' असा हा आमचा नित्यसंवाद आता होणे नाही.

माझ्या आयुष्यात शिक्षणक्षेत्रातल्या ज्या काही लोकांनी माझ्या मनावर खोलवर परिणाम केला आहे. त्यातील किशाभाऊ हे एक आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व होते. मी त्यांचा विद्यार्थी नव्हतो. वयाने त्यांच्यापेक्षा लहान असूनही मी त्यांचा समवयस्क मित्र होतो असे मी म्हणतो कारण किशाभाऊंची वागणूक तशी असायची.

मला त्यांच्याबद्दल असलेले आकर्षण त्यांच्यासारख्या नवनव्या शैक्षणिक प्रयोगांच्या ध्यासात असण्याचे होते. अनेकानेक विद्यार्थ्यांतून, अनेक ठिकाणी रुजलेला, बहरलेला, सदैव सळसळणाऱ्या अश्वत्थ वृक्षासारखा हा माझा सर्वार्थाने ज्येष्ठ जीवनदायी मित्र होता. अनेक विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या मधून वाढलेले व चिरंजीव झालेले हे एक झपाटलेले झाड होते.

त्यांचा माझा परिचय साधारण १९८२ सालानंतरचा. स्व–रूपवर्धिनीची स्थापना होऊन काही काळ गेला होता. मंगळवार पेठेतल्या अतिशय दाट वस्तीच्या जागी किशाभाऊंच्या 'स्व'–रूपवर्धिनीची इमारत आज मोठ्या दिमाखाने उभी आहे. वर मान केली तर टोपी पडावी अशी उंच वास्तू डोळ्यांना सुखवणारी आहे. ही सारी एका माध्यमिक शाळेतून निवृत्त झालेल्या मुख्याध्यापकाने निवृत्तीनंतर गेल्या पंचवीस वर्षांत उभी केलेली वास्तू आहे हे कुणाला सांगून खरे वाटणार नाही, पण ते तसे निर्भेळ सत्य आहे.

या वास्तूपेक्षा मोठी कमाई किशाभाऊंनी केली ती म्हणजे या उपेक्षित वस्तीतलीच गुणी मुले वेचून सतत वर्षानुवर्षे ३६५ दिवसांची संस्कार विद्या

देऊन त्यांच्यातून घडवलेली माणसे. ती त्यांची खरी मुले आहेत. १ जून २००३ ला डॉ. रघुनाथ माशेलकरांसारखा एक ख्यातनाम शास्त्रज्ञ जेव्हा जाहीरपणे बालगंधर्वच्या व्यासपीठावरून किशाभाऊंच्या या कार्याची प्रशंसा करीत होता तेव्हा किशाभाऊ एखादा टीव्हीवरचा कार्यक्रम पहावा अशा निरिच्छपणे या सोहळ्यात सहभागी झाले होते. ही लोकेषणा टाळण्याची क्षमता आजच्या काळात तरी दुर्मीळ आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, प्रचारक, य. गो. जोशी यांच्या हाताखाली विक्रयकलेचे धडे घेतलेले पुस्तक विक्रेते, ज्ञानप्रबोधिनीच्या डॉ. अप्पासाहेब पेंडसे यांचे सुरुवातीच्या काळातील सहकारी व ३६५ दिवसांच्या संघाच्या शाखेचे बाळकडू प्यालेले किशाभाऊ अगदी स्पष्टपणे हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकत्वाचा वसा लोकांना सांगत असत. डॉ. हेडगेवारांच्या जन्मशताब्दी-नंतरच्या काळात टीव्हीवर त्यांची मुलाखत झाली होती. त्यात डॉ. केशव बळिराम हेडगेवार हे त्यांचे स्फूर्तिस्थान आहे हे त्यांनी ठणकावून सांगितले होते, ते माझ्या आजही लक्षात आहे. त्याकाळात त्या नावाला राजमान्यता नव्हती आणि आजच्यासारख्या पैशाला पासरी टीव्हीच्या वाहिन्याही नव्हत्या. सरकारी शुक्राच्या झारीतून जे पडेल तेवढेच गंगाजल पदरात पडत असे.

'स्व'-रूपवर्धिनी' ही कल्पनाच मुळात वेगळ्या वाटेची आहे. ही नित्याची शाळा नाही. ही शाळांची शाळा आहे. इथला प्रवेश तुमच्या गुणावर अवलंबून आहे.  ह्या शाळेला ३६५ दिवसाच्या संघाच्या शाखेचे वळण आहे. नुसता अभ्यास घेणारा हा क्लास नाही किंवा व्यायामशाळा नाही. त्या साऱ्या गोष्टी आहेतच पण त्यापलीकडे ही एक मोठी संस्कारशाळा आहे. अनेक उपक्रम त्यांतून संस्कारित झालेल्या मुलांच्या हातात आहेत व ते किशाभाऊंच्या इतक्याच नेटाने पुढे चालवीत आहेत. एका ध्येयवादी प्रेरणेने काम करणारी ही सारी माणसे प्रत्यक्ष काम करताना पाहणे हाच मुळात तुमच्या भावनांचे व विचारांचे उन्नयन करणारा अनुभव असतो.

किशाभाऊंचा देह विसावला. पण त्यातील चैतन्य अनेक डोक्यात व हातात पोचले आहे. तरारते आहे.

असेच एकदा ते आमच्याकडे आले होते तेव्हा बोलता-बोलता विषय निघाला की पुण्यासारख्या मराठीच्या माहेरघरात कित्येक लोक असे आहेत की ज्यांना मराठी येत नाही. 'स्व'-रूपवर्धिनी जवळच्या वस्तीतली ही गोष्ट. किशाभाऊंनी सरळ तिथल्या मुस्लिम स्त्रियांना मराठी शिकवायला सुरुवात केली. त्यातून मग त्या स्त्रियांच्यासाठी शिवणकामाचा, कशिदाकामाचा वर्ग अशा अनेक उपक्रमांची सुरुवात झाली. त्यांनी मनात घेतले की मग त्यात ते नवे प्रयोग करणार ह्यांची निश्चिती असे. त्यांच्या या कामाची फळे आताशी दिसू लागली होती. कोणी एखादी हमिदा अब्दुल रहेमान हुतूर जेव्हा 'कामाची पावती' देते तेव्हा स्तुती करण्यावाचून आपल्याजवळ काही उरत नाही.

**लोकांकडून देणगीदाखल मिळालेल्या प्रत्येक पैशाचा हिशेब देण्याची किशाभाऊंची पद्धत अनुकरणीय आहे.** संस्थेला मिळालेल्या प्रत्येक रुपयातले ८२ पैसे संस्थेच्या उद्दिष्टांसाठी खर्च होतात. फक्त १८ पैसे व्यवस्थापनावर खर्च होतात. जनतेची सेवा करण्याचे कंकण बांधलेले सरकार मात्र याच्या बरोबर उलट परिस्थितीत आजही आहे. सरकारमार्फत राजीव गांधीच्या काळातच हे मान्य करण्यात आलेले आहे. केवळ पैशाचाच हिशेब नव्हे तर संस्थेजवळ उपलब्ध असलेला चोवीस तासांच्या इमारतीच्या वापराच्या वेळेचाही हिशेब 'स्व'-रूपवर्धिनी देते. ही सारी भव्य इमारत दिवसभर कशाकशासाठी वापरली जाते याचा हिशेबही किशाभाऊंची संस्था त्यांच्या वार्षिक वृत्तांतात देते. दायित्वाचे एवढे सजग भान सार्वजनिक संस्था चालविणाऱ्यांमध्ये क्वचितच आढळते. सहज चर्चेत या गोष्टीचे सूतोवाच माझ्याकडे त्यांनी केल्याने मला आजही आठवते.

त्यांच्या या बावनकशी कामाच्या जोरावर त्यांनी अनेक भिन्नभिन्न विचारांची, राजकीय पक्षांशी संबंधित मंडळी जोडली. **ते स्वत: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे घट्ट स्वयंसेवक पण निरनिराळ्या राजकीय पक्षाच्या, विचारांच्या लोकांना त्यांनी जोडले** व त्या साऱ्यांच्या सहकार्यावर

'स्व'-रूपवर्धिनीची वाटचाल चालू आहे. त्यांच्या संस्थेशी जोडलेले लोक आणि त्यांची नावे वाचली की त्याचा उलगडा होतो. प्रेरणास्रोत कोणताही असो खरेखुरे अंतिम उद्दिष्ट एक असेल तर ही महाजनांची मांदियाळी सहज जमते हे त्यांनी सिद्ध करून दाखविले. झोपडपट्टीतल्या तळागाळातल्या मुलांची गुणवत्ता जोखून, त्यावर प्रेरणादायी संस्कार करून त्यांना सामाजिक जाणिवेने भारून टाकले.

सदाशिव पेठेतले चांगले शिस्तबद्ध राष्ट्रप्रेमाचे संस्कार व कर्तबगार मुलांना निवडून त्यांचे सातत्याने राष्ट्रसेवेच्या भावनेने मंतरले जाणे मंगळवार पेठेत आणून अक्षरश: नागझरीच्या बाजूला रुजविण्याचे श्रेय संपूर्णपणे किशाभाऊंचे होते. ह्या सामाजिक अभिसरणाचे महत्त्व खूप मोठे आहे. परदेशी पैशानेच व प्रेरणेनेच अशी कामे होतात असे नव्हे याचे स्वदेशी उदाहरण किशाभाऊंनी निर्माण केले आहे व त्याचा शाखाविस्तारही सुरू झाला आहे. तो पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले ह्याचा माझ्यासारख्या दूरस्थ स्नेह्याला खूप अभिमान वाटतो.

एक माध्यमिक शिक्षक निवृत्तीनंतर एवढी मोठी संस्था उभी करू शकतो व ठराविक पूर्वनियोजित वयानंतर अगदी निरिच्छपणे तरुण लोकांच्या हाती सोपवून बाजूला होतो हे सुद्धा दुर्मीळ असे त्यांचे वर्तन आहे.

किशाभाऊंच्या पावन स्मृतीला प्रणाम.

## वैयक्तिक लक्ष देणारे किशाभाऊ

*वर्धिनीत येणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या वागण्यात एक प्रकारचा न्यूनगंड जाणवायचा. असा न्यूनगंड त्यांच्या मनात कशामुळे निर्माण झाला असेल याचा विचार केल्यावर पटवर्धन सरांच्या लक्षात आलं की याला 'Female Voice' आहे त्यामुळे लोक आपल्याला हसतील ही त्याला भीती वाटत असावी. योग्य वैद्यकीय उपचार करुन त्याच्या आवाजात अपेक्षित बदल झाला. किशाभाऊंनी त्यासाठी खूप धडपड केली.*

# वृद्धिंगत होणारा सुसंवाद

**– गजानन अनंतराव गद्रे**

स्वर्गीय आदरणीय शिक्षक श्री. किशाभाऊ पटवर्धन यांच्या काही आठवणींना उजाळा देत असताना त्याचा पुन:प्रत्यय अनुभवास येत आहे. ५४ ते ५५ वर्षांचा काळ मागे टाकावा लागतो आहे. 'स्व'–रूपवर्धिनीचे संस्थापक पटवर्धन सर हे आमचे राजा धनराजगिरजी हायस्कूलमधील शिक्षक. शास्त्र व गणित विषय शिकवण्यात त्यांचा हातखंडा होता. मी १९५९ साली एस.एस.सी. उत्तीर्ण झालो. इ. पाचवी ते अकरावी म्हणजे जवळ जवळ सात वर्षे विद्यार्थी व नंतर शिक्षक हे आपुलकीचे नाते आमच्यात वृद्धिंगत होत होते. हुषार विद्यार्थ्यांशी सरांची जरा जास्त जवळीक असायची. मॅट्रीकला मला जनरल सायन्स या विषयात डिस्टिंक्शन मिळाले होते. सरांनी दिलेल्या प्रॅक्टीकल हिंट्स्‌मुळे ते शक्य झाले.

इ. आठवीत असताना मार्च महिन्यात माझ्या वडिलांचे निधन झाले. सरांनी मला जवळ घेऊन घरच्या परिस्थितीची विचारपूस केली व कोणतीही अडचण आल्यास नि:संकोचपणे मला सांग असे बजावले. विश्वास दिला. त्यावेळेस मला त्यांचा खूप आधार वाटला. इ. अकरावीत असतानाचा एक प्रसंग मला आठवतो. एका दानशूर व्यक्तीने शाळेकडे काही रक्कम देणगी स्वरूपात दिली व यातूनच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची बोर्डाची फी भरायची असे कळवले. सरांना ही गोष्ट माहिती होती. त्यांनी लगेच मला शिक्षकखोलीमध्ये बोलावले व सांगितले की बोर्डाची फीची चिंता करू नको, अभ्यास कर. तुझी फी भरण्याची व्यवस्था शाळा करेल. ही सवलत मिळण्यासाठी इतरही काही विद्यार्थी व पालक यांचे अर्ज आले होते. परंतु सरांनी मुख्याध्यापक श्री. वि. कृ. श्रोत्रीय यांना भेटून ही सवलत सर्वप्रथम मला मिळाली पाहिजे असा आग्रह धरला व मला ती सवलत मिळवून दिली.

सरांची माझी भेट शाळेत वर्गाबाहेर होत असे. सर पटकन त्यांच्या खिशातील

काही रक्कम काढून माझ्या खिशात कोंबत. माझ्याशिवाय ही गोष्ट शेजारी किंवा बरोबर असलेल्या सहाध्यायासही कळत नसे. रक्कम किती व काय? हे महत्त्वाचे नसून **ज्याला ज्या प्रकारची मदत करणे आवश्यक असेल त्याला ती तत्परतेने व बिनबोभाट देण्याची सरांची हातोटी होती. या उपकाराची फेड कोणत्याही प्रकारे होऊ शकते का?** अनमोल असा हा ठेवा व्यक्तिपरत्वे जपला जातो. सरांचे माझे संबंध शालेय शिक्षण संपल्यानंतरही टिकून राहिले. राजा धनराजगिरजी हायस्कूलमधील त्यांची मुख्याध्यापकाची कारकीर्द, त्यामध्ये त्यांची झालेली मानहानी व ससेहोलपट मला पहावयास मिळाली. परंतु या सर्व घटनांकडे पाहिल्यानंतर किती संयम व धैर्याने त्यांनी एकाकी लढा दिला. संघर्षाला तोंड दिले हे आज शब्दात वर्णन करणे अवघड वाटते. परंतु या असाधारण परीस्थितीत ते जराही विचलित झाले नाहीत. पुढे १९७८-७९ साली सर सन्मानपूर्वक निवृत्त झाले व 'स्व'-रूपवर्धिनीची कल्पना मूळ धरू लागली. ज्ञानप्रबोधिनीच्या उभारणीतही सरांचा मोठा वाटा होता. स्वर्गीय श्री. अप्पासाहेब पेंडसे हे त्यांचे स्नेही होते. ज्ञानप्रबोधिनीला आर्थिक साहाय्य मिळावे यासाठी काही परदेशी संस्थांना प्रोजेक्ट रिपोर्ट अगदी बारीक सारीक तपशिलासह व आकडेवारीसह पाठवावा लागत असे. पटवर्धनसर या कामासाठी हक्काने मला श्री. अप्पासाहेब पेंडसे यांचेकडे श्रुतलेखनासाठी घेऊन जात असत. पूर्वी झेरॉक्स वगैरे अशा सुविधा नव्हत्या. तेव्हा अशा प्रकारच्या अहवालांचे पुन्हा पुन्हा टंकलेखन ते काम परिपूर्ण होईपर्यंत करावे लागे. संस्थेबद्दलची तळमळ व एकूण लागणारे कष्ट हे मी काही काळ का होईना जवळून आणि या दोन व्यक्तींच्या सान्निध्यात राहून पाहिले. आजची ज्ञानप्रबोधिनी, त्याची संकल्पना व मुहूर्तमेढ ही त्यावेळी कागदावर उतरली गेली होती. तसे जे संस्थेचे स्वरूप होते आज ते मूर्त स्वरूपात साकार झालेले आपण प्रत्यक्ष पाहत आहोत. ज्ञानप्रबोधिनीचे श्री. अप्पासाहेब पेंडसे व 'स्व'-रूपवर्धिनीचे अध्वर्यु श्री. पटवर्धन सर हे दोन्ही मान्यवर शिक्षणतज्ज्ञ आज आपल्यात नाहीत. परंतु त्यांच्या आदर्श संस्था अत्यंत दिमाखात शिक्षणक्षेत्रातील एक वेगळेपण दाखवत कार्यरत आहेत.

मी सोमवार पेठेत राहत होतो. निवृत्तीनंतर सरांनी त्यांचे 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्य मंगळवार पेठेत पारगे विद्यानिकेतन या महानगरपालिकेच्या शाळेत सुरू केले. वर्धिनीचे वर्ग संध्याकाळी भरत. सरांच्या आग्रहाखातर काही दिवस इ. आठवी-नववीतील विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरण शिकवले व प्रत्येक विद्यार्थ्यास 'डायरेक्ट-इनडायरेक्ट' नियमावलीची एकेक सायक्लोस्टाईल प्रत उपलब्ध करून दिली होती. त्याचे विद्यार्थ्यांना खूपच अप्रूप वाटले. सर म्हणत मला ३६५ दिवस शाळा चालवायची व सर्वगुणसंपन्न असे विद्यार्थी घडवायचे आहेत. आजूबाजूच्या शाळेतील विद्यार्थी हळुहळू संस्थेत यायला लागले. सांघिक खेळ, प्रार्थना व प्रत्यक्ष विविध विषयांचे अध्ययन त्याचबरोबर व्यक्ती विकास असा वेगळा उपक्रम सरांनी सुरू केला. परंतु अशा प्रकारे संस्था चालवण्यात सरांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत होते. निवृत्तीनंतर आरामात घरी बसावे व उर्वरित आयुष्य सुखासमाधानाने घालवावे ही अनुकूल परिस्थिती सरांना कदापी मान्य नव्हती. शिक्षण खाते, महापालिकेमधील शिक्षण विभाग, नगरसेवक यांना 'स्व'-रूपवर्धिनीचे विचार पटवत रहायचे व त्यासाठी हेलपाटे मारायचे हा सरांचा नित्याचा एक उपक्रम. बरोबर कोणीतरी असायचे. अशा परिस्थितीत सर कधीतरी घरी यायचे. निमित्त कॉफीचे. दिवसभराचा सगळा दिनक्रम व आलेले अनुभव कथन करायचे. परंतु यातून काहीतरी मार्ग निघेल असा आशावाद असे. वर्धिनीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची उत्तम संधी प्राप्त झाली पाहिजे व त्याबरोबर त्यांच्यात भविष्यात एक उत्तम नागरिक साकारला पाहिजे असे सरांच्या बोलण्यात यायचे. नि:स्पृह कार्यकर्ते मिळाल्यास यातील बरेचसे साध्य होईल असे सरांचे म्हणणे असायचे. चांगल्या कार्यात मदत करण्यासाठी लोक पुढे येतात असे सरांचे मत होते. आज असे शेकडो कार्यकर्ते सरांच्या या कार्यात सहभागी झाले आहेत. ज्या शाळेत हे वर्ग भरायचे ती शाळा वर्धिनीच्या कामासाठी उपलब्ध होऊ शकत नाही असा निर्णय महानगरपालिका व एका नगरसेवकाने घेतला व तो त्वरित अंमलात आणण्यात आला. कारणे अनंत होती. म्हणून काही दिवस रस्त्यावरील दिव्याखाली विद्यार्थी जमत. सरांच्या एका मित्राच्या कडबाकुट्टीतही वर्ग भरायचे. परंतु सरांनी आणि संस्थेच्या सहकारी विश्वस्तांनी दृढ संकल्प केला की, बस, आता या भागातच

वर्धिनीची वास्तू उभारायची. तेथे वेळ कशाला? सर लगेच कामाला लागले. जागेसाठी, वास्तूसाठी आर्थिक मदत कोणाकडून व कशी मिळवायची याची कला सरांना उत्तम अवगत होती. कोणतीही शक्ती हा उपक्रम बंद पाडू शकेल असे वाटत नाही.  तन–मन–धनाने सरांनी निवृत्तीनंतर 'स्व'–रूपवर्धिनीला वाहून घेतले व वास्तू उभारली. या सर्व दृष्टीने उपेक्षित अशा भागात गरीब व गरजू विद्यार्थ्यांना संस्थेच्या माध्यमातून प्रतिष्ठा मिळवून दिली. विद्यार्थ्यांचे पालकच स्वतःहून पाल्यात झालेले बदल बोलून दाखवत आहेत असे चित्र दिसू लागले. सरांनी वृद्धत्वावर मात करून उमेदीतील तरुणांना लाजवेल असे संस्थानिर्मितीचे कार्य केले. माझ्या विद्यार्थ्यांना काहीही उणे पडून देणार नाही असे ते म्हणत. सामूहिक गीते, अक्षर सुधारणा, वक्तृत्व, पोहण्याचे वर्ग यासाठी प्रशिक्षण देण्याचा सरांचा प्रयत्न असे. मला आठवते विधी महाविद्यालय आवारातील पोहण्याचा तलाव एका मे महिन्याच्या सुट्टीत सरांनी आरक्षित केला होता व वर्धिनीच्या विद्यार्थ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण व सराव सरांनी दिला. खेळ, चित्रकला संगीत, कार्यानुभव व्यक्तिविकास यासाठी सर शिबिरे आयोजित करीत. नवनवीन ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचे व प्रगतीचा मार्ग दाखवायचा, त्यांच्या आकांक्षाना फुलवायचे असे सरांचे धोरण होते. हे सर्व सर कसे घडवून आणत याबद्दल आश्चर्य वाटते. गेली कित्येक वर्षे 'स्व'–रूपवर्धिनीचे ढोल–लेझीम पथक पुण्याच्या वैभव असलेल्या गणपती विसर्जन सोहळ्यात जोशात सहभागी होताना दिसते. विद्यार्थ्यांमध्ये एकोप्याची भावना रुजवावी, सार्वत्रिक आनंदात वर्धिनीचे विद्यार्थी उत्साहात सहभागी व्हावेत असा त्यामागे सरांचा उद्देश होता. या विद्यार्थ्यांचे आज सर्वत्र कौतुक होताना दिसते.

आणखी एक प्रसंग मला आठवतो. १९५७ साली मोठ्या प्रमाणावर १८५७च्या समरयुद्धाचा शतक महोत्सव सर्वत्र साजरा करण्यात आला. शनिवार वाड्यासमोर यानिमित्त एक प्रचंड सभा आयोजित करण्यात आली होती. वक्ते होते श्री. सेनापती बापट, श्री. वीर सावरकर, श्री. प्र. के. अत्रे, गोवा संग्रामातील श्री. चितळे ही मान्यवर मंडळी एका मंचावर येणार होती. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या व धारातीर्थी पडलेल्या योद्ध्यांचे स्मरण करण्यासाठी. आम्ही इ. ९वीत होतो. सर वर्गावर आले व म्हणाले, ''लेको ! शनिवार वाड्यापुढे जंगी सभा आहे

व देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या मान्यवर व्यक्ती वक्ते म्हणून या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत. ही बुजुर्ग मंडळी कदाचित तुम्हाला पुढे पहावयास मिळणार नाहीत. त्यांना पाहणे व ऐकणे हा एक दुर्मिळ योग आहे.'' झाले! आम्ही सर्वजण मुख्याध्यापकांची परवानगी काढून सभा सुरू होण्यापूर्वी, अंमळ जरा लवकरच शनिवार वाड्यासमोर आसनस्थ झालो. १८५७ चे बंड नव्हते ते स्वातंत्र्य युद्ध होते. तेजस्वी वीरांगना राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, मंगल पांडे, तात्या टोपे यांच्या वीरगाथा समजल्या. या वक्त्यांच्या तोंडून या समरयुद्धातील त्यांचा सहभाग कळला. केवढे भाग्य थोर! हा योग केवळ पटवर्धन सरांच्या प्रेरणेमुळे घडला हे सांगणे नको.

पटवर्धन सरांबद्दल भरभरून सांगण्यासारखे पुष्कळ आहे. विद्यार्थी व शिक्षक यांचा सुसंवाद शालेय शिक्षण संपल्यानंतरही रहातो, टिकतो व वृद्धिंगत होतो. सरांची प्रतिमा सतत स्फूर्तिदायक ठरते. असे सर आम्हांला लाभले. आम्ही धन्य आहोत. पटवर्धन सरांच्या स्मृतीस नम्र आदरांजली.

## जीवनाचे सार्थक झाले.

स्वरूपवर्धिनीत माझी मुले आणि मी; आम्ही चांगले घडलो. आमच्या जीवनात कै. सरांचे खूप सहकार्य मिळाले. अयोध्येवरून परत आल्यावर सरांनी माझे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्यावेळेस मला माझ्या आयुष्यात राम भेटला, जीवनाचे सार्थक झाले असे वाटले. सरांना मी गुरुस्थानी वंदनीय मानते.

आजही मी मला जसे जमेल तसे वर्धिनीच्या संपर्कात असून समाजासाठी थोडे फार काम करते. समाजकार्याची प्रेरणा मला कै. किशाभाऊ सरांकडून मिळाली. प्रौढवर्ग, उर्दू महिला, मुलींचे मराठी वर्ग, हे काम सरांच्या प्रेरणेने केले.

**श्रीमती सुलोचना शिंदे**

# 'मी पाहिलेला कृष्ण'

**– म. शं. जव्हेरी (ॲडव्होकेट)**

भाताचे एक शीत खाऊन तृप्त होणारे कृष्ण भगवान, सुदाम्याचे अठराविश्वे दारिद्र्य दूर करणारे कृष्ण भगवान मी पाहिले आहेत.

'कृ.ल.' सरांनी बारा मुलांना घेऊन वर्धिनीचे रोप लावले. माझा भाऊ वर्धिनीत जायला लागला तेव्हापासून सरांचे आमचे घरी येणे होते. प्रत्येक वेळी फक्त चिमूटभर साखर खाऊन सर जात असत. त्यांची तृप्तता पाहून आम्ही सर्व धन्य होत असू.

दारू पिणारे वडील असलेल्या घरात कधी कोणाचीही वर्दळ नाही. त्यामुळे आम्हाला आमच्या अस्तित्वाविषयी शंका वाटत असे. आमच्याकडे कधीही कोणी चांगली / सभ्य माणसं येतील, जे आल्याने आम्हाला अभिमान वाटेल, असे होणे त्या वातावरणात अशक्यप्राय वाटत होते. अशा वेळी सरांनी गणपती उत्सवातील मिरवणुकीसाठी लागणाऱ्या पथकातील झांजांना मुठी करून घेण्याचे काम माझ्या वडिलांकडून करून घेतले. या कामाच्या निमित्ताने सरांचे आमच्याकडे वारंवार येणे सुरू झाले. त्यांच्या येण्याने आम्हा सर्वांना अभिमान वाटू लागला. एवढेच नव्हे तर आमच्या आजुबाजूला राहणाऱ्यांचा आमच्या घराकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. यामुळे विशेषत: माझ्या आई-वडिलांना पुढे अजूनही काही करण्यासारखे आहे असे वाटू लागले. याचाच फायदा घेऊन मी माझ्या वडिलांना 'सर आपल्याकडे येतात, त्यामुळे तरी तुम्ही दारू पिणे सोडून द्यायला पाहिजे, नाही तर ते परत आपल्या घरी येणार नाहीत' असे सांगून त्यांच्यावर भावनिक दबाव आणू लागलो. सरांनीही माझ्या वडिलांना समजावून सांगितले. सरांचे विचार माझ्या वडिलांच्या मनात रुजत जाऊन रोज नित्य नियमाने दारू पिणाऱ्या वडिलांनी दारू सोडली. घरातून दारू बाहेर पडल्यावर दारिद्र्याला थाराच राहिला नाही.

आमच्याकडे सत्यनारायणाची पूजा होती. तेव्हा मित्र मंडळी, नातेवाईक आले व गेले. सर येऊन गेल्या नंतरच सगळे पाहुणे येऊन गेल्याचे समाधानाचे वाक्य माझ्या वडिलांनी काढले. सरांच्या संस्कारांचा, वर्धिनीच्या जडणघडणीचा,

मनापासून सांगतो, व्यवहारी जगात त्रास होतो खरा पण ते संस्कार व जडणघडण सुटत नाहीत त्यामुळे मिळणारे समाधान हे निरंतर; होणारा त्रास मात्र क्षणिक आहे.

कृष्णाने आपली द्वारका पाण्यात बुडविली.

सरांची 'स्व'-रूपवर्धिनीची द्वारका मात्र त्यांच्या निर्वाणांनंतरही माझ्या मनात व सर्व वर्धकांच्या कार्यांनी अस्तित्वात आहे व राहणार आहे.

।। इति श्री कृष्णार्पणमस्तु ।।

## सेवाव्रती कर्मयोगी

'स्व'-रूपवर्धिनीचे संस्थापक किशाभाऊ पटवर्धन यांचे व्यक्तिमत्त्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्काराच्या मुशीतून घडले.

पुण्यात कँप एज्युकेशन सोसायटीच्या राजा धनराजगिरजी विद्यालयात त्यांनी शिक्षक, पर्यवेक्षक व मुख्याध्यापक म्हणून यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. आपल्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवाकाळात शिक्षकांच्या विविध प्रश्नांचा, समस्यांचा पाठपुरावा करून त्याबाबत तोडगा निघेपर्यंत ते अखंड प्रयत्न करत असत. ते म्हणत, मी आयुष्यभर विचारधन गोळा करीत आलो. तेच माझे खरे भांडवल. गोळा केलेल्या विचारधनाचा समाजाला उपयोग व्हावा याची त्यांना तळमळ लागलेली होती. ते सतत वंचित, उपेक्षित, श्रमजीवी, मागास समाजासाठी धडपडत असत. खरंच, त्यांनी पूर्वभागातील उपेक्षित मागास झोपडपट्ट्यामधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मातेच्या ममतेने, मनोभावे काम केले. 'इवलेसे रोप लावियेले द्वारी, त्याचा वेलू गेला गगनावरी' या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे आता 'स्व'-रूपवर्धिनी विकसित झाली, जनमानसात आता ती रुजली आहे. आजच्या पिढीत त्यागमय जीवनातून समाजकार्याची प्रेरणा लोप पावत असताना सेवाव्रती किशाभाऊ पटवर्धन यांच्यासारख्या निष्ठावंत अध्यापक तथा समाजसेवक हा पुढील नवोदित पिढीस 'दीपस्तंभच' ठरणार आहे.

**हरिभाऊ शिंदे**

# एक ध्येयवेडा स्वयंसेवक

**– डॉ. सच्चिदानंद परळीकर**

कै. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन यांचा आणि माझा परिचय संघाच्या शाखेवरचा. १९४५ च्या सुमारास आम्ही दोघे एकाच म्हणजे ध्रुव शाखेवर एकमेकांना रोज भेटत असू. ही शाखा सध्या बाजीराव रस्त्यावर जेथे दूरध्वनीचे कार्यालय आहे तेथे भरत असे आणि त्या वेळी ती 'ढमढेरे बाग' या नावाने ओळखली जात असे. कृष्णराव पटवर्धन यांचे घर समोरच माडीवाले कॉलनीत असल्यामुळे त्यांच्याकडे सतत जाणे येणे होत असे आणि आम्ही एकमेकांना एकेरी नावाने म्हणजे मी त्यांना 'किशा पटवर्धन' या नावाने आणि ते मला 'नाना परळीकर' या नावाने हाक मारीत असत. कृष्णराव त्यावेळी (आणि नंतरही) सडपातळ बांध्याचे होते. मध्यम उंची, गोरा रंग, डोळ्यावर विद्वत्तासूचक चश्मा, चेहऱ्यावर बुध्दिमत्तेचे तेज अशी त्यांची संघाची खाकी चड्डी घातलेली मूर्ती आजही समोर येते. त्यांच्या घरी नित्याचे जाणे-येणे असल्यामुळे त्यांचे वडील तसेच थोरले डॉक्टर बंधू आणि डॉक्टर वहिनी या सर्वांचा चांगला परिचय होता.

शाखेवर विविध प्रकारचे खेळ खेळले जात असत. सर्वसामान्य स्वयंसेवकांप्रमाणेच या खेळात तेही सहभागी होत असत. लेझीमच्या खेळात, ढोल व हलगी वाजविण्यात ते प्रवीण होते. शारीरिक खेळांपेक्षा बौध्दिक घेण्यात त्यांच्या बुध्दीची चमक दिसून येत असे. त्यामुळे निरनिराळ्या विषयांवरील त्यांची बौध्दिके मनापासून ऐकावीशी वाटत. या बाबतीत त्यांची तुलना त्यांचेच घनिष्ठ मित्र कै. अप्पा पेंडसे यांच्याशी केली जात असे. अप्पा पेंडसे आमच्या शाखेवर कधी तरी महिन्यातून एखादा दिवस येत असत आणि त्या दिवशी त्यांच्या बौध्दिकाचाच कार्यक्रम ठेवला जाई. अप्पांची भाषणे विद्वत्तापूर्ण असत. आणि त्यांच्या बोलण्यात एक प्रकारचा अभिनिवेश असे. तसा कृष्णरावांच्या बोलण्यात जरी अभिनिवेश नसला तरी ते अगदी साध्या, सोप्या शब्दात तळमळीने

जे काही सांगत असत ते आम्हा सामान्य स्वयंसेवकाच्या मनाला जाऊन भिडत असे.

शाखेवरची चार पाच वर्षे संपल्यावर माझे आणि कृष्णराव यांचे मार्ग बदलले. मी फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करू लागलो तर ते राजा धनराजगिरजी या पूर्वभागातील शाळेत अध्यापनाचे काम करू लागले. या नोकरीत त्यांनी विद्यार्थांना मनापासून शिकविले आणि नुसते विषयाचे ज्ञानच करून दिले नाही तर त्याबरोबर विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार केले. त्यांच्यात एक प्रकारची शिस्त निर्माण केली. मला वाटते, पूर्व भागातील तुलनेनं गरीब विद्यार्थ्यांना शिकवता शिकवता त्यांच्या मनात कोठे तरी 'स्व'– रूपवर्धिनीची कल्पना साकार होण्याची बीजे रूजली असावीत. शाळेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी हेच कार्य हे आपल्या जीवनाचे ध्येय मानून त्यामध्ये स्वत:ला झोकून दिले.

'स्व'– रूपवर्धिनी स्थापना करण्याची कल्पना त्यांना त्यांचेच घनिष्ठ मित्र कै. अप्पा पेंडसे यांनी स्थापना केलेल्या ज्ञानप्रबोधिनीवरून सुचली असावी. अप्पा पेंडसे यांनी अगदी नि:स्वार्थ भावनेने ज्ञानप्रबोधिनी सुरू केली आणि तिचा लौकिक थोड्याच दिवसात सर्वदूर पसरला. केवळ पुण्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात आणि काही प्रमाणात भारततही ज्ञानप्रबोधिनीचे नाव एक आदर्श शिक्षणसंस्था म्हणून सर्वतोमुखी झाले. या शाळेत प्रवेश देण्यापूर्वी विद्यार्थ्यांचा बुद्ध्यंक (आय.क्यू) काढला जातो आणि त्या कसोटीवर पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जातो. त्यामुळे तेथे प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारचा वशिला उपयोगी पडत नाही. प्रवेशाची ही पद्धत इतकी वस्तुनिष्ठ आहे की मुख्यमंत्र्यांची चिठ्ठी सुद्धा तेथे निरर्थक ठरते. ही संस्था पुढे आणण्यात अप्पा पेंडसे यांनी जे सेवाभावी कार्येकर्ते निर्माण केले त्यांचे प्रयत्नही उपयोगी पडले. या बाबतीत अप्पांचे संघटनकौशल्य वाखाणण्याजोगे होते. राजकीय दृष्ट्या अगदी विरोधी विचाराचे असलेले अप्पांचे मेहुणे एस्. एम्. जोशी यांचे सहकार्य मिळवण्यातही आप्पा यशस्वी झाले. यावरून आप्पांच्या ध्येयनिष्ठेबद्दल लोकांना

किती खात्री होती हे दिसून येते.

हे सर्व विस्ताराने एवढ्यासाठी लिहिले आहे की कृ.ल.पटवर्धन यांच्या समोर त्यांच्या या मित्राने स्थापन केलेल्या आणि नावारूपाला आणलेल्या ज्ञानप्रबोधिनीसारख्या संस्थेचा आदर्श होता. हेच मॉडेल डोळ्यासमोर ठेवून कृष्णरावांनी 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्य सुरू केले. जरी त्यांच्या डोळ्यासमोर ज्ञानप्रबोधिनाचा आदर्श होता तरी दोन्ही संस्थाच्या ध्येयधोरणात आणि कार्यपद्धतीत फार मोठा फरक होता. अप्पा पेंडसे यांच्या संस्थेत सुशिक्षित मध्यमवर्गीय स्तरातून आलेली मुलेच संख्येने जास्त होती. या मुलांच्या घरची आर्थिक परिस्थिती तशी चांगली होती आणि मुळातच काही संस्कार त्यांच्यावर झाले होते. त्यामुळे त्यांची बौध्दिक क्षमता वाढविणे आणि निरनिराळ्या क्षेत्रांत काम करण्याच्या दृष्टीने या मुलांना लायक बनविणे हेच मुख्य उद्दिष्ट अप्पांच्या डोळ्यासमोर होते.

कृष्णरावांनी काम तळागळातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सुरू केलेले होते. राजा धनराजगिरजी सारख्या पूर्व भागातील शाळेत शिक्षक म्हणून काम केलेल्या कृष्णरावांना या भागातील मुलांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीची पूर्ण जाणीव होती. मुलांना शिकवायला पुरेसा पैसा नाही म्हणून आपल्या हुषार मुलांना शाळेतून काढून टाकणारे गरीब पालक त्यांनी पाहिले होते. प्रतिकूल परिस्थितीत मुलांच्या मनावर चांगले संस्कार कोण घडविणार? अशा परिस्थितीने गांजलेल्या, संस्कारापासून दूर राहिलेल्या पण बौद्धिक क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करून त्यांना पुढे आणण्याच्या, स्वत:च्या पायावर ठामपणे उभे करण्याच्या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन कृष्णरावांनी 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना केली. या संस्थेच्या नावातच तिचे स्वरूप दडले आहे. इतर शाळांप्रमाणे, विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणे, त्यांना प्रत्येक विषयातील अद्ययावत ज्ञान प्राप्त करून देणे, एवढ्याच मर्यादित उद्देशाने 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना केलेली नव्हती. त्यामध्ये विद्यार्थ्यांचा स्वरूपाचा म्हणजेच व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचे उद्दिष्ट त्यांच्या डोळ्यांसमोर होते. या

विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली आणि त्यांच्या मनावर चांगले संस्कार केले तर ते कौटुंबिक स्थिती आणि समाज यात अपेक्षित बदल घडवून आणतील असे उदात्त ध्येय कृष्णरावांच्या डोळ्या समोर होते. या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी मोठ्या तळमळीने हे क्रांतिकारी कार्य हाती घेतले आणि ते यशस्वी करून दाखविले. ज्याप्रमाणे ज्ञानप्रबोधिनीच्या विकासासाठी आप्पांनी निस्वार्थ कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण केली त्याचप्रमाणे कृष्णरावांनीही उदात्त ध्येयाने भारावलेल्या कार्यकर्त्यांची एक फळी उभी केल्यामुळे त्यांच्या पश्चातही हे काम प्रगतीपथावर मार्गक्रमण करीत आहे.

समाजसेवेचे कोणतेही काम जर समाजाला पटले तर त्या कामासाठी पैशांची कमतरता भासत नाही हे सुद्धा 'स्व'-रूपवर्धिनीने सिद्ध करून दाखविले आहे. समाजसेवेसाठी पैशांची गरज नेहमीच भासत राहते. तथापि पैशाअभावी 'स्व'-रूपवर्धिनीची कोणतीही योजना अडून राहिली नाही हे या कार्याचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणावे लागेल आणि याचे श्रेय कृष्णरावांच्या समर्पित कार्यपद्धतीला द्यावे लागेल.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर नेहमी आणि अकारण आक्षेप घेतला जातो की संघातून विधायक कार्यकर्ते निर्माण होत नाहीत. ते फक्त स्वत:ची संघटना वाढविण्यातच गुंतून पडलेले दिसतात. हा आरोप किती बिनबुडाचा आणि तथ्यहीन आहे हे कै. अप्पा पेंडसे आणि कै. कृ. ल. पटवर्धन यांनी स्वत:च्या कार्यातून समाजाला दाखवून दिले आहे. खरे सांगायचे तर त्या दोघांच्याही कार्याची प्रेरणा ही संघाच्याच कार्यपद्धतीत सामावली असल्याचे दिसून येते. **संघाच्या संस्कारातून तयार झालेला स्वयंसेवक हा स्वत: झीज सोसून समाजहिताचे कार्य अत्यंत नि:स्वार्थपणे आणि तळमळीने करू शकतो, एवढेच नव्हे तर अंगीकृत कार्यात यशाचे शिखरही गाठू शकतो हे उपरोक्त दोघाही स्वयंसेवकांनी आपल्या ध्येयनिष्ठ कृतीने दाखवून दिले आहे.** यासाठीच कै. कृष्णराव यांना माझी विनम्र श्रद्धांजली.

# माझे पटवर्धन सर

**– अ. प्र. कुलकर्णी**

पटवर्धन सरांची आणि माझी ओळख शाळेत ते माझे ‘सर’ असल्यापासून. १९५० ते १९५२ दरम्यान मी ‘पूना हायस्कूल ऑफ कॉमर्स’ या डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्सने काढलेल्या पुण्यातील शाळेत त्यावेळेच्या ९ वी ते ११ वी मध्ये शिकत होतो. त्यानंतर काही वर्षांनी ही शाळाच बंद पडली. इन्स्टिटयूट मात्र अजून कार्यरत आहे. अकरावीचे वर्ष हे मॅट्रिकचे. आमच्या वर्गात पंधरा मुले होती. त्यात २ मुली होत्या. सर गणित शिकवायचे. वर्ग लहान आणि उत्साही सर, त्यामुळे सरांना प्रत्येकाची वैयक्तिक ओळख. अगदी घरातल्या माणसांची पण. शिकवण्याची पद्धत एकदम जलद. एक मुद्दा आम्हाला समजण्याअगोदर ते तिसऱ्या मुद्द्यावर पोहचत. आधी गणित विषय, त्यात शिकवण्याची ही पद्धत आणि आम्ही मॅट्रिकच्या दारात! पण याला सरांचा नाईलाज होता. मग आम्हीच आमचा एक ‘प्रायव्हेट’ क्लास सुरू केला. शाळा संपल्यानंतर आम्ही वर्गात बसायचो व आमच्यापैकी एकाने (बऱ्याच वेळा ती जबाबदारी माझ्यावर यायची) सरांनी शिकवलेला भाग परत एकदा इतरांना शिकवायचा. सरांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांना आमचे खूप कौतुक वाटले. म्हणाले, कॉमर्सच्या विद्यार्थ्याने सतत काहीतरी नावीन्यपूर्ण उपक्रम आखला पाहिजे. तसं तुम्ही करताय, तुम्ही नक्कीच यशस्वी होणार.

सर आम्हाला गणित विषयच फक्त शिकवीत नसत. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आपला इतिहास, संस्कृति, भारतातील थोर व्यक्ती आदी अनेक विषयांवर ते मनापासून, तळमळीने बोलत. यावेळी मात्र त्यांचे ओघवते वक्तृत्व कान देऊन ऐकावेसे वाटे. **प्रत्येक विचार मुद्देसूद असे. शब्दयोजना अचूक असे आणि ते बोलताना त्यांचे डोळे विलक्षण चमकायला लागत.** हे डोळे कधीतरी तुमच्यावर रोखलेले असत, तर कधी ते स्वप्नात हरवलेले असत. आम्ही सर्वजण मध्यम वर्गांतले, प्रत्येकाच्या पालकाने आपल्या खर्चाला कात्री लावीत आम्हाला शाळेत

घातलेले. याची जाणीव ते आम्हाला सतत करून देत. ते म्हणत, आई-वडिलांनी केलेल्या त्यागाची परतभेट करा, देशाला काहीतरी द्या आणि लक्षात ठेवा, तुमचे हे भाग्य की तुम्हाला शिक्षण मिळते आहे. अनेक मुले गरिबीमुळे आणि परिस्थितीमुळे प्राथमिक शिक्षणालाही वंचित झाली आहेत, त्यांच्यासाठी काहीतरी करा. आणि हे सांगणे सततचे असे. मनापासूनचे असे.

शेवटच्या वर्षात माझ्या वडिलांची बदली ठाण्यास झाली पण मॅट्रिकचे वर्ष म्हणून माझी सोय पुण्यांतील  माझ्या वडिलांच्या मित्राच्या घरी झाली. या माझ्या वडिलांच्या त्यागाचे ते मला सतत स्मरण करून देत. म्हणत, तुला नुसतं मॅट्रिक व्हायच नाही, चांगले मार्क्स मिळवायचे आहेत. तसे सुदैवाने मिळाले आणि त्यांना जेव्हा मी नमस्कार करावयास गेलो तेव्हा त्यांच्या डोळ्यात पाणी आले. म्हणाले, **छान केलेस. आता तुझ्या भावांडांकडे पण लक्ष दे. त्यांनाही शिकवण्यात तुझ्या वडिलांना मदत कर.**

'सर' म्हणून माझा संबंध इथेच वास्तविक संपायचा. पण तसा तो संपला नाही. कर्म-धर्माचा फार चांगला संयोग झाल्यामुळे कालांतराने माझे दोन धाकटे भाऊ सुनील व श्रीपाद पण दुसऱ्या शाळेत त्यांचे विद्यार्थी झाले. माझ्या वडिलांची सारखी बदली व्हायची तरी सुद्धा पटवर्धन सर आम्हा चार भावांपैकी तीन भावांना लाभले. त्यांनी दिलेले संस्कार अजून आम्हाला सोडत नाहीत. सुनील नंतर चांगल्या पगाराची, प्रतिष्ठेची नोकरी सोडून पटवर्धन सरांबरोबर 'स्व'रूपवर्धिनीमध्ये पूर्णवेळ करू लागला तेव्हा सर्वांना त्याचे कौतुक वाटले. इतका या संस्कारांचा आमच्यावर परिणाम झाला आहे.

आपल्याला शाळा-कॉलेजात अनेक शिक्षक-प्राध्यापक शिकवतात. पण त्यांतील काहीच लक्षात राहतात. त्यांतलेही एक-दोनच आपल्याला ते आपल्यात नसले तरी, दरक्षणी भेटतात, क्षेम विचारतात आणि केलेल्या चुकांबद्दल जाब विचारतात. माझे भाग्य म्हणजे मला असे एक-दोन शिक्षक लाभले. आणि यापैकी मला नेहमी भेटणारे पटवर्धन 'सर', त्यांना मी विसरू म्हटले तरी 'तू कसा मला विसरतोस ते बघच' म्हणून तेच माझ्यावर डाफरणार!

# सदैव सगळ्यांची काळजी करणारे सर

**– ॲड. सौ. भाग्यश्री बोरा**

● मी कॉलेजला असताना दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेपूर्वीचा काळ होता. कॉलेजमध्ये अभ्यासिकेत अभ्यासासाठी थांबायचं होतं पण खूप भूक लागली होती आणि कोणी मैत्रीणही बरोबर नव्हती. डबा होता पण एकटं कसं खावं? एकटं खाणं बुद्धीला पटत नव्हतं. ठरवलं आणि सरांकडे गेले. दुपारची दीड-दोनची वेळ होती. जेवणं चालली होती. तेव्हा सरांनी जेवायलाच बोलावलं. मी माझा डबा घेऊन जेवण केलं. बाईंनी वरण-भात दिला. जेवण झालं. हात धुण्यासाठी उठणार तेवढ्यात बाई म्हणाल्या 'अगं ताटाच्या कडेला भाताचे शीत पडले आहे, तेही घे.' तेव्हा मला संकोचल्यासारखं वाटलं. हे सरांच्या लक्षात येताच सरांनी अन्नाचा एक एक दाणा किती अनमोल असतो, त्याची किंमत आणि त्यासाठी राबणारे अनेक हात ह्याविषयी हसत हसत गप्पा मारल्या. त्यांनी जे सांगितलं ते मला रुचलं देखील. तेव्हापासून अन्नाचे महत्त्व किती अनमोल आहे हे लक्षात ठेवून चुकूनही अन्न वाया जाणार नाही याची खबरदारी माझ्याकडून नकळत घेतली जाते. अशा छोट्याशा प्रसंगावरून सर किती छोट्या बाबतीतही किती सतर्क होते याची प्रचीती येते.

● 'आजोळ' प्रकल्पाची वेळ दुपारी दीड ते पाच अशी होती आणि मी दुपारी तीन ते पाच असा वेळ देत होते. मला खूप उमेद होती. शाखेच्या वातावरणात मिसळून जावं, आनंद लुटावा, समाधान वाटावं अशी अपेक्षा होती. वर्धिनीचा सहवास लाभून अवघे चार महिने झाले होते. सरांविषयी, इतर सर्वांविषयी आदरयुक्त भीती मनात असायची त्यामुळे बोलायला संकोच वाटायचा. अचानक एके दुपारी डॉ. गिरीश बापट, राजाभाऊ लवळेकर अशी नामी मंडळी बसली होती. ऑफिसमध्ये खडू घेण्यासाठी गेले तेव्हा पटवर्धन सरांनी हाक मारली आणि म्हणाले, 'तुझी ओळख करून दे सगळ्यांना.' मी बोलण्या अगोदरच

सरांनी माझ्या कामाची स्तुती केली. मी शाखेत कशाप्रकारे मुलांना समजावून सांगते, त्यांच्याकडून अभ्यास करवून घेते, याची माहिती दिली तेव्हा आश्चर्याचा मोठा धक्काच बसला. त्या दिवसाअगोदर आम्ही एकमेकांशी बोललो नसतानाही सरांना माझ्याविषयी एवढी कशी माहिती याचा मी विचार करीत होते. सरांनी हे हेरलं आणि म्हणाले, **माझं सगळ्यांवर लक्ष असतं आणि विशेषकरून आपल्या चांगल्या उद्देशासाठी काम करणाऱ्या तुझ्यासारख्या उमद्या तरुण कार्यकर्त्यांवर.** तुझ्यासारख्या उमद्या तरुण पिढीची वर्धिनीसारख्या संस्थांना गरज आहे. तुझ्यासारखे अनेकजण तयार व्हावेत अशी इच्छा आहे.

● मी 'इंडियन ऑक्सिजन कंपनीत नोकरीला होते. पटवर्धन बाईंच्या आजारपणात त्यांना एक-दोन दिवसाआड एक छोटा ऑक्सिजन सिलिंडर लागत होता. पटवर्धन सरांचे रिक्षाचालक आणि स्वत: सर सिलिंडर बदलण्यासाठी यायचे हे माहिती होतं. सिलिंडरचा कधी तुटवडा पडू नये म्हणून सर सकाळीच फोन करायचे, 'एक सिलिंडर ठेव' असे सांगायचे आणि संध्याकाळी घेऊन जायचे. एकदा ऑक्सिजनचा तुटवडा पडला. लाईट नसल्यामुळे सिलिंडर भरले गेले नाहीत आणि सर येईपर्यंत ऑक्सिजन सिलिंडरची गाडीही आली नाही. खूप काळजी वाटत होती. मनांत देवाला ऑक्सिजन सिलिंडरसाठी प्रार्थना करीत होते. तेवढ्यात सर ऑफिसमध्ये पोहोचले. त्यांना नाही म्हणता येणार नाही हे माहिती होतं. खरी स्थिती सांगितली तेव्हा सरांना खूप काळजी वाटली पण ती न दाखवता ऑक्सिजन सिलिंडर केव्हा येईल असं हसत हसत विचारून गेले. कुठेही चलबिचल नाही. तब्येतीला संभाळून सर रिक्षात बसले आणि रिक्षावाल्याने रिक्षा वळवून घेतली. तेवढ्यात ऑक्सिजन सिलिंडर्स घेऊन गाडी आली आणि मी सरांना वेळेवर सिलिंडर देऊ शकले याचा खूप आनंद झाला. सिलिंडर मिळाल्यामुळे सरांनाही जो आनंद झाला, जे समाधान मिळालं, त्या दृष्याचे वर्णन मी शद्बांत व्यक्त करू शकत नाही. सर नेहमी सगळ्यांची काळजी करायचे पण स्वत: मात्र हसतमुख राहायचे.

● ज्ञानदा प्रशाला, कोथरूड येथे शिबिर चालू असताना शिबिरार्थींना भेटायला आले. शिबिर कसं चाललंय, विषय काय आहे याची आवर्जून विचारपूस

केली. जेवणाची वेळ होती पण सरांना पथ्य असल्यामुळे शिबिरातील जेवण चालणार नाही हे मला माहिती नव्हतं. सरही मुलांच्या बरोबर जेवायला बसले, मात्र स्वत:चा दहीभाताचा डबा घेऊन. सर आमच्या मुलांच्या समाधानासाठी पंगतीमध्ये बसले आणि सर्वांच्या बरोबर त्यांनी डबा खाल्ला.

या तऱ्हेचे अनेक प्रसंग घडत गेले, प्रत्येकवेळी प्रोत्साहन देत गेले आणि मी वर्धिनीची केव्हा होऊन गेले हे समजलेही नाही.

## व्यक्ती नश्वर, कार्य चिरंतन



संघ प्रतिज्ञा, वीरव्रताची
तुम्ही घेतली, तरुणपणी
वाण सतीचे, घेऊन हाती
जळली काया, दिवसारात्री

समाज पाहुनी, दु:खी कष्टी
क्लेशच झाले, तुम्हास पोटी
तुम्हांस होती, दूरच दृष्टी
तुम्ही निर्मिली, नूतन सृष्टी

ज्ञानावाचुनी, सर्व आंधळे
‘स्व’–स्वरुपाची, जाणीव देणे
मार्ग शोधुनी, सुफलित केले
जगावेगळे, कार्य निर्मिले

समाज तितुका, अवघा माझा
भाव मानसी, समरसतेचा
दीन दलित तो, उन्नत व्हावा
‘‘वर्धिनी’’ स्थापून मार्ग दाविला

समाज चिंतन, सदैव चाले
सभा, मीलनी,प्रकट जाहले
उक्ति कृतीतुनी, दर्शन घडले
हृदयीं ठसले, चित्र आगळे

जीर्ण तनू ती, आज त्यागिली।
वर्धिनी ‘रुपें’ नित्य राहिली।
व्यक्ति नश्वर, कार्य चिरंतन।
हेच सांगते, अपुले जीवन

**श्री. अरविंद हर्षे**

# 'अध्यात्म' जाणणारे मा. कृष्णराव

**– अशोक निरफराके**
**शब्दांकन : बागेश्री पोंक्षे**

१९५७ ते १९६४ या काळात मी 'राजा धनराज गिरजी' विद्यालयाचा विद्यार्थी होतो. पण त्या सर्व काळात पटवर्धनसर आमच्या वर्गावर शिकवायला नव्हते. दगडी इमारतीमध्ये वर्ग भरत. मैदानाकडे तोंड करुन असलेली सिमेंटची इमारत नुकतीच बांधून झालेली होती. तेव्हा फक्त तळमजला आणि गच्ची एवढीच वापरण्याजोगी जागा होती. तळमजल्यावर फक्त दोन मोठी दालने होती. त्यातील उजवीकडच्या दालनात आम्ही चर्मकला आणि चित्रकला यांच्या तासांसाठी जात असू. डावीकडच्या दालनात विज्ञान प्रयोगशाळा होती. ते खास पटवर्धन सरांचे राज्य होते. तिथे डोकावून पाहण्याचीसुद्धा आम्हाला भीती वाटत असे. कारण पटवर्धनसर फार कडक म्हणून प्रसिद्ध होते.

इयत्ता दहावीत असताना माझी 'ज्ञान प्रबोधिनी' संस्थेच्या प्रबोध वर्गासाठी निवड झाली. इयत्ता अकरावीत गेल्यावर ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक डॉ. वि.वि.पेंडसे म्हणजेच अप्पा यांनी मला सदाशिव पेठेतील त्यांच्या घरी राहायला बोलावले कारण त्यावेळी आम्ही पर्वतीदर्शन येथील पूरग्रस्त चाळीत राहत होतो, तेथे माझा अभ्यास नीट होणार नाही असे अप्पांना वाटले. अप्पांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी शिकविलेल्या स्वाध्याय कौशल्यांनुसार माझा अभ्यास जोरात सुरू झाला. साधारण निम्मे वर्ष संपल्यानंतर, घड्याळ लावून उत्तरपत्रिका सोडवायच्या, त्या जाणकार शिक्षकांकडून तपासून घ्यायच्या, त्यांनी दाखविलेल्या चुका दुरूस्त करून त्याच उत्तरपत्रिका पुन्हा लिहायच्या आणि त्याच शिक्षकांकडून त्या पुन्हा तपासून घ्यायच्या असे त्या शिक्षकांचे समाधान होईपर्यंत पुन्हा पुन्हा करीत रहायचे असे तंत्र अप्पांनी बसविले. साहजिकच या तंत्रात जशी आम्हा विद्यार्थ्यांच्या चिकाटीची कसोटी होती, तशीच उत्तरपत्रिका तपासून देणाऱ्या

शिक्षकांच्याही चिकाटीची! माझ्या सामान्यविज्ञानाच्या उत्तरपत्रिका तपासून घेण्यासाठी म्हणून अप्पांनी मला जवळच लिमयेवाडीत राहणाऱ्या पटवर्धनसरांकडे पाठविले. पहिल्यावेळी मी अगदी दबकत दबकत गेलो होतो. सरही मोजकेच बोलायचे. काही काळानंतर, उत्तरांमध्ये दर्जेदार तपशील भरण्यासाठी सरांनी आपल्याकडची पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र ह्यांची प्रगत पुस्तके मला वाचायला दिली. त्यांचा वापर करणे मला जमू लागल्यावर सर खुलले. मग प्रत्येक वेळी हातावर खाऊ मिळू लागला. शाळेत मात्र आम्ही एकमेकांच्यासमोर क्वचितच येत होतो.

पूर्वपरीक्षा झाल्यानंतर शाळेत जाणे बंद झाले. अप्पांच्या घरीच दिवसभर अभ्यास चालू असे. एके दिवशी सकाळी अचानक 'अरे अशोक' अशी जोराची हाक आली. मी पुस्तक टाकून सज्जातून जाऊन पाहिले, तर रस्त्यावर, स्कुटरवर बसून, पाय टेकून पटवर्धनसरच मला बोलवीत होते. मी खाली गेलो. सरांनी माझ्या हातात एक खाकी कागदाची पुडी ठेवली. आणि म्हणाले,''ह्यात बदाम आहेत. यातले दोन बदाम रोज रात्री वाटीत भिजत घालायचे आणि सकाळी चावून-चावून खायचे. आपल्याला परीक्षेसाठी जास्तीची शक्ती हवी आहे ना, म्हणून!'' सरांच्या ह्या अकल्पित मायेने मी अवाक् झालो.

पुढे परीक्षेचे वेळापत्रक लागले. माझा क्रमांक फर्ग्युसन महाविद्यालयात लागला होता. आमच्यावेळी रोज दोन विषयांची परीक्षा असे. तीन तासांची एक परीक्षा, मग अर्धा तास सुट्टी आणि मग पुन्हा तीन तासांची दुसरी परीक्षा. पहिल्या दिवशी मराठीची प्रश्नपत्रिका सोडवून सुट्टीसाठी मी बाहेर आलो, तर दारात पटवर्धन सर उभे! त्यांनी थर्मास पुढे केला आणि म्हणाले, ''यात गरम दूध आहे ते आधी सावकाश पी, चटका बसू देऊ नकोस, आणि मग सांग परीक्षा कशी झाली?'' सुट्टीनंतर सामान्यविज्ञानाची परीक्षा होती. त्या विषयासाठी सरांनी मला मार्गदर्शन केले होते त्यामुळे ते त्या दिवशी आले असावेत, असे मला वाटले. अर्थातच खूप आनंद झालेला होता. पण प्रत्यक्षात नंतरच्या सर्व दिवशी पटवर्धन सरांचा हा क्रम चालूच राहिला. शिवाय येताना रोज ते आमच्या

शाळेतील वेगवेगळ्या शिक्षकांना बरोबर घेऊन येत असत. **पटवर्धन सरांचे प्रेम असे नेमक्या कृतीतून व्यक्त होत असे.**

शालांत परीक्षा पूर्ण झाली. निकाल लागला. त्यानंतर काही दिवसांनी घडलेला प्रसंग. पटवर्धन सर प्रबोधिनीत आले आणि मला म्हणाले, ''तुझ्या सामान्यविज्ञानाच्या नोटस् मला हव्यात. देतोस का?' नाही म्हणण्याचे काही कारणच नव्हते. मी कपाटातून एक धारिणी (फाइल) काढली. अप्पांनी आम्हाला सुट्या कागदांवर टिपणे काढून ती धारिणीत प्रकरणवार लावून ठेवण्याचे तंत्र शिकवलेले होते. उत्तम कागद वापरायचा, उत्तम धारिणी घ्यायची, म्हणजे अभ्यासाला उत्साह वाटतो असे अप्पांचे सांगणे असे. माझी धारिणी त्यानुसारच होती. पटवर्धन सरांनी ती हातात घेतली आणि क्षणभर थांबून ते म्हणाले, 'मी आतले कागद घेतो. वरची फाईल भारीतली दिसते आहे, तुला ती आणखी कशाला लागेल. होय ना?' मला ते म्हणणे लगेच पटले. सरांनी देऊ केलेली रिकामी धारिणी मी परत घेऊन कपाटात ठेवली. थोडावेळ इकडचे-तिकडचे बोलून सर मला म्हणाले, ''आत्ता घडलेल्या प्रसंगाबद्दल मी तुला काही सांगतो. रागावू नकोस. पण तुला ते आयुष्यभर उपयोगी पडेल. आत्ता तू जे केलेस त्याला इंग्रजीत म्हणतात, 'बीईंग पेनी वाईज ॲण्ड पौंड फूलिश' म्हणजे महत्त्वाची गोष्ट सहजपणे दिलीस, पण किरकोळ गोष्ट मात्र ठेवून घेतलीस. माणूस बऱ्याचदा क्षुल्लक गोष्टीत कमालीची दक्षता दाखवतो. कारण तो 'पेनी वाईज' असतो. पण महत्त्वाच्या गोष्टीत मात्र तो गाफील राहतो किंवा हयगय करतो- 'फूलिश' ठरतो!'' रिकामी धारिणी देऊ करून पटवर्धनसर माझी कसोटी घेत आहेत हे माझ्या लक्षातही आले नव्हते! त्यांनी सांगितलेल्या म्हणीमुळे माझे डोळे उघडले. तो प्रसंग, ती म्हण आणि म्हणीमागचे तत्त्व मी अजूनही विसरलेलो नाही.

नंतरच्या काळात कँप एज्युकेशन सोसायटीने पटवर्धन सरांवर काही अन्याय केला. सर न्यायाधिकरणात गेले. कायदेशीर लढाई चालू झाली. त्याकाळी असे धाडस क्वचितच् कोणी शिक्षक दाखवीत असे. पण सर लढाऊ होते. सर शाळेत जात नव्हते. त्याकाळात अप्पांनी त्यांना ज्ञानप्रबोधिनीत काम करण्यासाठी

बोलाविले. आम्ही सगळ्यांनी त्यांना 'कृष्णराव' असे संबोधायचे असे अप्पांनी सांगितले. त्यामुळे पटवर्धनसरांचे 'कृष्णराव' झाले. त्यांचा हुद्दा 'संपर्क अधिकारी' असा होता. संपूर्ण प्रबोधिनीत कृष्णराव हे एकटेच असे होते की जे अप्पांना 'अरे अप्पा' अशी हाक मारीत असत. कारण त्यांची रा.स्व. संघातील जुनी ओळख होती. इकडे अप्पा पाचवीतल्या मुला-मुलींना सुद्धा 'कुठे राहता आपण?' अशा पद्धतीने 'अहो-जाहो' करीत असत. ते जितके वेगळे वाटत असे, तितकेच हे कृष्णरावांचे 'अरे अप्पा'. अप्पांच्या घरीच काही काळ राहत असल्यामुळे अप्पांचे थोरले भाऊ अण्णासाहेब आणि थोरल्या भगिनी चमूताई गोखले यांना मी अप्पांना एकेरी हाक मारताना ऐकलेले होते. पण आम्ही विद्यार्थी तेथे आलो की लगेच ते अप्पांना अहो-जाहो करू लागत. पण लवकरच कृष्णरावांचे संबोधन आम्हा कार्यकर्त्यांच्या सवयीने अंगवळणी पडले, कारण त्यातला जिव्हाळा अकृत्रिम होता हेही पटले!

ज्ञान प्रबोधिनीच्या कामातल्या छोट्या-मोठ्या आठवणी अनेक आहेत. त्यातील एक ठळक आठवण. कृष्णरावांनी ग.दि. माडगूळकरांना प्रबोधिनीत आणल्याची ! 'संपर्काधिकारी' या नात्याने कृष्णराव समाजातल्या वेगवेगळ्या प्रसिद्ध आणि दानशूर श्रीमंत व्यक्तींना जाऊन भेटत आणि प्रबोधिनी दाखवायला घेऊन येत. त्यांच्या मनाने एकदा घेतले की 'ग.दि.मा.' प्रबोधिनीत यायला हवेत. कोणी म्हणाले 'ग.दि.मांची काँग्रेस पक्षाशी जवळीक आहे, ते येतील की नाही कोण जाणे' कृष्णराव उत्तरले, 'असतील, म्हणून काय झालं? आपण त्यांना थोर साहित्यिक म्हणून बोलावणार आहोत. कसे येत नाहीत बघतो.' त्यांनी माहिती काढली की अमुक एका दिवशी ग.दि.मा. जवळच्याच महाराष्ट्र साहित्य परिषदेत येणार आहेत. कृष्णराव ग.दि.मांच्या घरी जाऊन धडकले. प्रबोधिनीची माहिती सांगून ती बघायला येण्याचे निमंत्रण त्यांनी दिले. ग.दि.मा. टाळाटाळ करू लागले, वेळ नाही म्हणू लागले. कृष्णरावांनी सांगितले अमुक दिवशी तुम्ही महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये येणार आहात. प्रबोधिनी तेथून चालत फक्त साठ सेकंदाच्या अंतरावर आहे. आम्ही तुम्हाला गाडीने घेऊन जाऊ, मग

काय हरकत आहे?' थोडेसे वैतागून ग.दि.मा. म्हणाले, 'अहो पटवर्धन, मी साहित्यिक आहे. साहित्यपरिषद ही माझी आपली संस्था आहे. तेथे जायला वेळ काढणं माझ कर्तव्यच आहे. तिथे तुमच्या शिक्षणसंस्थेचा काय संबंध?' हजरजबाबी कृष्णराव लगेच उत्तरले, 'नाही कसा? उद्या आमच्या संस्थेतूनही चार-दोन साहित्यिक तयार होतील. आपण आलात तर त्यांना स्फूर्ती मिळेल.' शेवटी ग.दि.मांनी हात जोडले आणि 'येतो' म्हणाले. कबूल केल्याप्रमाणे ते आले. त्यांची सभाही चांगली झाली. या प्रसंगानंतर प्रा.विनयराव हर्डीकर कृष्णरावांना चिडवीत असत की, मनात आणलं तर कृष्णराव इंदिरा गांधींच्या टेबलावरचं पेनसुद्धा त्यांना सांगून घेऊन येतील.' त्यांनी जर विचारलेच, तुम्हाला कशाला हवं पेन? तर कृष्णराव त्यांना बजावतील, 'तुम्ही पंतप्रधान आहात, तुम्हाला पेनं हवी तेवढी मिळतील, पण आमच्या विद्यार्थ्यांना 'इंदिरा गांधींचं पेन' असं म्हणून मी एकच पेन दाखवू शकेन. ते बघून त्यांच्यातलाच एखादा उद्या पंतप्रधान होईल. त्यामुळे तुम्ही साधं पेन देत नाही म्हणजे काय?'

दरम्यान कृष्णरावांनी कँप एज्युकेशन सोसायटीविरुद्धचा दावा जिंकला. मुख्याध्यापक पदाच्या खुर्चीत ते सन्मानपूर्वक जाऊन बसले. पुण्यातील शिक्षकवर्गात तो अभिमानाचा आणि आदराचा विषय झाला होता. केवळ कृष्णराव म्हणूनच ते ही झुंज यशस्वी करू शकले. रा.ध.विद्यालयातून निवृत्त झाल्यावर कृष्णरावांनी वेगळी संस्था काढायचे ठरविले.

नव्या संस्थेची उभारणी चालू असतानाच्या काळात माझ्या कृष्णरावांशी वारंवार गाठीभेटी होत असत. पुण्याच्या पूर्व भागात झोपडपट्टीतील मुलांसाठी शिक्षणसंस्था काढायची हे उद्दिष्ट अतिशय आवाहक होते. कृष्णरावांचा अफाट जनसंपर्क उपयोगी पडला.

त्या काळात कृष्णराव अचानक प्रबोधिनीत येत आणि म्हणत,'अशोक, चल कॉफी प्यायला जाऊ.' कधी-कधी प्रा. रामभाऊ डिंबळे, प्रा. विनयराव हर्डीकर यांना, म्हणजे आमच्या तिघातील कुणा एकाला, कुणाही दोघांना किंवा तिघांनाही, त्यांनी मनात योजल्यानुसार पुकारत. त्यावेळी प्रबोधिनीच्या इमारतीतून

बाहेर पडून हॉटेलात जाऊन कॉफी प्यायची हे जरासे धाडसच असायचे! कारण हॉटेलिंग शिष्टसंमत नव्हते! फार-फार तर गुऱ्हाळात जाऊन रस प्यायलेले चालायचे. कारण आयुष्याच्या हलाखीच्या काळात खुद्द अप्पांनी मा. वसंतराव गीत यांच्या साथीने विद्यापीठ रस्त्यावर एक गुऱ्हाळ चालवले होते. (अशाच हलाखीच्या काळात कृष्णरावांनी डोक्यावर पाटी घेऊन घरोघर जाऊन आंबे विकलेले होते. ते असो.) पण त्यामुळे गुऱ्हाळाला नाही म्हणण्याची कोणाची शहामत नसे. शिवाय प्रबोधिनीजवळच्या एका गुऱ्हाळात पाटी लावलेली होती ''देशबंधूंनो विचार करा, चहापेक्षा रस बरा''!

अशा पार्श्वभूमीवर **कृष्णरावांनी कॉफी प्यायला बोलावले की आम्ही निघालोच. कॉफी पिता-पिता कृष्णराव नव्या संस्थेचे एखादे काम हळूच आमच्या गळ्यात टाकीत.** संस्थेचे नाव काय ठेवावे यासाठी कल्पना सुचव, एखादे माहिती पत्रक लिहून दे, मराठी माहितीपत्रकाचा इंग्रजीत किंवा हिंदीत अनुवाद करून दे, किंवा कार्यकर्त्यांच्या एखाद्या बैठकीसाठी ये, अशी ती कामे असत. कृष्णरावांचे हे 'कॉफी चातुर्य' लक्षात आल्यानंतर मात्र रामभाऊ त्यांना नेहमी म्हणत असत,'कृष्णराव, नको तुमची कॉफी. फार महागात पडते !'

अशाच एका कॉफीच्या कपाबरोबर कृष्णरावांनी मला 'स्व'-रूपवर्धिनी साठी प्रार्थना रचायला सांगितली. संघाची प्रार्थना मी साधारण ऐकून होतो. प्रबोधिनीची प्रार्थना रोज म्हणतच होतो. मी कृष्णरावांना विचारले की त्यांना काय आशय प्रार्थनेत असावा असे वाटते. कृष्णराव म्हणाले की ते 'आशय वगैरे माझ्यापेक्षा राजाभाऊच चांगला सांगतील' म्हणून ते मला मा. राजाभाऊ लवळेकर यांच्याकडे घेऊन गेले. मा. राजाभाऊंनी त्यांच्या प्रभावी शब्दात अपेक्षित आशय मला समजावून सांगितला. प्रार्थनेचे वृत्त प्रौढ आणि गंभीर असावे अशी माझी कल्पना होती. रेव्हरंड ना.वा.टिळक यांची,

'सामर्थ्य नामी तुझ्या आर्यभूमी!
असे पाहिले मी न कोठे तरी'

ही मंदारमाला वृत्तातली कविता मला आठवली. मी जुळवाजुळव सुरू

केली. साधारण तीन कडवी जुळली. तेवढ्यात प्रा. विनयराव हर्डीकर त्यांनी रचलेले एक कडवे घेऊन माझ्याकडे आले आणि म्हणाले,'' कृष्णरावांनी मलाही (कॉफी पाजून !) प्रार्थना रचून द्यायला सांगितली पण कसंबसं हे एक कडवं जुळलंय. मला असं दुसऱ्यानी सांगितलेल्या आशयावर कविता रचून देणं काही जमत नाही, या कडव्याचं काय करायचं ते तू बघ. कृष्णरावांनी ते तुझ्याकडे द्यायला सांगितलंय'. मी ते कडवे वाचले. विनयरावांचे वृत्त वेगळे होते. काही आशय माझ्या कडव्यात आधीच येऊन गेलेला होता. पण मला अजिबात सुचलेलाच नव्हता असा विचार त्यांच्या एका ओळीत नेमक्या शब्दांत मला सापडला आणि ते शब्द मी लगेच अंतर्भूत केले. ते शब्द आहेत 'पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे'. नंतर मला जाणवले की शौर्य, पराक्रम हा आपला पिंडच नाही.

आणखी दोन-तीन दिवसांनी खुद्द कृष्णरावच आणखी एक कविता घेऊन आले. ती रचलेली होती मा.सौ. सुभगाताई देव यांनी. त्यात पुन्हा अगदी वेगळा आशय सापडला. तो ईश्वराला केलेल्या प्रार्थनेचा होता. (अशी प्रार्थना करणं हे ही माझ्या पिंडात नसलेलं !) ते कडवे जसेच्या तसे शेवटचे आणि महत्त्वाचे कडवे म्हणून घेतले गेले - 'प्रभो तू चिदानंद रूपी असोनी.....'

अशा रीतीने अनेकांचा हातभार लागून तयार झालेले हे पद्य प्रबोधिनीत काही जणांनी पाहिले. मा.डॉ. नलूताई गुजराथी यांच्या हाती ते पडले. त्यांचा संगीताचाही अभ्यास आहे. त्यामुळे त्यांनी त्या पद्याला चाल लावली. आणि ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील मुलींच्या एका वर्गाकडून ते बसवून घेतले. कृष्णरावांनी ती चाल ऐकली. 'आमच्या मुलांना ही चाल फार अवघड होईल.' असे ते म्हणाले आणि त्यांनी ती कुणाकडूनतरी सोपी करून घेतली. तर अशी आहे 'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रार्थनेची कथा! तिचे श्रेय कोणाही एका व्यक्तीला नाही. आणि मुख्यत: या प्रसंगात दिसते ती कृष्णरावांची योजकता, त्यांचे नियोजन कौशल्य. कोणत्याही कामासाठी कोणाही एकाच व्यक्तीवर अवलंबून रहायचे नाही हे त्यातले मुख्य सूत्र. आपल्याला नेमके काय हवे हे आधी आपल्याला

स्पष्ट असले पाहिजे, मग ते ज्याच्याकडून काम करून घ्यायचे त्याला नेमके समजावून देता आले पाहिजे आणि त्याने ते त्याच्या कुवतीनुसार करून आणून दिले तरी ते आपल्या निकषात बसेपर्यंत स्वीकारता कामा नये.

कृष्णरावांच्या घराबद्दल काहीच लिहिले नाही तर या आठवणी पूर्णच होणार नाहीत. लिमयेवाडीतले घर मी थोडेसेच पाहिले होते. नंतरच्या काळात कृष्णराव त्यांच्या स्कूटरवरून मधून-मधून मला त्यांच्या शासकीय तंत्र निकेतनाजवळच्या उच्चभ्रू वस्तीतल्या बंगल्यावर घेऊन जात असत. पहिल्यावेळी तर मी दबूनच गेलेलो होतो. अशा वस्तीतल्या अशा बंगल्यात जाण्याची आणि वावरण्याची सवय नव्हती. कृष्णरावांच्या सौभाग्यवती लीलाताई यांचाही प्रारंभी दराराच वाटला होता. घराची सजावट अतिशय अभिरूचिसंपन्न होती. कोचावर बसलो तर भरतकाम केलेल्या सोफा कव्हरला सुरकत्या पडतील अशा भीतीने मी लाकडी खुर्चीतच अवघडून बसलो होतो. लीलाताईंनी स्वयंपाकघरातून काहीतरी खाऊ आणला. बोलता बोलता मी त्यांना बंगल्यासमोरच्या आवारातल्या बागेबद्दल काही प्रश्न विचारला आणि लीलाताई एकदम भरभरून बोलू लागल्या. खाऊन झाल्यावर मला त्या स्वत: बाहेर घेऊन गेल्या आणि त्यांनी सगळी बाग बारकाईने दाखविली. वेगळ्या प्रकारचे तुळशीवृंदावन दाखविले. प्रत्येक गोष्टीत त्यांची हौस आणि सौंदर्यदृष्टी दिसत होती. पुढच्या भेटीत आणखीन मोकळेपणा वाढला. मी त्यांना माझ्या लाकडी खुर्चीवर बसण्याचे कारण सांगितले. त्यावर त्यांना हसू आले. कृष्णराव म्हणाले, ‘त्याचं काय आहे अशोक, आमच्या घरात कोणी लहान मूल नाही. त्यामुळे हे सगळं फर्निचर एकदा नीटनेटकं लावून ठेवलं की लीलाबाईंना फारसं काही करावं लागत नाही’. त्यावर (अर्थातच उसळून!) लीलाताई म्हणाल्या, ‘तुमचे सर एकटेच दहा पोरांपेक्षा भारी आहेत. त्यांनी केलेला पसारा आवरण्याचं काम मला दिवसभर पुरतं’. एकमेकात विरघळून गेलेल्या त्या पतिपत्नींचा प्रेमळ वादविवाद ऐकणे मोठे मनोहर.

मला आणखी बढती मिळाली. अनेकदा स्वयंपाकघरात जाऊन कृष्णरावांबरोबर जेवण करण्याचा योग आला. त्यावेळी लीलाताईंचे पाककौशल्यही

कळले. बोलण्याच्या ओघात एकदा कृष्णरावांनी मला सांगितले, 'आयुष्याचा काही काळ हलाखीत काढल्यानंतर, 'आधी प्रपंच करावा नेटका' हे मला पटले. केवळ आम्हा दोघांच्या पगारातून अशा जागी असा बंगला बांधणे शक्यच नव्हते. पण मी शेअर बाजाराचा अभ्यास केला. त्यात उलाढाल केली त्यातून बंगला झाला आणि थोरामोठ्यांच्या ओळखीही झाल्या.' पण हे सांगणारे कृष्णराव 'मग करावे परमार्थ विवेका' ही रामदासांची पुढची ओळही विसरलेले नव्हते. त्यांच्या दिवाणखान्यात सगळ्यात महत्त्वाच्या ठिकाणी रामकृष्ण परमहंसांची एक अतिशय सुंदर तसबीर लावलेली असे. आणि तिच्या शेजारीच एका चौकटीमध्ये (म्हणजे फ्रेममध्ये) त्यांचे एक सुवचन लावलेले असे. हे सुवचन बदलण्याची सोय त्या फ्रेममध्ये केलेली होती. त्यामुळे दर आठवड्याला वेगळे सुवचन असे. एकदा कृष्णरावांच्या घरी रात्री मुक्काम करण्याचे निमंत्रण त्यांनी दिले होते. पहाटे मला एका वेगळ्या आवाजाने जाग आली. मी दिवाणखान्यात झोपलेलो होतो. आतल्या खोलीतून आवाज येत होता. थोड्यावेळाने कृष्णराव आतून बाहेर आले. त्यांना मी आवाजाबद्दल विचारले. ते म्हणाले, 'अरे त्याला 'भ्रामरी' म्हणतात. तो प्राणायामाचा एक प्रकार आहे. रोज पहाटे मी योगासने आणि प्राणायाम करतो'.

कृष्णरावांचे रामकृष्ण आश्रमात नेहमी जाणे-येणे असे. ज्ञान प्रबोधिनीच्या आमच्या एकत्र असण्याच्या काळात एकदा ते मला विश्वासात घेऊन म्हणाले, ''हे बघ अशोक, आयुष्यभर ब्रम्हचारी रहायचं की नाही ते तुझं तू ठरव. अप्पांसारखं सगळ्यांनाच जमतंच असं नाही. पण जर तुझा तसा विचार असलाच तर मी तुला रामकृष्ण आश्रमातल्या स्वामीजींकडे घेऊन जाईन. ते तुला ब्रम्हचर्याश्रम सुखाचा होण्यासाठीची साधना शिकवतील'.

कृष्णरावांमधला हा आध्यात्मिक पैलू त्यांच्या सामाजिक-शैक्षणिक कार्यामध्ये नेहमीच समोर दिसत असेल असे नाही. पण **त्यांनी लीलाताईंच्या शेवटच्या आजारात जवळजवळ नऊ-दहा महिने त्यांची जी मन:पूर्वक**

**शुश्रूषा केली हे अध्यात्मच होते आणि स्वत:च्या आयुष्याच्या शेवटच्या पर्वात अशा वैभवशाली बंगल्याचा न्यास करून त्यावर तुळशीपत्र ठेवणे हे तरी दुसरे काय आहे?**

## शब्द झाले स्तब्ध मुके।

*कर्मयोगी 'कृष्णराव' तुम्ही आम्हा दाविली वाट।*
*पतितांच्या जीवनी उगवली चैतन्याची पहाट ।।*

*अंतरिचे 'स्वरुप' केले, 'वर्धित' घेऊन वसा,*
*जनी मानसी पहा उमटला, कर्तृत्वाचा ठसा।।*

*शब्द कृतितूनी लाभली, मातेची वत्सल माया,*
*आम्हासाठी झिजली अहोरात्र तुमची चंदनी काया।*

*भेदभाव विसरुनी पाहिली भव्य स्वप्ने जगी,*
*उद्धरण्या साऱ्यांना केली अंतर्मने जागी ।।*

*बळ दिले पखांना अमुच्या, झेप घेण्या आकाशी,*
*उजळून गेले अवघे जीवन, तेजाने दिव्य प्रकाशी।*

*चारित्र्याला संस्काराला, विश्वासाची देऊनी जोड*
*हसतमुखाने ओलांडले, अनंत अडचणींचे पहाड।*

*हाती हात धरुनी, करुया पुढे स्वप्नांची पूर्तता*
*विनवणी त्या देवाला, दे तव आत्म्याला मुक्तता ।।*

*तुम्हाविणे ही 'वर्धिनी', कल्पना मन ना करु शके*
*भावांजली तव अर्पण करता शब्द झाले स्तब्ध, मुके*

**रमेश इनामदार**

# मी पाहिलेले किशाभाऊ

**– बाळासाहेब दळवी**

माझे शालेय शिक्षण चालू होते. घरची परस्थिती बेताची असल्यामुळे मी शाळेच्या वेळा सोडून इतर वेळामध्ये किशाभाऊंच्या बंगल्यावर बागकाम करीत असे. मी जेव्हा सकाळी बाग काम करण्यासाठी जात असे तेव्हा किशाभाऊ व्यायाम करीत असत. प्राणायाम व ध्यान करीत असताना त्यांच्या समोर रामकृष्ण परमहंस यांचा फोटो असायचा.

त्यांच्या चहाच्या वेळीत मला मोठ्याने आवाज देत असत. त्यांच्याबरोबर मला जेव्हा चहा पिण्याची संधी मिळत असे तेव्हा ते माझ्याशी गप्पा मारीत असत. शाखेत जातो का? याची आवर्जून चौकशी करायचे. एकदा गप्पा मारताना त्यांना मी विचारले किशाभाऊ संघाचे (रा. स्व. संघ) काम एवढे चांगले, मोठे असताना तुम्ही हे वेगळे 'स्व'-रूपवर्धिनीचे काम का करता? तेव्हा ते मला म्हणाले वर्धिनी म्हणजे काय ते माहिती करून घे. समाजाच्या सर्व थरातील विदयार्थांचे शिक्षण व्हावे असे वाटते का? हो म्हटल्यावर त्यांच्या अडचणी माहीत आहेत का? ते कोठे राहून शिक्षण घेतात, ते घरी अभ्यास करू शकतात का? इत्यादी अनेक प्रश्न त्यांनी मला विचारले. पण मला सांगता येत नव्हते. त्यावर ते म्हणाले वरील सर्व गोष्टी एकाच ठिकाणी मिळतील असे ठिकाण म्हणजे 'स्व'-रूपवर्धिनी. मंगळवार पेठ येथील झोपडपट्टीतील असो किंवा वडारवाडीतील; अशा वस्त्यांमधून ज्ञान गंगा पुढे वाहत नेण्याचे काम म्हणजे वर्धिनीचे काम आणि हेच माझे संघाचे काम आहे. या एका वाक्यामधून मला खूप गोष्टी समजून गेल्या.

किशाभाऊ म्हणजे कार्यकर्ता निर्माण करण्याचा एक कारखाना होता. त्यांनी अनेक चांगली माणसे वर्धिनीच्या कामात गुंतवली होती. त्यांचा अनेक कुटुंबाशी घनिष्ठ परिचय होता. त्यामुळे ते अधिकारवाणीने त्यांच्याकडून कामे

करून घेत असत.

आपल्या समाजात अजूनही अशी त्यागी वृत्तीची माणसे आहेत. म्हणून साऱ्या जगाचे लक्ष आपल्या देशाकडे आहे. सध्या अनेक किशाभाऊ स्वरूप वर्धिनीचे काम करीत आहेत या शब्दांहून अन्य त्यांना दुसरी कोणती श्रद्धांजली वाहणार?

## सारे.... सारे.... देऊन गेलात

अखेर चैतन्यदीप मालवला.
समाजातील अवगुणांशी झुंजणारा
हसतखेळत जगू पाहणारा
समाजशील चैतन्यदीप
.....अखेर मालवला.
समाजसेवेचे व्रत हाती घेतलेला
जीवन आपलं त्याला वाहिलेला
ऐंशी वर्षाचा तरुण चैतन्यदीप
.....अखेर मालवला.
समाजातील बुध्दिमत्ता शोधणारा
त्यांच्या विकासासाठी झगडणारा
विकसित भारत पाहू इच्छिणारा
ध्येयवादी चैतन्यदीप
.....अखेर मालवला.
पण जाताना.......
समाज सेवेचा वारसा,
निर्व्याज प्रेम.....
सहवासातील आठवणी.....आणि
विकसित भारताचे ध्येय
.....सारे - सारे देवून गेलात.

# सच्चा माणूस

**–डॉ. श्रीराम गीत**

किशाभाऊ माझ्या वडिलांचे मित्र. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा त्यांच्यामधला जोडणारा एक अतूट दुवा होता. सुमारे पस्तीस वर्षांच्या कालावधीत **किशाभाऊंची विविध रुपे पाहताना आज एकच शब्द पटकन डोळ्यासमोर येतो– सच्चा माणूस!**

शाळेचे मुख्याध्यापक असले तरी त्यांची मूर्ती अनेकांच्या डोळ्यांसमोर येणार ती म्हणजे विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणूनच. त्यांच्या आज उच्चपदावर विराजमान झालेल्या विद्यार्थ्यांनाही आठवते ती प्रेमाची टप्पल, पाठीवरती शाबासकी, छोट्याशा चांगल्या कृतीबद्दल दिलेले प्रोत्साहन. अशा आठवणी आवर्जून आठवतांना भेटलेले विद्यार्थी किशाभाऊंना भेटून गेल्यावर, त्या विद्यार्थ्यांबद्दल किशाभाऊ ज्या प्रेमाने, कौतुकाने भरभरुन बोलायचे ते ऐकणे हा एक सोहळा बनायचा. अनेक शिक्षक अशा 'माझा विद्यार्थी' या संकल्पनेत अडकतात. किशाभाऊंच्या शब्दात त्या विद्यार्थ्याच्या गुणांची, कष्टांची कदर असायची. कारण स्वत:मुळे हा विद्यार्थी घडला असा अभिमान त्यांनी कधी बाळगलाच नाही. कदाचित त्यामुळेच निवृत्तीनंतर अशाच गुणी मुलांसाठी त्यांनी 'स्व'–रूपवर्धिनी काढायचे ठरवले असावे. हा सच्चेपणा मला तेव्हापासून सतत जाणवत राहिला, अगदी त्यांच्याबरोबरच्या शेवटच्या भेटीपर्यंत.

काही वर्षे किशाभाऊंनी ज्ञान प्रबोधिनीच्या कामात सहभाग घेतला. निधी संकलनासंदर्भात त्यांनी पुढाकार घेतला होता. नंतरसुद्धा 'स्व'–रूपवर्धिनीच्या इमारतीच्या पायाभरणीनंतर अशाच कामात त्यांच्या सतत मुंबईला फेऱ्या होत असत. अनेक चकरानंतर काही ना काहीतरी हातला लागत असेच. पण या साऱ्या कालखंडात एक वाक्य त्यांच्याकडून अनेक वेळा मी ऐकले आहे. **'पैसे येतातच रे, काही वेळा तर पैसे मागायलाही लागत नाहीत**. चांगल्या कामाला दिलेली ही शाबासकी असते, पण **कामात सहभागी व्हायला तेवढी माणसे मिळत नाहीत**

**याचे पण मला वाईट वाटते.**' मी देणगी आणली, माझ्यामुळे पैसे मिळाले वगैरे भावना त्यांना कधी शिवली असेल असे मला कधीही जाणवले नाही. काही वेळा मोठ्या देणगीदारासोबत तासभर गप्पा मारताना, वर्धिनी दाखवतानाही मला किशाभाऊंचा सहवास अनुभवता आला. पण त्यांचे संभाषण नेहमीच दाता आणि याचक या पातळीवर तर सोडाच पण हे काम समाजाचेच कसे आहे आणि त्या समाजाचा घटक म्हणून या कामाला तुम्ही हातभार लावला पाहिजे या स्तरावर राहिले आहे. अर्थातच वर्धिनीचे काम सुरू केल्यावर ज्या विविध प्रकारची माणसे संस्थेच्या व्यासपीठावर येऊन गेली, देणगीदार मिळाले त्या साऱ्यांचा स्त्रोत हा सच्चा माणूसच होता. आज हे सारे प्रकर्षाने जाणवते, कारण पदोपदी आसपास दिसत असलेली, झगमगाटात झाकलेली मूल्यांची अवनती.

वर्धिनीच्या दरवर्षीच होणाऱ्या एका तिळगूळ समारंभात किशाभाऊंच्या शेजारीच मी बसलो होतो, पालकांच्या समवेत शेवटच्या रांगेत. माझ्या मनात प्रश्न उभा होता की किशाभाऊ स्टेजवर कधी जाणार? शेवटपर्यंत ते गेलेच नाहीत. प्रमुख पाहुणे चहापानानंतर गेले. मनातील अनुत्तरित प्रश्न त्यांना विचारला. सहजच बोलल्याप्रमाणे तितकेच प्रांजळपणे त्यांचे उत्तर आले, 'तिथे मी किती दिवस बसायचे? ते काम करायला इतर खंबीर आहेत ना! आज अनेक संस्थात, अनेक पक्षात फक्त स्टेजवरच बसत आलेली (अगदी आधार देऊन चढउतार करणेही कठीण झाल्यावर सुद्धा) असंख्य माणसे पाहणाऱ्या मला ही आठवण किती वर्षापूर्वीची आहे हे आज नक्की सांगता येणार नाही.

किशाभाऊंच्या घरी अनेकदा, अनेक प्रसंगानी जाण्याचा योग आला. पण सतत जाणवलेली एक गोष्ट म्हणजे घराची टापटीप स्वच्छता व सौंदर्य. साधेपणा व नावीन्य यांचा सुरेख संगम त्या उभयतांनी जपला होता. किशाभाऊंनी ते घर सोडायच्या जेमतेम महिनाभर आधी त्यांना बरे नव्हते. डॉक्टर म्हणून मी गेलो होतो. फारसे हिंडवत नव्हते. ताकद कमी झाली होती. घरातील टापटीप तशीच होती, आपुलकी तीच होती. निघण्यापूर्वी छोटीशी वडी आग्रहाने मला खायला घातल्यावरच त्यांनी मला निरोप तिला.

सुमारे पस्तीस वर्षांच्या वैद्यकीय व्यवसायात औषधांच्या वेळा संभाळून

नेमकेपणाने औषध घेणारा पेशंट मला शोधावा लागला आहे. त्याला अपवाद म्हणजे किशाभाऊ. शेवटच्या पांच-सात वर्षात ज्यावेळी त्यांनी माझा वैद्यकीय सल्ला घेतला त्या वेळी क्वचित विस्मरण व्हायचे. पण मग सकाळचा पहिला फोन त्यांचा असायचा. 'अरे काय झाले तो औषधांच्या वेळेचा कागदच सापडत नाही, पुन्हा एकदा सांग बरं, पुन्हा लिहून घेतो.' हीच सारी शुश्रूषा पत्नीच्या आजारपणातही त्यांनी तितक्याच नेमकेपणाने केली हे सांगायलाच नको. निवृत्ती ही एक अत्यंत कठीण गोष्ट असते. वयोपरत्वे, स्वभावपरत्वे संस्थेच्या प्रगतीच्या वेगपरत्वे किशाभाऊंची निवृत्ती ही त्यांनाही मान्य होती. कदाचित ती त्यांनी आखूनही ठेवली असेल. पण या निवृत्तीनंतर स्वतःच्या रोजनिशीमधल्या नोंदीतून एकेका आठवणीत रमणारे किशाभाऊ मला काही वेळा भेटले. माझ्याही आठवणीत नसलेल्या १९८०, ८३ मधल्या बारीकसारीक गोष्टी त्यांच्या घरी निवांतपणे ऐकताना एखादे परिपक्व फळ त्याच्या गंधाने, रूपानेही कसे आनंद देऊ शकते ते अनुभवायला मिळाले. काही आठवणी कटु असल्या तरी त्याकडे पाहण्याची निर्लेप वृत्तीही पाहायला मिळाली. म्हणूनच पुन्हा पुन्हा एकच शब्द आठवतो तो म्हणजे 'सच्चा माणूस'.

मोठी माणसे, नामवंत माणसे, लोकप्रिय माणसे, सत्ताधारी माणसे आणि त्यांच्या अंत्ययात्रा, वैकुंठावरचा निरोप हा सारा खेळ अनेकदा पाहिलेला. पण किशाभाऊंना निरोप द्यायला वैकुंठावर जमलेला समुदाय पाहून मात्र त्या आठवणीने आजही अवाक् व्हायला होते. **ऐंशीच्या पुढे गेलेल्या या वृद्धयुवाला निरोप द्यायला जमलेल्यामध्ये तिशीच्या आतील रसरसत्या युवकांची संख्या पाहिली आणि 'स्व'-रूपवर्धिनीचा पाया किशाभाऊंनी किती खंबीरपणे रोवला आहे त्याची प्रखर जाणीव झाली. आजवर खरोखर कधीही न पाहिलेले ते दृश्य विसरणे अशक्य आहे.**

किशाभाऊ गेल्यावर वर्धिनीत जाण्याचा एकदोनदा योग आला. मा. राजाभाऊ लवळेकर होतेच, शिरीष असणारच होता. अन्यही सारे परिचित चेहरे कामात व्यग्र होते. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सच्चा माणसाची आठवण जी होतच राहणार, ती सोडली तर वर्धिनी तेवढीच नेहमीसारखीच फुललेली होती.

# अभ्यासू आणि आग्रही किशाभाऊ

**– सौ. संगिता भंडगे**

किशाभाऊ पटवर्धन! आम्हा सर्वांसाठीच ते आदर्श होते. नियमित व्यायाम, युक्त आहार-विहार, अतिशय अभ्यासू वृत्ती, संघकार्यावर संपूर्ण निष्ठा, व्यवहारदक्षता, उत्तम वक्तृत्त्व अशी त्यांची अनेक वैशिष्ट्ये होती. व्यवहारी असले तरी समाजासाठी मात्र ते दानशूर होते. वेळ, कष्ट, पैसा, इ. सर्वच गोष्टींचा त्यांनी कार्यासाठी त्याग केला. स्वामी रामकृष्णांच्या वचनांवर त्यांची खूप श्रद्धा होती. ३० वर्षे नियमितपणे ते श्रीराम मंदिरात दर्शनासाठी जात असत.

काम छोटे जरी असले तरी त्याचा संपूर्ण अभ्यास करून ते सुरू करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. मला आठवतंय, आम्ही कुठलाही कार्यक्रम घ्यायचा ठरविला तरी, त्यातील सर्व संभाव्य अडचणींचा विचार करून सावधपणे सर्व गोष्टी करण्याची सवय त्यांच्यामुळेच लागली. त्यामुळे **कार्यक्रमही उत्तम होत. तरीसुद्धा कार्यक्रम संपल्यावर किशाभाऊ झालेल्या चुकांची एक मोठी जंत्रीच आमच्यासमोर ठेवत. बाकी सर्वांच्या नजरेतून सुटलेल्या कितीतरी बारीक चुका ते निदर्शनास आणून देत.** त्यांच्या या अभ्यासू, आग्रही वृत्तीचा आम्हाला खूप लाभ झाला. त्यातूनच स्वत:च्या चुका शोधण्याची सवय लागली.

थोडीशी वैयक्तिक वाटली तरी एक आठवण मुद्दामच सांगते. **माझं तेव्हा लग्न व्हायचे होते. मुलगा पाहताना काय पाहावे? प्राधान्याचा क्रम त्यांनी मला सांगितला होता तो असा– १) स्वभाव, २) विचार, ३) शिक्षण, ४) आर्थिक स्थिती. बरेच जण आर्थिक स्थिती प्रथम पाहतात. पण किशाभाऊंनी हा वेगळाच क्रम सांगितला होता.** प्रत्येक गोष्ट अभ्यासूपणे मांडण्याची त्यांची कला विलक्षण होती. त्यांची ही दृष्टी आणि त्यांच्या द्रष्टेपणा यामुळे वर्धिनी आजच्या स्थितीला पोहोचली आहे असे मनापासून वाटते.

# ‘ओवाळणी’ ‘स्व’-रूपवर्धिनीची

**–श्रीमती कमल टाककर**

७ मार्च १९९०. सकाळी वर्धिनीच्या पायऱ्या चढत होते. जरा अस्वस्थ मन:स्थितीतच होते. आयुष्यातील भक्कम आधार सुटला होता. पण वर्धिनीत गेले आणि ती पोकळी भरून निघाली. ऑफीसमध्ये गेले. एका सात्विक व्यक्तिमत्त्वाने आवाज दिला ‘या कमलताई! आपले स्वागत आहे’. हे शब्द ऐकले आणि त्याक्षणीच वर्धिनी माझी आणि मी वर्धिनीची झाले. किशाभाऊंमुळे वर्धिनीची ओवाळणी मिळाली व मी खरोखरच त्यात रमून गेले.

पुणे शहराच्या आजूबाजूच्या गावातील दहावीत शिकवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ‘स्व’-रूपवर्धिनीत मार्गदर्शनपर शिबिर आयोजित केले होते. त्यावेळेस न्याहारी व जेवणाची जबाबदारी माझ्यावर होती. तेव्हाही सर माझ्या घरी आले होते. त्यांच्या प्रोत्साहनाने शिबिरातील हे जबाबदारीचे कामही माझ्या हातून सहजरीत्या पार पाडले गेले.

जेव्हा केव्हाही सरांशी भेट व्हायची तेव्हा सर आनंदाने, उत्साहाने बोलायचे, कौतुक करायचे. माणसाला बोलण्यानेच जिंकणारे सरांचे हसतमुख व्यक्तिमत्त्व त्यांच्या कार्यसिद्धीचा एक महत्त्वाचा पैलू होता.

त्यांची पंच्याहत्तरी वर्धिनीत साजरी झाली. तेव्हा सभागृहामध्ये कार्यक्रम होता. माझ्या सुनेला प्रथमच मी वर्धिनीत घेऊन गेले होते. तिने सरांसाठी एक कविता रचून म्हटली. तेव्हाही सरांनी आवर्जून स्वत: त्या कवितेला सुरेख दाद दिली होती. वर्धिनीत येण्याविषयी सुनेला लाघवी आमंत्रणही दिलं.

एकदा आम्ही बालवाडीतील सर्व शिक्षिका त्यांच्या घरी गेलो होतो. कॉफी व चिवड्याचा आस्वाद घेत घेत सरांनी खूप गप्पा मारल्या होत्या. शरीर थकत चाललं होतं पण मन मात्र कायम तरुण, उत्साही आणि आनंदी.

किशाभाऊंमुळे वर्धिनी स्वरूपास आली व वर्धिनीमुळे माझेही खऱ्या अर्थाने

'स्व'-रूपवर्धन झाले. शेवटपर्यंत 'स्व'-रूपवर्धिनीचे वर्धन व संवर्धन करणाऱ्या या तेजस्वी किरणाला माझे शतशः प्रणाम.

## एका देवमाणसाच्या छायेखाली

तसे पाहायला गेलो तर मी 'स्व'-रूपवर्धिनीचा विद्यार्थीही नव्हतो. तरीदेखील मला शिक्षणाबद्दल गोडी लावण्याचे जे काम व सहकार्य त्यांनी केलं ते माझ्या भविष्यामध्ये एक सूर्य किरण ठरलं. त्या वेळी मी चौथीमध्ये शिकत होतो. त्यांचा व माझा संबंध माझ्या चुलत भावामुळे आला. त्याने माझी घरची सर्व परिस्थिती पटवर्धनसरांना सांगितली. ते माझ्या घरी आले. माझी घरची परिस्थिती पाहिली आणि लगेचच आपल्या सोबतच्या सहकाऱ्याला सांगितले की ह्या मुलाला घरी शिकवणी घेण्यासाठी आपला एक विद्यार्थी रोज संध्याकाळी पाठवा. दुसऱ्या दिवसापासूनच तशी सुरुवातसुद्धा करून दिली. त्यामुळे मी चौथीमध्ये चांगल्या क्रमांकाने पास झालो. त्याच काळामधे त्यांनी आगाखान पॅलेस येथे एक आठवड्याचे शिबिर भरवले होते. त्या वेळीसुद्धा त्यांनी सर्व मुलांना जे मार्गदर्शन केले ते मला आजसुद्धा आठवते आहे. ते नेहमी माझी चौकशी करीत असत. खरंच मला अभिमान वाटतो की मी अशा देवमाणसाच्या छायेखाली काही काळ वावरलो. 'स्व'-रूपवर्धिनीचा विद्यार्थी नसताना देखील मला जे मार्गदर्शन त्यांनी केले, माझ्यासाठी ते खरेच मोलाचे होते. त्यांचे कार्य कुणासाठीही मर्यादित नव्हते. त्यांचे हे मोलाचे काम फार प्रेरणादायी होते. आता त्यांचे काम पुढे नेण्याची जबाबदारी आज 'स्व'-रूपवर्धिनी चांगल्या प्रकारे पार पाडीत आहे. जेव्हा केव्हा मी 'स्व'-रूपवधिनीचे नाव वाचतो किंवा ऐकतो तेव्हा मला पटवर्धनसरांची आठवण येते. परमेश्वर त्यांचे स्वप्न 'स्व'-रूपवधिनीच्या माध्यमातून साकारो हेच परमेश्वराकडे माझे मागणे राहील.

**सुभाष भोसले**

# मनामनातली धग जागवणारे आणि जपणारे 'सर'

**– डॉ. सौ. मनीषा नारकर**

'आयुष्याला वळण देणारी घटना कोणती?' असा स्वत:शीच विचार केला की नजरेसमोर एकच घटना येते; १२वीची परीक्षा देऊन भविष्याविषयी संभ्रमात असताना 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये आले तो दिवस !

पहिल्याच दिवशी किशाभाऊंशी ओळख झाली. प्रथमच आलेल्या एका सर्वसाधारण मुलीचं बोलणं अगदी लक्षपूर्वक ऐकणारा, त्या वयामध्ये मला अत्यंत महत्त्वाच्या वाटणाऱ्या परीक्षेतील यशाविषयी, माझ्यापेक्षाही अधिक विश्वास दाखविणारा हा माणूस या मोठ्या संस्थेचा प्रमुख आहे यावर विश्वास ठेवणं अवघड वाटत होतं.

वेगवेगळी शिबिरं, चर्चा, बैठकी, दैनंदिन शाखा इ. सारं सरांनी अशा पद्धतीनं सुस्थापित केलं होतं की नकळत मीही 'स्व'-रूपवर्धिनीच्या चुंबकीय क्षेत्रात केव्हा ओढले गेले ते कळलंच नाही.

'काहीतरी वेगळं करायचंय' अशी उत्कटता असणाऱ्या त्या वयात वेगळं म्हणजे काय याचं उत्तर सरांच्या अनेक अनौपचारिक भेटींमधून, गप्पांमधून स्पष्ट होत गेलं. सर जेव्हा जेव्हा भेटायचे, एकदम दिलखुलासपणे बोलायचे. वर्धिनीमध्ये आलेल्या पाहुण्यांशी आमची ओळख म्हणजे तर एक जंगी कार्यक्रमच असायचा. आमच्या असलेल्या-नसलेल्या गुणांविषयी सर भरभररुन सांगायचे. काहीवेळा अवघडल्यासारखं वाटायचं. पण साक्षात् देवसुद्धा स्तुतिप्रिय असतात. तिथे आमचा अपवाद कसा असणार?

'सर खूप वाढवून सांगतात' अशी प्रेमळ तक्रार सरांविषयी असली तरी मनात मात्र 'येस्, मी कोणीतरी आहे' असा आत्मविश्वास आपोआपच निर्माण व्हायचा. विशेषत: धडपडणाऱ्या आम्हा विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वासाची ही काठी त्यावेळी गरजेची होती.

अर्थात या आत्मविश्वासाचं रुपांतर अहंगंडामध्ये होऊन 'आपण म्हणजे

कोणीतरी वेगळे आहोत' अशी भावना रुजून 'स्व'-रूपवर्धिनीच्या विद्यार्थ्यांचं एक बेट तयार होऊ नये याचीही सर काळजी घेत होते. म्हणूनच वर्धिनीच्या प्रार्थनेमध्ये 'जनांचा प्रवाहो इथे चाललेला..... आम्ही भिन्न ना त्याचियापासूनी' या ओळी आवर्जून होत्या. आणि हे संपूर्ण कडवं म्हणजे सरांचा प्रार्थनेतील सर्वात आवडता भाग होता.

शिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षे पूर्ण वेळ सामाजिक काम करायचयं असं जेव्हा मी सरांना म्हटलं त्यावेळी, 'स्व'-रूपवर्धिनी, विवेकानंद केंद्र, कल्याणाश्रम इ. अनेक पर्याय त्यांनी सुचविले. निर्णय घेताना प्रत्येक वेळी, प्रत्येक ठिकाणी ते माझ्याबरोबर आले परंतु, 'अमुकच केलं पाहिजे' असा दुराग्रह त्यांनी दाखविला नाही.

अरुणाचलला मी आणि प्रांजली जायला निघालो तेव्हा सर मुंबईपर्यंत सोडायला आले. **आमची गाडी उशीर होत होत, तब्बल चोवीस तास उशीरा निघाली. वयाच्या आठव्या दशकातही सर आमच्याबरोबरीने चोवीस तास स्टेशनवर ठाण मांडून बसले होते.** अरुणाचलमध्ये गेल्यावर ज्यावेळी थोडं मनासारखं काम होतयं असं वाटलं त्यावेळी सरांना मी पत्र लिहिलं. त्यात सहजच, 'तुम्ही एकदा याल का?' असं म्हटलं होतं.

मग काय पत्रं पोहोचताच, सर, वयाच्या पंचाहत्तरव्या वर्षी ३५०० कि.मी.वरील अरुणाचलातील 'मेदो' या माझ्या गावी हजर!

तेथील दुर्गमता, अनेक गैरसोयी, खाण्यापिण्याच्या वेगळ्या सवयी, स्वत:चं वय अशा कशाचाही बाऊ न करता सर प्रत्येक गावात, वस्तीत माझ्याबरोबर फिरले, तेथील लोकांना भरभरुन भेटले, इतकं की सुरुवातीला 'आपका सर' असं म्हणणारे बाकेसोम, केके, दिलांग आदि मंडळी 'हमारा सर अब कब आयेगा ?' अस जाताना विचारत होते.

आज सर नाहीत; पण त्यांनी दिलेला सकारात्मक दृष्टिकोन, त्यांनी सांगितलेल्या अनेक गोष्टी कायमच आमच्या सोबत आहेत.

सध्या सर्वसामान्यपणे जगतानाही, 'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे' ही धग मनात कायम आहे. त्याचं कारण अर्थातच 'स्व'-रूपवर्धिनी आणि पर्यायाने 'सर' आहेत.

# किशाभाऊ पटवर्धनरूपी परिसाचा स्पर्श

**– त्र्यंबकराव आपटे**

१९७८ सालचा नाव्हेंबर-डिंसेबर महिना असावा. एक व्यक्ति आमच्या सदाशिव पेठेतील जुन्या वाड्यात 'त्र्यंबकराव आपटे येथेच रहातात का?' म्हणून चौकशी करत येऊन धडकली. 'हो, मीच त्र्यंबक आहे' मी म्हणालो. 'हो का, मी किशाभाऊ पटवर्धन' त्यांनी आपले नाव सांगितले. मी त्यांचे स्वागत केले व आम्ही दोघेही घरात येऊन बसलो. बराच वेळ इतर गप्पा झाल्या व त्यानंतर त्यांनी त्यांच्या येण्याचे कारण सविस्तर सांगितले. त्यातून पुण्याच्या पूर्व भागातील परिस्थितीने गरीब परंतु अत्यंत हुशार कर्तबगार, होतकरू मुलांसाठी काहीतरी केले पाहिजे ही तळमळ जाणवत होती. या मुलांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन आपण घडवू शकतो. हा आत्मविश्वास ओसंडून वाहत असलेला दिसत होता. त्यांच्या अंत्यत मधुर बोलण्याने मी प्रभावित झालो होतो. 'मग काय करावे? आपली काय योजना आहे? मी काय करू शकेन असे आपणास वाटते?' असे मी त्यांना विचारले. 'विशेष काही नाही. तुम्ही मला संध्याकाळचा तास – दोन तास वेळ देऊ शकाल काय? दिल्यास फार बरे होईल. मुले तयार आहेत. छोटीशी जागा आहे. आपण त्यांचे कार्यक्रम सुरू.' करू किशाभाऊ म्हणाले, 'विचार करून वेळ कसा देता येईल ते सांगतो' असे मी म्हणालो. एवढ्यावर पहिली बैठक संपली. मी विचार करीत होतो की माझे नाव किशाभाऊंना कसे समजले. बहुधा श्री. राजाभाऊ लवळेकर किंवा श्री. यशवंतराव लेले यांनीच सुचविले असावे हे माझ्या ध्यानात आले. दरम्यानच्या काळात श्री. किशाभाऊ सात-आठ वेळा तरी मला भेटले असावेत. शेवटी त्यांच्या मनातील अतीव तळमळ, चिकाटी, जिद्द, मृदु व गोड बोलणे, आत्मविश्वास अशा अनेक गुणांमुळे मी वेळ देण्यास तयार झालो. तारीख निश्चित आठवत नाही. पण १९७९ सालचा एप्रिल किंवा मे महिना असावा. मी संध्याकाळी सहाच्या सुमारास बारणे रस्त्यावरील श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या कारखान्याजवळ

गेलो. दहा–बारा मुले श्री. किशाभाऊंसह माझी वाट पाहत होते. मी गेलो तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसला तो मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. अर्थात या कामासंबंधी त्यांची अनेक मान्यवर लोकांशी सखोल चर्चा झाली असावी हे मला जाणवत होते. कामासाठी एक तरुण कार्यकर्ता मिळाला याचा त्यांना झालेला आनंद काय वर्णावा? झाले मी आत गेलो. मुलांना माझा थोडा परिचय करून देण्यात आला. कार्यक्रम सुरू झाले. जमलेल्या मुलांचे मी शारीरिक कार्यक्रम व खेळ सुरू केले. वेळ मोठा मजेत गेला. आणि माझ्या स्मरणाप्रमाणे 'स्व'–रूपवर्धिनीच्या प्रत्यक्ष कामाची मुहूर्तमेढ त्या दिवशी साजरी झाली या भव्य–दिव्य समाज उत्थानाच्या कामाच्या पायांतील एक दगड होण्याचे भाग्य किशाभाऊंमुळेच मला मिळाले हे मी विसरू शकत नाही. किशाभाऊंचे आचरण, येणाऱ्या मुलांच्या घरापर्यंत त्यांचा असलेला संपर्क इ. मी सर्व पहात असे. त्यावेळी मला असे वाटायचे की किशाभाऊ पटवर्धनरूपी परिसाचा स्पर्श ज्यांच्या ज्यांच्या जीवनात होईल, ती सारी जीवने उजळून निघतील. हे सारेजण हजारोंच्या जीवनाचे आधार होतील. तशी प्रेरणाशक्ती यांच्यात निर्माण होईल आणि प्रेरणा घेतलेले हे सारे तरूण राष्ट्रउभारणीच्या कामात स्वत:ला झोकून देतील.

१९८० चा काळ असावा. मुलांची संख्या वाढतच होती. जागा अपुरी पडू लागली होती. जवळच म.न.पा संचालित रवींद्रनाथ टागोर विद्यानिकेतन ही शाळा होती. या शाळेचे आवार आपल्याला मिळावे यासाठी विविध माध्यमातून किशाभाऊंचे अथक प्रयत्न चालू होते. त्या प्रयत्नांना यश आले आणि 'स्व'–रूपवर्धिनीच्या कामाला आकार येऊ लागला. शारीरिक कार्यक्रमांसाठी छोटेसे मैदान उपलब्ध झाले. तसे विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी वर्गखोल्या, विविध शैक्षणिक साहित्य उपलब्ध होऊ लागले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षक मंडळी त्यांना जसजसा वेळ उपलब्ध असेल तसतशी येऊ लागली. या सर्व उभारणीसाठी किशाभाऊंनी घेतलेले परिश्रम, त्यासाठी सोसलेला त्रास मी प्रत्यक्ष पाहिलेला आहे. त्यांचे उदाहरण म्हणजे संपर्कासाठी मुलांच्या पालकांना भेटायला गेले म्हणजे काही वेळा ऐकू नये अशा मुक्ताफळांनीच स्वागत होत असे. असे सर्व आघात केवळ किशाभाऊच सहन करू शकतात हे समजून येत

होते. **ज्यांना स्वत:च्या मुलांच्या भवितव्याबाबत कसलेही ज्ञान नव्हते, त्याची कोणतीही फिकीर नव्हती अशांनी किशाभाऊंची केलेली हेटाळणी, टिंगल मी पाहिलेली आहे, ऐकलेली आहे. या सर्वांवर आपल्या स्वभावाने, आचरणाने आणि ध्येयावर असलेल्या अविचल निष्ठेने किशाभाऊंनी मात केली** आणि वर्धिनीचे काम भक्कम पायावर उभे केले.

## वंदितो आज तव पदकमला......

सात्विकतेच्या पुतळ्या पुढती, शतदा माथे झुकवावे,
भारतियांचे आदर्श जीवन, तुम्हाकडून शिकुनि घ्यावे.
ऋषितुल्य जीवन, तुम्ही जगला
वंदितो आज तव पदकमला...।।धृ।।

साठी कुणाची बुद्धी नाठी, कुणी आधारा घेई काठी
ऐशीव्यातही ताठ राहूनि परिस्थीतीशी तुम्ही लढला...
वंदितो आज तव पदकमला...।। १ ।।

कुणा गरिबी करते गारद, श्रीमंतीचा चढे कुणा मद
ऐंशीव्यातही निरस्पृह राहून, आदर्श जीवन तुम्ही जगला...
वंदितो आज तव पदकमला... ।। २ ।।

सुखात कोणी सतत विसरती, दु:खाने दबुनिया जाती
ऐशीव्यातही, सुख-दु:खांना, समान लेखीत तुम्ही जगला...
वंदितो आज तव पदकमला...।। ३ ।।

निशिदिन कोणी करती निंदा, मस्का पॉलीस कुणास धंदा
ऐशीव्यातही निर्भय राहून, सत्यव्रती हो तुम्ही ठरला...
वंदितो आज तव पदकमला...।। ४ ।।

**मामा मोडक**

# एक सहृदय मार्गदर्शक

**– विलास कुलकर्णी**

किशाभाऊंना मी प्रथम भेटलो तो दिवस होता १३ मे १९७९. तेव्हा मी ५वीत होतो. या दिवशी किशाभाऊंनी वर्धिनीच्या १२ निवडक मुलांना बोलावले होते. मी वर्धिनीत आलो. मोठा भाऊ 'विश्वास' सोबत होता. घरच्यांनी किशाभाऊंना अट घातली की दोन्ही मुलांना एकाच ठिकाणी पाठवू. त्यामुळे विश्वासला घ्यायचे असेल तर विलासलाही घेणे आवश्यक आहे. त्यावेळी किशाभाऊंनी मान्य केले पण त्यांनीही अट घातली की, 'दोघांनाही आवश्य घेऊ पण विलासलासुद्धा परीक्षा द्यावी लागेल व निवड चाचणीत पास झाला तरच प्रवेश देऊ.' यावरून समोरच्या माणसाला न दुखावता पण आपल्या तत्त्वांशी तडजोड न करता आपल्या विचारांशी घट्ट राहून कसे काम करावे हे धडे आमच्या मनावर कोरले गेले. तसे दहावी पर्यंत आम्हाला ते एक चांगले शिक्षक, अत्यंत जवळचे मित्र, असे वाटत होते. नंतर मात्र जसे थोडे थोडे कळायला लागले, तसे त्यांच्यातील विविध पैलूंचा उलगडा होत गेला. पुढे जसजसे माझे वय वाढायला लागले त्यावेळी तर किशाभाऊ म्हणजे 'माझी कोणतीही समस्या सोडवणारे योग्य मार्गदर्शक' झाले होते.

एक दिवस शाखेत दंगा करताना पकडला गेलो. किशाभाऊंनी रागावून एक थोबाडीत मारली. त्यामुळे रागात मी घरी निघून गेलो. त्यावेळी घरी येऊन सरांनी समजाऊन सांगितले. पण तरीही दुसऱ्या दिवशी मी शाखेवर गेलो नाही. हे पाहून माझ्या आईलाच चांगले वाटले नाही. म्हणून तिने मला घेऊन वर्धिनीत सोडले. त्यावेळी किशाभाऊंनी आईला सांगितले की याला मारले म्हणून मला रात्री झोपताना खूपच वाईट वाटले व तसा उल्लेख मी दैनंदिनीत केला आहे. त्यांची ती प्रांजळ कबुली ऐकून मी ओशाळलोच पण त्याचबरोबर आईने रागवून मला चांगलाच दम भरला. त्या प्रसंगापासून किशाभाऊ हे घरचेच होऊन गेले. ते जेव्हा घरी यायचे त्यावेळी आई त्यांच्याशी घरच्या गप्पा मनमोकळेपणाने

करत असे.

शाळेत असतांना किशाभाऊ एकदा दोन वेळा दात घासण्याचे महत्त्व समजावून सांगत होते. अत्यंत पोटतिडकीने ते दातांच्या आरोग्याबद्दल सांगत होते. त्यावेळी मी मध्येच विचारले, 'समजा माझे दात लवकर पडले तर तुम्हाला काय करायचे आहे? मी वर्धिनीत येतो ना तेवढे पुरे आहे.' यावर त्यांनी सर्वांसमोर तर पटवून दिलेच पण मी रोज दोन वेळा दात घासतो का हे घरीसुद्धा विचारण्यास सुरवात केली. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे दुसऱ्यांमध्ये चांगल्या गोष्टी रुजवायच्या कशा हे आम्ही सहज शिकत होतो. खरे तर ज्यांनी ह्या गोष्टी अनुभवल्या व नंतर न विसरता पुढच्या विद्यार्थ्यांवर तसे प्रयोग केले ते सर्व मुलांवर संस्कार करण्यात यशस्वी झाले.

वर्धिनीची सुरुवात होऊन पंधरा दिवस जेमतेम झाले होते. टागोर विदयानिकेतन शाळेचे मैदान नुकतेच मिळाले होते. त्यावेळी एक दिवस खेळत असतांना प्रचंड पाऊस आला. दिवे गेले सगळीकडे अंधार झाला होता. आम्ही सर्वजण झाडाखाली उभे होतो. त्यातही सरांनी 'बलसागर भारत होवो' हे पद्य, सुविचार सांगितला व नंतर गप्पा मारण्यास सुरुवात केली. आमच्या हातात घड्याळ नव्हते. कोणालाही कंटाळाही आला नव्हता. काळी वेळाने बऱ्याच जणांचे पालक येऊन जाळीच्या गेटमधून डोकावून बघत होते की कोणी मुले दिसतात का ? शेवटी एकाचे वडील हाक मारत आत आले. त्यावेळी सर्वजण त्या गप्पातून बाहेर आलो. यानंतर खूप वेळा शाखेनंतरच्या गप्पा या रात्री दहा-अकरापर्यंत लांबल्या होत्या. हळूहळू घरच्यांनाही सवय झाली.

माझे लग्न होण्याआधी आईने, बहिणीने आणि लग्न झाल्यावर बायकोने खूप वेळा फोन करुन किशाभाऊंकडे तक्रार केली. त्यावेळी त्यांनी घरच्यांचे समाधान योग्य प्रकारे केले. पण मला मात्र हेच सांगितले **'जर घरून कार्यकर्त्यांबद्दल तक्रार नसेल तर संसार चांगला चालला आहे व जर घरून कार्यकर्त्यांबद्दल तक्रारी येऊ लागल्या तर कार्य चांगले चालले आहे'**. यावरून मी काय समजायचे ते समजून जायचो. अशा प्रसंगी किशाभाऊंनी त्यांच्या घरातील खूप प्रसंग सांगितले. वर्धिनीचे काम सुरू होण्यापूर्वीपासूनच, गप्पांमुळे, बैठकांमुळे अन्य भेटी, संपर्क यामुळे घरी येण्यास होणारा उशीर होत

असे यावर बाईंचे घरी मिळणारे 'टोमणे' त्याला मुक्ताफळं, प्रसाद, स्वागतपर वाक्ये अशा विविध नावांनी सर सांगत असत. या सर्वांची सुरुवात लीलाताई 'अहो पटवर्धन' अशी करीत. हे सांगतांना बऱ्याच वेळा सरांच्या डोळ्यात पाणी आलेले मी बघितले आहे.

मी नोकरीला लागल्यावर, सरांना भेटायला गेलो. साहाजिकच नवीन नोकरी असल्याने, वडिलांनी दोन-तीन चांगले ड्रेस खरेदी केले होते. त्यातील नवीन उंची शर्ट घालून  सरांना भेटायला गेलो होतो. सरांनी प्रथम त्या नवीन शर्टाचे तोंड भरुन कौतुक केले. खरे तर त्या शर्टाचे व्हायला पाहिजे त्यापेक्षा सरांकडून जास्तच कौतुक झाले. पण ते माझ्या लक्षात आले नाही. माझी कॉलर खरच ताठ झाली होती. गप्पा मारून जातांना सरांनी य. गो. जोशी यांच्या एक विचार मला सांगितला 'अरे परिस्थिती बदलली (खराब आली) तरी सदरा बदलावा लागणार नाही याची काळजी घे'. यानंतर तासभर तरी परत गप्पा सुरू राहिल्या. सामाजिक काम तसेच भान ठेऊन संसार करणाऱ्यांनी साधेपणाला किती महत्त्व द्यावे ह्यावर विचार करण्यास नकळत प्रवृत्त केले. सरांचे कपडे अत्यंत साधे पण स्वच्छ असत.

कुठल्याही आर्थिक व्यवहाराबाबत सरांचे मत मागितले तर सर पूर्ण विचार करून, त्यांच्या दोन-तीन तज्ज्ञ मित्रांना विचारून सांगत. पण निर्णय हा स्वत: घेण्यास सांगत. **त्यांची मते ही फक्त विचारार्थ आहेत, आग्रह नाही व तसे केले नाही तर थोडेसुद्धा दु:ख होणार नाही असे ते सुरवातीलाच सांगत**. त्यामुळे मी लग्नाचा खर्च किती व कसा करावा, घरात सुखसोयी कोणत्या आणाव्यात, पैसे बचत कुठे, किती कसे करावेत, वर्धिनीला मी स्वत: देणगी देतांना. मिळकत व देणगी याचे गणित हे व्यावहारिक किती टक्के, व भावनिक किती टक्के राखावे, घरच्यांच्या सोने, चांदी व अन्य हट्टांना कसे तोंड द्यायचे, पैशामुळे होणाऱ्या भांडणांना उपाय कोणता ? खरे तर अशा अनेक गोष्टींवर मी सरांचे मत मागायचो. बहुतेक वेळा मी दुपारी कंपनीतून सरांना फोन करुन समस्या सांगायचो. सर कॉफी पिण्यासाठी गंधर्ववर बोलवून द्यायचे. एक-दोन कप कॉफीमध्ये या विषयांवर चर्चा व्हायची, सरांचे मत मिळायचे. निर्णय मात्र स्वत: घ्यायचा पण काहीही निर्णय घेतला तर त्यासाठी सर पूर्णपणे मदत

करायचे. आता विचार केला तर असे वाटते की, सरांना आपण आपल्या वैयक्तिक कारणांसाठी फारच त्रास दिला, त्यांचा खूप वेळा घेतला. त्यापेक्षा चांगल्या विषयांवर चर्चा केली असती तर सरांकडचा जो प्रचंड ज्ञान खजिना होता त्यातील कणभर ज्ञान मिळाले असते. पण घरगुती गोष्टींबद्दल त्यांचे मार्गदर्शन खरेच मोलाचे होते. यामुळे 'घरात गुंतणारे बरेच जण आपण खूप मोठे कार्य करीत असतो अशा भ्रमात असतात पण आयुष्याच्या शेवटी चिमणी कावळ्याच्या संसारापेक्षा वेगळे काहीच घडत नाही. म्हणून वेळोवेळी तुला जागे करण्याचे काम करतो' असे सांगून ते बऱ्याच कॉफी सत्रांचा समारोप करीत असत.

मी औरंगाबादहून पुण्यात आल्यावर, नोकरीसाठी किशाभाऊंनी खूप प्रयत्न केले, त्यामुळे एका ठिकाणी नोकरी मिळाली. त्यानंतर मला थरमॅक्समध्येही नोकरी मिळाली. आता पहिली नोकरी सोडण्याचा विचार मी करत होतो कारण दुसऱ्या ठिकाणी दुप्पटीहून जास्त पगार व कंपनीही चांगली होती. फक्त प्रश्न होता किशाभाऊंनी त्या कंपनीच्या मालकांना दिलेल्या शब्दाचा. ज्यावेळी मी सरांसमोर हा प्रश्न मांडला, त्यावेळी सरांनी श्री. राजाभाऊ लवळेकर, श्री. किशोर करमरकर, त्या कंपनीचे मालक, त्यांचा मुलगा तसेच आपल्या कार्यकारिणीतील काही सदस्य यांचा विचार घेतला. प्रत्येकाकडे माझी घरची परीस्थिती, वर्धिनी, स्वत:चा शब्द याबद्दल खऱ्या अर्थाने माझी वकिली केली. त्यानंतर माझ्या भविष्याचा विचार माझ्यापेक्षा जास्त चांगल्याप्रकारे करून, त्या कंपनीच्या मालकांना फोन केला. जणूकाही स्वत: खूप मोठा अपराध केला आहे व विलास यात माझ्यावर कोणतेच दडपण आणत नाही हे पटवून देऊन त्यांनी माफी मागितली. याचा परिणाम म्हणजे सरांच्या घरी ते मालक स्वत: दहा मिनिटात हजर झाले. त्यांनी सरांचीच माफी मागितली, कारण सरांनी ह्या गोष्टीच्या इतका खोलवर विचार करून इतर दहा जणांशी चर्चा केली आहे हे त्यांना माहीत नव्हते. त्याचप्रमाणे सरांनी केलेले विश्लेषण हे त्यांच्या विचारांच्या पलिकडे होते हेही मान्य करून ते सरांच्या पाया पडले.

थरमॅक्समध्ये असतांना मला पार्ट टाईम नोकरीसाठी एका मोठ्या कंपनीची वर्षांसाठी ऑफर आली होती. त्याबद्दल मत घेत असतांना त्यांनी मला ठणकावून सांगितले. 'जास्त पैसे मिळवायला नोकरी जरुर कर पण सध्या जेथे काम करतो

आहे त्यांच्याशी एकनिष्ठ रहा.' त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांकडे काम कधीही करू नकोस. ती गद्दारी आहे. ते तुला काम देतीलच पण न करणे हे तुझ्या भल्याचे आहे. ज्या कामाचा तुझ्या सध्याच्या नोकरीशी काडी मात्र संबंध नाही ते काम कर. यापुढे जाऊन त्यांनी वर्धकाने पैशाला किती महत्त्व द्यावे तसेच सध्याच्या परीस्थितीत वर्धिनीला पैशापेक्षा वेळ देणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज जास्त आहे हे पटवून दिले. त्यामुळे मी पार्ट टाईम काम करण्याचा विचार सोडून दिला.

लीलाताई, सर्वांच्या भाषेत 'बाई', आजारी होत्या. त्यावेळी त्यांच्या अखेरच्या दिवसात मी आठवड्यातून दोन-तीन दिवस सरांकडे झोपायला जायचो. ऑक्सिजन सिलिंडर बदलण्याचे काम कधीतरी असायचे. रात्री १०.३० वाजता पोहोचायचो नंतर बारापर्यंत सरांशी गप्पा व्हायच्या. वर्तमान पत्रातील अग्रलेख सर वाचायला लावायचे व त्यावर आम्ही चर्चा करायचो. माझी मते थोडीशी समाजवादी लोकांशी जवळीक साधायची. त्यामुळे चर्चेला रंगत यायची. पण सर दरवेळी मला माझा दृष्टिकोन बदलावा यासाठी चांगली कात्रणे वाचायला देत. याचाच परिणाम म्हणून मला वर्तमान पत्रातील वैचारिक लेख वाचण्याची व चांगली पुस्तके वाचण्याची सवय लागली. ही सवय पुढे फिरतीच्या नोकरीवर कायम उपयोगात आली. पुणे ते कलकत्ता ४० तासाचा प्रवास इतरांसाठी कंटाळवाणा असला तरी माझ्यासाठी एक दोन पुस्तके एवढाच होता. पुढे तर मी कंपनीची व वर्धिनीच्या कामातील लिखाण, वाचन, कामेही या वेळात करायला लागलो आहे.

२००४ साली मी उन्हाचा त्रास होऊन आजारी पडलो. जवळपास २२ दिवस झोपून होतो. या दिवसात किशाभाऊंचा जवळपास रोज फोन येत असे. त्यांची तब्येत तोळामासा असूनही ते माझ्या तब्येतीची रोज विचारपूस करीत होते. बराच वेळ फोनवर बोलत असत, त्यामुळे त्या दिवसांमधील कंटाळा, त्रास सुसह्य होत असे.

एक दिवस मी बाहेरगावी जाऊन दुपारी परतलो. सायंकाळी वर्धिनीच्या शाखेवर गेलो नाही. रात्री ११ वाजता सरांचा घरी फोन आला. ठरलेला प्रश्न 'भाऊसाहेब कसा काय गेला आजचा दिवस? आज कंपनीचे काम चांगले झाले, घरी पण वेळ दिला पण वर्धिनीचे काम काही झाले नाही'. असे मी म्हटले. 'मग

माझ्या दृष्टीने आजचा दिवस काही चांगला गेला नाही गड्या. **ज्या दिवशी वर्धिनीची आठवण झाली नाही, तो दिवस तुझ्या-माझ्या आयुष्यात येता कामा नये. बघ तूच विचार कर**' असं सर म्हणाले. मी काही न बोलता फोन ठेवला व वर्धिनीत एक चक्कर मारून आलो. त्यानंतर दोन गोष्टी ठरविल्या पुण्यात असतांना एकही दिवस वर्धिनीची शाखा अथवा इमारतीवर जाणे चुकणार नाही. पुण्यातून बाहेर असताना रोज रात्री झोपतांना माझ्यावर वर्धिनीने सोपविलेल्या जबाबदारीसाठी आज काय विचार केला याची आठवण करणे ही गोष्ट किशाभाऊंना सांगितल्यावर त्यांनी त्यांच्या घरी, तब्येत ठीक नसतांना, स्वत:च्या हातांनी चकाचक स्वच्छतेत स्पेशल कॉफी पाजून आनंद व्यक्त केला. सरांच्या त्या एका वाक्याच्या माझ्यावर प्रचंड परिणाम झाला. आज मला ह्याची सवयच लागून गेली आहे. आता माझ्या वेळ देण्यापेक्षा जास्त परिणामकारक चांगले काम अधिक वेळ कसे करू शकेन असा विचार मी करतो आहे.

एकदा सरांना घेऊन मोटारसायकलवर मी त्यांच्या भावाकडे गोखलेनगरला भेटायला गेलो होतो. त्यांच्या घरी सांगितल्याप्रमाणे सर दोन-तीन मिनिटेच बसले व परत जायला आम्ही निघालो. घरातून बटाटेवडे तळण्याच्या खमंग वास येत होता. त्यांनी दोन डीश पुढे केल्या. मला काही कारणाने खाता येत नव्हते पण इच्छा मात्र प्रचंड झाली. सरांनी मात्र वडे खाणे नाकारले व म्हणाले तुम्हाला द्यायचे असेल तर एखादे फळ, त्यातही चिकू सारख्या छोट्या फळाची एक फोड मला व तेवढीच याला द्या म्हणजे आम्हाला तब्येतीला हानी नाही. तुमचा पण अपमान होणार नाही. बाहेर आल्यावर सर म्हणाले, **''आपल्या जिभेवर जो नियंत्रण ठेवू शकला नाही तो आपल्या तब्येतीची काळजी काय घेऊ शकणार?''** त्यांनी काही उदाहरणे देऊन केवळ जिभेच्या चोचले पुरविणारे कार्यकर्ते उतार वयात कसे अंथरुणाला खिळले किंवा इतरांना त्यामुळे किती त्रास झाला हे सांगितले. किशाभाऊंचे रोजचे खाणे मोजके पण सर्वार्थाने परिपूर्ण, वेळच्यावेळी असायचे. बाहेरच्या खाण्यात त्यांना कधीही रस नव्हता, कदाचित हे त्यांच्या तब्येतीचे गमक असेल.

लीलाताईंच्या निधनानंतर, त्यांच्यासाठी आणलेली खुर्ची सरांकडे दोन वर्षे पडून होती. ती परत करण्याचे सरांच्या डोक्यात होते पण जमत नव्हते. सर

एकदिवस किशोर सोंडूरला सारखा फोन करत होते. मी सरांना काम विचारले, आमचे दोघांचे एका देणगीदाराला भेटायला जायचे निश्चित होते. सरांनी किशोरला ती खुर्ची नेण्यास सांगितले. मी सरांना विचारले - 'सर ८०-१०० रुपये गेले असते तर चालले असते, रिक्षाने खुर्ची नेली असती. किशोरशी तेवढ्याच गप्पा मारत खुर्ची नेली असती'. त्यावर सर म्हणाले, 'अरे! किशोर खुर्ची देण्यासाठी जाईल तर वर्धिनीबद्दल बोलेल. विचारपूस करेल. तर कदाचित त्या आपल्याला त्यांच्या इस्टेटीतील काहीतरी देतील. मी गेलो तर या वयात हे कसले धंदे करताय पटवर्धन!' असे म्हणतील. त्यापेक्षा किशोरच्या घराच्या रस्त्यावरच खुर्ची पोचवायची असल्याने तो ते काम करेल व आपण दोघे आपले ठरल्याप्रमाणे श्री. पवारांना भेटायला जाऊ.

सर हार्डीकर हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. त्यावेळी त्यांच्याकडे मोबाईल होता. मी छत्तीसगडला होतो. निवडणुकांच्याबद्दल आधी आमची बरीच चर्चा झाली होती. किशाभाऊ भाजपच्या बाजूने घट्ट होते. त्यांना ''राष्ट्रहित जपणारे सरकार यावे'' अशी तीव्र इच्छा मनापासून होती. निवडणुकांचे निकाल जाहीर होऊ लागले तसे मी फोन करुन सरांना भाजप आघाडी हारत असल्याचे सांगू लागलो व भाजपातील त्रुटी सांगत होतो. त्यादिवशी सर फोन वर अक्षरश: अस्वस्थ होऊन म्हणाले, ''अरे इतर सर्व एकत्र आलेले डोमकावळे आहेत, आपण इतके कष्ट घेतो आहोत आणि ही लोकं हा देश केव्हा विकतील ते कळणारदेखील नाही''. सरांनी त्याच अस्वस्थ मनस्थितीत फोन ठेवला. मलाही खूप वाईट वाटले. नंतर पुण्यात परत आल्यावर लगेच सरांना भेटायला गेलो, त्यावेळी माझी अपेक्षा होती, सर भाजप हरल्याबद्दल बोलतील, त्यांना वाईट वाटतच असेल. पण निवडणुकीचा विषय काढताच सरांच्या मूड बदलला, सर म्हणाले, ''जे झाले ते आपल्या भल्यासाठीच झाले, यामुळे संघाच्या शाखा व कार्य वाढेल, आपण सर्वजण चांगले कामाला लागू. राजकीय पाठबळ असेल तर एक प्रकारचा गर्व होतो व लोक काम करेनासे होतात. या पराभवाने आपण आपले समाजापर्यंत पोचायचे काम जोमाने करणार आहोत''. सरांची ही सकारात्मक विचारशैली बघून मी चकितच झालो.

# 'असे गुरुजी पुन्हा भेटणे नाही!'

**– नारायण श्रॉफ**

१९५०-५३ या कालावधीमध्ये पटवर्धनसर राजा धनराज गिरजी विद्यालयामध्ये शिक्षक होते. त्यावेळेस ते विज्ञान विषय शिकवत होते. अवघड विषय सोपा करून कसा शिकवावा याची विलक्षण हातोटी सरांकडे होती. त्यामुळे त्यांच्या वर्गात सर्व विद्यार्थी आत्मीयतेने लक्ष लावून विषयाचे ग्रहण करीत.

पटवर्धन सर जात्याच शांत वृत्तीचे व मनमिळाऊ होते. विशेषत: विद्यार्थी वर्गात ते अत्यंत लोकप्रिय होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असा एक दरारा होता, की आम्ही मुले त्यांच्याशी मोकळेपणाने वागत असूनदेखील एक प्रकारचा आम्हां विद्यार्थांमध्ये भीतियुक्त आदर असे. त्याचप्रमाणे सरांच्यामध्ये विनोदबुद्धीही होती. परंतु त्यांचा विनोद हा नेहमी नर्म असे. व त्यांच्या विनोदामुळे कधीही कुणाचे मन दुखावले गेले असे झाले नाही. ऐन परीक्षेच्या वेळीदेखील परीक्षा चालू असताना त्याच्या विनोदी स्वभावाचे आम्हास आकर्षण वाटे. आम्ही विद्यार्थी परिक्षेच्या तणावाखाली पेपर लिहित असतानादेखील विद्यार्थ्यांचा तणाव कसा कमी करावा याचे विलक्षण कसब त्यांच्याकडे होते. वानगीदाखल एक उदाहरण देतो. ते नेहमी म्हणायचे, की परीक्षा सुरू झाली की ते ज्या वर्गात पर्यवेक्षक असतील त्या वर्गामध्ये अगोदर अर्धातास यायचे आणि मुलांना सांगायचे ''अरे मुलांनो तुम्ही वर्षभर जरी टवाळ्या केल्या तरी थोडेसे जे कानावर पडलंय ते लिहिण्यास अर्धा-पाऊण तास पुरेसा होईल. तोपर्यंत तुम्ही पहिल्या अर्धा-पाऊण तास काही करणार नाही याची मला खात्री आहे. तुमचं खरं हातचालखीचे कसब एक तासानंतर सुरू होईल व त्याला उधाण जोराने शेवटच्या तासात येईल. याचीही मला जाणीव आहे; तेव्हा विद्यार्थ्यांनो असा आत्मघातकी खेळ करू

नका. काही तरी पांढऱ्यावर काळं चार-पाच पाने बरी लिहा. म्हणजे पुढच्या वर्गाच्या पाटीला हात लावण्याची शक्यता दाट होईल. तेव्हा तुम्ही कुठलीही चतुराई करण्याच्या भानगडीत पडू नका.'' परीक्षेच्या वेळेला फळ्यावर मोठ्या सुवाच्य अक्षरात नलदमयंती स्वयंवरातील एक वाक्य ते आवजूर्न लिहीत असत व त्यामुळे पेपर चालू असताना देखील वर्गात हास्याची लकेर पिके. ''कठिण समय येता, कोण कामास येतो.''

शाळा सुटल्यावरदेखील विद्यार्थी व त्यानां शिकवणारे सर हे दृश्य आम्ही अनेकदा पाहिलं आहे. असं अतूट नातं क्वचितच अनुभवास मिळतं. पुष्कळ दिवसांनी विद्यार्थी भेटला व ते कितीही कामात असले तरीदेखील आत्मीयतेने त्याची चौकशी केल्यावाचून राहत नसत.

माझ्या मुलाचं लग्न होतं. त्यावेळेस सरांना मी लग्नाची पत्रिका पाठवली होती. सरांच्या पत्नी रुग्णशय्येवर पार खिळून होत्या. त्यामुळे सरांना येणे जमले नाही. म्हणून त्यांनी मला पत्र पाठविले, ते हृदयस्पर्शी पत्र मी अमोल ठेव म्हणून जपून ठेवले आहे. ज्या ज्या वेळेस मला सरांची आठवण होते, त्या त्या वेळेस मी ते पत्र वाचतो व नकळत माझ्या सयंमाचे बांध फुटतात व अश्रुपूर्ण नयनांनी मी त्यांना श्रध्दांजली वाहतो.

माझा दुसरा अनुभव असा की मी एकदा शाळेत असताना शाळेतील फोनच्या वायरी मी तोडल्या होत्या. त्यामुळे दोन दिवस फोनसेवा विस्कळीत होती. नेमके एकदा सरांनी मला त्या फोनच्या वायरीपाशी बघितले व मला म्हणाले,''काय रे, तूच तोडल्यास ना वायरी''. तेव्हा सरांनी मला खूप मारले. तसा मी तब्येतीने बलवान आणि सर काटकुळे. नंतर सर येऊन म्हणाले ''अरे! तुला मारून माझा हात दुखायला लागलाय, जरा मालिश करून दे''.

म्हणजे मारलेल्या विद्यार्थ्यांचे मन न दुखवता त्याला परत जवळ करण्याची कला त्यांच्यात होती.

# निगर्वी स्वभावाचे किशाभाऊ

**– शरद घाटपांडे**

भारत इंग्लिश स्कूल, शिवाजीनगर या शाळेत शिक्षक म्हणून पंधरा वर्षे सेवा झाल्यावर माझी बदली पुण्यातच बुधवार पेठेतील शेठ हिरालाल सराफ प्रशालेत (म्हणजे पूर्वीचे भारत हायस्कूल मध्ये) झाली. नंतरच्या चार-पाच वर्षांमधला म्हणजे १९८० च्या आगेमागे घडलेला प्रसंग माझ्या कायमचा स्मरणात आहे.

शाळा सुटण्याची ५.३० ची वेळ होती. मुख्याध्यापकांकडून भेटण्यासाठीचा मला निरोप मिळाला. खोलीत जाताच किशाभाऊंची व माझी नजरानजर झाली. आम्ही दोघे पूर्वपरिचित होतो. मात्र मुख्याध्यापक असणाऱ्या श्री. पटवर्धनांचा, ते किती मोठे आहेत हे वर्णन करून मला आमच्या मुख्याध्यापकांनी परिचय करून दिला. त्यांचे तुमच्याशी काही काम आहे असे सांगून झाल्यावर मी व किशाभाऊ शेजारच्या वर्ग खोलीत बसलो. किशाभाऊंनी मला सविस्तर विषय सांगितला.

'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रारंभीचा तो काळ होता. इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांची बुध्दिमापन चाचणी घेऊन त्यातील गरीब आणि सेवावस्तीत (झोपडपट्टी) राहणाऱ्या मुलांना वर्धिनीत आणण्याचे प्रयत्न सुरू होते. किशाभाऊंनी सारी पद्धती आणि (मला थोडी माहिती आहे हे माहीत असूनही) वर्धिनीची कल्पना, रचना, आवश्यकता या साऱ्या गोष्टी सविस्तरपणे समजावून दिल्या. मी सराफ शाळेतील काही मुला-मुलींना निवडावे, त्यांना चाचणीसाठी आवर्जून पाठवावे अशी विनंती किशाभाऊंनी मला केली. त्यांचे हे विनंतीवजा शब्द ऐकून मी खजीलच झालो.

मी किशाभाऊंना म्हटले– 'माझी व तुमची चांगली ओळख आहे. संघाच्या कामाची, या पेठांची काहीशी जबाबदारी माझेवर आहे हेही तुम्हाला माहिती

आहे. तर मग मुख्याध्यापकांची परवानगी घेणं, मला विनंतीवजा शब्द वापरणं याची काय आवश्यकता आहे? हा औपचारिकपणा नकोच. तुमचा अधिकार मोठा आहे'.

किशाभाऊ मला म्हणाले, 'मी एका नवीन संस्थेच्या कामासंबंधी बोलायला आलो आहे, आणि शाळेतील मुले चाचणीसाठी बोलवायची आहेत म्हणून मुख्याध्यापकांची रीतसर परवानगी हवीच. **येथे अधिकार वापरणं योग्य नाही नि मला तशी सवयही नाही. या कामात तुम्हाला सुचविणारा किंवा आज्ञा करणारा योग्य अधिकारी मी निश्चितच नाही'.**

एक माजी मुख्याध्यापक, संघकार्यातील जुना व अनुवभी ज्येष्ठ स्वयंसेवक, एका संस्थेचा संस्थापक अशा श्रेष्ठ पात्रतेचा हा कार्यकर्ता किती निगर्वी स्वभावाचा होता त्याचे हे प्रत्यंतरच नव्हे का?

## कृष्ण कुठे गेला?

'स्व'-रूपवर्धिनीच्या रूपाने इतके मौल्यवान व कायम स्वरूपी देखणे काम करूनही किशाभाऊ, ८५ व्या वर्षातही आपण अतृप्तच! आपण परमेश्वराकडे प्रार्थना करीत होतात की 'हे देवा! हे दीनदयाळा!! मला अजून काम करण्यासाठी दहा वर्षांचे आयुष्य दे' परंतु परमेश्वर म्हणाला असेल, 'अरे योगेश्वरा! तुझ्याकडून किती कष्ट करून घ्यायचे? हे माझ्याच्याने सुद्धा बघवत नाही. तू आता थकला आहेस. मी तुला कितीही आयुष्य दिले तरी तुझा आत्मा अतृप्तच राहिला असता. तेव्हा आता हे कृष्णा तू इकडेच ये.'

श्रीकृष्ण गोकुळातून निघून मथुरेला गेला हे समजले होते पण 'स्व'-रूपवर्धिनीचा कृष्ण कुठे गेला हे समजले नाही. हे कृष्णा आपण पुनर्जन्म घेऊन याच ठिकाणी परत या अशी आपल्याला प्रार्थना.

**श्रीमती निर्मला रोंघे**

# योग्य वेळी कानउघडणी झाली म्हणून...

**– सुहास पंढरीनाथ पवार**

गुरूर् ब्रह्मा गुरूर् विष्णु: गुरूर् देवो महेश्वर:।
गुरू: साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरुवे नम:।।

घडत तर सगळेच असतात, परंतु घडविणारा हा गुरूच असतो. ज्याप्रमाणे मातीला कुंभार आकार देतो त्याचप्रमाणे मनुष्याच्या आयुष्याच्या चक्रावर त्याला त्याचा गुरू आकारत असतो.

माझ्या लहानपणापासूनचा पहिला गुरू–'भगवा ध्वज'. त्या संस्कारातून मी घडलेलो. लहानपणाचे, मस्तीचे व खेळकरपणाचे दिवस प्राथमिक शिक्षणापर्यंत गेले व माध्यमिक शिक्षणासाठी आपण हायस्कूलमध्ये जाणार ह्या भावनेने थोडे शहारून आले. भीतीयुक्त मनाने मी शाळेत प्रवेश केला. शाळेचे नाव होते, 'राजा धनराज गिरजी हायस्कूल', रास्तापेठ पुणे.

पूर्व भागातील विद्यार्थी आमच्या शाळेत होते. आठवीपासून नववीपर्यंत मी निरनिराळ्या स्पर्धांमधून भाग घेत असायचो, मग सूर्यनमस्कारच्या स्पर्धा असोत किंवा समरगीतांच्या स्पर्धा असोत, लहानपणापासून शाखेत पद्य म्हणायची सवय. त्यामुळे शाळेतल्या स्पर्धांमधून समरगीते व सूर्यनमस्कारांमध्ये मी प्रावीण्य कधी सोडले नाही. परंतु हे सर्व होत असताना काही चाणाक्ष नजरा माझ्या ह्या कलागुणांवर गेल्या व नकळत ह्यातून काही संकेत माझ्या गुरूजनांना मिळाले. परंतु त्यात ह्या ठिकाणी आवर्जून उल्लेख करावयाचा म्हणजे पटवर्धन सर! आम्ही त्यावेळेस 'पटवर्धन सर' असेच म्हणायचो. सरांनी मला अचूक टिपले व म्हणाले,'पवऱ्या (लाडाने मला ते पवऱ्या म्हणायचे) आडदांडपणा पुरे आता, अभ्यासात लक्ष दे नाहीतर बसशील त्याच वर्गात' अर्थात असं म्हणण्यामागे त्यांचा हेतू काय होता हे मला कळाले. सर मला फिजिक्स व केमिस्ट्री शिकवायचे. शिकवणारे अनेक असतात, मात्र विद्यार्थ्याला उचित मार्गदर्शन करणारे पटवर्धन

सरांसारखे खूप क्वचित असतात.

पूर्वी अकरावीला बोर्डाची परीक्षा असायची. आजकाल शाळांमधे पूर्वपरीक्षा घेतात, तशीच त्यावेळीदेखील असायची. त्या परीक्षेत सरांच्या विषयात माझी दांडी उडाली. सरांची प्रत्येकाच्या प्रगतीकडे बारीक नजर असायची. माझ्या बाबतीत असं घडल्यामुळे त्यांनी मला बोलावलं. कितीही केलं तरी ते आमचे शिक्षक असल्यामुळे त्यांनी माझा कान धरला आणि बजावलं, 'गधड्या, चांगले अकलेचे दिवे लावलेस. ते काही नाही, तुला बोर्डाच्या परीक्षेला बसता येणार नाही.' मग काय, एवढा मस्तीखोर मी पण माझा चेहरा अगदी रडवेला झाला. मी सरांना विनंती करू लागलो. मनात फक्त एकच विचार येत होता की, 'काहीही करायचं पण सरांना पटवायचंच' म्हणून मी सरांना खात्री देऊ लागलो. तसे सर खूप कडक होते. सर काही ऐकेनात, पण मग सरांनी मला एक अट घातली व म्हणाले,'तुला एक आठवड्याची मुदत देतो. त्या काळात चांगला अभ्यास करून ये. मी तुझी परत परीक्षा घेणार आहे. झालं, एका आठवड्यानंतर परीक्षेचा दिवस आला. भरपूर अभ्यास केला. सरांनी म्हणल्याप्रमाणे माझी परीक्षा घेतली व दोन्ही विषयांत ६०% च्या वर मार्क मिळाले.

मग सरांनी मला तेवढ्याच आत्मीयतेने जवळ घेतले व म्हणाले, 'पवऱ्या मी तुला चांगले ओळखतो. तू बोर्डात ह्याच्यापेक्षाही चांगली प्रगती करू शकशील त्याचे कारण तुझे परिश्रम आणि इच्छाशक्ती' आणि खरच फिजिक्स व केमिस्ट्री ह्या विषयात ७५ पेक्षाही जास्त मार्क मिळवून मी उत्तीर्ण झालो.

या ठिकाणी मला एकच सांगायचे की त्यावेळेस सरांनी घेतलेली परीक्षा फक्त परीक्षा नसून ऐक संदेश होता की, **आयुष्यात सगळ्या गोष्टी करता येतात. मौज, मजा या सर्व गोष्टी आयुष्यात येतातच, पण माणसाने मौजमजेत आपलं ध्येय कधीही विसरू नये.** याचा अर्थ असाही नाही की माणसाने काम एके काम करावं. याचा अर्थ असा की माणसाने कर्माला धर्म मानून जगलं पाहिजे, तेव्हा कुठे त्याची खरी प्रगती होऊ शकते. सरांनी त्यावेळेस केलेली माझी कानउघडणी मी कधी विसरू शकणार नाही, अशा या पूज्य व आदरणीय गुरूस माझी भावपूर्ण श्रध्दांजली, दिव्यत्वाची जेथ प्रचीती । तेथे कर माझे जुळती ।

# त्वमेव माता - पिता त्वमेव

**- डॉ. सोमनाथ सलगर**

निराशेमुळे मनात चहुबाजूंनी कृष्णमेघ दाटले असताना, किशाभाऊंना फोन केल्यावर ते आधार द्यायचे; 'डॉक्टर, निराश होऊ नका. रात्र फक्त बारा तासांची असते. रात्रीनंतर दिवस उगवतो. प्रतीक्षा करा'. मनाला नवसंजीवनी मिळायची. काम करण्याचा उत्साह, ऊर्जा प्राप्त व्हायची.

विद्यार्थी सहायक समितीच्या 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत माझी बहीण सुनीता, लेखनिक म्हणून किशाभाऊंकडे जाऊ लागली. तिनेच माझा सरांशी परिचय करून दिला. 'विद्याव्यास पुरस्कार' मिळाल्यानंतर मी सरांना प्रथमच प्रत्यक्ष भेटण्यास गेलो असता नम्रपणे सरांनी पुरस्काराचे श्रेय वर्धिनीच्या सर्व कार्यकर्त्यांना दिले. तिथेच मॉडेल कॉलनीतील त्यांच्या घरी त्यांनी 'स्व'-रूपवर्धिनीचे कार्यवृत्त वाचण्यास दिले व मी वर्धिनीच्या 'प्रेमात' पडलो.

मंगळवार पेठेत, वातावरणाचा ताप व परिस्थितीचा शाप असलेल्या भागात स्वरूपवर्धिनीची मंगल वास्तू अनेकांना दिशा दाखविण्याचं काम गेली अनेक वर्षे अव्याहतपणे करीत आहे.

त्यानंतर दर आठवड्याला मी सरांशी फोनवरून किंवा प्रत्यक्ष भेटीत 'संवाद' साधू लागलो. त्यांचं लाघवी, आस्थापूर्वक बोलणं मनात कायमचं घर करीत असे. अकृत्रिम स्नेह, जिव्हाळा, आपुलकी यांचं मूर्तिमंत प्रतिक म्हणजे किशाभाऊ.

मी स्पर्धा परीक्षा केंद्रात विद्यार्थी म्हणून दाखल झालो. केंद्राच्या सर्व उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागलो. सर्वच कार्यक्रमांना सर आवर्जून उपस्थित असत. कार्यक्रमानंतर मला सांगायचे, 'तुम्ही फारच अभ्यासपूर्ण भाषण केलेत. असेच वक्तृत्व पुढे चालू ठेवा.' कौतुकाने पाठीवर शाबासकीची थाप आवर्जून द्यायचे. श्री. पाटणकर सरांचा 'व्यक्तिमत्त्व विकसन वर्ग' सुरू झाल्यावर

वेळेअभावी मला त्या वर्गांना उपस्थित राहणे शक्य नव्हते. पण सरांनी कार्यालयात बोलावून अर्धा तास माझे समुपदेशन केल्यानंतर ताबडतोब मी त्या वर्गात प्रवेश घेतला. त्या वर्गाचा मला आजही दैनंदिन जीवनात खूप उपयोग होतो आहे, आणि सरांची आठवणही प्रकर्षाने होते.

'सकाळ' मध्ये माझा 'प्रयत्ने वाळूचे कण' सदरात 'धुणीभांडी करून डॉक्टर झालो' हा लेख प्रकाशित झाल्यावर सरांनी तो लेख सतीश माळीकडून वाचून घेतला आणि सरांना अश्रू अनावर झाले. नंतर वर्धिनीच्या कार्यक्रमात श्री. प्रतापराव पवार, प्रा. प्रवीण दवणे, श्री. जयसिंगभाई मरिवाला, श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ यांच्याशी माझा परिचय करून देताना त्यांनी माझ्या जीवनसंघर्षाचा कौतुकाने उल्लेख केला.

सरांना एकदा आकाशवाणीने मुलाखातीसाठी बोलविले असता त्यांनी माझ्या नावाची शिफारस केली व त्यामुळे 'युववाणी' वर 'काट्यातून यशाकडे' या कार्यक्रमात माझी मुलाखत प्रसारित झाली. सरांनी ती स्वत:साठी टेप करून ठेवली व अनेकांना ती ऐकवली.

माझा (फिजिओथेरपिस्ट) भाऊ ज्ञानेश्वर, सरांना मसाज व व्यायामाचे उपचार देण्यास नियमित जाऊ लागला व आम्हा तिघा भावंडांना सरांचा सहवास लाभला. सरांचे दैनंदिन व्यायाम, वाचन, ध्यान, दैनंदिन लेखन हे प्रत्यक्ष पाहून ज्ञानेश्वर प्रभावित झाला. तरूणाला लाजविणारा सरांचा दांडगा उत्साह सर्वांनाच प्रेरणादायी असे.

श्री. किशाभाऊ सर आम्हा तिघांना शिक्षणासाठी पालकांप्रमाणे प्रोत्साहन, देत व मार्गदर्शन करीत. आमच्या परीक्षांची, निकालाची काळजी आईवडिलांपेक्षा सरांना जास्त असायची.

मी जेव्हा सरांकडे भेटण्यास जाई तेव्हा मला वाचनाची आवड असल्यामुळे ते एखाद्या पुस्तकाची नेहमी शिफारस करीत. जोहड, हिंदुतेजा होई जागृत, अग्निपंख इ. उत्तमोत्तम पुस्तके, सरांच्या संग्रहातून आम्हा तिघांना वाचायला देत. वाचनातून त्यांनी आमच्यावर संस्कार केले.

सरांच्या अखेरच्या आजारपणात सेवाशुश्रूषेसाठी साहाय्यक म्हणून राघप्पा गोविंद चौगुले या माझ्या मामेभावाला खुपसंगी ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथून आणले. सरांना खूप आनंद झाला. आम्ही राघप्पाला 'पिंटू' म्हणत असू पण सरांनी त्याचे बारसे 'रामभाऊ' असे केले. न बोलणारा राघप्पा ऊर्फ पिंटू सरांच्या सहवासात राहून, वर्धिनीच्या संपर्कात येऊन मनमोकळेपणे बोलणारा 'रामभाऊ' झाला. त्याच्यातील हा बदल गावकऱ्यांनाही आश्चर्यचकित करणारा होता. सरांच्या सहवासात व वर्धिनीच्या संपर्कात आम्हा सर्व कुटुंबियांना परिसस्पर्श लाभला.

प्रत्येक छोटी-मोठी अडचण सोडविण्यासाठी सर स्वत: वैयक्तिक लक्ष देत. समस्येवर तोडगा सापडेपर्यंत ते पाठपुरावा करीत.

केरळला मला वैद्यकीय महाविद्यालयात काम करण्याची संधी मिळाल्यावर सरांनी अवश्य जाण्यास सांगितले. **'घरटं सोडल्याशिवाय आकाश सापडणार नाही. तेव्हा आकाशात मुक्तपणे संचार करा पण घरट्यावर लक्ष ठेवा.' हा सरांचा मौलिक सल्ला मी कधीही विसणार नाही.**

स्वरूपवर्धिनीसारखे काम आम्हा मंगळवेढा तालुक्यातील खुपसंगी हाजापूर या दुर्गम दुष्काळी गावात सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. तेथील शिक्षकांसमोर वर्धिनीचा विषय मांडणे, विद्यार्थ्यांशी संपर्क करणे यातून वर्धिनीचा परिचय किमान १०० जणांना झाला असून काहीजण सुटीतील शिबिराला येण्यास उत्सुक आहेत. वाचनालय व अभ्यासिका ही तेथील मूलभूत प्राथमिक गरज आहे. किशाभाऊंना दिलेल्या शब्दानुसार आम्ही आयुष्यभर वर्धिनीच्या प्रचार-प्रसारासाठी योगदान देण्याचे ठरविले आहे.

केरळला निघण्यापूर्वी सरांची मी हर्डीकर हॉस्पिटलमध्ये भेट घेतली. अखेरच्या आजारपणातही वर्धिनीचा विस्तार हाच त्यांच्या गप्पांचा विषय होता. जम्मू-काश्मीरच्या प्रश्नावर ते भावनावश होऊन बोलत. यमगरवाडी, भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, गिरीशजी प्रभुणे, अरूणाचल प्रदेशातील वनवासी कल्याणाचे कार्य हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय होते. सर मला नेहमी म्हणत,

'मंगळवेढ्यातील हाजापूरच्या खडकाळ जमिनीतील सलगरांचे हे बीज सद्‌गुणांचं प्रतीक आहे' असं काही ऐकलं की मनातील वैफल्य, न्यूनगंड दूर होई. पुन्हा झुंजण्यासाठी बळ मिळे.

आज सर जरी देहाने उपस्थित नसले तरी प्रत्येक वर्धक, वर्धिका, युवा-युवती व कार्यकर्त्यांच्या मनामनात सरांच्या विचारांचे, आचारांचे 'क्लोनिंग' झाले आहे. वर्धिनीतील सर्वच कार्यकर्त्यांकडून आम्हा सर्वांना परिवारातील सदस्यांप्रमाणे आपुलकीची वागणूक मिळाली. स्नेह लाभला.

रौप्यमहोत्सवी कार्यक्रमात डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी 'स्व'-रूपवर्धिनीची गरज महाराष्ट्राला तसेच देशाला आहे व वर्धिनीचा तेवढा विस्तार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी जे जे प्रयत्न होतील त्यामध्ये आम्ही भावंडांनी यथाशक्ति सक्रिय सहकार्य करणं म्हणजे वर्धिनीचे शिल्पकार कै. किशाभाऊ पटवर्धन यांचं खरं स्मरण करणं असे मला वाटले.

## अंत नव्हे सुरुवात...

*वास्तविक त्यागी जीवनाचा अंत कधीच होत नाही. कारण त्या व्यक्तीच्या त्यागातून तरुण पिढीला धडा मिळत असतो. तेव्हा 'त्यागी जीवनाचा अंत' असे न म्हणता 'त्यागाची सुरुवात' म्हणणे जास्त योग्य होईल. किशाभाऊंचे देहावसान झाले त्यामुळे या थोर कार्यकर्त्यांच्या आशीर्वादाला आपण मुकलो पण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन जेव्हा हजारो तरुण सामाजिक क्रांती घडवतील तेव्हा ती क्रांती हीच किशाभाऊंना खरी श्रद्धांजली ठरेल.*

**गोपाळ संत**

# सहकारी कार्यकर्त्यांच्या काही आठवणी

**– मल्लापा सोलापुरे**

कै. किशाभाऊ पटवर्धन हे संघाचे जुने स्वयंसेवक. बालवयापासूनच माझा संघाशी संबंध आला. किशाभाऊही बाल स्वयंसेवक होते. १९४० सालापर्यंत संघांत इतर कार्यक्रमांबरोबर सैनिकी शिक्षणही दिले जात होते. सैनिकी शिक्षण प्रत्येक उपशाखेवर देत असत. मी त्यावेळी पुणे शहराच्या पूर्व भागात काम करीत होतो तर किशाभाऊ पश्चिम भागात. सैनिकी शिक्षणाच्या निमित्ताने आम्ही एकत्र येत असू. आपला खाकी गणवेष उत्कृष्ट असावा व सैनिकी शिक्षणात आपण तरबेज व्हावे अशी माझ्यासह किशाभाऊंचीही ईर्षा होती. दरवर्षी नाताळच्या सुट्टीत अरण्येश्वर देवळाजवळ हिवाळी शिबिर होत असे. १९४० पर्यंत शिबिरात संपूर्ण मिलिटरी शिक्षणाचे जणू काही प्रात्याक्षिकच होत असे. स्पर्धाही होत असत. उत्कृष्ट 'कॅडेट' व्हावे अशी आम्हा दोघांचीही इच्छा असायची. उन्हाळ्यात O.T.C. (Officers Training Camp). म्हणजे संघ शिक्षा वर्ग चाळीस दिवसांचा असे.

१९४० नंतर संघातून मिलिटरी शिक्षण बंद झाले. नंतर केवळ बैठकीतच माझी किशाभाऊंची भेट होत असे. अत्यंत विनोदी थट्टामस्करी करणारे म्हणून त्यांची ओळख सर्वांना होती. उपशाखा उत्कृष्टपणे चालविणारा कार्यकर्ता अशीही त्यांची ओळख होती. बालवयातच १९४० पर्यंत कै. डॉक्टर हेडगेवारांची आमची भेट होत असे. पुढे कार्यक्षेत्र बदलल्यामुळे आमचा संपर्क कमी झाला. १९४२-४५ याबाबत मी सोलापूरला प्रचारक होतो. त्याप्रमाणे किशाभाऊही अनेक वर्षे प्रचारक होते. केवळ प्रांतिक बैठक, प्रांताचे कार्यक्रम, उन्हाळ्यातील संघशिक्षा वर्ग अशावेळी किशाभाऊंची भेट होत असे. पुढे राजा धनराज गिरजी शाळेतून निवृत्त झाल्यावर 'स्व'-रूपवर्धिनीची त्यांनी स्थापना केली. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या उपेक्षित समाज घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय डोळ्यापुढे ठेवून या कामासाठी किशाभाऊंनी उर्वरित सर्व आयुष्य शेवटपर्यंत व्यतीत केले.

# आधार एका 'सावलीचा'

**–प्रा. गणेश द. राऊत**

'कृ.ल.'सरांच्या फक्त आठवणीच आता आयुष्यभर सोबत करणाऱ्या आहेत. इयत्ता पाचवी ते एम. ए. होईपर्यंतचे दिवस म्हणजे– पटवर्धन सर बाहेरगावी गेले असतील तरच भेट नाही अन्यथा– आमची भेट नाही असा दिवस विरळाच !

ते मुख्याध्यापक आणि मी त्याच शाळेचा विद्यार्थी हा आम्हा दोघांना जोडणारा एक दुवा होता. शाळेत असताना रोज मी त्यांचे नाव पाटीवर पहायचो. या माणसाशी आपली ओळख आहे असं वाटून खूप आनंद व्हायचा. मी पाचवीत असताना खूप आजारी पडलो असता ते माझ्या घरी पहिल्यांदा आले ते 'बोर्नव्हिटा'चा डबा घेऊन. या गोष्टी तेव्हा परवडणाऱ्या नव्हत्याच! मी आयुष्यात पहिल्यांदाच 'बोर्नव्हिटा' प्यायलो असेन. तो पिऊनही माझ्यात फारसा फरक पडला नाही, पण सर आम्हा सर्वांच्या आयुष्याशी जोडले गेले ते कायमचे.

त्यांच्या घरी जाण्याचे सुरुवातीला दडपण यायचे, पण संजय तांबट आणि रवींद्र मोदळेबरोबर जाताना मजा यायची. त्यांच्या बंगल्यातील मधुर चवीचे आंबे, पेरु, आवळे, भरपूर खाल्ले. त्यांच्या दिवाणखान्यातील रामकृष्ण परमहंस व विवेकानंदांच्या मूर्ती आजही स्मरणात आहेत.

बाथरुमला जाऊन आल्यावर पाय धुवायचे असतात हा संस्कार पटवर्धन सर आणि बाईंचा. त्यांनी एकदा सांगितल्यावर ते मी कधीच विसरलो नाही. त्यांच्यामुळे पत्ता शोधायची सवय लागली. ते पत्ता सांगताना म्हणायचे त्या रस्त्यावर कोणीही सांगेल, प्रत्यक्षात असा माणूस कधीच भेटायचा नाही पण त्यामुळे संजय आणि मी पत्ता शोधण्यात कधीही अयशस्वी झालो नाही.

मी कोणत्याही छोट्या मोठ्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलो की ते सर्वांसमोर अभिनंदन करायचे, येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला ओळख करुन देताना ते ही

गोष्ट **कौतुकाने सांगायचे. झापायचे सुद्धा सगळ्यांसमोरच. त्यांचे प्रेम, राग, लोभ असेच तीव्र.** मला भूक लागल्याचे ते अचूक ओळखत मग एखाद्या हॉटेलात इडली व कॉफी व्हायची.

माझ्या कला शाखेला जाण्याच्या निर्णयाला त्यांचा पूर्ण पाठिंबा होता. माझ्या प्राध्यापक होण्यालासुद्धा त्यांचा पाठिंबा होताच. परिस्थितीने पुढे अशी काही वळणे घेतली की मला खूप काळ पटवर्धन सरांच्या सावलीत राहिल्यावर उन्हात जावेसे वाटले आणि मी आजपर्यंत उन्हातच उभा आहे, अर्थात, त्यांच्यासारखं 'सावली' देण्याचं काम करता यावं या इच्छेपोटी.

## ही खरी राष्ट्रीय संपत्ती आहे.

१९७९ साली वर्धिनीचे काम सुरु झाले. योगायोगानं ते वर्ष आंतरराष्ट्रीय बालक वर्ष होतं. त्यावर्षी जगभर मुलांच्या कौतुकाचे अनेक कार्यक्रम झाले असतील पण त्याच वर्षात मुलामुलींच्या, विशेषत: उपेक्षित समाजघटकातील मुलामुलींच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू झालेला आणि विस्तारलेला 'स्व'–रूपवर्धिनी हा एकमेव आगळा वेगळा शैक्षणिक प्रयोग असावा. प्रतिकूल वातावरणातील बुद्धिमान चुणचुणीत मुलामुलींचं भवितव्य उत्तम घडलं पाहिजे या एकाच विषयाने झपाटून त्यांनी वर्धिनीचे काम उभे केले. अशा मुलामुलींविषयी किशाभाऊ नेहमी म्हणत "If you attend them, it is a National Wealth, but if you don't, it may turn out to be a National nuicence." शिक्षक म्हणून करड्या शिस्तीचे असूनही मुलांमध्ये सहजपणानं मिसळण्याची वृत्ती किशाभाऊंमध्ये होती आणि हे कदाचित् संघ संस्कारानं घडलं असावं. वर्धिनीमध्ये येणारा प्रत्येक मुलगा, प्रत्येक मुलगी ही त्यांना त्यांची अपत्ये वाटत इतक्या जिव्हाळ्यानं ते त्यांच्याशी वागत. मुलामुलींच्या विकासात अडसर बनणाऱ्या छोट्या छोट्या गोष्टींकडेही किशाभाऊंचे बारकाईने लक्ष असे.

# लोकहितं मम करणीयम् ।

**– शरद हरी भिडे**

संघाच्या प्रचारक व्यवस्थेमध्ये अनेक उपक्रम योजले जातात. पूर्णवेळ प्रचारक हे तर संघाचे एक खास वैशिष्ट्य आहे. १९४५ ते ४८ च्या काळात व्यवसायी प्रचारक अशी एक योजना सुचविण्यात आली होती. आणि या योजनेनुसार श्री. किशाभाऊ राजगुरुनगर (त्यावेळचे खेड) येथे आमच्या शाळेत शिक्षक म्हणून दाखल झाले. सुरुवातीला नेहमीच्या प्रथेप्रमाणे ते आमच्या घरी राहिले, पण आठ-दहा दिवसात स्वतंत्र खोली घेऊन त्यांचा 'संसार' सुरु झाला. शाळेमध्ये ते विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणूनच ओळखले जात व शाळेतील सर्व उपक्रमांमध्ये समरसून सहभागी होत असत. त्यांची राहाण्याची खोली ही आम्हा स्वयंसेवकांची हक्काने जमण्यासाठी-अभ्यासासाठी, शंका निरसनासाठी, गप्पागोष्टींसाठी व बैठकीसाठी जागा होती.

राजगुरुनगरला येण्यापूर्वी श्री. किशाभाऊ चाळीसगावला प्रचारक होते. त्यामुळे तेथील संघकार्याचे अनुभव त्यांच्याकडून ऐकण्यात एक वेगळीच मजा असे. तेथील कार्यकर्त्यांना पत्र पाठविताना पत्ता लिहिताना ते **'४०गाव'** असा लिहीत, त्याची आम्हाला विशेष गंमत वाटत असे.

किशाभाऊंच्या जीवनप्रवाहाची दिशा नियतीने वेगळ्याप्रकारे निश्चित केली असल्याने त्यांचे आमच्या शाळेतील वास्तव्य एक वर्षाचेच राहिले; पण त्या अवधीतही आमच्या बालमनावर झालेले त्यांचे संस्कार चिरकालीन आहेत.

किशाभाऊ नंतर पुण्यात आले. काही काळ श्री. अप्पा पेंडसे यांच्याबरोबर ज्ञानप्रबोधिनीमध्ये, प्रामुख्याने धनसंचयाचे काम करीत होते. या दोन्ही मनस्वी कार्यकर्त्यांनी प्रबोधिनीच्या रोपट्याचे बहरलेल्या वृक्षात रुपांतर केले.

उच्च प्रतीचा बुद्ध्यंक असलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या वैयक्तिक उत्कर्षाबरोबरच राष्ट्रानुकूल विचार करायला शिकविणे व आपल्या सभोवतीच्या परिस्थितीत आपले वेगळे बेट निर्माण न करता आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा

लाभ सर्व सामान्यांना मिळावा यासाठी प्रयत्नशील राहण्याची मनोवृत्ती जोपासणे हे प्रबोधिनीच्या कामाचे सूत्र किशाभाऊंना मान्य होते. त्याला अनुसरूनच असामान्य बुद्धिमत्ता व अतिसामान्य कौटुंबिक परिस्थितीत असलेल्या विद्यार्थ्यांना – तरुण – तरुणींना विकासाची संधी मिळावी यासाठी काही केले पाहिजे हा विचारही त्यांच्या मनात सतत घोळत होता. शाळेत मुख्याध्यापक म्हणून काम करताना त्यांनी अशा प्रतिकूल परिस्थितीमधील अनेक विद्यार्थ्यांची शिक्षणाची जिद्द पाहिली होती व अशा प्रयत्नांना पाठिंबा देण्याच्या योजनाही केल्या होत्या. त्यामुळे असे एखादे स्थायी काम उभे करण्याचे ठरवून त्यांनी 'स्व'–रूपवर्धिनीची उभारणी केली. हे आव्हान मोठे होते. परिस्थिती सर्वस्वी प्रतिकूल होती. कारण आपला पाल्य बुद्धिमान आहे व थोड्याशा मार्गदर्शनाने, प्रयासाने तो व्यक्तिगत उत्कर्ष करु शकेल असा विश्वास ज्या घरात शिक्षणाची पार्श्वभूमी नाही, अभ्यासाला जागा नाही, पुस्तके नाहीत, फार मोठ्या अपेक्षा नाहीत अशा पालकांच्या मनात निर्माण करणे व त्या दृष्टीने पालकांना उद्युक्त करणे खरोखरच अवघड होते. पण किशाभाऊ व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे शिवधनुष्य उचलले आणि पेलले.

'स्व'–रूपवर्धिनी मोठी व सुस्थिर करण्यासाठी श्री. किशाभाऊंची पायपीट सुरु झाली. धनसंचयासाठी पुणे–मुंबई भ्रमंती, अनेकांच्या भेटीगाठी, शासकीय–प्रशासकीय अडथळे, विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या कुटुंबियांची काळजी, संस्कारक्षम कार्यक्रमांची आखणी, संघविचाराची बैठक बिघडू न देता समाजाच्या सर्व स्तरातील व भिन्नभिन्न विचारसणीच्या अनेकांचे सहकार्य मिळविणे असे अनेकानेक प्रयोग त्यांना पुन्हा नव्याने करायला लागले. किशाभाऊंचे एक वैशिष्ट्य म्हणजे **ते कधीही निराश, निरुत्साही अथवा वैफल्यग्रस्त झाले नाहीत. समोर आलेली प्रत्येकी व्यक्ती, प्रसंग, घटना आपल्याला अनुकूल व लाभदायक ठरेल असा त्यांचा विश्वास होता व त्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याची व वाट पाहण्याची त्यांची तयारी असायची.**

पुणे–मुंबई प्रवासात वा अनेक कार्यक्रमात किशाभाऊंची भेट होत असे व त्यावेळी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या यशोगाथा ते वर्णन करीत. ते ऐकताना अक्षरश: थक्क व्हायला होई. देशात व परदेशातही वैयक्तिक उत्कर्ष अनुभवताना 'स्व'–रुपवर्धिनीचे विद्यार्थी आपल्या मूळ संस्कारांशी कसे प्रामाणिक

आहेत याचा अभिमान त्यांच्या शब्दाशब्दातून जाणवत असे.

शारीरिक हालचालींवरील मर्यादा लक्षात आल्याबरोबर त्यांनी वर्धिनीसाठी 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' ही अलिप्ततेची भूमिका स्वीकारली व अखेरपर्यंत पाळली. आज अशी निर्लेप वृत्ती अतिशय दुर्मिळ आहे. किशाभाऊंच्या मित्रपरिवारात आपला समावेश आहे ही भावना सुखद आहेच; परंतु त्यांच्या विशाल हृदयाची व दूरदृष्टीची झलक दर्शविणारी एक आठवण नमूद केल्याविना राहवत नाही. 'मला एकट्यानं भेटायला ये' अशा त्यांच्या निरोपाप्रमाणे त्यांच्या निवासस्थानी गेलो असताना राजगुरुनगरच्या आठवणीबरोबरच त्यांच्या व माझ्या परिचयाच्या एका जुन्या कार्यकर्त्यांविषयी ते भरभरून बोलले व त्या कार्यकर्त्याच्या स्वास्थ्यासाठी, उतारवयातील तरतुदीसाठी काय करावे लागेल याची जी योजना त्यांनी सांगितली त्यातून एखाद्या सुहृदाविषयीची त्यांची आत्मीयता विशेषत्वाने जाणवली.

## दीर्घायुष्याचे रहस्य

किशाभाऊंना अनेकांची पत्रे येत. परंतु वय झाल्यामुळे स्वत:च्या हस्ताक्षरात त्यांना उत्तर देणे शक्य नसे. अशा पत्रोत्तरांच्या लेखनासाठी कॉलेजच्या सुट्टीत मी सरांकडे जात असे. त्यावेळी सरांचा दिनक्रम अगदी जवळून पाहायला मिळाला. किशाभाऊ जेव्हा प्राणायाम करायला बसायचे तेव्हा भस्त्रिका आणि इतर प्राणायाम करताना अतिशय वेगात श्वास चालायचा. छाती आणि पोटाची सशक्त हालचाल पाहून खरंच सरांचे वय झाले आहे यावर विश्वास बसायचा नाही. कदाचित सरांच्या दीर्घायुष्याचे हेच रहस्य असावे. शरीर थकले तरी त्यांचे श्वासावर अप्रतिम नियंत्रण होते. सरांच्या शेवटच्या काळात एकदा हर्डीकरमध्ये ॲडमिट करावे लागले होते. त्यावेळी त्यांनी निरोप पाठवून बोलावून घेतले. सरांना भेटल्यावर त्यांनी तिथल्या डॉक्टरांच्या उपचाराबद्दल माझे मत विचारले. खरं तर त्यावेळी माझे शिक्षण चालू होते. हर्डीकरमधल्या तज्ज्ञांसमोर मी कोण, पण तरीही सरांनी आवर्जून मत विचारले. आपल्या कार्यकर्त्यांबद्दलची आपुलकी आणि त्यांच्या कौशल्याला वाव देण्याची वृत्ती त्यावेळीही मला दाद द्यावीशी वाटली.

**डॉ. विनेश नगरे**

# कृतिशील कर्मयोगी लोकशिक्षक

**– सोमनाथ दिगंबर पाटसकर (राजीव)**

ज्या ज्या वेळी कृ. ल. पटवर्धन सरांची भेट होत असे, त्या प्रत्येक वेळी त्यांच्या सहवासात आपलेच भावनिक उन्नयन होत असे. आजच्या चंगळवादी जगात जुन्या पिढीतील अशी ऋषितुल्य वडिलधारी मंडळी आपल्यात अगदी कालपर्यंत कार्यरत होती, हे आपल्या सारख्यांचे परमभाग्यच! सरांचे पारदर्शक समग्र जीवन म्हणजे सेवा–त्याग–न्यायाने नटलेला व अखंड वाचन–चिंतन–मनन–व्यासंगाने सजलेला एक संगमच... सरांच्या देशभक्ती–सदाचार–प्रांजलपणाचे जसे दर्शन घडत असे तसेच त्यांच्या सामाजिक बांधिलकी व मार्गदर्शन करण्याचा उपजत शिक्षकी स्वभाव आदि सद्गुणांमुळे स्वरूपवर्धिनीतील वर्धकांनाच काय तर वर्धकांच्या माझ्या सारख्या पालक कुटुंबीयांनाही सर आपलेच वाटायचे... यातच सर्व काही आले. या कृतिशील शिक्षकाकडे पाहिल्यावर 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या उक्तीचे सार्थ दर्शन घडत असे आणि आपल्यालाही प्रेरणा मिळत असे पण तोंडावर स्तुती कशी करणार अशी तेव्हा अवस्था असायची. म्हणूनच आता कृतज्ञतेच्या भावनेतून लिहिलेत हे चार शब्द... सरांच्या हृद्य आठवणी.

'स्व'–रूपवर्धिनीच्या स्थापनेनंतर सुरवातीच्या काळात बऱ्याच अडचणी येऊनही सर डगमगले नाहीत. उलट मोठया उत्साहाने, उमेदीने बरोबरीच्या, त्यांच्या सारख्याच दमदार नि:स्पृह शिक्षकवृंदाच्या साथीने अडचणींवर मात करून सरांनी निवृत्तीनंतरही एक बोधप्रद वस्तुपाठ उभा केलाय! त्यांच्या बोलण्या–वागण्यात सदैव सकारात्मक आशावाद असे, कुठेही निराशेला थारा नसे. तथापि दूरदृष्टी असलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेकविध पैलू त्यांच्या यशाचे गमक आहेत. **सरांचे आणखी एक वैशिष्ट्य हे होते की ते वर्धकांच्या अडचणी–समस्यांवरही अगदी रामबाण उपाय सुचवत व प्रसंगी शक्य ती सर्व**

**मदतही करीत**. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळेच सरांशी सर्वांचेच जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. काळानुरूप बदल करून, गतीचे भान ठेवून वर्धिनीला प्रगतीपथावर नेण्यासाठी किशाभाऊंची अखंड धडपड अखेरपर्यंत चालूच होती. मानाच्या तुळशीबाग गणपतीविसर्जन मिरवणुकीत वर्धिनीच्या पथकांबरोबर असलेले पारंपारिक वेषातील वडिलधारे किशाभाऊ... संक्रांतीच्या तिळगुळ सभारंभात भेटणारे 'कृ.ल.' अशी त्यांची अनेकविविध रूपे अनेकदा स्मृतिपटलावर येऊन जातात. काही वर्षांपूर्वी वर्धिनीच्या एका शिबिरात जाण्याचा योग आला. तेव्हा आस्थेने चौकशी करणारे अगत्यशील-मातृहृदयी किशाभाऊ मलाच काय सर्वांनाच भावले. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्वात प्रचंड आशावाद असायचा. अभिनव कल्पना-विधायकता-नवनिर्मिती आणि त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तितील कलागुणांना वाव देणारी गुणग्राहकता अशा अनेक गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व सामावलेले होते. सद्य:स्थितीचे भान, आधुनिक वास्तवतेला सहज स्वीकारण्याचे मनोधैर्य यासारखे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील पैलू प्रकर्षाने जाणवत. दूर्दम्य आकांक्षा, जीवनदृष्टी व्यापक करण्याचे सामर्थ्य सरांजवळ होते आणि सरांच्या कष्टांचे चीज करणारे त्यांचे शिष्योत्तम म्हणजे अनेकविध पदव्या अन् पुरस्कारप्राप्त असे अनेक हुशार विद्यार्थी व विद्यार्थिनी. आज त्यातील अनेकजण डॉक्टर, वकील, इंजिनीअर, पत्रकार, प्राध्यापक, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी झालेत. आणि वर्धिनीचे कार्य आज नेटाने पुढे नेत आहेत...

एकदा असेच वेळ ठरवून पहाटे साडेपाचलाच सरांना भेटायला गेलो होतो. त्यावेळी आम्ही सरांशी खूप मनमोकळ्या गप्पा मारल्या. त्याप्रसंगी शिक्षणक्षेत्र, समाजकारण, राजकारण, देशभक्ती आदी विषयांवरून तसेच स्वत:च्या विद्यार्थ्यांचा उज्ज्वल शैक्षणिक कारकीर्दीविषयीही आत्मीयतेने बोलले होते. मी मध्येच सरांना म्हटले ''सर, खरंच किती हुशार-कर्तृत्ववान आहेत हे विद्यार्थी...कौतुक करावे तेवढे थोडे!'' त्यावर सर लगेच म्हणाले ''पाटसकर, यालाच सोनं म्हणतात 'सोनंऽऽऽ!'' हे सांगताना त्यांना या गुणी शिष्यांचे किती कौतुक होते हे त्यांचा आनंदी चेहरा व देहबोलीच खूप काही सांगून गेली.

आपल्या शिष्योत्तमांना 'सोनं' मानणाऱ्या कृतिशील कर्मयोगी किशाभाऊंची थोरवी कळते ती यातूनच... वर्धिनीच्या विकासासाठी अखेरच्या काळातही, प्रकृतीची फारशी साथ नसतानाही विचलित झाले नाहीत... ते वर्धिनीचे पदाधिकारी, वर्धक आणि स्नेह्यांवरील विश्वासामुळे ! बीजाला गाडून घेतल्याशिवाय अंकुर फुटत नाही. या न्यायाने किशाभाऊंनी स्वत:ला वर्धिनीसाठी गाडून घेतले होते. यातूनच वर्धिनीच्या हितचिंतकांचे, विद्यार्थ्यांचे, सहकाऱ्यांचे उद्योजकांचेही त्यांना सहज सहकार्य मिळत गेले... अन् वर्धिनीही समृध्द होत गेली...अखेरपर्यंत नियमितपणे भल्यापहाटे ब्राह्ममुहूर्तावर ऊठून दिनचर्या सुरू करून दिवसभर काय? जन्मभरच 'वर्धिनीमय' झालेल्या, राजा धनराजगिरी हायस्कूलच्या या मुख्याध्यापकाने सेवानिवृत्तीनंतरही 'स्व'-रूपवर्धिनीसारखी राष्ट्रनिष्ठ आदर्श नागरिक घडविणारी संस्था निर्माण केली. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन....

## 'गाढव' म्हणवून घेण्यातला अभिमान

*कुठल्याही वयातील मुलांशी किशाभाऊंचा संवाद सहज होत असे दोस्ती पटकन् होत असे. कुणा लहान मुलाला भेटले की सरांच्या खिशातून डबी बाहेर निघायची आणि त्या लहानग्या मुलाच्या हातावर खडीसाखरेचे खडे पडताच त्याची कळी खुलायची आणि दोस्ती जमायची. कधी कुणाची 'काय गं रंगे तुझ नाव काय?' अशी चौकशी व्हायची तर जवळकीने ते कुणाला 'गाढवा' असेही संबोधायचे. पण हे गाढवा म्हणण्यातले प्रेम ज्यांना समजले होते ते विद्यार्थी हे 'गाढव' बिरुद अभिमानाने मिरवायचे. विलायतेत मोठ्या हुद्दावर काम करणारा त्यांचा एक विद्यार्थी त्यांना पत्र पाठवल्यावर खाली लिहायचा 'तुमचा मुन्ना (गाढव)'*

# भाग्य : मोठ्या सरांच्या सेवेचे

**– अशोक मुटकुळे**

मी ‘स्व’–रूपवर्धिनीच्या गाडीवर चालक म्हणून काम करतो. पटवर्धन सरांच्या शेवटच्या आजारपणात गाडीचे काम नसेल तेव्हा मी त्यांच्या घरी त्यांच्या सेवेला जात असे. माझ्या दृष्टीने हे माझे भाग्य होते.

मी आणि रामभाऊ त्यांची रोज आनंदानं सेवा करायचो. सरांना अस्वच्छता अजिबात चालत नसे. कितीही त्रास झाला तरी आंघोळ झालीच पाहिजे. त्यांना चालताना खूप त्रास व्हायचा. जेव्हा त्यांना आंघोळीला बाथरूमध्ये घेऊन जायचो तेव्हा त्यांचे हाल पाहून माझ्या डोळ्यात पाणी यायचे. ‘हे काय सरांच्या नशिबी आले!’ असे वाटायचे. एवढे असूनही सर मात्र आम्हाला आनंदच द्यायचे. दिवसभर गप्पा गोष्टी चालायच्या. खूप काही सांगत असत. अगदी आपुलकीने वागत असत. एकदा मला ते म्हणाले, ‘तुम्ही कॉफी किंवा चहा, जे काही हवं असेल ते ठेवत जा’. मी त्यांना म्हटलं, ‘तुम्ही कॉफी घेणार असाल तरच मी घेईन. नाहीतर नाही’. सरांच्या बरोबर मग कॉफी व्हायची. मी कॉफी केल्यावर एकदा सर स्वयंपाकाच्या ओट्यापाशी आले. कॉफी झालेली होती. सरांनी ओट्याकडे नीट निरखून पाहिले. ते मला म्हणाले, ‘कॉफी झाल्यावर, ओटा धुऊन पुसून किती स्वच्छ ठेवलात. मलाही अस्वच्छता मुळीच चालत नाही!’

सरांच्या आपुलकीनं वागण्याचा एक अनुभव विसरताच येणार नाही. सर हर्डीकर रुग्णालयात होते. घरी येताना त्यांच्या कमरेकरता पट्टा दिलेला होता. काही दिवसांनी त्यांनी मला विचारले, “काहो, तुमच्या घरी मालकिणीचा मणका दुखतो आहे ना?” मी ‘हो’ म्हटले. त्यावर सर मला म्हणाले ‘तुमच्या मालकिणीला मी आणलेल्या या पट्ट्याचा चांगला उपयोग होईल. तो तुम्ही घेऊन जा.’ सरांनी मला बोलू न देता त्यांच्याकरता दिलेला पट्टा माझ्या हातात दिला.

मला सरांची सेवा करायला मिळाली त्याचे खूप समाधान वाटते आहे. पण त्या बदल्यात आम्हाला सरांकडून जे मिळालं त्याच मोल खूप मोठं आहे.

# प्रेरणा, प्रोत्साहन आणि संस्कार

**– डॉ. सौ. रोहिणी दिघे (तेंडूलकर)**

- कधीही कल्पना न केलेलं असं अपयश मला बारावीच्या परीक्षेत मिळालं. सर्वांच्या आशा आकांक्षा यावेळी मी पूर्ण करू शकले नाही. यामुळे माझं मन खूप खात होतं. कोण काय म्हणेल याची भीती वाटत होती. सरांसमोर जाण्याचा कसाबसा धीर केला. आणि अगदी अनपेक्षित अशी प्रतिक्रिया त्यावेळी सरांनी दिली. **'मावळल्याने होतो का रे अंत भास्कराचा?' सरांचं हे एक वाक्य आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मला आजही सतत प्रेरणा देत आहे.**
- 'पत्र लिहिणे' यात सरांचा हातखंडा होता. वाढदिवस असो, देणगी दिल्याबद्दल पत्र असो, परीक्षेत यक्ष मिळाल्यासंबंधी पत्र असो किंवा सांत्वनपर पत्र असो, **कोणतीही घटना असली तरी तत्परतेने पत्र लिहिले गेलेच पाहिजे. याबद्दल सरांचा नेहमी आग्रह असायचा. त्यातही भाषासौंदर्य, शुद्धलेखन, सुंदर अक्षर असले पाहिजे याचा आग्रह जास्त असे.** मी काही दिवस पत्र लिहून देण्याचे काम करीत होते. एकदा श्री. जगन्नाथ वाणी यांना सरांनी पत्र लिहिले.दोन फुलस्केप पान पत्र होते. सरांनी सांगितले तसे पत्र मी एकही चूक न करता लिहिले. मात्र पत्र वाचून 'इथे आपण असं लिहिले तर अधिक चांगले होईल' असे म्हणून दोन तीन शब्दांकरिता पुन्हा ते पत्र लिहायला सांगितले. असे दोनदा झाले. तेव्हा मात्र पुन्हा पुन्हा लिहायचा खूप कंटाळा यायचा. पण आपलं काम अतिशय व्यवस्थितच व उत्तमच असले पाहिजे हा संस्कार त्यातून झाला.
- वर्धिनीत मुलींची शाखा सुरू होऊन दोन तीन वर्षे झाली होती. तेव्हा शाखेच्या सहली निघत असत पण सायकलवरून सहल हा नवीनच आग्रह आम्ही धरला होता. पण आम्हाला कोणीच परवानगी देत नव्हते. किंबहुना 'मुली काय जाताहेत सायकलवरून!' असे काही जण चिडवत होते. त्यामुळे इमारतीच्या खालील कट्ट्यावर आम्ही उदास होऊन बसलो होतो. सरांनी आम्हाला विचारल्यावर

आम्ही कारण सांगितले. तेव्हा मात्र सरांनी उत्साहाने ‘जा की मग सहलीला’ असे सांगितले व शंभर रूपयेही सहलीकरीता दिले. त्यावेळी आम्हाला झालेला आनंद अवर्णनीय होता.

- शाखेत कोणताही उपक्रम, कार्यक्रम झाला की आम्ही सरांना सांगायला जायचो. सर मनापासून कार्यक्रमाचे खूप कौतुक करायचे. मात्र सरांच्या नंतरच्या प्रश्नांची उत्तरे देणे काहीसे अवघड वाटायचं. **कार्यक्रमातून स्वत:ला काय मिळालं, वर्धिनीचा काय फायदा, तोटा झाला, आपल्याला स्वत:ला कार्यक्रमाबद्दल काय वाटलं? चांगली व वाईट बाजू कोणती? तेव्हा कधी कधी कंटाळा यायचा परंतु सिंहावलोकन करण्याची सवय यातून नकळतपणे लागून गेली.**
- वर्धिनीत सुरूवातीला आले तेव्हा बोलायची किंवा सर्वांमध्ये मिसळायची सवय नव्हती. स्वत:चा परिचय करून द्यायचा असला तरी भीती वाटायची. मात्र सर सुरूवातीलाच सांगायचे परिचय करताना स्पष्ट उच्चार, दोन शब्दात अंतर ठेवायचे. या सर्व गोष्टींचा उपयोग आजही होतो.

## मनकवडे किशाभाऊ

२००३ साली माझे लग्न झाले. त्याच वर्षी मी MPM (PG) च्या शेवटच्या वर्षाला होते. लग्नानंतर पाच महिन्यांनी माझी शेवटची परीक्षा होती. किशाभाऊंची माझी वरवरची ओळख होती. पण त्यांना माझ्या बद्दलची माहिती फार सविस्तर होती.

एकदा किशाभाऊंनी मला आणि विनेशला बोलावून घेतले. विनेशला सांगितले की, हिला परीक्षेसाठी माहेरी पाठव. तुझ्या घरचे वातावरण तिच्यासाठी नवीन आहे. घरी गेल्यावर तिचा अभ्यास छान होईल. मला क्षणभर काही सुचेना. मनात म्हटलं, सरांनी मानसशास्त्र विषयात पीएच.डी. केलीय का? माझ्या मनातलं कसं काय त्यांनी जाणून घेतलं. खरंच सरांमुळे परीक्षेत प्रथम श्रेणी मिळाली. जाता जाता सरांनी विनेशला सांगितले होते की, हिला वर्धिनीत घेऊन येत जा. सर तुम्ही दिलेले शब्द मी पाळत आहे.

**सौ. मेघा नडे–नगरे**

# सर्वांना सारखे वागवणारे 'सर'

**– राघप्पा गोविंद चौगुले**

मी मुबईला एका कंपनीमध्ये नोकरीला होतो. अचानक एके दिवशी मला सुनीताचा फोन आला की तू पुण्याला नोकरीला ये. इथे चांगली नोकरी आहे. मग मी पुण्याला आलो. पुण्यातील मला काहीच माहिती नव्हती व नोकरीविषयी सुद्धा काही माहिती नव्हती. मग सुनीता मला सरांच्या घरी घेऊन गेली. त्या दिवशी सरांनी मला कामाविषयी व 'स्व'-रूपवर्धिनीविषयी माहिती सांगितली. पण मला ते काय सांगत आहेत हे काहीच कळत नव्हते. मी ते सर्व ऐकून घेतले. लगेच दुसऱ्या दिवशी कामाला सुरुवात झाली. सर म्हणाले आता आपल्याला बाहेर जायचे आहे. तयारी कर. मला सांगितल्याप्रमाणे सर्व तयारी केली. पहिल्यांदा सरांनी कुठेतरी फोन केला. १० ते १५ मिनिटांनी एक गाडी आली. मग आम्ही दोघे व ड्रायव्हर अशी एकूण तीन माणसे. एका कुठल्यातरी बंगल्यापाशी गाडी थांबली. आम्ही उतरलो. सर आणि मी लिफ्टने वरती गेलो. सर तिथल्या एका ऑफीसच्या खोलीत गेले. मी बाहेर बसलो. सर आतमध्ये होते. अनेक लोकं येत जात होते. मला सगळे नवीन असल्याने काही सुचेना. थोड्या वेळाने सर बाहेर आले. त्यांच्याबरोबर बाहेर आलेल्या साहेबांना त्यांनी माझी ओळख करून दिली. 'हा मुलगा सुनीताचा आतेभाऊ आहे. हा मुलगा खूप सणकी आहे आणि आता माझ्याबरोबर कायम राहणार आहे. त्याचे नाव राघप्पा आहे. पण मला ते आवडत नाही म्हणून मी त्याचे बारसे घालून 'रामभाऊ' असे नाव ठेवले आहे'. हे वाक्य माझी अनेकांशी ओळख करून देताना मला ऐकायला मिळायचे.

सर नेहमी मला सांगायचे 'आज आबा येणार आहे. माझा हा मित्र नेहमी येत असतो, त्यांनासुद्धा माझ्याप्रमाणे कॉफी द्यायची, त्यांना बिन साखरेची कॉफी लागते.' उद्या कोणती कामे करायची हे त्यांचे आदल्या दिवशी ठरलेले असायचे. उद्या आपल्याला या ठिकाणी सकाळी लवकर जायचे आहे असे आदल्या दिवशी

सांगत. सकाळी लवकर उठून ध्यान धारणा, आंघोळ, नाष्टा, गोळ्या, औषधे, वाचन मग मिळाली तर दुपारी विश्रांती. विश्रांती झाली की ठरलेले असे की आबांना फोन करणे. 'केव्हा येणार आहात ? आज कोणाला बरोबर आणणार? कोणालातरी घेऊन या'. आबा आल्यानंतर चहा-कॉफी व गप्पा ठरलेल्या. कधी कधी 'आज आपण गंधर्वमध्ये कॉफी पिऊ' असे सुचवत. दिवस कसा जायचा ते काहीच समजत नसे. पहिल्यांदा काही दिवस असे वाटले की उगाच आपण येथे आलो पण थोड्याच दिवसांतच लक्षात आले की सरांनी मला घरच्या आठवणी येऊ दिल्या नाहीत. दररोज कुठेना कुठे बाहेर जायचे असे. तिथे ठरल्याप्रमाणे ओळख करून देत. माझ्याबद्दलची ठरलेली वाक्येही सांगायची . जेवण करताना व फळे खाताना कोणता पदार्थ आधी घ्यायचा, कोणता नंतर घ्यायचा याचे क्रम ठरलेले असायचे. उदा. दूध प्याल्यानंतर, फळे खाल्यानंतर पाणी प्यायचे नाही इ. सरांच्यामुळे कळले. त्यांच्यामुळे कामाचे वेळापत्रक करायची सवय मला लागली. त्यामुळे मी कुठलेही काम हे घड्याळाकडे पाहूनच करत असे. एकदा सरांना जेवण्यासाठी उशीर झाला. मी सरांना म्हणालो, 'सर ! मी तुम्हाला जेवण वाढून मी जेवण करुन येतो'. सर कामातच दंग होते. तरीही मी दोन तीनदा म्हणालो. मग सर जेवणासाठी बसले. नंतर पुन्हा एकदा न राहवून मी म्हणालो 'सर ! मी आता जेवण करुन येऊ का?' सर वैतागून म्हणाले, 'तू जेवण करुन आल्याशिवाय मी जेवण करणारच नाही.' म्हणून जेवणावरुन उठायला लागले. मी घाबरुन लगेच उठलो व बाहेर निघून गेलो. माझ्या मनात सारखे वाटू लागले की मी उगाच सरांना दुखावले, आल्यानंतर सर आपल्याला खूपच रागावणार असे वाटले पण मी आल्यानंतर लगेचच सरांनी विचारलं काय रामभाऊ कसे होते जेवण ? कळेना की सर एकदम इतके कसे शांत झाले ? **मग सवयीने कळले की सर रागवायचे पण लगेच शांत व्हायचे. चांगल्या गोष्टी सांगून समजूतही काढायचे.**

सरांना नेहमी गप्पा मारलेल्या आवडायच्या. विषय कोणताही असो; पण संपत असे वर्धिनीच्या विषयावर. सारखे काही ना काही 'स्व'-रूपवर्धिनीतील गोष्टी मला सांगायचे. मला म्हणायचे की, आता तुझी वर्धिनीतील युवकांची

ओळखही झाली आहे. त्यामुळे तरं तुला माझी आठवणही येणार नाही. तेथून तुला घरी यावेसेच वाटणार नाही. खरंच! सरांचे ते बोलणे खरेच ठरले. एकदा 'स्व'-रूपवर्धिनीत गेले की परत तेथून जावेसे वाटत नाही.

सरांचे पेन, पाकिटे, आले वडी हे सर्व साहित्य घेण्याची दुकाने ठरलेली असायची. दुसरीकडे कुठेच ते घेणार नाहीत. एकदा तांदूळ आणण्यासाठी ग्राहकपेठेत रिक्षाने मी त्यांच्याबरोबर गेलो होतो. जाताना मी सरांना एक प्रश्न केला की, 'आपल्याला घराजवळील चौकात त्याच ब्रँडचा तांदूळ मिळत असताना आपण तेवढ्यासाठी इतके लांब ग्राहकपेठेत का यायचे? त्यावर सर म्हणाले, 'ते आपल्या 'स्व'-रूपवर्धिनीतील परिवारातील आहेत. जर तिथेच सामान घेतले तर त्यांची भेटही घेऊन व अजून जास्त वर्धिनीशी जवळीक निर्माण होईल. त्यामुळेच आपण ज्या ठिकाणी नेहमी वस्तू घेतो त्याच ठिकाणी घ्याव्यात. त्यांच्याशी बोलून त्यांची वर्धिनीशी जवळीक साधावी असा माझा नेहमी हेतू असतो.'

सर आजारी असतानासुद्धा सारखे 'स्व'-रूपवर्धिनीविषयी बोलत असत. रुबी हॉलमध्ये असताना सर शेवटच्या काही दिवसात 'नरवणे सर!', असे म्हणून हाक मारत असत. तसेच त्यांच्या शाळेचे नाव घेऊन त्या शाळेविषयी काही तरी बोलत असत.

आजारी असले तरी कोणीही आले तरी त्यांना ते नेहमी म्हणत असत 'माफ करा हं ! मला आता उठता येत नाही.' म्हणून हात जोडून नमस्कार करत असत.

अशा थोर व्यक्तीची मला सेवा करायला मिळाली. हे माझे भाग्य मी समजतो. सरांचा माझ्यावर ऐवढा विश्वास बसला होता की माझे आईवडीलसुद्धा माझ्यावर जेवढा विश्वास ठेवणार नाहीत तेवढा विश्वास माझ्यावर सरांचा होता.

सरांनी कधीही मला वेगळं असे वाटूच दिले नाही. कोठेही जाताना मला बरोबर नेत असत. लहान मोठे ते कधीही समजत नसत. सर्वांना सारखे वागवत असत.

# नित्य प्रेरणादायी कार्यमग्नता

**– डॉ. शांताराम हरी केतकर**

''कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती'' ही ओळ नाना पालकर यांचे गीतात आहे. प्रापंचिक असूनदेखील नानांच्या या कल्पनेतील जीवन जगणाऱ्या ज्या मोजक्या व्यक्ती देशभरात माझ्या संबंधात आल्या, त्यांच्यामध्ये किशाभाऊंचा क्रमांक खूपच वरचा आहे. पहिल्या संघबंदीनंतर १९५० ते ५५ या काळात संघाच्या अनेक ज्येष्ठ स्वयंसेवकांनी संघाच्या कामाचे भावी काळात स्वरूप कसे असावे त्यासंबंधी आपपापले विचार खाजगीत, बैठकीतून आणि वृत्तपत्रात लेख लिहून व्यक्त केले होते. किशाभाऊंनी एक संघस्वयंसेवक म्हणून संघाजवळचे आपले संबंध उत्तम प्रकारे ठेवून आपल्या कल्पनेतील शिक्षणक्षेत्रातील काम 'स्व'-रूपवर्धिनीच्याद्वारा उभे केले. देशातील अनेक प्रांतातील कार्यकर्त्यांनी या कामाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून असे काम उभे करण्याचा चालू केलेला प्रयत्न मी पाहून आलो आहे.

संपूर्ण देशातील असंख्य संघ स्वयंसेवकांनी अपार कष्ट करून जी सेवा केंद्रे उभी केली, ती मी पाहून आलो. माझ्या निरीक्षणाप्रमाणे मी त्या कामांची चार गटात विभागणी केली. शहरी भागातील कामामध्ये किशाभाऊंनी उभे केलेले 'स्व'-रूपवर्धिनीचे काम 'अ' गटातील आहे. त्यांनी सुचविल्यावरून मी वर्धिनीतील कार्यकर्त्यांजवळ गप्पागोष्टींसाठी आलो होतो. त्यावेळी म्हणजे आठ वर्षांपूर्वी मी ते उपस्थित असताना अपेक्षा व्यक्त केली होती की किशाभाऊंची काम करण्याची क्षमता वयोमानाप्रमाणे कमी झाल्यावरदेखील हे काम आजच्यासारखेच चालू राहिले पाहिजे. त्यानंतर माझ्या पुण्यात जितक्या फेऱ्या झाल्या त्या प्रत्येक वेळी मी किशाभाऊंना प्रत्यक्ष भेटून किंवा फोनवरून वर्धिनीच्या प्रगतीची चौकशी करीत असे. प्रत्येक वेळी किशाभाऊ काहीतरी नवीन उपक्रम चालू केलेला सांगत असत. त्या वेळी माझ्या लक्षात येत असे की, माझी

अपेक्षा वस्तुस्थितीत उतरली आहे.

आज किशाभाऊ आपल्यात नाहीत. वर्धिनीची अनेकानेक कार्यकर्ती मंडळी किशाभाऊंनी लावलेले हे रोपटे आपल्या अखंड प्रयत्नांच्या आणि श्रमांच्या द्वारे आकाशाला भिडविण्याचा प्रयत्न करतील असा विश्वास मला आहे. समाज स्वास्थ्यासाठी अशा कामांची नितांत गरज आहे.

वर्धिनीच्या आपणा सर्व कार्यकर्त्यांना कै. किशाभाऊंची स्मृती सतत प्रेरणा देत राहो ही परमेश्वरचरणी प्रार्थना.

## आणि मुलगा शहाण्यासारखा वागू लागला...

*आपल्या मुलाची घरची कामं करण्यातील टाळाटाळ एका आईला मान्य नव्हती. आई वडील दोघेही कष्टाची कामे करणारे. आपल्या मुलाने घरची काही कामे केली पाहिजेत अशी त्यांची रास्त अपेक्षा. पण मुलगा दाद देत नव्हता. एका पालक सभेत आईने आपली व्यथा सांगितली. पटवर्धन सरांनी त्यांना सांगितले की मला एका आठवड्याचा वेळ द्या. तुमचा मुलगा तुम्हाला हवा तसा वागेल. मी त्याच्याशी बोलेन. दुसऱ्या दिवसापासून त्यांनी मुलाशी रोज न चुकता गप्पा मारायला सुरुवात केली. आपण आईवडिलांचे काम करणे ही किती महत्त्वाची गोष्ट आहे हे त्यांनी त्याला पटवून दिले. आठवडा व्हायच्या आतच आई सरांना भेटायला आली आणि म्हणाली सर तुमच्या बोलण्यात काही तरी जादू आहे. माझा मुलगा अगदी शहाण्यासारखा वागू लागलाय.*

# स्मृतिगंध

**– सुधाकर मुळे**

'स्व'– रूपवर्धिनीचा स्पर्श म्हणजे परीसस्पर्श होय. वर्धकांच्या आयुष्याचे सोने बनविणारा हा स्पर्श. हा असा परीस शोधण्याची कल्पना ही तर बऱ्याच कालावधीपासून अनेकांच्या मनात होती. समाजधुरीणांनीही ती शोधण्याचा प्रयत्न केला होता. पुणे शहराच्या पश्चिम भागाच्या तुलनेत पूर्व भागामध्ये मात्र असा प्रयत्न खूप कमी प्रमाणात झाला होता.

स्वर्गीय किशाभाऊंचा पिंड हा स्वयंसेवकाचा. मी अनेकवेळा अनुभवले आहे की, समाजातील उपेक्षितांबद्दलची कणव त्यांच्या मनात अत्यंत तीव्रतेने होती. उपेक्षित बांधवाचे दु:ख पाहून त्यांच्या डोळ्यात पाणी न आले तरच नवल!

मी १९७३ मध्ये बी. कॉम. झाल्यानंतर लगेचच पुण्यात आलो. पुण्यात आल्यावर थोड्याच दिवसात विवेकानंद केंद्र, पुणे शाखा यांच्याशी माझा संबंध आला. केंद्राच्या कामातूनच वर्धिनीच्या कामाचा परिचय झाला आणि मी काम करायला सुरुवात केली.

**'संपर्क हा स्वरूपवर्धिनीचा आत्मा आहे'. हे किशाभाऊंचे आवडते वाक्य. रोज, वर्धिनीत अनुपस्थित असलेल्या वर्धकांच्या घरी जाऊन अडचणी लक्षात घेणे, त्याचे निवेदन किशाभाऊंजवळ करणे, वर्धकांचे लक्षात आलेले गुण त्यांच्याजवळ सांगणे, याबाबत किशाभाऊ आग्रही असत.** गाडीतळ वस्तीमधील एक प्रसंग. 'मारुती' व 'दत्ता' हे दोन वर्धक वर्धिनीत अतिशय नियमित येत असत. यांच्यापैकी 'दत्ता' एक दिवस वर्धिनीत आला नव्हता, म्हणून 'मारुती' ला विचारले तर दत्ताचा वाढदिवस असल्याचे समजले. त्याचे अभिनंदन करण्यासाठी गटनायक, काही कार्यकर्ते व वर्धक यांना घेऊन त्याच्या घरी पोहोचलो. त्याच्या आईच्या चेहऱ्यावर अवर्णनीय आनंद

उमटला होता. 'लिफ्टमन्' म्हणून काम करणाऱ्या त्याच्या वडिलांना आपल्या मुलाचे अभिनंदन करण्यासाठी वर्धिनीतून आलेल्या शिक्षक, वर्धकांचे आश्चर्य वाटत होते व आनंदही वाटत होता. किशाभाऊंच्या कानावर हा सर्व प्रसंग घातला. आपल्या कामाची दिशा कशी योग्य आहे हेच जणू त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव सांगत होते.

* वर्धिनीच्या शाखा भरवणे व सोडणे ही दोन्ही कामे वर्धकांच्या मदतीनेच सुरूवातीपासून केली जात होती. त्यानुसार एका वर्धकाकडे वर्धिनी भरविणे व सोडणे हे काम दिलेले होते. किशाभाऊ प्रार्थनेपूर्वी मैदानावर रोज संस्कारक्षम बोलणे करीत असत. त्यानंतर वर्धकांची चौकशी होत असे. 'रात्री ज्यांनी दात घासले नाहीत, त्यांनी हात वर करा', 'वर्धिनीतून घरी गेल्यावर स्वच्छ हातपाय धुऊन देवाला व आई वडिलांना नमस्कार कोणी केला नाही त्यांनी हात वर करा अशी चौकशी करून त्या त्या मुलांशी सर बोलायचे.

पटवर्धनसर दररोज प्रार्थनेपूर्वी संस्कारक्षम विचार, माहिती वर्धकांना सांगत असत. दर शनिवारी, रविवारी वर्धकांना नवनवीन गोष्टींचा खजिना प्राप्त होत असे. कधी क्रांतिकारकांच्या कथा, कधी अनुभवकथन तर कधी मुलाखती, मुक्त प्रश्नोत्तरे असे त्यांचे स्वरूप असे. एके दिवशी वर्धिनीमध्ये दैनिक सकाळचे संपादक श्री. श्री. ग. मुणगेकर यांना सरांनी वर्धकांशी बोलण्यासाठी आमंत्रित केले होते. वर्धकांचा त्यांच्याशी संवाद घडवून आणला.

* एका वर्धकाच्या घरी गेलो, वर्धकाची चौकशी केली. मुलगा नमस्कार करतो की नाही म्हणून वडिलांना विचारले. त्यांची मान शरमेने खाली गेली. 'अहो सर! तो रोज पाया पडतो, पण मलाच लाज वाटते. त्याने माझ्या पाया पडावे अशा अवस्थेत मीच नसतो'. त्या वर्धकाच्या पाया पडण्याने वडिलांचे मद्यप्राशन बंद झाल्याचे पुढे या पालकांनी वर्धिनीच्या पालकसभेत किशाभाऊंच्या समोर अनुभव निवेदन करताना सांगितले.

* माणूस जोडणे हा तर किशाभाऊंचा आवडता छंद होता. त्यासाठी ते संधी शोधत असत. वर्धिनीचा गाडा चालवण्यासाठी किशाभाऊ प्रचंड फिरत

असत. पुणे–मुंबईच काय, अमेरिका, इंग्लड असा सर्व दूरपर्यंत प्रवास करून त्यांनी माणसे जोडली. नंतर अशा माणसांकडील धन हे सहजपणे वर्धिनीकडे येत असे. पण त्यांच्या धनापेक्षाही किशाभाऊंना तो माणूस अधिक मोलाचा वाटे.

* वाढदिवसाचे नेमके दिवशी अभिनंदन करून अन्य वर्धकांबरोबर ते समाजातील अन्य व्यक्तींचेही वर्धिनीशी नाते जोडीत असत. मला या संदर्भातील एक उदाहरण माहिती आहे. एके दिवशी सकाळी सहा वाजताच किशाभाऊ एका मान्यवरांच्या बंगल्यासमोर जाऊन उभे राहिले. दारवानाने चौकशी केली. सरांनी त्यांना कार्ड दिले व तुमच्या मालकांची भेट घ्यायची आहे असे सांगितले. आत गेल्यावर किशाभाऊ एक गुलाब पुष्प व शुभेच्छा पत्र घेऊन त्यांना भेटले. त्यांचे अभीष्टचिंतन केले. हे मान्यवर त्या दिवसापासून 'स्व'–रूपवर्धिनीचे कायमचे आश्रयदाते झाले.

* **कार्यकर्त्यांवरील गाढ विश्वास हे किशाभाऊंचे वैशिष्ट्य** होते. संध्याकाळी शाखेच्या वेळात आम्ही जर शाखेवर नसलो तर किशाभाऊ विश्वासाने म्हणत, 'अरे तो नक्की खूपच आजारी असला पाहिजे'. माझ्याच बाबतीतील एका प्रसंगातून त्यांच्या या स्वभाववैशिष्ट्याचे मला दर्शन घडले.

मी पर्वतीपायथा येथे चुलत भावाच्या ब्लॉकवर रहात होतो. एक दिवस मला फणफणून ताप आला व मला अंथरूणावरून उठताच येईना. स्वाभाविकच वर्धिनीत जाणे झाले नाही, फोनही करता आला नाही. रात्री ९.३० वाजता एक टपोरे डाळिंबं व मोसंबं घेऊन सर चार जिने चढून माझ्या चौकशीसाठी आले. माझ्या सर्व भावडांना या गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटले.

* 'सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार' हे सूत्रसुद्धा त्यांनी नुसतेच सांगून नव्हे तर प्रत्यक्ष तसे आचरण करून वर्धकांवर, कार्यकर्त्यांवर ठसविले होते.

एके दिवशी पटवर्धन सरांच्या स्कूटरला अपघात होऊन त्यांना पायाला जखम झाली. वर्धिनीत मुले वाट पाहत असतील म्हणून सर दवाखान्यात न जाता तसेच वर्धिनीत आले. वर्धिनीचे सर्व कामकाज पूर्ण झाल्यावर रात्री घरी जाताना सर त्यांचे मित्र श्री. संचेती यांच्या हॉस्पिटलमध्ये गेले. तेथे ड्रेसिंग करून घेतले

व रात्री उशिरा घरी पोहोचले.

या सर्व गोष्टी वर्धकांच्या लक्षात येत होत्या आणि नकळत तसे संस्कार होत होते. हे संस्कार किती पक्के होतात याचे प्रत्यंतर आले. एकदा उन्हाळी शिबिर लोणावळा येथील 'बालग्राम'मध्ये होते. या शिबिरात अनेक अडचणी आल्या. परंतु सर्वांनी ते अतिशय आनंदात पूर्ण केले, अडचणींवर मात केली. या शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रमात 'जाळ्यातील उड्यांचे' चित्तथरारक प्रात्यक्षिक होते. निवासाच्या खोल्यांमध्ये या उड्यांसाठी उपयोगात आणावयाच्या लोखंडी कड्या ठेवल्या होत्या. या कड्यांच्या भोवती गुंडाळलेले आवरण योग्य पेटते किंवा नाही हे बघण्यासाठी एका वर्धकास मैदानावरून पाठविले होते. वाटेतच या वर्धकाच्या पायामध्ये काच गेली. व पायातून रक्त येऊ लागले. पायातून रक्त येत असतानासुद्धा या वर्धकाने प्रथम लोखंडी कड्या योग्य रीतीने पेटतात किंवा नाही हे पाहिले. आणि तसाच तो शिक्षकांकडे परत आला. शिक्षकांनी त्याचा पाय पाहिला. पायाला औषध लावून बँडेज केले. त्यावेळी शिक्षक त्याला म्हणाले की, 'अरे! तू प्रथम जखमेवर उपाय करून घ्यायला हवा होतास,' छोट्या वर्धकाचे उत्तर अगदी समर्पक होते. 'माझे काम पूर्ण झाल्याशिवाय आणि तसा निरोप दिल्याशिवाय मी पायावर उपाय करत बसणे योग्य नाही'. सरांचा आदर्श वर्धकांनी अशा रीतीने प्रत्यक्ष आचरणात आणला होता. वर्धकांमध्ये सद्‌गुण कसे रुजवले जातात याचे हे एक उदाहरण:

वर्धकांचे व्यक्तिमत्त्व सर्वांगांनी विकसित व्हावे याकरिता सर किती परिश्रम घेत, कसा व्यवहार करीत हेच या उदाहरणांवरून ध्यानात येतं.

## देहाकडून देवाकडे जाताना...

देहाकडून देवाकडे जाताना वाटेत देश लागतो अशी संभाजीनगरमधील 'आराधना' प्रकल्पाची संकल्पना आहे. ही संकल्पना किशाभाऊ पटवर्धन सरांनी वर्धिनीच्या रूपाने वास्तवात आणली. वर्धिनीच्या कामाच्या निमित्ताने त्यांचा जो सहवास मिळाला तो आमच्या सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

**अनिल काळे**

# माणूस घडवणाऱ्या कार्यशाळेचा निर्माता

**– श्रीकांत मोहन यादव**

स्वर्गीय किशाभाऊंच्या आठवणी लिहून हव्यात असा फोन आला. मी काय लिहू शकतो असा विचार करू लागलो.

कॉलेजमध्ये असताना Intigration, Derivation हा गणिती भाग शिकलो होतो. पटवर्धन सरांबद्दल लिहायचे तर, आपल्याच व्यक्तिमत्वाचे Derivation करून नेमके काय 'सोने' झाले, असे सिंहावलोकन करावे लागेल. खरे तर किशाभाऊंनी 'प्रॅक्टिकल्स' घेऊन मुलांना घडवले. त्याची थिअरी कशी काय मांडणार?

विद्यार्थीदशेत, 'कृलपं'चा प्रभाव किंवा प्रशिक्षण मला कसे झाले ह्याचे गणित मांडणे अवघड आहे. पण छोट्या छोट्या गोष्टीने संपूर्ण व्यक्तिमत्त्व बदलणे, घडवणे सहज शक्य असते हा प्रयोग तरी सिद्ध झाला. मला वाटते वर्धिनीच्या कार्यपद्धतीतच ही सूत्रे सापडतील १) वर्धिनीची त्रिसूत्री २) संपर्क ३) सातत्य.

मला आठवते की सर नेहमी म्हणायचे आमचा वर्धक फक्त दोन गोष्टी असेल तर शाखेवर नसेल. एक, तो जेव्हा बाहेरगावी असेल आणि दुसरे आजारी असेल तेव्हा. ३६५ दिवसांची शाळेनंतरची शाळा म्हणजे 'स्व'–रूपवर्धिनी अशी वर्धिनीची ओळख किशाभाऊ सर्वांना करून देत असत. एवढ्या विश्वासाने एक मोठी व्यक्ती आपल्याबद्दल बोलत असेल तर शक्यतो कोणी शाखा बुडवायचे नाही. तरी मला आठवते की एखाद्या दिवशी मी शाखेवर गेलो नाही तर लगेच एखादा वर्धक किंवा सर माझ्या घरी यायचे. **संपर्काची रचनासुद्धा इतकी घट्ट की माणूस घट्ट विणलाच गेला पाहिजे.**

सरांची दुसऱ्यांदा जवळून ओळख झाली ती 'युवक कार्यकर्ता' झालो तेव्हा. त्यांना व्याख्यानाला, भाषणाला उभे राहताना पहात रहावे. त्यांना किती सांगू आणि किती नको असे होऊन जायचे आणि नेहमी वेळच कमी पडायचा. त्रास देणाऱ्या

माणसांचा उल्लेख ते 'एक सद्‌गृहस्थ होते, नाव सांगत नाही' असा करीत. त्यांनी कसा त्रास दिला हे ऐकल्यावर मनात प्रश्न यायचा मग ती व्यक्ती 'सद्‌गृहस्थ' कशी?

'स्व'-रूपवर्धिनी सुरू करण्याची प्रेरणा कशी मिळाली हे त्यांच्या तोंडून ऐकताना मी गुंगून जात होतो. सरांनी 'राष्ट्र मंदिराच्या या उभारणीत कार्यकर्त्यांच्या रूपाने एक एक वीट करुन या मंदिराच्या भिंती घडविण्याचे सरांचे काम चालू असायचेच. **कार्यकर्ता कसा हवा? * तल्लख बुद्धी * समर्थ खांदे * विशाल मन * स्वच्छ हात * समाजाबद्दल प्रचंड तळमळ यांनी युक्त.** 'तळमळ' हा शब्द जेव्हा ते उच्चारायचे तेव्हा ती तळमळ आम्हाला त्यांच्या चेहऱ्यावरही दिसायची. कृतीतून दिसलीच पण केवळ नेमक्या शब्दाने भावना पोहचवणारे ते खऱ्याखुऱ्या तळमळीचे उत्कृष्ट समाजशिल्पी वाटायचे.

वर्धकाला कार्यकर्ता म्हणून तयार करण्याबरोबरच 'माणूस' म्हणून तयार करण्यावर त्यांचा भर असे. एक प्रसंग मला अजूनही आठवतो. सरांनी मला आणि विवेक बने यांना वर्धिनीचे एक काम सांगितलेले होते. त्याबद्दल सांगताना सरांना मी म्हणालो, 'मी आणि माझ्या बरोबर बने पण होता.' सर मला म्हणाले, 'असे सांगण्याऐवजी बने आणि त्याच्याबरोबर मी होतो असे म्हण'. जे अनेक वाक्यातून समजणार नाही असे एक सूत्र सरांच्या एका वाक्यातून समजले. 'कार्यकर्त्याला अहं नसावा, मीपणा नसावा.'

सर आम्हाला हाताने पत्र लिहायला सांगायचे. त्यावेळी कळायचे की सरांकडे नेमक्या माणसांसाठी नेमके शब्द आहेत. त्यांनी लिहिलेल्या पत्रातील एक वाक्य कायम लक्षात राहील असे आहे, 'लोभ तर आहेच आहे, वृद्‌धीची अपेक्षा आणि आवश्यकताही आहे'. 'आभार' शब्दापेक्षा 'कृतज्ञता' हा शब्द वापरुन त्यांनी शब्दांनी माणसे जोडली. गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निक मध्ये शिकत असताना, सरांचे घर कॉलेजच्या मागेच असल्याने सरांकडे जायला मिळायचे. घरातले सर जरा वेगळे असायचे. त्यांच्या घरातील एक गोष्ट नेमकी लक्षात यायची ती म्हणजे स्वच्छता, व्यवस्थितपणा. त्यांच्या टेपरेकॉर्डरलासुद्धा एक

ॲक्रीलिकचा/प्लास्टीकचा बॉक्स होता. त्याला हात लावण्याची ठराविकच लोकांना परवानगी असायची. त्यातील मी एक होतो. सरांना कोणतीही कॅसेट रेकॉर्ड करायची असल्यास ते काम माझ्याकडेच यायचे. घर कसं असावं ह्याचं एक उत्तम उदाहरण म्हणजे सरांचे घर होतं. सरांकडे गेल्यावर सरांच्या किंवा बाईंच्या हातची कॉफी आणि चितळेंच्या कडबोळ्या किंवा चकल्या मिळायच्या. सर व्याख्यानात नेहमी घराबद्दल बोलताना म्हणत 'घर कसं आहे हे त्या घराच्या स्वच्छता गृहावरुन ठरवावं'.

सरांचं आणि आमचं 'कार्यकर्ता' झाल्यावर नातंच बदललं. सर आमचे मित्र कधी झाले, सखा कधी झाले हे कळलंच नाही. 'त्वमेव माता, पिता त्वमेव' चा अर्थ आता मला उलगडतो आहे. शिकवण्याचा कोणताही आव न आणता, संपर्कातून, अनुभवातून सहजपणे आयुष्यातल्या मोठ्या गोष्टी सरांनी शिकवल्या. त्यांनी सांगितलेले एक एक काम हे म्हणजे एक प्रात्यक्षिकच असे. त्यामध्ये सकाळी डेक्कन क्वीनमध्ये अहवाल/पत्रे नेऊन देणे असो की हितचिंतकापर्यंत 'अहवाल' आणि 'वर्धिनी' पोहचवणे असो. सरांचे 'पत्ता' सांगणे हे तर एक कोडेच असे. आपला कार्यकर्ता कोणत्या पट्टीचा होतोय हे तपासण्याचा हा एक प्रयोग असे. त्यांनी सांगितलेला पत्ता हा त्यांनी दिलेल्या पत्त्याच्या साधारण अर्धा कि.मी. फरकाने अयायचा. मग आपण विचारत विचारत त्या माणसापर्यंत पोहचायचं आणि फक्त पोस्टमनचे काम करायचे नाही तर वर्धिनीबद्दल त्या माणसाला सांगायचे. हेही मार्केटिंगचे प्रात्यक्षिकच असावे असे मला आता वाटते. सरांनी आम्हा वर्धकांसाठी खूप मेहनत घेतली, एक आदर्श घालून दिला. त्यांची बरीच व्याख्याने, गप्पा या अजून लक्षात आहेत. त्यातील काही वाक्ये आपले व्यक्तिमत्त्व घडवण्यात नक्कीच मदत करतात. त्यातले एक वाक्य 'आज वेळ पैशासारखा खर्च करा. उद्या नक्कीच वेळेचा पैसा होईल' अशा वाक्यातून सरांचा वेळेबाबतचा काटेकोरपण नक्कीच जाणवायचा.

त्यांनी कार्यकर्त्यांवर उदंड प्रेम केले. एकदा सरांचे आणि आम्हा काही मित्रांचे काही कारणावरुन बिनसले. आम्ही तरुण होतो, आम्ही शाखेत फक्त

प्रार्थनेला यायचो. प्रार्थना संपताच निघून जायचो. त्यावेळी सरच आमच्याकडे आले आणि म्हणाले, **'ज्याला प्रेम करायचा अधिकार आहे, त्याला रागावण्याचाही नक्कीच अधिकार आहे.'** पुढे खड्डा आहे हे मी नक्कीच सांगणार, आता खड्डा सोडून पुढे जायचे का खड्ड्यात पडायचे हे तुम्ही ठरवा. एवढं बोलून पुढे म्हणाले की 'माझं काही चुकलं असेल तर मला नक्की सांग' हे असं म्हटल्यांवर मला 'मी केवढासा आहे' हे कळले. मला कुठे जायचेय ते सोडून मी काय करतोय असा प्रश्न पडला, पण नावातचं 'कृष्णाजी' असलेला माणूस माझ्यासारख्या भरकटलेल्या तरुण 'अर्जुनांना' नक्कीच मार्ग दाखविणारच आणि एवढ्यावरच न थांबता **'अर्जुनच' 'कृष्ण' होऊन अशा अनेक वाट चुकलेल्या अर्जुनांना मार्गदर्शक कसा होऊ शकेल यावरच किशाभाऊंचा भर असे.**

सरांचे वय निसर्गनियमानेच फक्त वाढत होते. त्यांचा उत्साह, प्रत्येक कामात रस घ्यायची वृत्ती ही आम्हा तरुणांना लाजवेल अशी होती. संस्कारभारतीच्या माध्यमातून '२२ जून १८९७ एक चैतन्य स्मरण' हे महानाट्य आम्ही १०० वर्षांनी त्याच वेळेस, त्याच ठिकाणी केले. हे करण्यासाठी आम्ही काय काय केले, कसे केले हे आपल्या युवकांना समजले पाहिजे असे सरांना वाटले म्हणून संस्कार भारतीच्या सर्व कार्यकर्त्यांना घेऊन वर्धिनीत आलो होतो. सरांच्या भीतीमुळे मी 'नाट्य' ह्या क्षेत्राच्या भानगडीत फारसा पडत नव्हतो. पण संस्कार भारतीच्या माध्यमाने आम्ही चाफेकरांची, सावरकरांची देशभक्तीची प्रेरणा नाट्यरुपाने मांडून सरांकडून कौतुकाची शाबासकीही घेतली. पण मी सरांचाच विद्यार्थी असल्याने हे कार्य माझ्या एकट्याचे नाही 'पूर्ण टीमचे' आहे असेच सांगितले.

रविवारी दुपारी चार वाजता युवकांची बैठक असायची. नंतर पाच-साडेपाचला बैठक संपल्यावर सरांकडून कॉफी असायची. तीही एक बैठकच असायची, पण अनौपचारिक. या बैठकीत गप्पा-टप्पा, विनोद अशी रेलचेल असायची. **सरांचा प्रचंड लोकसंग्रह. गाडीवाल्यांपासून गाडी ओढणाऱ्यांपर्यंत सरांची मैत्री.** मग त्यांच्या अनुभवाच्या पोतडीतून एक-एक किस्से बाहेर यायचे. गरमागरम अर्ध्या कॉफीच्या कपाबरोबर असे खुसखुशीत

किस्से. जाम मजा यायची पण मला वाटते की तेही आमचे एक प्रकारचे प्रशिक्षण असावे. अशा गप्पांमधून कार्यकर्त्यांच्या, सर्वांसमोर न सांगता येणाऱ्या, अडचणी आपोआप सरांना कळायच्या. नंतर त्यावरती उत्तरही मिळायचे. कृतीही व्हायची आणि त्याचा पाठपुरावाही. मला नेहमी आश्चर्य वाटायचे की या माणसाला एवढ्या लोकांच्या एवढ्या बारिक सारिक गोष्टी कशा माहिती? आणि कळल्या तरी त्यांच्या लक्षात कशा ? ह्याचे उत्तर मला वाटते 'संपर्क' ह्या शास्त्राला द्यावे लागेल. कारण 'संपर्क' करणे म्हणजे पोस्टमन सारखे उंबऱ्यापर्यंत न करता तो थेट स्वयंपाक घरापर्यंत हवा हे समजले.

सर शाखेवर आले की एक मोठी शिट्टी व्हायची. सर यायचे, वंदन व्हायचे तोपर्यंत संपूर्ण शाखा स्तब्ध सावधानमध्ये उभी असायची. २९ जुलै, २००४ रोजी सरांचे दु:खद निधन झाले. सर आम्हाला सोडून गेले. 'सर जाताना' मात्र कोणतीही शिट्टी वाजली नाही तरी सगळे स्तब्ध उभे होते. सरांनी उभे केलेले कार्य अव्याहतपणे चालू राहील अशीच उपाय योजना सरांनीच, स्वत:कडे काहीही न ठेवता केली आहे. हे कार्य साधेसुधे नाही. हा एका परिसाने दुसरा परीस निर्माण करण्याचा प्रयोग आहे. 'स्व'-रूपवर्धिनीचा दुसरा उल्लेख सरांच्या भाषेतच करायचा झाल्यास हे एक "Man Making Machine' आहे.

## योगसाधना

आपल्या आयुष्यात योगासने, प्राणायाम यांचे किती महत्त्वाचे स्थान आहे याविषयी एक दिवस विवेकानंद शाखेत पटवर्धन सरांचे व्याख्यान झाले. त्यात त्यांनी योगामुळे होणारे फायदे सांगितले. बोलताना व्यवहारातील उदाहरणे देऊन बोलणे हे सरांचे वैशिष्ट्य असायचे. या व्याख्यानात सुद्धा बोलताना ते म्हणाले की, 'मूल जन्माला आल्यानंतर साधारण पहिल्या एक वर्षांत ते मूल वेगवेगळी योगासने करीत असते व ते त्याच्या वाढीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते'. या उदाहरणाचे मला थोडे आश्चर्य वाटले होते, पण मला जेव्हा मुलगा झाला तेव्हा त्याची वाढ अनुभवताना वेळोवेळी सरांच्या त्या व्याख्यानाची आठवण यायची.

**दत्ता शेडगे**

# हवाहवासा वाटणारा सहवास

**– सतीश श्रीकृष्ण चितळे**

तसा किशाभाऊंचा संबध माझ्या वडिलांशी सन १९४५ पासूनचा होता. माझे वडील पूर्वी माडीवाले कॉलनीमध्ये 'सोमण' यांच्या बंगल्यात राहत होते व तेथेच शेजारी पटवर्धन कुटुंब राहत असे. किशाभाऊंना आम्ही 'किसनमामा' म्हणत असू.

माडीवाले कॉलनीतली जागा कमी पडू लागली त्यामुळे सगळे पटवर्धनबंधू वेगळ्यावेगळ्या ठिकाणी राहायला गेले. आम्हीही नंतर स्वारगेट येथे राहायला गेलो. मी त्यावेळी इयत्ता दुसरी–तिसरीत असेन. आम्ही जरी वेगवेगळ्या ठिकाणी राहायला गेलो तरी आमचे एकमेकांकडे जाणे येणे असे. त्यामुळे एक प्रकारचे नातेसंबंधच तयार झाले. दरवर्षी गणपतीत जेवणाच्या निमित्ताने गाठ पडत असे. जेवणाच्या पंगतीतही किशाभाऊंचे हास्य–विनोद चालत असत. त्यामुळे जेवणाला एक वेगळाच रंग यायचा.

ते अनेक विनोदी किस्से सांगत. त्यातील एक मला आठवतो. एक गृहस्थ त्यांच्या मुलाच्या लग्नाची पत्रिका घेऊन अंत्यविधी करणाऱ्या गुरुजींच्या घरी जातो. त्यांच्या दाराची बेल वाजवतात. दार उघडले जाते. गुरुजी आतल्या बाजूला जेवायला बसलेले असतात. आता गुरुंजीकडे येणारी माणसे कुठल्या कामासाठी येतात ते सर्वांना माहित आहेच... त्या सवयीप्रमाणे ते आतून आवाज देतात... लाकडे रचून घ्या तो पर्यंत मी येतोच. ह्या किश्श्याला आम्ही प्रचंड हसलो होतो.

किशाभाऊंच्या शेवटच्या चार ते पाच वर्षात माझे त्यांच्याकडे जाणे खूपच वाढले होते. ते आवर्जून फोन करायचे व गप्पा मारायला बोलवायचे. किशाभाऊंना गप्पा मारण्यासाठी वयाचे बंधन नव्हते. ते कुठल्याही वयातील

व्यक्तीशी सहज संवाद साधत. कुशाग्र बुद्धी, हजरजबाबी, अंगभूत विनोदीवृत्ती यामुळे ते सर्वांचे होऊन जायचे. गप्पा मारायला बोलवायचे त्यावेळी त्यांची एक अट असायची ती म्हणजे कॉफी प्यायला ये व थोडा वेळ काढून ये. किशाभाऊ स्वत: उत्तम कॉफी तयार करीत. संध्याकाळची सहाची वेळ असेल तर श्री. आबा अभ्यंकरही कॉफी प्यायला असायचे. त्यांचे आणखी एक माझ्याकडे काम असायचे. ते म्हणजे माझ्याकडून पत्र लिहून घ्यायचे. कारण वयपरत्वे त्याचा हात थरथरत असल्यामुळे त्यांना लिहिणे शक्य नव्हते व त्यामुळे अक्षर नीट येत नसे व त्यांची समजूत अशी होती की माझे अक्षर चांगले आहे व त्यामुळे ते लिहून घेत.

मला एक अजून खंत वाटते ती म्हणजे त्यांना माझ्याकडून त्यांच्या जुन्या पंचवीस–तीस वर्षापूर्वीच्या दैनदिंनीतील काही मजकूर पुर्नलिखित करून घ्यायचा होता. पण मी त्यासाठी रोजचा वेळ त्यांना देऊ शकलो नाही व ते काम अर्धवटच राहिले.

त्यांच्या परिचित व्यक्तीच्या कुटुंबात सुखाचा अथवा दुखा:चा प्रसंग आला तर ते वेळ न घालवता दूरभाषद्वारे नाहीतर पत्राद्वारे त्यांच्याशी संपर्क साधायचे. अशा काही प्रसंगांची पत्रे माझ्याकडून त्यांनी लिहून घेतली आहेत, त्यांचे म्हणणे असे की त्या प्रसंगाला व वेळेला महत्त्व आहे. अनेक व्यक्तींचे दूरभाष नंबर त्यांना पाठ असायचे.

सोलापूर मध्ये एका वैज्ञानिकाने युवकांसमोर भाषण केले होते. त्यात त्यांनी भारत स्वयंपूर्ण होण्यासाठी युवकांनी काय केले पाहिजे व स्वदेशी तंत्रज्ञान वापरून आपण जगात कसे श्रेष्ठ होऊ शकू त्याची काही उदाहरणे दिली. तसेच डॉ. अब्दुल कलाम, श्री. अनिल काकोडकर ह्यांचे व्यक्तिमत्त्व, त्याचे वर्णन त्यात होते. अशी एक कॅसेट किशाभाऊंना ऐकायला मिळाली. ती ऐकून किशाभाऊंनी स्वत:च्या खर्चाने त्याच्या असंख्य प्रती करून 'हे एक राष्ट्रीय कार्य आहे' असे समजून त्या वाटल्या.

# दत्तजयंती ! नव्हे कृष्णजयंती !!

आदरणीय सर,

आज दत्तजयंती. दत्ताचा जन्म आजच्या दिवशी झाला म्हणून दत्तजयंती साजरी केली जाते. पण माझ्या दृष्टीने ही कृष्णजयंती आहे. कथेतील किंवा अध्यात्मातील दत्तापेक्षा मला वास्तवातील कृष्ण फार महत्त्वाचा वाटतो. म्हणून मला आजचा दिवस हा कृष्णाची जयंती साजरी करण्याचा वाटतो आणि ते कृष्ण म्हणजे कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन.

सर, सर्वांसाठी तुम्ही वर्धिनीचे संस्थापक असाल पण माझ्यासाठी तुम्ही माझ्या जीवनाचे शिल्पकार आहात. बऱ्याच वाईट सवयी, अनेक न्यूनगंड मनात घेऊन काही वर्षापूर्वी मी तुमच्या सहवासात आलो. आणि आज आयुष्यात सामोरे येणाऱ्या हजारो अडचणींना धुळीला चारण्यास मी समर्थ बनलो आहे. **'स्वार्थी धोरणांनी स्वत:चे पोट भरावे यासाठी नोकरी असावी व त्यासाठी स्पर्धापरीक्षा, अशा स्पष्ट व स्वार्थी हेतूने मी 'स्व'-रूपवर्धिनीत आलो होतो; पण त्यानंतर वर्धिनीत व वैयक्तिक तुमच्या सहवासात मला समाजाची जाणीव झाली.** आपलं जीवन म्हणजे समाजाचं एक देणं आहे व ते फेडण्यासाठी आपल्याला आयुष्यभर झटायचं आहे हे मी पहिल्यांदा आपल्या सहवासातच शिकलो. स्वच्छतेचे, शिस्तीचे जे धडे तुम्ही मला आपल्या वागण्यातून दिले ते म्हणजे माझ्यासाठी आयुष्यभर पुरणारी शिदोरी वाटते.

त्याचबरोबर सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आर्थिक बाजू. दीड वर्षांपर्यंत मी तुमच्या घरी विनामूल्य राहत होतो. त्यामुळे माझ्या आर्थिक बाजूला तुमच्यामुळे फार मोठी मदत झाली आहे हे मी या ठिकाणी विशेषत्वाने नमूद करतो. त्यासाठी तुमचे पुन्हा एकदा आभार मानतो. मला माहिती आहे की माझ्या दोन आभाराच्या शब्दाने मी तुमच्या उपकारातून मुक्त होणार नाही. पण मुक्तीचा मार्गही तुम्ही दाखविला आहे तो म्हणजे समाजाची सेवा. सर तुम्ही वयाची ८५ वर्षे समाज-सेवेसाठी वाहिली, तेच काम करण्यासाठी मला तीन-चार जन्म सुद्धा पुरणार नाहीत एवढे तुमच्या कामाचे मोठेपण आहे. तरीही या एकाच मानवी जन्मामध्ये समाजाच्या, तुमच्या ऋणातुन उतराई होण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न करीन.

तुम्ही मला दिलेले संस्कार, विचार, सवयी, आर्थिक मदत, प्रेम, आपुलकी, विश्वास या सगळ्यासाठी मी तुमचा अंत:करणाच्या तळापासून आभारी आहे.

तुमचा विश्वासु,

**(सतीश माळी)**

## प्रोत्साहन देणारे किशाभाऊ

*'पाकोळी' बालवाडी सुरू झाल्यानंतरच्या चार-पाच वर्षातीलच गोष्ट आहे. सार्वजनिक गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीतील सहभागाची तयारी सुरू होती. एक दिवस किशाभाऊ म्हणाले, ''पुष्पाताई, या वर्षीच्या मिरवणुकीत बालवाडीच्या मुलांचे पण पथक बसवा.'' या कल्पनेने मी आनंदून गेले पण इतकी लहान मुलं या मोठ्या मिरवणुकीत काय करू शकतील हे मला सुचेना. मी म्हटलं, ''सर, मुलं खूप लहान आहेत ते काय करू शकणार?'' सर म्हणाले, ''साभिनय गीत तर सादर करू शकतील ना?'' मी म्हटलं, ''सर, वर्गात त्यांची गीतं बसवून घेणं आणि सादर करणं शक्य असतं, पण मिरवणुकीत मुलं एवढं चालणार कशी?'' सरांचं तात्काळ उत्तर होतं मुलांना चालावं लागणारच नाही. मिरवणुकीमध्ये आपण त्यांच्यासाठी एक ट्रक सजवून घेऊ. त्यामध्ये मुलं गीत सादर करतील. कल्पना फारच मस्त होती. आम्ही सर्व शिक्षिका कामाला लागलो. 'आओ बच्चो, तुम्हे दिखाए झाँकी हिंदुस्तानकी' हे गीत मुलांकडून बसवून घेतलं. प्रत्यक्ष मिरवणुकीमध्ये सजवलेल्या ट्रकमध्ये नटलेली-सजलेली मुलं चढली. सुरुवातीला मुलं थोडी बुजली पण मिरवणूक पाहणाऱ्या लोकांच्या टाळ्या आणि उत्स्फूर्त प्रतिसादाने खुलली. मिरवणूक जेव्हा शेवटच्या चौकात आली तेव्हा स्वत: महापौर सर्व मंडळांचे स्वागत करीत होते. वर्धिनीच्या बालवाडीच्या मुलांनी सादर केलेले गीत त्यांना एवढे आवडले की त्यांनी वन्समोअर दिला आणि रुपये ५००/- चे बक्षिसही दिले. सरांच्या अशा प्रोत्साहनामुळे पुढे वर्धिनीतल्या या बालवाडीत नवे नवे प्रयोग करून पाहण्याचं बळं मिळालं.*

**श्रीमती पुष्पाताई नडे**

# सोबत करणाऱ्या आठवणी - सरांच्या !

**– विजय विश्वासराव**

सरांचे नांव डोळ्यांसमोर येताच एका वेगळ्याच व्यक्तिमत्वाची व्यक्ती समोर येते. तसा त्यांचा माझा परिचय ते राजा धनराज गिरजी हायस्कूलचे मुख्याध्यापक होते त्या वेळचा. माझी चित्रकला शिक्षक म्हणून नेमणूक दि. १९७१ ते १९७३ या काळातली. नवीन पदावर रुजू होण्यापूर्वी १९७१ च्या मे महिन्यात त्यांनी मला शाळेत बोलाविले. वेळ साधारण दुपारची असावी. मुलाखतीत पाहिलेली व्यक्ती हीच का ती? असा प्रश्न पडला होता. कारण तसेच होते. त्यांच्या खोलीत दोन–तीन विद्यार्थी, दोन शिपाई आणि दोन शिक्षक यांच्या सोबत चर्चा चालू होती. मी आल्याचे कळल्यावर त्यांनी मला लगेच आत बोलविले. माझ्याकडे पहात त्यांनी समोरील शिक्षकांची ओळख करून दिली की हे आपले नवीन चित्रकला शिक्षक. आपल्या शंकररावांबरोबर काम करणार आहेत. मला कळेना हे शंकरराव कोण? पण नंतर खुलासा झाला. उभा असलेला मी थोडा साशंकच होतो. एका मुख्याध्यापकाच्या खोलीत इतके लोक एका वेळेस काय करीत असावेत? विद्यार्थी होते ते सुट्टीच्या वर्गातील शंकानिरसनासाठी आलेले, समोरील शिक्षक तासिकांचा चार्ट घेऊन त्यावर चर्चा करण्यासाठी आलेले. तर शिपाई त्यांना सकाळ पासून सांगितलेल्या कामाचा आढावा देण्यासाठी आलेले. एका वेळेला इतक्या व्यक्तींशी संवाद साधणारी, मुख्याध्यापकपदाचा अजिबात गर्व नसलेली अशी व्यक्ती पाहून आदरच वाटला. वाटले इथे कुठे तरी आपली उमेद, धडपड, कामास येऊ शकेल. नंतर सर्वजण गेल्यावर स्वतंत्रपणे माझ्याशी चर्चा सुरू झाली. शाळेचा इतिहास थोडक्यात कथन करून माझ्या विद्यार्थ्यांसाठी तुम्ही काय करू शकता? असा प्रश्न विचारून मला त्यांनी कोड्यातच टाकले. उलटपक्षी मीच त्यांना विचारले, की सर मी चित्रकला शिक्षक म्हणून काम करणार, त्या व्यतिरिक्त अन्य जी काही जबाबदारी आपण

सोपवाल, ती पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करेन. ह्या उत्तराने त्यांना अपेक्षित उत्तर मिळाले असावे असे मला वाटले. परंतु त्यांच्या स्पष्टीकरणाने माझा अपेक्षाभंगच झाला. कारण विद्यार्थ्यांच्या पूर्ण मानसिकतेचा, आर्थिक स्थितीचा, अशैक्षणिक पार्श्वभूमीचा तसेच क्षमतेचा सखोल विचार करुन त्यांनी ज्या नेमक्या शब्दांत विचार मांडले, तेव्हा मला सरांच्या वैचारिक सखोलतेचा अंदाज आला; नुसते सांगण्यापुरते अथवा बोलण्यापुरते नव्हे. विचार मांडण्यापेक्षा, कर्तव्यतत्पर राहून ते आचरणात आणण्याचा त्यांचा आग्रह पुढील दोन वर्षाच्या काळात पुरेपूर अनुभवास आला. एका कला शिक्षकाला किती विविध प्रकारे वेगवेगळ्या विषयासंबंधी काम करता येते, याचे मार्गदर्शन तेथेच मिळाले. थोडक्यात माझ्या दृष्टीने त्यांचे हरहुन्नरी व्यक्तिमत्व होते. 'अ-शांतता' हा बहुधा त्यांचा स्वभावगुणच असावा. वेळ प्रसंगी कठोर असणारे किशाभाऊ खरे तर प्रेमळच होते. काम वेळचे वेळी व्हावे याकडे त्यांचा कटाक्ष असे. कोणावरही जबाबदारी सोपवण्यापूर्वी त्यांच्या अडीअडचणींचा, नियमांचा, गृहपाठ तयार असे. अडणाऱ्या कामातून मार्ग कसा काढावा, हेही शिकावयास मिळाले. माझे वरीष्ठ कला शिक्षक श्री. शंकरराव सुतार तसे परिचयाचे. एकाच शिक्षण संस्थेतून आम्ही बाहेर पडलो तरी ते अनुभवसिद्ध आणि मी अगदीच नवखा. मात्र १९७१ ते १९७३ अशा दोन्ही वर्षी इन्स्पेक्शनला बेस्ट टीचर्स असा शेरा मिळाला. याचे श्रेय अर्थातच किशाभाऊंच्याकडे जाते. वेळोवेळी नवीन कामाची दृष्टी, कल्पना आणि संधी देणारे तेच होते. थोडक्यांत गुरुस्थानी असणारे पटवर्धन सर म्हणजे सेनापतीच.

माझ्या काळांत जवळ जवळ वेगवेगळ्या विषयांच्या तरुण शिक्षकांची भरती झालेली होती. त्यामुळे तेवढ्याच जबाबदारीने सर्व शिक्षकांना काम देणारे व त्यांच्याकडून करवून घेणारे किशाभाऊ म्हणजे ज्ञानरुपी रथाचे सारथीच म्हणणे योग्य ठरेल. शाळेसाठी व सहकाऱ्यांसाठी सर्वस्वी आपला वेळ खर्च करणारी व्यक्ती मी प्रथमच पाहात होतो. माझे वडीलही प्राथमिक शिक्षक होते. ते १९५५ साली सेवानिवृत्त झाले. त्यांची आणि किशाभाऊंची तुलना नेहमी माझ्या

मनात चाले. दोन्हीही ध्येयवेडी माणसे! ते त्यांच्या काळांत आणि पटवर्धन सर आजच्या काळांत. काळ बदलला की परिस्थिती बदलते असे म्हणतात. ते खरे आहे. विद्यार्थ्यांचे हित पाहणारे शिक्षक अशा लौकिकांच्या काळांतील ही माणसे खरंच थोर.

हळूहळू मी त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारची कामे काम करीत असतांना एकदा पूर्वाश्रमीचे मुख्याध्यापक कै. वाघोलीकर यांच्या व्यक्तिचित्रणाचे (पोर्ट्रेट) कामाबाबत त्यांनी विचारणा केली. माझ्या दृष्टीने ही मोठीच संधी होती. एका कलाशिक्षकाला असे काम करण्यास मिळणे म्हणजे आव्हानच होते. मी त्यांना त्या बद्दल, काम करण्याच्या पद्धतीबद्दल सांगितले. व्यक्तिचित्रण प्रत्यक्ष करणे आणि न पाहिलेल्या व्यक्तीच्या कृष्ण-धवल (ब्लॅक अँड व्हाईट) फोटो वरुन नंतर व्यक्तिचित्र तयार करणे तसे अवघडच. परंतु प्रथम पटवर्धन सरांनी समजावून सांगितले आणि मग कामास सुरुवात करण्यास सांगितले. साधारण १० ते १५ दिवसांत चित्र तयार करुन शाळेत घेऊन आलो. ते पाहिल्यावर त्यांनी अभिनंदन केले. चक्क नोटीस काढून सर्व शिक्षकांची सभा बोलविली आणि सर्वांसमोर व्यक्तिचित्र ठेऊन त्यांनी त्यावर स्पष्टपणे बोलण्यास सांगितले. काहींनी किरकोळ दुरुस्त्या सुचविल्या. काहींनी रंगाच्या बाबत सूचना केल्या. परंतु चित्र पाहताच हेच वाघोलीकर सर, अगदी हुबेहुब! हा अभिप्राय सर्वांनीच दिला. **यांतून सर्वमान्यतेला किती महत्त्व असते, आणि आपले मत व्यक्त करणे किती समर्पक असते हे मला समजलं.** त्यामुळे काम करणाऱ्याला मिळणारे समाधान वेगळेच. शाळा सुटल्यावर चक्क त्यांच्याबरोबर चहा पान झाले आणि प्रेमळ शब्दांत त्यांनी शाबासकी दिली. शिवाय पुन्हा एक परीक्षा व्हायची आहे बरं का? असे म्हणून एक धक्काही दिला. सूचना-उपसूचनेनुसार पुढे हे चित्र पूर्ण झाले.

कै. वाघोलीकर सरांच्या पुण्यस्मरणदिनाचेऔचित्य साधून संस्थेच्या पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी यांचे उपस्थितीत त्या चित्राचे उद्‌घाटन करुन ते शाळेच्या पुढील प्रांगणात खुर्चीवर ठेवले. आश्चर्य असे की काही माजी

विद्यार्थी शाळेच्या समोरुन जातांना चित्र पाहण्यासाठी आवर्जून शाळेत आले. त्यांनी आदरांजली वाहून पटवर्धनसरांच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी सर्वांना सांगितले की माझे कौतुक करण्यापेक्षा ज्यांनी हे चित्र जिवंत केले. त्या कलाकाराचे कौतुक करा. सरांनी श्रेय मिळण्यासाठी जीवन व्यतीत केले नाही. ते सतत कार्य करीत राहिले. मलाच काय अनेकांना त्यांनी वेगवेगळ्या संधी दिल्या. मी १९७३ नंतर शाळेतून बाहेर पडलो. परंतु सतत वेगवेगळ्या कार्यक्रमांत भेटत राहिलो. न विसरता मला ते म्हणत कोणतीही अडचण आली अथवा काम असेल तर माझ्याकडे ये. अशा व्यक्तीला विसरणे खरोखर अशक्य. ह्या आठवणीचं आपल्याला सोबत करतात.

## मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी झटणारे सर!

*मी राजा धनराज गिरजी हायस्कूल मध्ये शिकत असताना पटवर्धन सर हे अत्यंत कडक शिस्तीचे असे होते परंतु त्यांचा मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत मनमिळाऊ असा होता.*

*'स्व'-रूपवर्धिनी या संस्थेच्या संदर्भातील एक घटना आठवते. माझ्या घरासमोर सुनील रायकर नावाचा एक विद्यार्थी राहत होता. तो महानगरपालिकच्या शाळेत सातवीत असताना एक दिवस त्याचा पत्ता शोधत पटवर्धन सर माझ्या वाड्यामध्ये आले. पाहताच त्यांनी मला ओळखले व पत्ता सांगण्यास सांगितले. मी त्यांना त्या मुलाची ओळख करून दिली. तो मुलगा वर्गात हुषार असल्याचे त्यांचे लक्षात आले होते परंतु घरची परिस्थिती बिकट होती. त्या मुलांचे वडील हयात नव्हते. अशा मुलांचे भवितव्य उज्ज्वल व्हावे म्हणून सर नेहमी प्रयत्नशील असत.*

**श्री. दामजी**

# एक कृतार्थ जीवन

**– आबा अभ्यंकर**

काही सुहृदांशी आपले भावबंध इतके दृढ कसे होऊन जातात हे मला न उलगडलेले एक कोडे आहे. श्री. किशाभाऊ पटवर्धन हे त्यातले एक प्रमुख व्यक्तिमत्त्व. वास्तविक श्री. किशाभाऊंचा ज्ञानप्रबोधिनीच्या उभारणीतला सहभाग व त्यानंतर 'स्व'–रूपवर्धिनीतील कार्य, त्यांचा जनसंपर्क, संस्थेसाठी देणग्या मिळविताना त्यांनी घेतलेले कष्ट, हाती घेतलेल्या कामासाठी सर्वस्व ओतून काम करण्याची त्यांची शैली, या सर्वांमध्ये सामील होण्याइतकी माझी पात्रता वा तयारी नसतानासुद्धा त्यांनी त्यांच्या कामात मला सामावून घेण्याचा प्रयत्न केला हे विशेष.

मोतीबागेत दर शुक्रवारी शहरातील जुने व जाणते स्वयंसेवक साप्ताहिक शाखेच्या निमित्ताने एकत्र येत असत. त्यामध्ये किशाभाऊही असत. शाखेनंतर कॉफीपानासाठी आम्ही बहुधा 'गंधर्वमध्ये' जात असू. त्या गटामध्येही किशाभाऊ असत व कॉफीबरोबर अनेकानेक विषयांवर गप्पा व विचारांचे आदानप्रदान होत असे.

पुढे शुक्रवार शाखेतील भेटीगाठी बंद झाल्या. त्यामुळे सर्वांनाच चुकल्यासारखे वाटत होते. श्री. बाळासाहेब चितळे यांनी सुचविले की आठवड्यातील एक दिवस सर्वांनी कॉफीपानासाठी 'श्रेयस'मध्ये जमावे व अशाप्रकारे दर शनिवारी 'श्रेयस'मध्ये जाणे सरू झाले. इथूनच सुरू झाले 'जागृती व्यासपीठ'! अर्थात याचा सर्वाधिक आनंद झाला तो किशाभाऊंना. मात्र यावेळी त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नव्हती त्यामुळे कोणाच्या तरी साहाय्याशिवाय अशा बैठकांना उपस्थित राहणे त्यांना शक्य नव्हते. अर्थात् त्यांना नेण्या–आणण्याची जबाबदारी मी आनंदाने स्वीकारली व त्यातून त्यांच्या निकट परिचयाचा लाभ झाला.

किशाभाऊ म्हणजे अखंड परिश्रम, सतत नव्या कल्पना व उपक्रम लहानमोठ्या सर्व कार्यकर्त्यांची चौकशी, संघाच्या सर्व अधिकाऱ्यांशी सततचा संपर्क, विविध विषयांवरील अद्ययावत् पुस्तकांचे वाचन व मनन आणि माझ्यासारख्या अनेकांना आपल्या स्नेहबंधनात कायमचे गुंफून टाकणारे कसब! **आपण कष्टपूर्वक उभे केलेले काम अत्यंत निर्लेपपणे 'पुढिलांचे स्वाधीन करणे' हे केवळ संघ कार्यकर्तेच करु शकतात. कारण हे 'मी' उभे केले असा अहंभाव त्यांच्या मनात नसतो, तर परमेश्वराने हे काम माझ्याकडून करवून घेतले ही भावना सतत त्यांच्या मनात जागृत असते.** श्री. किशाभाऊ हे या वृत्तीचे आणखी एक उदाहरण.

शेवटी शेवटी किशाभाऊंची प्रकृती त्यांना साथ देईनाशी झाली होती. छोट्याशा अपघाताने त्यांचे हिंडणे-फिरणेही कठीण झाले होते. अशावेळी कोणीतरी समोर असावे, बोलावे असे त्यांना वाटत असे व त्यासाठी ते मला आवर्जून निरोप देत असत. मीही शक्यतो अनेकांना त्यांच्या भेटीसाठी घरी व रुग्णालयात घेऊन जात असे पण किशाभाऊंची शारीरिक अवस्था, थोड्या बोलण्यानेही त्यांना होणारे कष्ट मला पाहवत नसत. परंतु किशाभाऊ मात्र तसे खुश असत. आलेल्या प्रत्येकाची आपुलकीने चौकशी करीत व त्याच्या कामाविषयी काही अभिप्राय व सूचनाही करीत.

शेवटचे काही दिवस ते अत्यवस्थ व बोलण्याच्या स्थितीतही नव्हते. तरीसुद्धा दिवसातून एकदा तरी त्यांची वास्तपुस्त केल्याशिवाय चैन पडत नसे.

आपल्या जीवनाची दिशा निश्चित करुन त्या आधारे उभे केलेले काम वर्धिष्णु झाल्याचे तसेच आपल्यानंतरही ते त्याच धोरणाने चालू राहील अशी व्यवस्था झाल्याचे पहाण्याचे भाग्य फार थोड्या जणांना मिळते. किशाभाऊंना ते मिळाले त्यामुळे त्यांचे सर्व जीवन कृतार्थ झाले असे म्हणता येईल.

# सेवेतून सेवेकरी घडविणारे किशाभाऊ !

**– ॲड. सौ. नीलिमा गोखले**

१९९२ मध्ये 'कायदा सल्ला केंद्र 'स्व'–रूपवर्धिनीत सुरू करण्याच्या निमित्ताने पटवर्धन सर व 'स्व'–रूपवर्धिनीची यांची खऱ्या अर्थाने मला ओळख झाली. खरं म्हणजे याच निमित्ताने वर्धिनीत काम करण्याचाही योग आला.

**वर्धिनीत नवीन आलेल्यांना किशाभाऊ वर्धिनीत काम करणाऱ्यांची ओळख इतक्या कौतुकाने करून देत की आपल्याला क्षणभर प्रश्न पडावा की ही आपलीच ओळख आहे ना! पण यातूनच ही ओळख म्हणजे वर्धिनीची आपल्याकडून असलेली अपेक्षा आहे याची जाणीव होऊन आपले गुणवर्धन करीत अनेक जबाबदार कार्यकर्ते तयार झाले आहेत.**

आपल्या गुणांचा, शिक्षणाचा जसा समाजासाठी उपयोग झाला पाहिजे तसाच आपण कमावलेल्या पैशातील हिस्साही समाजासाठी योग्य प्रकारे खर्च करणे हे आपले कर्तव्य कसे आहे हे सर इतक्या सहजतेने नि प्रभावाने पटवून देत की कुणालाही आपल्या कमाईचा काही भाग ह्या कार्यासाठी बाजूला ठेवण्याची इच्छा होईल! ह्या असामान्य हातोटीमुळेच तर सरकारी मदत न घेता समाजाकडून मिळणाऱ्या देणग्यातूनच समाजासाठीचे 'स्व'–रूपवर्धिनीचे अलौकिक कार्य उभे राहिले व वर्धिनीची विलोभनीय वास्तू उभी राहिली!

माणूस व्यवहारी असला तर स्वत:ची प्रगती करू शकतो असे म्हणतात. सरांकडे व्यवहारिक चातुर्य कमालीचे होते. पण स्वत:च्या प्रगतीत न अडकता सरांनी स्वत:चा परिघ विशाल समाजापर्यंत वाढवून उपेक्षित, दुर्लक्षित समाजाची प्रगती करण्याचे ध्येय ठेवले व त्याप्रमाणे दिशा आखली. वर्धिनीचे बोधवाक्य 'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे' असे आहे. ह्या कामाचे सातत्य टिकवण्यासाठी सुयोग्य व निस्वार्थी कार्यकर्त्यांची फळी उभारण्यापासून ते संस्थेच्या

दैनंदिन कार्यासाठी लागणाऱ्या खर्चाची दीर्घकालीन तरतूद करण्यापर्यंतची सरांची नियोजनबद्ध कार्यपद्धती व दूरदृष्टी विलक्षणच!

मला स्वत:ला सरांच्या मार्गदर्शनातून व सहवासातून एका मौलिक गोष्टीची शिकवण मिळाली जी इतरत्र क्वचितच मिळाली असती. कायदा सल्ला केंद्राचे काम करतांना मी व पुष्पाताई गरजूंना विशेषत: महिलांना मदत करण्यासाठी धडपड करीत होतो. कधी कधी आपली धडपड, आपण अव्यवहारीपणाने करतो व त्याचा उपयोग आपण ज्या उद्देशाने काम करतो त्याला होत नाही. हे आपल्या लक्षातही येत नाही. अेका साध्या घटनेतून सरांनी हे आमच्या लक्षात आणून दिले. अेका महिलेचे काम आम्ही विनामोबदला केले. त्या महिलेचे कोर्टाचे काम झालेही. पण नंतर ती आम्हांला भेटलीही नाही व वर्धिनीतही आली नाही. सरांना ही घटना कळल्यावर भेटल्यानंतर त्यांनी जो अभिप्राय व्यक्त केला त्यातून मी बरेच काही शिकले. सर म्हणाले, **'नीलिमाताई, सामाजिक काम म्हणजे लोकांना स्वावलंबी बनवणे. आपल्या रूमालाने त्यांचे नाक पुसणे नाही. संस्थेमुळे काम झाले याची जाणीव ठेवून त्या व्यक्तीने स्वत:देखील सामाजिक कामात सहभागी झाले पाहिजे.'** केवळ पैसे देण्याचे टाळण्यासाठी ती बाई वर्धिनीतही येत नाही यात आपले कुठे तरी चुकले ह्याची जाणीव झाली.

समर्थ रामदास स्वामी व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांप्रमाणे व्यवहारीपणाने शहाणपणाचा उपयोग नि:स्वार्थीपणे समाजहित व देशहितासाठी करण्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे किशाभाऊ पटवर्धन सर. त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून गेल्यास आपले आयुष्य निश्चितच उदात्त व उन्नत होणार, जसे अेका इंग्रजी कवीने म्हटले आहे,

***Lives of great men always remind us***
***We can make our lives sublime***
***And leave behind us***
***Footprints on sands of time.***

# दर्शन 'गृहस्थ' किशाभाऊंचे

**– अरविंद वि. केळकर**

कार्यकर्ता स्वरुपातील किशाभाऊंचे दर्शन सर्वांना सतत होत असायचे. त्यातील विविध रुपेही अनुभवायला मिळायची. त्याचबरोबर गृहस्थाश्रमातील किशाभाऊ अनुभवणे हेही काही जणांच्या भाग्यात होते. त्यापैकी मीही एक आहे. 'पटवर्धनबाई' अशी लीलाताईना सरांनी मारलेली हाक आणि 'अहो पटवर्धन' असा त्यांचा प्रतिसाद यातूनच संवादाला सुरुवात व्हायची.

लीलाताईचा प्रत्येक गोष्टीतला काटेकोरपणा व शिस्त सरांनीही स्वत:मध्ये बाणली होती. मात्र कधीही याचा त्यांना त्रास होत आहे असे त्यांच्या वर्तनातून दिसत नसे. सरांच्या घरातील शोभेच्या वस्तूंचे कपाट एकदा धुळीने थोडेसे अस्वच्छ झाले होते. बाईंनी त्याबद्दल सरांना आठवण केली. मी सहज म्हणून गेलो होतो 'स्वच्छतेला मी मदत केली तर चालेल का' असे विचारले. त्यावर सर म्हणाले, 'बघ तू मोठे आव्हान स्वीकारतो आहेस. पण थोडी अधिक सावधानता बाळग.' मग मी त्या कपाटातील सर्व वस्तू बाईंच्या मनाप्रमाणे स्वच्छ करून त्याच जागी व्यवस्थित ठेवून दिल्या व चक्क व्यवस्थितपणाचे प्रशस्तिपत्रक, तेही 'पटवर्धनांच्या वर्धिनीतला वर्धक (हे बाईंच्या भाषेत) असूनही' मिळवले. याची आठवण म्हणून 'एक आठवण' असे लिहिलेला श्री ज्ञानेश्वर महाराजांचा फोटो बाईंनी मला भेट म्हणून दिला. बाईंचा लाडका म्हणून सरांच्या घरी माझा नवा प्रवेश सुरू झाला.

इयत्ता दहावीत असताना माझा इतिहासाचा पेपर तपासताना माझे हस्ताक्षर सुधारणे गरजेचे आहे हे समजावून सांगून बाईंनी मला रोज सराव कसा करायचा हेही समजावून सांगितले. याचा मला माझे गुण वाढण्यासाठी खूपच फायदा झाला. व्यवस्थित, वक्तशीरपणे, शिस्तीत सर्व काही केले की बाईंना आवडायचे. यामुळे बाईंच्या आजारपणात त्यांनी किशाभाऊंना सांगूनच ठेवले

होते की शक्य असल्यास अरविंदालाच माझ्याकडे पाठवत जा. अशा थोर माऊलीची सेवा करायला मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो.

**बाई रुग्णालयात असताना बाईंचे पथ्य, खाणे, औषधं यांची व्यवस्थित आठवण व स्वत: वयपरत्वे थकूनही चेहऱ्यावर कोणतीही नाराजी न दाखवता बाईंचे सर्व काही व्यवस्थित करताना गृहस्थाश्रमाचाही चांगला आदर्श सरांनी आम्हाला घालून दिला.**

शाखेवर आल्यावर सरांच्या गप्पांना सुरुवात व्हायची ती त्रिसूत्रीपासून. संपर्क, अभ्यास या सर्वांचे महत्त्व अनुभवातून सांगणे व मनावर बिंबवणे हे अतिशय नकळतपणे व्हायचे.

प्रत्येक क्षेत्रातल्या अनुभवांची मोठी शिदोरी सरांकडे होती आणि दिवसेंदिवस तिचा आकार वाढतच होता. कोणीही भेटले तरी त्या शिदोरीतील धन त्याला किती देऊ आणि किती नको असे सरांना होई. हे अगदी शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही अनुभवलं. कोणाचेही अभिनंदन आणि सांत्वन या दोन गोष्टी अतिशय वेळेवरच केल्या पाहिजेत असा सरांचा कटाक्ष होता आणि आम्हालाही वेळोवळी ते याची आठवण करीत असत.




*फिरत्या प्रयोगशाळेच्या प्रकल्पाची कल्पना उपस्थितांसमोर मांडतानाच्या प्रसंगी मा. किशाभाऊ.*

# दूरदर्शन आणि किशाभाऊ

**– दत्तात्रय बाळू शेडगे**

विवेकानंद शाखा सुरू झाल्यानंतर साधारणत: तीन-चार वर्षांतील गोष्ट असेल. वडारवाडी भागात राहणारा संजय नावाचा एक वर्धक अचानक वर्धिनीत यायचा बंद झाला. त्यामुळे आम्ही दोघे वर्धकच त्याच्या घरी गेलो. त्याची विचारपूस केली असता असे लक्षात आले की त्यांच्याकडे नवीन टी.व्ही. घेण्यात आला आहे व त्यामुळे त्याचे वडील त्याला वर्धिनीत पाठवीत नव्हते. त्या वर्धकाच्या वडिलांचे म्हणणे होते की पंधरा हजार रुपये खर्च करून टी.व्ही. घेतला तो केवळ ठेवण्यासाठी नाही. संजय दिवसभर शाळेत जातो. संध्याकाळी आल्यावर तुम्ही त्याला वर्धिनीत घेऊन जाता मग त्याने टीव्ही केव्हा पाहावा? ह्या त्यांच्या प्रश्नाला आमच्याकडे उत्तर नव्हते. नंतर श्री. कटके सर संजयच्या वडिलांची समजूत काढायला गेले परंतु त्यांच्या वडिलांच्या प्रश्नांनी तेही आश्चर्यचकित होऊन परतले. नंतर एका रविवारी सकाळी नऊ वाजता 'कृ.ल.' सर शाखेत आले. नेहमीच्या पद्धतीत आम्हा सर्वांशी गप्पा मारत असताना संजय नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. श्री. कटके सरांनी त्यांना सर्व हकीगत सांगितली. सर तेव्हा काहीच बोलले नाहीत. पण सोमवारी संध्याकाळी पाच-साडेपाच वाजता माझ्याकडे आले व मला म्हणाले की, आपल्याला संजयच्या घरी जायचे आहे. आम्ही संजयच्या घरी गेलो. त्याच्या घरी आई-वडील व नुकताच शाळेतून आलेला संजय असे सर्वजण उपस्थित होते.

घरात शिरताच सरांनी संजयच्या वडिलांच्या तब्येतीविषयी विचारणा केली व त्याच शैलीत त्यांचा नवीन टी.व्ही किती चांगला आहे हेसुद्धा सांगितले. संजयचे वडीलसुद्धा खूष झाले. कारण आधीच्या सर्व आलेल्या सर्वांनी टी.व्ही.चे दुष्परिणाम सांगितले पण हे आलेले मोठे सर टी.व्ही. चांगला आहे असे म्हणतात.

मग सर म्हणाले, 'काय हो आण्णा (संजयचे वडील) संजय टी.व्ही.वर

दिसावा असं तुम्हाला वाटतं का हो?' 'हो तर,' **वडील म्हणाले की माझी तर फार इच्छा आहे संजय खूप मोठा व्हावा. त्यावर सर त्यांना म्हणाले, 'त्यासाठी तुम्ही त्याला घरात बसवता का?' ह्यामुळे त्याचा फायदा काय ते सांगा.** त्या क्षणाला आण्णांना त्यांची चूक लक्षात आली व ताबडतोब संजयला वर्धिनीत पाठवले.

तात्पर्य असे की, वडारवाडीत राहणाऱ्या माणसाला त्याच्या मनात काय आहे हे ओळखून योग्य पद्धतीने समजावणे हे सरांना सहजतेने जमत होते. त्या प्रसंगामुळे आम्हालाही सरांच्या मनातील तळमळ जाणवली.

## सेवाभावाने मदत देण्यासाठी हात पुढे आले पाहिजेत...

''आजच्या तरुणांनी देशाच्या जडणघडणीत पुढाकार घेतल्याशिवाय देशाची सकस आणि सर्वांगीण प्रगती होणार नाही. यासाठी लहान वयातच मुलांवर योग्य संस्कार करून त्यांना योग्य दिशा दाखवणे गरजेचे आहे. आपले ऋण व्यक्त करण्यासाठी प्रत्येक तरुणाने काही निश्चित असे योगदान नक्कीच दिले पाहिजे असे मला वाटते. आजच्या परिस्थितीत कोणतीही सेवाभावी मदत घेण्यासाठी हजारो हात पुढे येताना दिसतात पण सेवाभावी मदत देण्यासाठी मात्र जास्त ओघ दिसत नाही. त्यातही **आर्थिक मदत करणारे हात पुढे येतात पण सामाजिक कार्यासाठी आपला वेळ देण्यात फारसा पुढाकार घेताना लोक दिसत नाहीत.** सेवाभावाने समाजाची सेवा करण्यासाठी, असे काम करणाऱ्यांना सेवेत मदत करण्यासाठी, हात पुढे आले पाहिजेत''.

**किशाभाऊ पटवर्धन**

*(रोटरी क्लब ऑफ पुणे पर्वती तर्फे चैतन्यदीप पुरस्काराने कै. पटवर्धन सरांना गौरवण्यात आले. त्याप्रसंगी त्यांनी वरील विचार व्यक्त केले. या कार्यक्रमानंतर थोड्याच दिवसांनी पटवर्धन सरांचे देहावसान झाले. एका अर्थाने हे त्यांचे जाहीर असे शेवटचेच भाषण होते.)*

# माणसांचं मोल जाणणारा 'माणूस'

**–डॉ. रा. ल. देवपूरकर**

'काय डॉक्टरसाहेब पुत्र व्हावा ऐसा गुंडा त्याचा तिन्ही लेकी झेंडा ! आहे कां आनंद ...' माझा चिरंजीव आनंद याच्या अभिनंदनासाठी आलेल्या फोनवरचे प्रत्येक वेळचे किशाभाऊ पटवर्धनांचे तेच तेच शब्द आजही कानात घुमतात. **उच्चारलेला प्रत्येक शब्द हा त्यामागच्या हेतूंनी पूर्णपणे ओलाचिंब करण्याची श्री. किशाभाऊंची वाक्‌शैली !**

माझी आणि किशाभाऊंची पहिली भेट अमेरिकेत आयोवा शहरामध्ये झाली. ऑगस्ट ९९ मध्ये हॉक आय कोर्ट, मधील अपार्टमेंटमध्ये फोन वाजला. माझ्या स्नेह्यांचा फोन होता.

'पुण्याहून किशाभाऊ पटवर्धन माझ्याकडे आले आहेत. पुण्यातील 'स्व'–रूपवर्धिनी तुम्हाला माहिती आहे का? ते त्या संस्थेचे संस्थापक' 'बरं. मला 'स्व'–रूपवर्धिनी माहीत नाहीये. पण मी आलोच'

माझे स्नेही डॉ. शिरोडकर हॉक आय कोर्टच्या दुसऱ्या अपार्टमेंटमधे रहात होते आणि तेथेच किशाभाऊ निवासासाठी आले होते. प्राथमिक परिचय ओळख–पाळख झाल्यानंतर जेवावयास बसलो. पहिल्याच दिवशी रात्री ९ ते ११ असे दोन तास किशाभाऊंबरोबर गप्पा झाल्या. स्वत:च्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमध्ये महत्त्वाचा गंभीर मुद्दासुद्धा मिश्किल शैलीने मांडीत सर माझ्याशी बोलत होते.

'काय आहे, डॉक्टर साहेब, पुण्यात 'स्व'–रूपवर्धिनी नावाची संस्था आहे..........असं असं विविध काम सध्या चालू आहे. त्यासाठी आर्थिक साह्य मिळविण्याच्या मिशनवर हा अमेरिकेचा दौरा काढलाय, कसे?'

मग ज्ञानेश पुरंदरे आणि आपण कसे कसे फिरलो याचे कथन झाले. मध्येच 'वहिनी! जरा डॉक्टरांसाठी कॉफी टाका, मीही घेईन बरं का त्यांच्या

बरोबर ! (सौ. शिरोडकरांना आदेश !) पहिल्या तास दोन तासातच त्यांची आणि माझी गेल्या ५-१० वर्षांची ओळख असल्याप्रमाणे चेष्टा मस्करी, गप्पा झाल्या ! अत्यंत सहजगत्या कामात हात घालण्याची त्यांची पद्धती क्षणाक्षणाला जाणवणारी. या पहिल्याच दिवशी मग आयोवा विद्यापीठाच्या हिंदू स्वयंसेवक संघाचे काम करणाऱ्या लोकांची माहिती, पुढच्या दोन-तीन दिवसांसाठी करावयाची कामे, बैठका याचेही सूतोवाच झाले.

आयोवा सिटी पब्लिक लायब्ररीमध्ये दि. २६ ऑगस्ट १९९९ ला 'रक्षाबंधन उत्सव' कार्यक्रमाचे आयोजन ठरले. त्याचे निमंत्रण सर्व संबंधितांना पाठविले होते. बहुधा संध्याकाळी चारच्या सुमारास कार्यक्रम होता! सुमारे शंभर एक लोक जमले होते. आयोवा शहर, सीडार रेयाड हे जवळचे उपनगर यातून हिन्दू स्वयंसेवक संघ (HSS) च्या संबंधित सर्वजण उपस्थित होते. ध्वजवंदन, रक्षाबंधन - किशाभाऊ पटवर्धन सरांना आणि सरांच्या हस्ते ध्वजाला. मग सरांचे भाषण, 'स्व'-रूपवर्धिनीवरील चित्रफितीचे प्रदर्शन असा कार्यक्रम आखलेला होता. माझी आणि किशाभाऊंची दोन-तीन दिवसांचीच ओळख पण त्यांच्याच आदेशावरून या कार्यक्रमामध्ये सरांची औपचारिक ओळख करून देण्याचे काम माझ्याकडेच द्यायचे आहे असे ठरल्याचे संयोजक डॉ. सतीश शिरोडकरांनी मला सांगितले. 'आदमीकी पहचान आखोंसे नहीं, बातोसे होती है' ही एका अंध साधु आणि चुकलेले राजा, प्रधान आणि सैनिक यांची गोष्ट सांगून, सरांची ओळख त्यांच्या कामातूनच होईल असे सांगून मी रिकामा झालो. त्यावर किशाभाऊंचे मिश्किल उद्‌गार 'डॉक्टरसाहेब आमचा चेंडू चांगलाच परतवलात तर ! पण मी तुम्हाला असा सोडणार नाही.'

किशाभाऊंनी 'स्व'- रूपवर्धिनीची संकल्पना, चित्रफितीद्वारे तेथे चालणाऱ्या विविध उपक्रमांचे आणि स्थापनेपासून संस्थेच्या वाटचालीसंबंधी खुमासदार पद्धतीने विवेचन केले. माणूस घडवणारी संस्था म्हणजे 'स्व'- रूपवर्धिनी असे हुबेहुब चित्र जमलेल्या सर्वांसमोर उभे राहिले. सरांनी आर्थिक साहाय्य तर नि:संकोचपणे मागितलेच पण त्याहीपलिकडे जावून मला माणसं हवी आहेत, नुसते पैसे नको ! देवपूरकर भारतात नजीकच्याच काळात

(म्हणजे अजून १-२ महिन्यातच) परतणार आहेत आणि 'स्व'-रूपवर्धिनीसाठी काम करणार आहेत'' हे सुद्धा सरांनी त्यांच्या व्याख्यानातच सांगून टाकले.

नंतरच्या आठवडाभरात भेटलेल्या सर्वांना मी अमेरिकेतून नुसतेच पैसे नाही तर माणसे घेऊन जात आहे. हे त्यांनी वारंवार सांगितले. कित्येक वेळा माझ्याकडे बोट दाखवून, ह्यांना पुण्यात 'स्व'-रूपवर्धिनी आहे, हे आयोवामध्ये समजले ह्या योगायोगाचा सर आवर्जून उल्लेख करीत.

हॉक आयकोर्ट मध्ये सरांच्या बरोबरचे ते दिवस अविस्मरणीय आहेत. अपार्टमेंटमध्ये बसल्या बसल्या बहुधा वॉशिंग्टनमधे असलेल्या ज्ञानेश पुरंदरेशीच नव्हे तर पुण्यामध्ये शिरीष पटवर्धनांशी सुद्धा फोनवरून बोलताना मी त्यांना पाहिले. इतर असंख्य जणांशी (मला सर्वांची नावे माहीत नव्हती आणि नाहीत) भारतात ते फोनवर बोलत होते. इलेक्ट्रॉनिक फोन कार्डस् आणि लांबलचक नंबर्स फिरवून त्याही वयांत नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेणारे किशाभाऊ पाहिले की जाणवायचे 'पलितं मुण्डम्, दन्तविहीनं जातं तुण्डम्, तदपि न मुंचति कर्मपिंडम्'?



*प्राज कंपनीचे प्रमुख श्री. प्रमोद चौधरी यांना धन्यवाद देताना किशाभाऊ.*

# दर्शन-भावावस्थेतील किशाभाऊंचं

**– केदार पारगावकर**

सोळा-सतरा वर्षांपूर्वीचं शाखेतले ते दिवस ! मैदानावर छानपैकी पाणी मारुन आमचा खेळ सुरु झाला. कबड्डीचा डाव अगदी रंगात आला होता. प्रतिस्पर्धी गटाच्या वर्धकाला आम्ही पाय धरुन आत खेचणार इतक्यात, शाखाप्रमुखांची 'वर्धिनी ऽऽ सावधान' अशी आज्ञा कानावर आली.... माझ्यासारखे नववर्धक चपापलेच... आज इतक्या लवकर खेळ संपला?

कुतूहल चेहऱ्यावर व्यक्त होत असतानाच मैदानावरचा प्रत्येक वर्धक, प्रत्येक युवक, प्रत्येक शिक्षक स्तब्ध झाला ! मोठ्ठ्या कोलाहलानंतर एका क्षणात एकदम नि:स्तब्धता पसरली. मी नवीन ! मला कळेचना काय झालंय! पण, तेवढ्यात रिक्षातून एक गोरंपान, तेजस्वी, चंदेरी केसांचं, कृश परंतु चपळ असं व्यक्तिमत्त्व दृष्टीस पडलं. रिक्षातून उतरुन चपळाईनं मैदानाकडे चालत येणाऱ्या 'त्या' व्यक्तिमत्त्वाचं हे माझं 'प्रथम दर्शन' ...भीती, आदर, धाक इ. भावना एकाच वेळी मनात चमकून गेल्या...

शाखेतले दिवस जसे सरत गेले तसतशी या व्यक्तिमत्त्वाची ओळख होत गेली नि त्याबरोबर भीती, धाक जाऊन आदर आणि प्रेम यांनी मनात घर केलं. निवृत्तीनंतरचं त्यांचं आदर्श वानप्रस्थी जीवन, वर्धिनीविषयक संकल्पना, देशप्रेम, उपेक्षित वर्गाविषयी आस्था, साधं राहणीमान याही गोष्टींचे संस्कार मनात घर करत गेले. युवकगटात आमचा प्रवेश होताच, किशाभाऊंशी थोडा संपर्क वाढला. पाच-सहा वर्षे वर्धिनीचे संस्कार ग्रहण केल्यानंतर काहीतरी उत्तम काम हातून पार पडावं अशा तीव्र इच्छेतून किशाभाऊंची भेट व्हायची.

'रात्री झोपायला माझ्याकडेच या!' असे किशाभाऊ मधून मधून हमखास म्हणायचेच. मग आम्ही आमच्या पांघरुणाची वळकटी शबनममध्ये घालायचो, सायकली काढून आनंदात गणेशखिंडचा सगळा चढ डबलसीट चढून घाम पुसून

किशाभाऊंच्या दाराची बेल वाजवायचो. **एखाद्या फार मोठ्या व्यक्तीचं स्वागत केल्याप्रमाणे ते आम्हा मुलांना 'या'-'या' म्हणायचे. आम्ही पार ओशाळून जायचो, मग आतून पाणी घेऊन आले की आम्हाला फारच लाज वाटायची... मग आंब्याची / राजगिऱ्याची वडी आतून यायचीच, हमखास...** मग आमच्या गप्पा सुरू व्हायच्या. गप्पा म्हणजे आम्ही 'गप्प' आणि फक्त श्रवणभक्तीसाठी आसुसलेले !

प्रचारक असताना त्यांना आलेले बरेवाईट अनुभव, संघकार्य, वर्धिनीची सुरुवात, शिरीष-संजय-ज्ञानेश यांचे किस्से ऐकायला मिळायचे... प्रेरणा मिळायची... आपणही असंच करावं... धडाडून कामाला लागावं असे विचार मनात न आले तरच नवल !

'देशभक्तीवरून' रामकृष्ण-विवेकानंदांकडे विषय आला की मग तो 'देवभक्तीकडे' झुकायचा... पण, या विषयाची खूप आवड असून, हा विषय खूप पटलेला असूनही किशाभाऊ जरा उदास वाटायचे. 'मला ह्यातलं खूप करायचं होतं, पण, किशाभाऊ थांबायचे. मात्र, रामकृष्णांची विशिष्ट भावावस्थेतली भिंतीवरची तसबीर पाहिली की, रामकृष्णांविषयी मात्र भरभरून बोलायचे. **विवेकानंदांना समाधीपासून दूर ठेवून देशसेवेकरिता भाग पाडण्याच्या रामकृष्णांच्या भूमिकेचं त्यांना फार कौतुक वाटायचं. हा प्रसंग त्यांनी कित्येकदा आम्हाला सांगितला असेल.** यामुळेच की काय, माझ्या कार्यालयात ही तसबीर मी मुद्दाम आणून लावलीय. ती निवांतपणे पाहताना मला नेहमीच किशाभाऊंची आठवण येते.

किशाभाऊंनी जसा हा प्रसंग पुन्हा पुन्हा सांगितला तसा एक प्रश्न मीही त्यांना पुन्हा पुन्हा विचारी, 'अध्यात्मिक साधनेतून उन्नत झालेलं व्यक्तिमत्त्व देशकार्य उत्तम करेल की देशप्रेमानी भारलेलं व्यक्तिमत्त्व?...'

मला याचं उत्तर अगदी शेवटी मिळालं पण, अनेक दिवस मोघमपणे अनेक छोटी छोटी बौद्धिकं ऐकायला मिळाली. माझ्या दृष्टीनं ती मेजवानीच असे.

त्यांचं म्हणणं ‘शिवभावे जीवसेवा’, ‘कार्य हाच ईश्वर’, अशा तत्त्वांच्या अनुषंगाने यायचं. खरं तर माझं पूर्ण समाधान व्हायचं नाही. माझा प्रश्न पुन्हा ठरलेला असायचाच ‘विकसित व्हावे अर्पित होऊनि जावे’... यामध्ये विकसित कशाला म्हणायचं ? फक्त लौकिक अर्थानी विकसित होण्याला ? ... काहीही असो, असू देत पण, या प्रश्नासाठी कितीही उत्तरं, कितीही उदाहरणं दिली तरी माझं काही समाधान झालं नव्हतं...

त्या काही दिवसात माझं शिक्षणात आणि वर्धिनीच्या कामातही मन लागत नव्हतं... शंभर वैचारिक ग्रंथ अखंड वाचायचे असा संकल्प करून मी ‘वर्धिनीच्या ग्रंथालयात’ मुक्काम ठोकलेला असायचा... एक दिवस ते तिथे आले मी ‘विश्वगांधार’ वाचत होतो. चेष्टेच्या सुरात मला म्हणाले, ‘साहेब दहा-पंधरा मिनिटे वेळ देणार का आम्हाला?’ मी ओशाळून त्यांच्याबरोबर शेजारच्या ‘माडगावकर सभागृहात’ गेलो. आमच्यासाठी दोन खुर्च्या टाकल्या. आम्ही अर्धा तास तिथे होतो.

‘तू जे काही अध्यात्म साधनेविषयी बोलतो आहेस ते अगदी खरंच आहे... मलाही अशीच साधना करायची होती, पण नाही जमलं शेवटपर्यंत. पण तू मात्र कर... वर्धिनीची कुठली जबाबदारी तू घ्यावीस असं मी तुला कधीच म्हणणार नाही पण ज्या मार्गानं तू जाऊ इच्छितोस त्या मार्गानं शेवटपर्यंत जात रहा...’

**माझे आई-वडील, वर्धिनीचे इतर वरिष्ठ कार्यकर्ते मला ज्या मार्गापासून परावृत्त करत होते त्या मार्गानेच पुढे जा असा उपदेश देणारे किशाभाऊ मला एकटेच भेटले...**

त्यांच्या पत्नीच्या अंतिम दर्शनासाठी आम्ही गेलो असता किशाभाऊंनी एक सौम्य धक्का दिला...

आम्ही तिथे पोहोचलो तेव्हा भेटायला आलेल्या वरिष्ठांशी जणु काही झालेच नाही अशा मोकळेपणाने किशाभाऊ बोलत होते... प्रसंग लहान पण मनावर कोरला गेला हे मात्र नक्की...

त्यानंतर, मात्र किशाभाऊंची एकच भेट होऊ शकली... दोन वर्षांसाठी योगवैद्यक शास्त्राच्या अध्ययनासाठी जनसंपर्क पूर्ण बंद होता... त्यानंतरचं एक वर्ष कराड येथे वास्तव्यास होतो. दर गुरुवारी काही तासांसाठी पुण्यात चक्कर असे. अचानक एका बुधवारी मोबाईलची रिंग वाजली... तिकडून किशाभाऊ बोलत होते. आधी माझी चौकशी केली, लग्न ठरल्याचं अभिनंदन केलं. मला म्हणाले, 'जरा तब्येत बरी नाहीए. पुष्कळ औषधं घेतली पण काही विशेष गुण नाही, तू एक चांगला अभ्यासक्रम पूर्ण केलास असं ऐकलंय, त्यामुळे मला बरं कर...' मला फार वाईट वाटलं... दुसऱ्या दिवशी पुण्याला आल्यावर आधी किशाभाऊंना जाऊन भेटलो...

आधीच कृश त्यात आजारानं आणखीन थकलेलं त्यांचं शरीर पाहवलं नाही... पण, उत्साह आणि आवाज मात्र तसाच खणखणीत होता.

मला त्यांनी मानेचे आणि कंबरेचे एक्सरेज दाखवले, स्पाँडीलीसीस दिसत होताच... त्यामुळेच हातापायात मुंग्या येणे, बधीरता येणे, ताकद गेल्यासारखी वाटणे अशी लक्षणं दिसत होती... बरं करण्यासाठी उपचार शक्य होते... पण, माझी कराडला जाण्याची अडचण होती... मी जरा अवघडल्यासारखा बसून राहिलो...आपल्या चाणाक्षबुद्धीनं त्यांनी हे निश्चित हेरलं असणार...

म्हणाले, 'तू आता कराडला असतोस हे मला माहितेय, तुझा कुणी सहाध्यायी असेल तर त्याला माझ्याकडे उपचारासाठी पाठव...' मला हायसं वाटलं... कितीही इच्छा असून मला त्यांना उपचार देण्यासाठी थांबणं शक्य नव्हतं... पण, अनिरुद्ध नावाच्या एका मित्राला त्यांच्याकडे मी जाण्याची विनंती केली आणि उपचार सुरु सुद्धा झाले...

त्या दिवशी पुन्हा तोच प्रश्न समोर आला म्हणाले,'कशी चालली आहे साधना ? ध्यान-धारणा करतोस का?' म्हणलं 'हो'!... फार प्रेमानं आणि थकलेल्या आवाजात 'शाबास'! म्हणालेले ते शब्द अजून आठवतात.

पडल्यापडल्याच ते बोलत होते... मधे मधे थांबून दीर्घ श्वास घेत होते... 'समर्थ अभिप्रेत लोकनेता', असं एक छोटसं पुस्तक आहे ते मिळालं तर जरुर

वाच !'' मी म्हटलं ''वाचलंय !''... यावर विशेष प्रतिक्रिया न देता ते म्हणाले... त्यातली दोन तीन सूत्र लक्षात ठेव. मी कान देऊन ऐकू लागलो.

*'सामर्थ्य आहे चळवळींचे। जो जे करील तयांचे ।*
*परंतू, तेथे ईश्वराचे । अधिष्ठान पाहिजे ।।*

दुसरं

*देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।*
*मुलुख बडवावा की बुडवावा । धर्म संस्थापनेसाठी ।।*

तिसरं

*पहिले ते ईश्वरचिंतन । दुसरे ते राजकारण ।*
*तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ।।*

त्यामुळे देशासाठी कुठल्याही संस्थेचं काम करताना मन, मनगट आणि मस्तिष्क यांच्याआधी अध्यात्मिक विकास तेवढाच गरजेचा आहे.' मला माझं उत्तर मिळालं होतं... जवळजवळ सहा वर्षांनी.

हे किशाभाऊंचं माझं शेवटचं दर्शन... त्यानंतर, 'मला अनिरुद्धाच्या उपचारांनी रुपायातील १० पैसे बरं वाटलं' असा एक फोन आल्याचं आठवतंय... थोडंसं समाधान !

किशाभाऊ निवर्तले... पण, त्यांचे सगळेच शब्द मनात घर करुन आहेत... **'पैसे काय झाडाला लागलेत?' हा वाक्प्रचार सर्वत्र ऐकतोच, पण 'आता तुम्ही तुमचा वेळ पैशासारखा जपून वापरा उद्या त्या वेळेचाच पैसा होईल.' या त्यांच्या वाक्याची अनुभूती नित्यप्रत्ययाची झाली...**

सहा वर्षांच्या त्यांच्या मार्गदर्शनात मी त्यांना हसताना पाहिलं. एकदा अश्रू आलेलंही पाहिलं, गंभीर झालेलंही पाहिलं पण रागावलेलं मात्र एकदाही पाहिलं नाही... वर्धिनीविषयी, तिथल्या सगळ्या कार्यकर्त्यांविषयी, देशाविषयी त्यांच्या अंतर्मनात जे भाव होते त्यांचं दर्शन मला वेळोवेळी झालं... ते प्रत्येकवेळी वेगळं असलं तरी त्याचं साधर्म्य मला एकाच गोष्टीशी दिसायचं... ते म्हणजे 'रामकृष्णांच्या भावावस्थेशी'....!

# किशाभाऊंचे सलगी देणे कैसे असे ?

**– डॉ. प्रदीप आगाशे**

किशाभाऊ पटवर्धन हे सर्वांना गुणदोषासह सामावून घेणारं एक व्यक्तिमत्त्व. जीवनाचं एक ध्येय त्यांनी ठरविलं होत. त्या ध्येयाप्रत हा तपस्वी जीवनभर चालत राहीला.

''दिव्य ध्येयकी ओर तपस्वी जीवनभर अविचल चलता है'' ही काव्यपंक्ती त्यांचेबाबत सर्वार्थाने खरी ठरली. परिसस्पर्श झालेले वर्धिनीचे कार्यकर्ते तर आहेतच. ते भाग्यवान की त्यांना किशाभाऊंचा सहवास सतत लाभला

किशाभाऊंचे कैसे बोलणे?

किशाभाऊंचे कैसे चालणे?

किशाभाऊंचे सलगी देणे कैसे असे?

निश्चयाचा महामेरू,

बहूत जनांसी आधारू,

असे किशाभाऊंचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्याबाबत वर्धिनी व्यतिरिक्तही इतरही असंख्य आठवणी आहेत.

वर्धिनीच्या स्थापनेपासून मलाही त्यांचा सहवास लाभला. त्यांच्या सहवासातला प्रत्येक क्षण म्हणजे एक आठवण. यापैकी काही आठवणी देत आहे.

* **थोड्याही चांगल्या कामाचे भरभरून कौतुक हे मला त्यांच्याकडे पहावयास मिळाले. अर्थात म्हणूनच वांड आणि उनाड वाटणारी असंख्य मुले आज स्वरूपवर्धिनीच्या प्रवाहात आली** आणि 'विकसित व्हावे अर्पित होऊन जावे' हे तत्त्व जीवनात उतरविण्याचा आज प्रयत्न करताहेत.

* मी लोणावळ्याजवळ असलेल्या 'आंतरभारती बालग्राम' या संस्थेत त्यांचे समवेत तीन दिवस होतो. त्यांनी त्यावेळी माझ्या विज्ञान कीर्तनाचे, आरोग्यावरील लावण्यांचे सवाल जवाबांचे एवढे कौतुक केले की मी भोरहून पुण्यात आल्यावरही कितीतरी शाळात त्यांनी त्याचे कार्यक्रम घडवून आणले. मी संघाच्या प्रार्थनेचा अर्थ लक्षात घेऊन 'वत्सले हे मातृभूमी' हे पद्य रचले. ते वर्धिनीत आजही म्हटले जाते.

* शारीरिक कार्यक्रमानंतर मुलं एकत्र आल्यावर गटचर्चा अगर बौद्धिक कार्यक्रमापूर्वी थोडा दंगा चाले. परंतु किशाभाऊ आरडाओरड न करता अगर शिट्टीचा वापर न करता साऱ्यांना गप्प करीत. त्यासाठी त्यांनी एक अजब पद्धती वापरली. ते मुलांच्या पुढे उभे राहून एक, दोन, तीन ... असे अंक म्हणू लागत आणि मुले पाहता पाहता एकदम शांत आणि एकाग्र होत.

* वर्धिनीच्या कार्यकर्त्याविषयी त्यांना अतोनात प्रेम होतं. त्याचा परिचय करून देताना ते अगदी सोनं, रत्नं, हिरा अशा उपमा देऊन त्याचा गौरव करीत. त्यातूनच आज अनेक हिरे आणि रत्ने वर्धिनीत कार्यरत आहेत, आणि वर्धिनी बाहेरही वर्धिनीचा ठसा उमटवित आहेत.

* मी पुण्यात आल्यावर अर्थार्जनासाठी क्लासेस चालविले. परंतु त्याबाबतही विद्यार्थीहित सतत त्यांच्या डोळ्यासमोर असे, ते मला म्हणत 'विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे लक्ष ठेव. त्याच्या पालकांच्या खिशाकडे नको'' त्याचमुळे मला कधीही प्रचलित क्लासेससारखे माझे क्लासेस चालविणे जमले नाही.

* परंतु हे असताना अर्थार्जनाबद्दलही त्यांनी काळजी घेतली. माझे सर्व घर माझ्यावरच अवलंबून असल्यानं त्यांचा सतत आग्रह असे की मी ठराविक वेतन घेऊन वर्धिनीसाठी काम करावे. ते नेहमी म्हणत, 'प्रदीप, पैसा कमी नाही. माणसांचीच उणीव आहे'.

# आठवणी म्हणजे सुखद भूतकाळ

–प्रा. सौ. छाया सकटे (गायकवाड)

आठवणी म्हणजे सुखद भूतकाळ, ज्याच्या आठवणीवर जगतो वर्तमानकाळ, आणि ज्याच्या आधारे घडविता येतो भविष्यकाळ. एखाद्या विषयीच्या आठवणी लिहिणं म्हणजे, त्याच्याबरोबर पुन्हा तेच क्षण जगणं. किशाभाऊ पटवर्धन म्हणजे आमचे 'K.L.P.' सतत हसतमुख असणारे, जीवनातील प्रत्येक संकटाला धैर्याने सामोरे जा म्हणून सांगणारे, संकटाला सामोरे कसे जायचे ते शिकविणारे.

१२ वी झाल्यानंतर माझा संबंध 'स्व'–रूपवर्धिनीशी आला. तोपर्यंत जगात किती स्वार्थ आहे हे मला जाणवलं होतं. मी ते अनुभवत होते. पण वर्धिनीत आल्यावर निस्वार्थी माणसंही जगात असतात आणि आता आपण अशा माणसात आलोत हे जाणवल्यावर मी स्वत:ला फार सुरक्षित समजायला लागले. या सुरक्षिततेच्या भावनेने मला आत्मविश्वास मिळाला. ज्याच्या जोरावर मी आजही स्वत:ला सावरते आहे.

वर्धिनीच्या इमारतीत काम करीत असल्याने K.L.P. शी गप्पा मारण्याचा योग खूप वेळा आला. दुपारी सरांबरोबरचं जेवण म्हणजे अनुभवांची मेजवानी असे. मनोरंजनाबरोबरच जीवनमूल्यंही त्यातून शिकायला मिळत असत. सरांचा खरा हेतूही तो असे. वर्धकाच्या आयुष्यातील प्रत्येक घटना सरांसाठी महत्त्वाची असे. **माझं लग्नं जमविताना माझ्या घरच्यांनी लग्नं जमवलं, खर्चाचा प्रश्न होता पण तोही सरांनी सोडविला. माझ्या घरच्यांना जेवढं टेन्शन होतं तेवढं सरांच्या चेहऱ्यावर मी पाहिलं आहे. माझ्या लग्नातील जेवणाचा खर्च कोणी केला हे आजतागायत मला कळले नाही.** सरांना विचारले असता सर म्हणायचे लग्न एकदाच करायचं असतं, तू टेन्शन घेऊ नकोस. तू आनंदी राहा. सरांना भेटायला गेले असता सरांनी लग्नांची सर्व चौकशी केली. सरांच्या कदाचित लक्षात आलं असावं की, मी शालू घेणार नाही. साधी साडीच घेणार आहे. मी निघताना **सरांनी**

**दोन हजार रुपये माझ्या हातात दिले व म्हणाले, 'छाया, लग्नाचा शालू घे!' आजही ही आठवण लिहिताना मला कागदावरची अक्षरं दिसत नाहीत. आलेला हुंदका आवरता येत नाही.** खरंच माझी मागच्या जन्माची काहीतरी पुण्याई असेल म्हणून मला अशा लोकांची माया मिळाली. सर आमच्याशी असे मायेने वागायचे, आपलेपणाने वागायचे म्हणून कदाचित आम्हालाही दुसऱ्याशी वागताना चांगलं वाग असं सांगावं लागत नाही.

आम्ही केलेल्या प्रत्येक गोष्टीचं सरांना फार कौतुक असायचं, आलेल्या पाहुण्यांना आवर्जून आमचे मार्क्स, इतर गोष्टी सर सांगत. परीक्षा जवळ आली की म्हणायचे, 'अभ्यास कर सांगणार नाही, पण ६०% पेक्षा कमी मार्क चालणार नाहीत. ६०% ला जेवढे कमी मार्क असतील तेवढे % X २ एवढे फटके खावे लागतील. 'आम्हाला सरांच्या बोलण्यातला रोख कळायचा. कारण **आम्ही जरा दंगेखोर मुली होतो. वर्षभर अभ्यासाकडे लक्ष दिलेले नसायचे. याची जाणीव सरांना असल्याने आम्हाला अशी धमकी (मायेपोटी) मिळायची. आज मी जे काही आहे त्याचे सर्व श्रेय सरांच्या या धमकीला द्यावे लागेल. कारण दरवर्षी आम्ही कधी ६०% पेक्षा खाली आलो नाही. आणि सरांना गुणाकार करण्याची संधी दिली नाही.'**

मला दोन जुळी मुलं झाली. वर्धिनीतील सर्व लोक बघून गेले. प्रत्येक जण म्हणत होते, सरांना आता चालवत नाही. तब्येत फार नाजूक झाली आहे. नाहीतर सर नक्की आले असते. तेव्हा मी ठरवलं होतं की, विटाळाला कामावर जाण्याआधी सरांकडे नक्की जायचं. पण वर्धिनीच्या परिवारात एवढी आनंदाची गोष्ट घडावी आणि सरांनी यात भाग घेऊ नये. असं कसं शक्य आहे. सर तिसऱ्या दिवशी दवाखान्यात मला भेटायला आले. दोघांनी सरांना धरून आणलं होतं. शरीर साथ देत नव्हतं. पण मुलीवरचं प्रेम त्यांना स्वस्थ बसू देत नव्हतं. सरांनी बाळांना मांडीवर घेतलं. माझ्या डोक्यावरून मायेचा हात फिरविला. सरांची व माझी ही शेवटची भेट ठरली. सर गेले तेव्हा मी विटाळाला होते. बाळं लहान असल्याने मला अंत्यदर्शनाला येता आले नाही. यासाठी मी अजूनही स्वत:ला माफ करू शकलेले नाही.

# Kishabhau : A Genuine Man

– Swami Divasevananda (Milind)

It was my twin brother Madhav because of whom I came to know about 'Swa'-Roopwardhinee and Shri K L Patwardhan. When I first came in Ramakrishna Shakha I was impressed with the different games, discipline, prarthana and studies etc. I soon found all the wardhaks to be the salt of society and all are dedicated, devoted, spirited & enthusiastic to put the cause of 'Swa'-Roopwardhinee into practice. The concept of oneness 'solidarity', the feeling for the distressed wardhakas & society and the missionary zeal to practice and propogate cultural values and by studying hard, securing good marks, securing a degree i.e. to stand on one's own feet these things appealed to my mind immediately and I got dissolved in the ocean of 'Swa'-Roopwardhinee. After few months I came to know that the source behind all these activities is Shri. K. L. Patwardhan (Called कृ. ल. or किशाभाऊ). He had deep faith in our age old culture. He had a fervent reverence towards all our Rishis, Saints & Mystics. Patriotism was also a dominant factor in his character. As a mother nurtures / feeds and brings up her child, respected, Shri. K. L. Patwardhan Sir, would look upon us in the same manner and we owe to him what we are today.

I had a deep interest in Astronomy and Telescope making. Shri K L Patwardhan knew it so he introduced me to Shri. Patwardhan of Wardhan Works & he taught me to make a

Telescope. In this way Shri K L Patwardhan would help and guide Wardhakas to grow / develop in their respective subjects.

I will not go into the details as to how the institution is running & what departments it is having today but the basic principles which Swami Vivekananda taught to all of us like man making, character building, life giving principles, strengthening of character etc. I found Shri. K. L. Patwardhan was inspiried by these principles and he translated them in wardhinees lives. In todays world there is information boom all around and moral & cultural values are degrading \ eroding on fast track and there is a scarcity of men like Shri. K. L. Patwardhan. Swami Vivekananda says "Men, Men are wanted, pure and selfless men, sincere to the backbone are wanted. Then everything else will come on its own. Swamiji further says "You give me ten genuine men and I will revolutionise the whole world". Shri. K.L. Patwardhan was one such man. By the grace of Shri. Ramakrishna I am a monk in the holy monastic order founded by Shri. Ramakrishna-Vivekananda.

I would like to tell you, it was Shri. K L Patwardhan who first introduced me in Ramakrishna Math & Ramkrishna Mission. It so happended that I was passing through a difficult phase in my life and I was unable to decide whether I should become a householder or I should renounce wordly life and embrace monastic life. Shri K L Patwardhan was a keen student of human mind & psychology and like an expert doctor, found out the disease and suggested me to go to Ramakrishna Math . He not only suggested the remedy but he telephoned to Swami Bhaumanandaji of Ramakrishna Math, Pune, took his

appointment & sent me to meet the Swami. Shri K L Patwardhan's one instruction \ direction \ suggestion and my meeting with Swami Bhaumanadaji has changed my life and today I am blessed to be a monk of the holy monastic order founded by Swami Vivekananda, inspirer of many patriots, political leaders of pre Independence India. I pray to Shri. Ramakrishna, Holy Mother Sarada Devi & Swami Vivekananda for spiritual unfolding & well-being of soul of shri K L Patwardhan . I would also like to take this opportunity & pray to the Holy Trinity that the cause and purpose for which shri K L Patwardhan started 'Swa'-Roopwardhinee, let it be fulfilled and let 'Swa'-Roopwardhinee grow & sustain like a big banyan tree and give shelter, peace , solace, direction to all the souls who come there.

## निःस्वार्थीपणाचा संस्कार

एक दिवसीय वर्धिनीच्या कार्यालयातून पटवर्धन सर घरी लीलाताईंना फोन करीत होते. फोन झाल्यावर त्यांनी दोन रुपयाचे नाणे वर्धिनीच्या कोषात जमा केले. हे पाहिल्यावर मी सहज म्हटलं, ''सर, हे काय? अहो, तुम्ही वर्धिनीचे काम करताय मग...'' माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आत सर म्हणाले, ''समाज, जो आपल्याला पैसा देतो, तो वर्धिनीच्या कामासाठी. आत्ता केला तो माझा खाजगी फोन होता''. या छोट्याशा प्रसंगातून मला त्यांच्यातील सामाजिक नीतीचे दर्शन घडले.

**श्रीमती पुष्पाताई नडे**

# मूर्तिमंत गुणग्राहकता

**–श्रीमती अरुणा द. बर्वे**

राजा धनराज गिरजी हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून सर काम पाहत असताना मी नोकरीसाठी अर्ज घेऊन त्यांच्याकडे गेले होते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले, 'चेअरमनसाहेबांकडे अर्ज द्यायला हवा. ते शाळेत येतात, पण कधी ते मी सांगू शकत नाही. आता ते बाबाजान चौकातील मुख्य शाळेत असतील.' मी म्हणाले, 'मग ते जेव्हा येतील तेव्हा तुम्हीच त्यांना द्या ना हा माझा अर्ज. मला काही कँपमधली शाळा माहीत नाहीये.' सर म्हणाले, 'बाई, एक गोष्ट नेहमी ध्यानात घ्या. अशी महत्त्वाची कामं ज्याची त्यानंच करायची असतात. दुसऱ्यांवर विसंबून राहून, हस्ते-परहस्ते कधी कामं होत नसतात. बाहेर जाऊन रिक्षा करा, रिक्षावाल्यास बाबाजान चौक सांगा. स्वत: जाऊन अर्ज द्या'.

प्राथमिक ओळख नसतानादेखील इतके परखडपणे सांगणारे असे हे आमचे मुख्याध्यापक सर. आज इतक्या वर्षानंतरही तो प्रसंग मला स्पष्टपणे आठवतोय.

त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी गेले, अर्ज दिला. मला मुलाखतीला बोलावले गेले. मुलाखत होऊन कँप एज्युकेशन सोसायटीच्या राजा धनराज गिरजी शाळेत मी नोकरीवर रुजू झाले.

असाच एकदा भूगोलाचा तास होता. मला पक्के आठवतेय– मी स्थानिक वेळ व प्रमाण वेळ या संकल्पना शिकवीत होते. सर वर्गामध्ये आले, बसले जाऊन मागच्या बेंचवर. तास ऑब्झर्व्ह केला. त्यांना माझे शिकवणे खूप आवडले. त्यांनी सर्वांना तसे सांगितलेसुद्धा. एखाद्याचे कौतुक करणे, ही आजकाल दुर्मिळ होऊ पाहणारी गोष्ट सरांच्या ठायी विपुल होती.

पटवर्धन सरांच्या कारकिर्दीतले अनेक कडू-गोड प्रसंग आम्ही पाहिले, पण त्यांनी कशाचाही परिणाम आपल्या कार्यावर होऊ दिला नाही. राजा धनराज गिरजी हायस्कूलच्या आसपास दोन-तीन चित्रपटगृहे आहेत. चार-पाच शिक्षकांना मदतीला घेऊन जे विद्यार्थी शाळा बुडवून चित्रपट पाहण्यास जात त्यांना पटवर्धन

सर पकडून आणत असत. मुख्याध्यापकांच्या खोलीत त्यांना उभे करून कडक शब्दांत सुनावत. मग प्रेमाने त्यांची समजूतही घालत.

मला अजून तो प्रसंग आठवतोय... एम.ए.साठी शाळेने मला परवानगी दिली होती. शाळेच्या रिझल्टची कामे सुरू होती. माझे पेपर्स होते, त्यामुळे इतरांपेक्षा माझे काम मागे होते. माझी परीक्षा संपल्यावर दुसऱ्या दिवशी साधारण दुपारी दीड-दोनच्या सुमारास शिपायांमार्फत सरांचा निरोप आला. मी ऑफीसमध्ये गेल्यावर त्यांनी माझ्या रिझल्टच्या कामाची चौकशी केली. काम कुठपर्यंत आलंय, असे विचारल्यावर मी त्यांना सांगितले, ''सर, मी सकाळी आठपासून बसलेय. काही खाणे-पिणे नाही. आतापर्यंत कामच करतेय. पण आता सगळ्यांबरोबर काम आलंय.'' ''छान! त्यासाठीच बोलावलं होतं.''

मी पुन्हा येऊन माझ्या कामाला लागले. अर्ध्या तासाने पुन्हा सरांचा निरोप आला मला बोलावलंय. म्हणून. मी ऑफिसमध्ये गेले तर काय-डिशमध्ये डोसा-चटणी. शेजारी पाण्याचा ग्लास. सर म्हणाले, **''बसा. काही खाल्लं नाहीत ना सकाळपासून. खा, पाणी प्या, मग काम करा.'' मी एक दुय्यम शिक्षिका, पण इतके आत्मीयतेने वागणारे, कामाची कदर करणारे सरांसारखे मुख्याध्यापक असतील तर मग कामे का होणार नाहीत वेळेत?** चटपटीतपणा हा तर त्यांचा जणू स्थायीभावच होता. इतका, की आता ग्राऊंडवर, तर लगेच दुसऱ्या मजल्यावर दिसतील. दुष्ट प्रवृत्तींशी लढा देत, तिकडे दुर्लक्ष करत आपले काम निष्ठेने करीत ते निवृत्त झाले.

मंगळवार पेठेतील व आजुबाजूच्या परिसरातील आर्थिक विवंचना असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासात मार्गदर्शन करण्याचे काम, अभ्यासासाठी त्यांना जागा देऊ करत, त्यांच्यातील सुप्त गुणांची वाढ करण्याचे काम त्यांनी मोठ्या जोमाने सुरू केले. आज स्व-रूपवर्धिनीचे नाव सगळीकडे गाजतेय, त्याला पटवर्धन सरांची अथक मेहनत, विद्यार्थ्यांविषयीचे प्रेमच कारणीभूत आहे. स्व-रूपवर्धिनीचे काम त्यांच्या अनुपस्थितीतही अखंड सुरू राहो. अशी देवाजवळ प्रार्थना करण्यापलीकडे आपल्या हातात काय आहे?

(दै. सकाळमधून पुनर्मुद्रित)

# किशाभाऊ - एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व

**– नंदकुमार कानडे**

साधारणपणे ऑक्टोबर १९७२ मधील प्रसंग. मा. अप्पा पेंडसे यांचे मा. किशाभाऊ यांच्याबरोबर बोलणे चालू होते, त्यावेळी विषय होता मार्केटिंग. त्यावेळी किशाभाऊ म्हणाले, ''सोपी गोष्ट आहे, मुंबईच्या रस्त्यावर बसलेल्या फळविक्रेत्यांकडून सफरचंद घेऊन सदऱ्याच्या बाहीवर घासून चकचकीत करून टॅक्सीतल्या साहेबाला जास्त किमतीला विकू शकणारा मुलगा जे करतो ते म्हणजे मार्केटिंग. मार्केटिंगची इतकी सोपी व सुटसुटीत व्याख्या मी तरी ऐकलेली आठवत नाही. एखादी गोष्ट इतकी सोपी करून सांगणे यात किशाभाऊंचा हातखंडा होता.

एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की ती गोष्ट पूर्ण करण्याकरिता स्वत:ला झोकून देणे हेही त्यांचे एक स्वभाववैशिष्ट्य मला एका घटनेतून जाणवले. त्यांचे एक स्नेही श्री. सखाराम पंडित यांनी ठाणे जिल्ह्यामध्ये एक वृद्धाश्रम चालू केला होता. त्यासाठी अर्थसाह्य गोळा करण्यासाठी किशाभाऊ धडपडत होते. त्यासाठी त्यांनी मला काही रक्कम देण्यास सांगितले. त्याचवेळी त्यांनी या रकमेवर व्याज मिळणार नाही; पण मूळ रक्कम परत करण्याचा प्रयत्न करीन असे सांगितले. मध्यंतरी काही काळ लोटला. याबाबत आमचे काहीही बोलणे झाले नाही. परंतु त्यांच्या शेवटच्या काही दिवसात त्यांनी मला मुद्दाम बोलावून सांगितले की त्या रकमेच्या परतफेडीची व्यवस्था केली आहे. एक आठवड्यानंतर मला धनादेश मिळाला आहे ना याची खात्रीही करून घेतली. **आपला शब्द पूर्ण करण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करीत राहावयाचे हा त्यांचा गुणधर्मच झालेला होता.**

गुणग्राहकता आणि संघटन याबाबतीत तर किशाभाऊ रत्नपारखीच होते. खाणीतील कोळशाचा दगड काढून, त्यांना पैलू पाडून रत्न तयार करावयाचे हा तर त्यांचा नित्यक्रम होता. अशा अनेक उनाड मुलांचे जबाबदार कार्यकर्त्यांमध्ये रूपांतर झालेले मी पाहिले आहे. संस्थेच्यावतीने एखाद्या नवीन व्यक्तीला ते

भेटायला गेले की नंतर पाठपुरावा करून तो माणूस आपल्या संस्थेला जोडला जाईल याची ते काळजी घेत असत.

किशाभाऊंची कॉफी हा तर आमच्या चर्चेचा एक नेहमीचाच विषय असायचा. त्यांनी कॉफी पाजतो किंवा तुझ्याकडून कॉफी पाहिजे असे म्हटले की ते काहीतरी काम सांगणार आणि आपल्याकडून करून घेणार याची आम्हाला खात्री असायची. कोणत्याही नवीन माणसाची ओळख करून घेण्याआधी त्यांची माहिती करून घेणे व नंतर सलगी निर्माण करणे हाही त्यांचा एक आवडता छंद होता. त्यानंतर वेगवेगळ्या निमित्ताने भेटीला/ कार्यक्रमांना बोलावून ती व्यक्ती संस्थेला जोडली जाईल आणि काही काळानंतर संस्थेच्यावतीने कामही करायला सुरुवात करेल अशी काळजी किशाभाऊ घेत असत.

आपल्या संस्थेतील मुलांना बाहेरील जगाची ओळख व्हावी व सामान्य ज्ञान वाढावे यासाठी निरनिराळ्या क्षेत्रातील व्यक्तींना बोलावून त्यांची व्याख्याने आयोजित करणे व कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांचे मार्गदर्शन मुलांपर्यंत पोहोचविणे असा त्यांचा प्रयत्न असे. असेच एकदा किशाभाऊ मला 'स्व'-रूपवर्धिनीत बोलण्यासाठी घेऊन गेले. त्यावेळी मी ज्ञान प्रबोधिनीच्या 'दुग्धघट' विभागाचे काम बघत होतो. हे काम पुण्यापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावरील करंजावणे या गावी होते. त्या संदर्भात बोलत असता वर्धिनीतील विद्यार्थ्यांनी विचारलेले प्रश्न आजही आठवतात. एका विद्यार्थ्याने विचारले होते की, इतक्या मागास भागात काम करताना कुशल कर्मचारी कोठून मिळतात? तर दुसऱ्याने विचारले, 'या कामाकरता लागणारा कच्चा माल कसा आणता? तिसऱ्याने विचारले, 'तेथे बँक नसेल तर पैशाचे व्यवहार कसे करता? इ. यावरून लक्षात येते की, पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञानसुद्धा मुलांना मिळाले पाहिजे, असा किशाभाऊंचा खटाटोप होता.' नवनवीन कल्पनांवर चर्चा करून त्यातील व्यवहार्य कल्पनांना मूर्त स्वरूप देणे हा त्यांच्या कामाचा एक भाग होता. त्यातील 'मोबाईल लॅबोरेटरी' हा एक प्रकल्प मला विशेष भावला आणि या प्रकल्पाद्वारे ग्रामीण भागातील पुष्कळ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला. याबाबतचे अभिप्रायही अनेकांकडून ऐकावयास मिळाले.

# वटवृक्षाच्या छायेत...

**– मधुकर अ. गद्रे**

गोरी शिडशिडीत अंगकाठी, सरळ नाक, पांढरेशुभ्र केस आणि तेज:पुंज घारट डोळ्यांवर असलेला साधा चष्मा. पांढराशुभ्र नाही तर भगवा झब्बा आणि पांढराशुभ्र पायजमा. डाव्या मनगटात सैलसं बसणारं साधं घड्याळ, आणि क्वचित वेळेचं भान लक्षात आल्यावर हाताची मूठ स्वत:कडे वळवून वेळ पाहण्याची सवय– बरेचसे नाकानं बोलणारे पण घंटानादासारखे स्पष्ट बोलणारे आमचे सर– किशाभाऊ पटवर्धन– 'स्व'–रूपवर्धिनी'चे अध्वर्यु– आज आमच्यात नाहीत ही कल्पनाच मनाला असह्य वाटते.

राजा धनराज गिरजी हायस्कूलमध्ये सर आम्हाला शास्त्र शिकवायला होते. खरं तर शास्त्र हा विषय फक्त सरांनीच शिकवावा. अवघड विषय सोपा करून शिकवायची सरांची एक विशिष्ट धाटणी होती. त्यामुळे नंतरही आम्हाला तो विषय कधी अवघड गेला नाही. **प्रत्येक अवघड वाटणाऱ्या प्रश्नाला का, कोठे, कसे, कधी, केव्हा हे प्रश्न विचारले की त्याचे उत्तर मिळते– ही सरांची शिकवण आम्हाला नंतरच्या आयुष्यात येणाऱ्या कठीण प्रसंगांना तोंड देताना उपयोगी पडली,** आजही तिचा उपयोग आम्ही करीत आहोत.

स्वामी विवेकानंदांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवणारे आमचे सर, आमच्या प्रगतीकडे बारीक लक्ष ठेवून असायचे. त्यामुळे एखाद्या वर्षी मार्क कमी मिळाले की 'गधड्या' ह्या शब्दाने सुरुवात करून, आमच्या खांद्यावर हात ठेवीत 'पुढे चला' म्हणणारे सर आम्हाला नेहमी आवडायचे. नंतरच्या काळात कधी त्यांना भेटायला गेलो तर 'गधड्या, कसा आहेस?' हे त्यांचं ठरलेलं वाक्य ऐकून कृतार्थ वाटायचं. **त्यांच्या 'गधड्या' ह्या शब्दात प्रेम होतं, विद्यार्थ्यांबद्दल वाटणारी आपुलकी होती. तसंच त्यांनी 'पुढे चला' म्हटल्यावर अंगावर मूठभर मांस चढायचं.** हे दोन शब्द खरं तर फक्त सरांनीच म्हणावेत आणि

आम्ही ते ऐकावेत. बाकी कोणाला त्याचा अधिकार नाही. अशा आमच्या सरांबद्दल आमच्या मनात एक आदरयुक्त भीतीही होती.

नंतर कालांतराने सरांनी शाळा सोडली. दहा-पंधरा मुलांना घेऊन तीस वर्षांपूर्वी मंगळवारातल्या नगरपालिकेच्या शाळेत सरांनी मुलांना घडवायला सुरुवात केली. त्यावेळी आम्ही हजर होतो. सरांच्या त्या 'स्व'-रूपवर्धिनी'त खाजगी नोकरीच्या वेळेच्या बंधनामुळे आम्ही सक्रिय भाग घेऊ शकत नव्हतो, याचे मनातून वाईट वाटायचे. पण झपाटल्यासारखे काम करीत सर मुलांना घडवीत होते. नाना प्रकारच्या योजना आखीत. **कॅन्सरने सरांच्या पत्नी गेल्या तेव्हाही त्या ऋषितुल्य, स्थितप्रज्ञ डोळ्यांत आम्ही आसवं पाहिली नाहीत! उलट 'मला आता हिरिरीने कामाला लागलं पाहिजे. वर्धिनीचा व्याप वाढतो आहे' असं म्हणणारे सर आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहेत.** आज 'स्व'-रूपवर्धिनीला' पाहायचं म्हणजे उंच मान करून आकाशाकडे पाहाव तशी तिची व्याप्ती वाढली आहे. आणि या सर्वांच्या पाठीमागे आहे सरांची जिद्द, त्यांच्या अनंत ओळखी आणि त्यांच्या कुठल्याही कामात त्यांना 'हो' म्हणणारे त्याचे असंख्य हितचिंतक, स्नेहांकित, मित्र आणि विद्यार्थीसुद्धा! सरांच्या सूचनेला किंवा शब्दाला कोणी नकार दिला नाही. सर कधी कुणाला 'अहो' म्हणून म्हणाले नाहीत. त्यांच्या 'अरे'मध्ये एक प्रकारचा विश्वास होता, प्रेम तर होतंच, हक्कही होता. कामसू माणसांना जोडण्याची त्यांची सवय होती.

दरवर्षी वर्धिनीचा होणारा तिळगूळ समारंभ म्हणजे सरांना भेटण्याचा खास दिवस! आम्ही त्या समारंभाला हक्काने जाणार हे निश्चित. डोळ्याचे पारणे फिटावे असा तो तिळगूळ समारंभ असायचा! सर निमंत्रितांच्या गराड्यात असायचे. वाट काढीत, सर्वांसमक्ष सरांना नमस्कार केला, त्यांचा 'गधड्या' हा शब्द ऐकला की मन प्रसन्न व्हायचं. सगळ्या काळज्या, चिंता नाहिशा व्हायच्या. नवीन उमेद, जिद्द मनात घेऊन आम्ही देवाजवळ प्रार्थना करायचो, 'देवा, सरांना भरपूर आयुष्य दे.'

वयाची ८४-८५ वर्षे सर एका ध्येयासाठी जगले. अशी ऋषितुल्य,

तेजस्वी माणसं भाग्यवंतांनाच भेटतात. आमचं भाग्य थोर म्हणून सरांच्या त्या वटवृक्षाच्या छायेत आम्ही विसावा घेतला. सरांच्याच भाषेत सांगायचं तर 'आम्ही बी घडलो'. हे घडवण्याचं काम परमेश्वर नावाची अफाट विश्वशक्ती मोजक्याच लोकांना करायला सांगत असते. सर त्यापैकी एक होते.

आज सर आमच्यात नाहीत. पण मनात एक विचार येतो, स्वर्गामध्ये-सुद्धा असं घडवण्याचं कार्य करण्यासाठी देवाने त्यांना आमंत्रित केलं असावं. 'स्व-रूपवर्धिनी'नं आजपर्यंत खूप मुले 'घडली', यापुढेही 'घडतील'. सरांनी नेमून दिलेल्या पायवाटेवरून जाताना ही वर्धिनी आणखी मोठी होईल, चिरायू होईल. सर्वव्यापी होईल. अशा गुरूच्या सान्निध्यात आमच्या आयुष्याचा काही काळ गेला हे आमचं सद्भाग्य. 'आम्ही सरांचे अत्यंत ऋणी आहोत' हे म्हणताना सरांनी 'गधड्या' ही म्हणावं आणि 'पुढे चला' ही म्हणावं असं मनोमन वाटतं. पण यापुढे ते शक्य नाही हेही समजतं.

आमच्या आयुष्यावर उमटलेली सरांची प्रतिमा ही आमची श्रीमंती आहे. ती अक्षय आहे. आणि शेवटपर्यंत ती तशीच आदराने, प्रेमाने ओथंबलेली राहणार आहे. आमची गुरुदक्षिणा हीच.

## ओळखी न विसरणारे सर

मी ज्ञानप्रबोधिनीची विद्यार्थिनी. त्यामुळे त्या काळात पटवर्धन सरांना प्रबोधिनीत पाहिले होते. महाविद्यालयात असताना वर्धिनीचे काम जवळून पाहण्याची व पटवर्धन सरांशी बोलण्याची मला संधी मिळाली. त्यानंतर जवळपास पंधरा वर्षांनी जेव्हा सर श्रेयस हॉटेलमध्ये एका मिटिंगसाठी आले होते तेथे मला पाहिल्यावर त्यांनी मला लगेच ओळखले आणि नावाने हाक मारून माझी चौकशी केली. अप्पासाहेब पेंडसे असतील किंवा किशाभाऊ पटवर्धन सर या लोकांकडे फार जबरदस्त शक्ती होती असं मला वाटतं.

**श्रीमती गीता तांबे**

# भाग्यवंत सांज

**-श्रीकांत तथा मामा मोडक**

मला ज्या कार्यात रूची, त्याच कार्यातील एक नाही, दोन नाही, तीन दिग्गज मला एका संध्याकाळी भेटले. त्या संध्याकाळला मी 'भाग्यवंत-सांज' म्हणणेच योग्य होईल. त्या संध्याकाळी घराच्या दरवाजात एक व्यक्ती उभी राहिली. 'आपणच श्रीकांत मोडक ना? मी वासुदेव खाडीलकर. तुम्हाला दादांकडे घेऊन जाण्यासाठी आलोय'. पाच मिनिटातच आम्ही दादांच्या म्हणजे के.डी. जोशी यांच्या बंगल्यावर पोहोचलो. मला काहीही बोलायची संधी न देता के.डी.नी डोमरीच्या गुरूकुलासंबंधीची सर्व माहिती एका दमात सांगून टाकली. 'मग, केव्हा जायचं प्रत्यक्ष डोमरी पहायला? असं विचारलं. मीही म्हटलं. कधीही जाऊ, पण तिथे राहायला मात्र १ एप्रिल नंतरच, कारण माझ्याकडे ९ वी व १० वी च्या गणित, शास्त्राच्या शिकवण्या आहेत. त्यांची वार्षिक परिक्षा झाल्याशिवाय मी पुण्याबाहेर जाऊ शकत नाही'. माझे स्पष्टीकरण संपण्यापूर्वीच त्यांनी फोन करून किशाभाऊ पटवर्धन नावाच्या व्यक्तीला बोलावले.

सात-आठ मिनिटांतच बाहेरचे गेट वाजले, 'काय रे, कुठे एवढी आग लागलीय, जी विझवायला मला इतक्या घाईने बोलावलय' अस म्हणत एका अुसळत्या अुत्साहाने व्हरांड्यात प्रवेशही केला. हे मामा मोडक, आणि मामा हे स्वरूपवर्धिनीचे किशाभाऊ. के.डी. ने आमचा परिचय करून दिला. ''बरं यांना डोमरीकरता विचारले आहेत ना? किशाभाऊचे फापट पसारा न वाढवता थेट मुद्द्यालाच हात घालणे मला आवडले.' ९वी-१० वीच्या शिकवण्या करतात म्हणून मार्च अखेरपर्यंत डोमरीला येऊ शकत नाहीत. 'अरे वा! मग मामा तुम्हाला मी पुढच्या दोन वर्षाच्या शिकवण्या देतो, दिवसभर शिकवण्या करा व संध्याकाळी या वर्धिनीच्या शाखेवर. दादा तुम्ही डोमरीकरता आणिक कुणीतरी शोधा'. मला ही खोचक विनोद बुद्धी आवडली. किशाभाऊंनी माझा ताबा

घेतला. मला अगदी थोड्या वेळात स्वरूपवर्धिनीची माहिती दिली. व सर्वांना ऐकू जावे म्हणून मोठ्या आवाजात म्हटले, 'मग काय मामा वर्धिनीत केव्हा पासून येताय'. मी ही म्हटलं 'आजपासून' आणि सगळेजण हसले.

## प्रोत्साहन आणि नकळत प्रशिक्षणही...

वर्धिनीत काम करण्यापूर्वी खूप लोकांमध्ये मिसळण्याची, गप्पा मारण्याची मला सवय नव्हती. वर्धिनीत कोणत्या ना कोणत्या निमित्ताने पटवर्धन सर अनेकांना वर्धिनीचे काम दाखवायला घेऊन यायचे. ओळख करून द्यायचे आणि म्हणायचे आता सांगा तुम्ही काय काम करता? अशा मोठ्या माणसांसमोर बोलण्याचा सराव नसल्याने थोडा संकोच असायचा व नकळत दडपणही. सर मात्र नवी नवी निमित्तं शोधून आमच्यातील संकोच/दडपण काढून टाकण्याचा प्रयत्न करायचे. एक दिवस त्यांनी मला सांगितले की, पुष्पाताई आपले रमेश जोशी आहेत ना त्यांची फॅक्टरी वर्धिनीच्या जवळ संगमब्रीजवरच आहे. तुम्ही महिन्यातून एकदा त्यांना जाऊन भेटायचे व त्यांच्याशी गप्पा मारायच्या. खूप दडपण आलं. पहिल्यांदा रमेश जोशी यांच्या कंपनीत गेले तेव्हा आणखीनच गोंधळले. जोशी सरांनी त्यांच्या केबिनमध्ये बोलावल्यावर दडपण आणखीनच वाढलं. केबिनमधील गुबगुबीत खुर्चीवर बसले खरी; पण काय बोलावं हेच सुचेना. मग रमेश जोशी सरांनीच गप्पा मारायला सुरुवात केली. काय काय काम चालतं याची चौकशी केली. शिवणकामातील महिलांचे अनुभव मी सांगत होते ते ऐकता ऐकता त्यांनी एक पिशवी समोर ठेवली आणि म्हणाले, 'तुमच्या महिला अशा पिशव्या शिवून देतील का?' त्यांच्या आत्मीयतापूर्ण बोलण्यामुळे माझे दडपण तर कुठल्या कुठे गेले आणि माझ्या हे लक्षात आले की अशी मोठी माणसं आपल्यासारख्या कार्यकर्त्यांशी किती सहज गप्पा मारतात, त्यांना कामाबद्दल किती आपुलकी आहे. हळूहळू त्यांच्याकडे जाणं वाढलं आणि आत्मविश्वास वाढला. पटवर्धन सरांचे हे जे तंत्र होते त्याचे मोल आज मला समजते आहे. प्रोत्साहन देता देता सरांनी माझे प्रशिक्षणही किती सहजपणे घडवून आणलं?

**श्रीमती पुष्पाताई नडे**

# सहवासातून जाणवलेले किशाभाऊंचे व्यक्तिमत्त्व

**–शिरीष पटवर्धन**

कै. किशाभाऊंचे व्यक्तिमत्त्व हे बहुआयामी होते. अनेक प्रकारच्या अनुभवातून गेल्यामुळे या व्यक्तिमत्त्वाला नकळत एक उंची प्राप्त झाली होती. अनेक वर्षे त्यांचा मिळालेला सहवास, त्यांच्याशी झालेल्या गप्पा यातून उलगडत गेलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही गुणवैशिष्ट्यांचे हे दर्शन–

● **लहान वयातील 'संघटक' किशाभाऊ –** लहान वयातच किशाभाऊंचा संघाशी संबंध आला त्यामुळे आपल्या शाखेत नवे नवे स्वयंसेवक आले पाहिजेत असा विचार त्यांच्या मनात त्याही वयात असायचा व हा नुसता विचार नव्हता तर त्यांनी प्रत्येक तुकडीत पहिल्या पाच क्रमांकांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांशी मैत्री करायची आणि त्यांना शाखेत आणायचे असा प्रयोग अनेक वर्षे केला. किशाभाऊंमुळे शाखेचा स्वयंसेवक झालेल्या त्यांच्या एका मित्राच्या तोंडूनच किशाभाऊंच्या या संघटनकौशल्याची आठवण ऐकायला मिळाली होती.

● **प्रचंड जिद्दी–** संस्था संघटनांना जन्म देणाऱ्या अनेकांमध्ये हा गुण ठसठशीतपणे जाणवतो. या गुणाच्या बळावरच कदाचित अशी माणसं काही भव्य-दिव्य कामं उभी करू शकतात आणि सर्व प्रकारच्या अडी-अडचणींवर मात करू शकतात. किशाभाऊंची हुषारी पाहून त्यांनी वैद्यकीय शाखेकडे जावे, डॉक्टर व्हावे अशी घरच्यांची, त्यातही विशेष, त्यांच्या थोरल्या बंधूंची इच्छा होती. हे थोरले बंधूही डॉक्टरच होते. या अपेक्षांना अनुकूल प्रतिसाद देण्याऐवजी किशाभाऊंनी १९४२ च्या क्रांतीत उडी घेतली आणि पुढे तर संघाचे प्रचारक म्हणून काम करू लागले. संघप्रचारक म्हणून थांबल्यावर नोकरी, संसार अशा चक्रातून स्थिर होण्याचा ते प्रयत्न करीत होते. अशा वेळी त्यांचे उत्पन्न, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सुविधा या अपुऱ्याच होत्या आणि ते साहजिकच होतं. या

काळात आत्यंतिक प्रेमातून पण आपला अपेक्षाभंग करणाऱ्या किशाभाऊंना टोचतील अशा प्रतिक्रिया घरातून ऐकायला लागत होत्या. त्याने संतापून जाऊन किशाभाऊंनी निश्चय केला की सर्वांच्या आधी मी माझे स्वत:चे घर घेईन आणि त्यासाठी नोकरी व्यतिरिक्त अन्यही काही कामे करीन. प्रसाद मासिकाची सेल्समनशिप, रसाचे गुऱ्हाळ, आंबे विक्री, शेअर्स खरेदी-विक्री असे अनेक उद्योग करून सर्वांच्या आधी किशाभाऊंनी आपला टुमदार बंगला बांधला. घरात अन्य सुखसुविधा आणल्या आणि टीका करणाऱ्यांची, सामाजिक कामात सहभागी झाल्याबद्दल केल्या जाणाऱ्या उपहासाची समाप्ती आपल्या कर्तृत्वाने केली. ही जिद्द पुढे वर्धिनीच्या उभारणीतही त्यांच्या उपयोगी पडली हे निर्विवाद.

● **घरातील किशाभाऊ –** वर्धिनीच्या कामाच्या निमित्ताने अनेक वेळा त्यांच्या घरी जाणे व्हायचे, गप्पा रंगायच्या.

* कॉफी करण्याची त्यांची पद्धत अभ्यासण्यासारखी होती. विशेषत: गॅस बंद करताना आधी सिलिंडरचा स्विच ऑफ करायचा आणि मग शेगडीचा (नळीतील गॅस वापरला जावा म्हणून).

* फळं खाण्याचीही त्यांची एक शिस्त होती. विशेषत: सिताफळ खाताना ते एक चमचा द्यायचे. सिताफळाच्या अर्ध्या भागात चमच्याने गर घेतला की सालावरील गरही व्यवस्थित खाता येतो व हात चिकट होत नाही.

अशा अनेक गमती जमती अनुभवायला मिळायच्या. अर्थात त्यांच्या या शिस्तशीर सवयीमागे त्यांच्या पत्नी अर्थात लीलाताईचा वाटा मोठा होता.

● **दिनचर्या आणि दैनंदिनी लिखाण –** सकाळचा नियमित व्यायाम, ध्यानधारणा, वाचन आणि दैनंदिनी लिखाण या त्यांच्या अत्यंत शिस्तीच्या सवयी होत्या. किंबहुना या नियमित व्यायामामुळेच निवृत्तीनंतर वर्धिनीची स्थापना करून तिच्या रौप्यमहोत्सवापर्यंत ते सक्रिय राहू शकले. वर्धिनी १९७९ ला सुरू झाली. त्या वर्षाची सोडली तर जवळपास सर्व वर्षांच्या त्यांच्या डायऱ्या उपलब्ध आहेत. १९८० ते जवळपास २००३ पर्यंत ते किती लोकांना भेटले याची नुसती जंत्री केली तरी ती मोठी होईल. प्रचंड जनसंपर्क हे त्यांच्या यशाचे रहस्य होते.

ज्यांना ज्यांना ते भेटले व ज्यांची व्हिजिटिंग कार्डस् त्यांना मिळाली होती त्या कार्डस्वर ही व्यक्ती कुठे भेटली, कोणाच्या संपर्कातून आली यांच्या नोंदी असायच्या किंवा सदर व्यक्ती कोणत्या प्रकारच्या कामाला उपयोगी पडू शकते यासंबंधीचा त्यांचा एखादा शेरा असायचा.

● **संतवचने–सुवचने... वाचणारे... जगणारे किशाभाऊ–** किशाभाऊंच्या दिनचर्येमध्ये वाचन असायचेच व त्यामध्ये **एक डायरी होती ज्यामध्ये त्यांना आवडलेले, त्यांच्या वाचनात आलेले विचार, सुवचने, म्हणी, वाक्प्रचार इ. गोष्टी असायच्या**. या डायरीचे एक पान, मधुकर किंवा निरोप्या या पुस्तकाचे एक पान, रामकृष्ण वाक्सुधा, माताजी काय म्हणतात, विवेकानंद काय म्हणतात अशा प्रेरणादायी पुस्तकांची काही पाने ही नियमितपणे असायची. **या सततच्या वाचनामुळे त्यांच्या बोलण्यात, त्यांच्या लिखाणात अशा विचारांचा नकळत प्रभाव असायचा**. असे बोलणे ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांना/कार्यकर्त्यांना त्यातून प्रेरणा मिळाली नाही तरच नवल म्हणावे लागेल.

● **किशाभाऊंची पत्रे–** अनेकांना वर्धिनीकडे आकृष्ट करून घ्यायला किशाभाऊंमधील या गुणवैशिष्ट्यांचा मोठा हातभार होता. **सांत्वन, शुभचिंतन आणि अभिनंदन या गोष्टी वेळेवरच व्हायला हव्यात असा त्यांचा आग्रह असायचा व ते स्वत: या गोष्टींबाबत अतिशय दक्ष असत.** त्यामुळे एखाद्याला लिहिलेले अभिनंदनपरपत्र असेल किंवा एखाद्या दु:खद घटनेनंतर एखाद्याला त्यांनी लिहिलेले सांत्वनपर पत्र असेल त्यातील मजकुरामुळे अपेक्षित परिणाम साधला जायचा आणि ती व्यक्ती किशाभाऊंच्या आणि पर्यायाने वर्धिनीच्या प्रेमात पडायची. संभाव्य देणगीदारांना लिहिलेले आवाहनपत्र असो किंवा देणगीदाराला धन्यवाद देणारे पत्र असो या प्रत्येक प्रकारच्या पत्राला एक जाणवणारा खास 'किशाभाऊ टच' असायचा.

● **माणसे जोडण्याची कला–** ही तर किशाभाऊंच्या रक्तातच होती असे वाटते. वर्धिनीचे काम सुरू झाल्यावर त्यांच्या हातातील बॅगमध्ये किंवा पिशवीमध्ये वर्धिनीचे माहितीपत्रक, कार्यवृत्त नाही असे कधीच व्हायचे नाही

त्यामुळे कुठेही गेले आणि त्यांना नवीन कोणी माणसे भेटली की त्यांच्या हातात हे माहितीपत्रक किंवा कार्यवृत्त जायचेच. अशा नव्याने संपर्कात आलेल्या व्यक्तींना वर्धिनीचे काम दाखवायला ते घेऊन यायचे. अशा व्यक्तींचा परिचय करून द्यायचे आणि त्यावेळी समजायचे ही व्यक्ती कोणत्या प्रसंगात किशाभाऊंच्या 'तावडीत' सापडली. अशा व्यक्तींसमोरसुद्धा किशाभाऊ गमतीत सांगायचे 'हे श्रीमान........... याचा एवढाच गुन्हा झाला की........... यांच्याकडील लग्नात हे माझ्याजवळ जेवायला बसले' ही ओळख ऐकून अशी व्यक्तीही हसून दाद द्यायची. **लग्नकार्य असो की डेक्कन क्वीनमधील प्रवास वर्धिनीच्या कामासाठी सतत माणसांना जोडत जाणारे किशाभाऊ हे एक इंजिनच होते.**

● **सर्व वयोगटात रमणारे किशाभाऊ – अगदी लहान वयातील मुलांपासून ते अगदी ज्येष्ठ वयातील माणसांमध्ये, त्यांच्या गप्पांमध्ये, किशाभाऊ सहज मिसळू शकायचे.** हॉटेल श्रेयसमध्ये दर शनिवारी चालणाऱ्या त्यांच्या जागृती व्यासपीठाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या बैठकीत अगदी काश्मिर सुरक्षेसारख्या गंभीर समस्यांवर बोलणारे किशाभाऊ तितक्याच सहजतेने लहान मुलांशीही संवाद करू शकायचे. फोनवर कुणी लहान मूल असेल आणि त्याने कोण बोलतंय असं विचारलं की किशाभाऊ म्हणायचे, 'मी चोर बोलतोय' आणि ते लहान मुलंही तितक्याच सहजतेने आपल्या आजोबांना सांगायचे, 'आजोबा! चोरआजोबांचा फोन आलाय'. दर रविवारी युवक बैठकीनंतर युवकांबरोबर त्यांच्या होणाऱ्या गप्पा ऐकणं ही एक वेगळीच गोष्ट होती पण अशा गप्पांमधूनच त्यांनी अनेकांना कार्यप्रवृत्त केलं.

● **कामाच्या तळमळीतून निर्माण होणारा आत्मविश्वास– अशक्य हा शब्दच किशाभाऊंच्या शब्दकोशात नव्हता. त्यामुळे एखादी अशक्य वाटणारी गोष्ट ते सहज करू शकायचे.** कामाच्या तळमळीमुळे अगदी कोणालाही भेटायला जाणं आणि त्यांच्याकडून अपेक्षित काम करून घेणं या गोष्टी किशाभाऊ सहज करू शकायचे. कै. ग. दि. माडगूळकरांसारख्या ज्येष्ठ साहित्यिकाला म्हणूनच ते आग्रहपूर्वक आणि त्यांचा ठरलेला कार्यक्रम बदलायला

लावून ज्ञानप्रबोधिनीत मुलांना भेटायला घेऊन येऊ शकले. वर्धिनीची इमारत बांधण्याच्या वेळी निधी उभारणी हा मोठा विषय होता. पण किशाभाऊंनी अथक मेहनत घेतली आणि **अवघ्या सात-आठ वर्षांमध्ये वर्धिनीची स्वत:ची व कोणत्याही कर्जाच्या ओझ्यात नसलेली चार मजली वास्तू उभी राहिली. त्यासाठी लागलेला जवळपास पन्नास लाख रुपयांचा निधी किशाभाऊंनी आपल्या हिमतीवर उभा केला होता.**

● **किशाभाऊंची निवृत्ती –** मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाल्यावर वयाच्या साठीत एखादे नवीन काम सुरू करणे हा व्यावहारिक जगाच्या दृष्टीने वेडेपणाच होता, पण अवघं आयुष्य ज्या ध्येयासाठी ते जगले त्याचसाठी वर्धिनीचे काम त्यांनी वयाच्या या टप्प्यावर सुरू केले. नुसते सुरू केले नाही तर त्याला समाजात एक वेगळे स्थान, एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या या कर्तृत्वाला समाजाने वेगवेगळ्या पुरस्कारांच्या निमित्ताने अभिवादन केले होते. एका अर्थाने **किशाभाऊ यशाच्या, मान-सन्मानाच्या शिखरावर होते अशा स्थानावरून स्वत:हून बाजूला होता येणं ही सोपी गोष्ट नाही. परंतु ठरवून किशाभाऊ पदनिवृत्त झाले.** त्यांचे निवृत्तीचे पत्रही पुरेसे बोलके आहे. पदनिवृत्त झाल्यावरही ते वर्धिनीत येत होते पण कोणत्याही निर्णयात त्यांनी हस्तक्षेप केला नाही. आपल्या सहकाऱ्यांवर, विद्यार्थ्यांवर पूर्ण विश्वास टाकून तटस्थपणे चालू असलेले काम पाहिले आणि समाधानाने शेवटचा श्वास घेतला.

## मरणोत्तर नेत्रदान!

शेवटच्या आजारपणातही ज्यांच्या मनात सदैव समाजाच्या कामाचे विचार रुंजी घालत होते. त्या कै. किशाभाऊंनी मरणोत्तर नेत्रदानाची इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या इच्छेनुसार नेत्रदान करण्यात आले. ज्या कुणा दृष्टीहिन व्यक्तीला ही भेट मिळाली असेल, किशाभाऊंची दृष्टी मिळाली असेल तो खरोखरीच भाग्यवान.

# सरांच्या धपाट्यातून प्रेरणा मिळत गेली

**–सुभाष चलवादी**

किशाभाऊ पटवर्धन सरांच्या संपर्कात आलो तेव्हा मी शाळकरी मुलगा होतो आणि सरांनी तर वयाची साठी केव्हाच पार केलेली होती. त्यावेळी सर दिसले की त्यांच्यापासून दूर पळायचो पण सर मात्र बरोबर नजर ठेवून असायचे. मला बोलवायचे. माझी प्रगती कशी काय होतीय त्याची चौकशी करायचे आणि मग प्रेमाने पाठीत एक धपाटा घालायचे किंवा कान पिळायचे. त्यांची ती कृती ही शिक्षा नव्हती तर त्यांचे आमच्यावरचे प्रेम होते आणि आमच्यासाठी प्रेरणा होती. **आज त्याच धपाट्यांच्या बळावर आणि कान पिळण्यामुळे (चावी देण्यामुळे) आभाळात उडतोय.** मंगळवार पेठेतल्या गरीब परिस्थितीतील माझे घर ते गेल्या काही वर्षांपासून दुबईमधील माझी नोकरी, माझे नोकरीतील स्थान या माझ्या प्रगतीत वर्धिनीत मिळालेले प्रोत्साहन आणि प्रशिक्षण याचे मोठे स्थान आहे. त्यातही विशेषत: किशाभाऊ पटवर्धन सरांकडून मिळालेले प्रोत्साहन मला फार मोलाचे वाटते.

वर्धिनीचे काम करण्याचा, विशेषत: शाखेचं काम करण्याचा आज दुबईमध्ये नोकरी करताना खूप फायदा होतो आहे. सहकाऱ्यांमध्ये सहकार्याची भावना कशी वाढवावी हे अशा कामातूनच शिकलो आणि त्यामुळे माझे सहकारी माझ्या काम करवून घेण्याच्या पद्धतीला मनापासून दाद देतात. पण काही वेळा असं वाटतं की वर्धिनीत काम करण्याचा फायदा जसा होतो तसा तोटाही होतो. तोटा अशासाठी म्हणतो कारण जेव्हा जेव्हा मी नोकरी सोडावी असं ठरवून राजीनामा देऊ केला तेव्हा तेव्हा व्यवस्थापनाने तो नाकारला. आपण जे प्रामाणिकपणाने, मन लावून आणि त्याचवेळी क्षमतेने काम करतो त्याचा हा परिणाम असतो. व्यवस्थापनही मग मी राजीनामा का देतोय याचा विचार करून

माझ्या आर्थिक आणि अन्य अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करून मला जाऊ देत नाही.

दुबईत असलो तरी वर्धिनीची, तेथील सर्व मित्रांची, कार्यकर्त्यांची, आणि शिक्षकांची आठवण येत असतेच. जेव्हा जेव्हा पुण्याला येणं होतं त्या त्या वेळी मग संपर्काला जाणं हा माझा आवडता कार्यक्रम असतो. जे ज्येष्ठ कार्यकर्ते, शिक्षक पुण्याच्या वेगवेगळ्या टोकांना राहतात किंवा शारीरिक अथवा अन्य काही अडचणींमुळे वर्धिनीच्या संपर्कात नाहीत अशांकडे मी आवर्जून जायचो आणि जातो. एकदा गप्पांच्या ओघात सरांनी मला विचारले की आता तर तू रोजच्या कामात नाहीस पण संपर्क करतोस की नाही. मी नाही असं म्हटलं कारण मला वाटलं की शाखेतील वर्धकांच्या संपर्काबद्दल सर बोलत असावेत पण मग मी त्यांना सांगितलं की सर जे ज्येष्ठ कार्यकर्ते/ शिक्षक आता वर्धिनीत येत नाहीत, आजारी आहेत, लांब राहतात त्यांच्याकडे मात्र मी जाऊन येतो. सरांनी प्रेमाने एक धपाटा पाठीत घातला आणि म्हणाले की असा संपर्क म्हणजे खरा आणि छान संपर्क. त्या वाक्याने आणि धपाट्याने मी आनंदित झालो.

दूर असलो तरी फोनच्या माध्यमातून माझा पटवर्धन सरांशी संपर्क असायचा. त्यांच्या अगदी शेवटच्या दिवसातही, ते हॉस्पिटलमध्ये असताना माझ्या सरांशी फोनवर खूप छान आणि खूप वेळ गप्पा झाल्या होत्या. पण त्यानंतर पाच-सहा दिवसांनीच मला समजलं की सरांना देवाज्ञा झाली. सर पुन्हा भेटणार नाही, त्यांचा धपाटा मिळणार नाही याचं वाईटही वाटलं आणि बरं अशासाठी वाटलं की सर जाण्यापूर्वी पाच-सहा दिवस आधी मी त्यांच्याशी गप्पा मारू शकलो.

# मातेच्या ममतेने समाजाला जवळ घेणारे किशाभाऊ

**– जयंत कवठेकर**

श्री. किशाभाऊंचा माझा परिचय पहिल्यांदा झाला तो त्यांच्या पत्नी सौ. लीलाताई यांच्यामुळे. त्या आणि मी स्वाध्याय महाविद्यालयात (सायंकालीन) एकत्र शिकत होतो. किशाभाऊ दररोज तास संपल्यानंतर लीलाताईंना न्यायला यायचे. किशाभाऊ हे संघाचे जुने प्रचारक, ज्येष्ठ जाणते आणि तळमळीचे कार्यकर्ते त्यामुळे त्यांच्याबद्दल आदर आणि धाक वाटायचा. लीलाताईंबद्दलही अशीच भावना मनात होती.

किशाभाऊंशी झालेला हा परिचय तसा औपचारिकच होता. त्यांचा माझा खरा जवळून परिचय झाला तो मी राजा धनराज गिरजी विद्यालयात शिक्षक म्हणून काम करायला लागल्यावर. हा स्नेहबंध १९६२ पासून जुळला. त्यांनी माझ्या खांद्यावर हात टाकून एका क्षणात मला आपलंसं करून टाकलं. **मी त्यांच्यापेक्षा वयाने लहान असूनही त्यांनी मला मित्रत्वाचं सख्य दिलं. त्यामध्ये अकृत्रिम निर्मळता होती.** माझ्या मनाला याचं खूप अप्रूप वाटायचं. वाड्याच्या दारात आल्याबरोबर त्यांची माझ्या नावानं खणखणीत हाक यायची. तशीच हाक काही वेळा शाळेच्या प्रवेशद्वारातही यायची. आजुबाजूचे विद्यार्थी ती नावानं मारलेली हाक ऐकून गालातल्या गालात हसायचे आणि सरांच्या नकळत त्यांच्या आवाजाची नक्कल करीत मला तशीच हाक मारायचे. किशाभाऊंचं असं सख्य लाभलेला मी एकटाच शिक्षक सहकारी नव्हतो तर असे पाच-दहा सहकारी होते. स्थळ-काळाचं बंधन तोडून त्यांनाही अशाच हाका जायच्या. शिक्षक खोलीत, मधल्या सुटीत, चहा-कॉफीला जाताना किशाभाऊंचा सहवास सर्वांना हवाहवासा वाटे. दिलखुलास गप्पा, चेष्टामस्करी, विनोद या गोष्टी अखंड चालत असायच्या आणि धमाल मजा यायची.

पण 'वर्गातील' किशाभाऊ, 'शिक्षक' किशाभाऊ वेगळे असत. वर्गात

गप्पा–विनोद, मार्मिक उदाहरणे यांच्या जोडीला व्यासंग आणि तळमळ असे. परिस्थितीचा शाप सोसणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांच्या हृदयात कणव असे. अशा मुलांना उभे करण्यासाठी ते सतत धडपडत असत; पण याचा कधीही ते गाजावाजा करीत नसत. विशेष म्हणजे अशा विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत त्यांचा संपर्क असे.

शिक्षक म्हणून आणि त्यातही संघस्वयंसेवक असलेला शिक्षक म्हणून माझ्यावर त्यांचे कटाक्षाने लक्ष असे. शाळेमध्ये मी आयोजित केलेल्या साहित्यिक उपक्रमांना ते प्रोत्साहन आणि सहकार्य देत, मार्गदर्शनही करीत. शिक्षक म्हणून माझ्या हातून कोणतीही कसूर होऊ नये या बाबतीत ते दक्ष असत आणि तितकेच कठोरही असत. खऱ्या अर्थाने ते माझे तत्त्वज्ञ मार्गदर्शक होते.

राजा धनराज गिरजी शाळा मी सोडली आणि त्यानंतर जवळपास २७–२८ वर्षे मी त्यांच्या नित्य सहवासाला मुकलो. पुढे १९८० मध्ये अचानक त्यांची गाठ पुणे विद्यार्थीगृहाच्या राममंदिरात झाली. 'स्व'–रूपवर्धिनीच्या प्रयोगाबद्दल त्यांनी मला माहिती सांगितली आणि संपर्कासाठी त्यांचे कार्डही दिले. पुढे अधूनमधून मला वर्धिनीच्या उपक्रमांविषयी माहिती मिळत होती.

१९९२ मध्ये मी स्वेच्छानिवृत्ती घेऊन पुण्यात परत आलो. त्याआधी श्री. राजाभाऊ लवळेकर आणि कै. बापूराव दात्ये यांनी मला वर्धिनीत जाण्याविषयी सुचविले. किशाभाऊंचीही भेट झाली. माझ्या मनात काही प्रश्नही होते आणि शंकाही. या भेटीत मी त्या किशाभाऊंसमोर मांडल्या. किशाभाऊंनी अत्यंत शांतपणाने आणि सविस्तरपणे माझ्या प्रश्नांचं समाधान केलं आणि शंकांचं निरसनही. मग माझं वर्धिनीत येण्याचं नक्की झालं. किशाभाऊंनी मी 'आजोळ' प्रकल्पात काम करावं असं सुचवलं. परिसरातील वस्तीमधील सकाळ शाळेत जाणाऱ्या पाचवी ते सातवीमधील मुलामुलींसाठी हा प्रकल्प सुरू झाला होता. विशेषत: आईवडील दिवसा घरी नसल्याने जी मुलं दिवसा घरातील एकाकीपणाला आणि भावनिक रिकामपणाला सामोरी जातात अशा मुलामुलींसाठी हा प्रकल्प होता. माझ्यासाठी तो अभिनव होता. या प्रकल्पामागची भूमिका किशाभाऊंनी अत्यंत तळमळीनं माझ्यासमोर मांडली होती. ही तळमळ, त्यामागची

आर्तता माझ्याही मनाला भावली होती.

**वर्धिनीतील इतर प्रकल्प, उपक्रमांप्रमाणे आजोळमध्येही किशाभाऊंनी प्रयोगशीलतेला पूर्ण स्वातंत्र्य दिलेलं होतं आणि त्यामुळेच काही आनंददायी आणि चौकटीबाहेरचे प्रयोग आजोळमध्येही करता आले.** एक दिवस आजोळचे वर्ग चालू होते. अचानक वारं सुटलं, अंधारून आलं, पाहता पाहता जोरदार गारांच्या वर्षावात पाऊस सुरू झाला आणि वीजही गेली. वर्गातल्या वर्गात बोलण्याचा आवाजही सर्वांपर्यंत पोहोचेना. आता काय करावं याविषयी आजोळच्या सर्व कार्यकर्त्यांचा विचार सुरू झाला. मुलं तर केव्हाच मनाने गारांच्या वर्षावात पोहोचली होती. सर्वांनी विचार केला की मुलांना गारा वेचण्याचा आनंद आपण देऊ या. ही सूचना सांगायचा अवकाश; सर्व मुलं वर्धिनीच्या गच्चीवर पळालीसुद्धा. भिजताना आणि गारा वेचताना मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद अवर्णनीय होता. नुसता जल्लोष चालू होता. पाऊस ओसरल्यावर सर्वांना अंग कोरडे करायला सांगितलं आणि सुटी दिली. गारा वेचू देण्याच्या, मनसोक्त भिजू देण्याच्या उपक्रमानं मुलं तर जाम खूष झाली होती. त्यांचा आंनद पाहिला आणि मनामध्ये एक कल्पना चमकून गेली. उद्या आजोळमध्ये मुलांना गारा कशा तयार होतात. ही विज्ञानातील गम्मत समजावून सांगता येईल का? असा विचार करीत वर्धिनीच्या ग्रंथालयात पोहोचलो. संजय राचेल्ली हा युवक कार्यकर्ता ग्रंथालयात होता. त्याचे विज्ञान विषयातील प्रेम आणि त्याचा अभ्यास याची मला कल्पना होती. त्याला मी घडलेला प्रसंग सांगितला आणि त्याला म्हटलं उद्या तू मुलांना गारा कशा तयार होतात हे सांगशील का? त्याने आनंदाने होकार दिला. हे सगळं वृत्त मी किशाभाऊंना सांगितलं तेही खूप खूष झाले आणि म्हणाले, ‘‘शाळेत असे प्रयोग करायला मर्यादा पडतात पण वर्धिनीत मात्र असे प्रयोग आपण केव्हाही करू शकतो. मुलांचा आनंद आणि अभ्यास याची तुम्ही घातलेली सांगड मला आवडली आणि संजयची निवडही योग्य केली आहे.’’ संजय राचेल्लीनं दुसऱ्या दिवशी गारा कशा तयार होतात याविषयावरचा एक उत्तम तास घेतला. फळ्यावर उत्तम

आकृत्या काढल्या. मुलं अगदी मन लावून ऐकत होती, प्रश्न विचारत होती आणि टिपणेही घेत होती. हेलन केलरच्या शिक्षिकेनं तिला W....A....T... E....R या शब्दाची अनुभूती जशी दिली होती तसाच काहीसा हा प्रयोग होता. किशाभाऊंनी प्रयोग करण्याचं दिलेलं स्वातंत्र्य आणि टाकलेला विश्वास यामुळेच केवळ या प्रयोगाचा आनंद घेता आला.

विद्यार्थ्यांना काही दुखलं खुपलं तर किशाभाऊ खूप अस्वस्थ व्हायचे. अशा वेळी आवश्यक असेल ते सर्व साह्य मिळवून देण्याची त्यांची सिद्धता असायची. एक दिवस खेळताना आजोळ प्रकल्पातील एका पाचवीच्या विद्यार्थ्यांचे बोट दाराच्या फटीत सापडले आणि त्या बोटाचा नखाजवळचा जवळपास सर्व भाग तुटला. खूप रक्त यायला लागलं. त्या मुलाला वेदनाही खूप होत होत्या. दवाखान्यात नेण्याशिवाय पर्याय नव्हता. ही घटना मी लगेचच किशाभाऊंना कळवली. ते म्हणाले, ''त्या मुलाचं बोट पूर्ण बरं होणं ही आपली जबाबदारी आहे. प्लॅस्टिक सर्जरी करण्याची वेळ आली तरी ती आपण करू. तू डॉक्टरांशी तसं बोल.'' इतका भक्कम पाठिंबा मिळाल्यानं त्या प्रसंगातून सावरणं सोपं गेलं. सुदैवानं इजा झालेल्या बोटाच्या नखाचं मूळ शाबूत होतं आणि मुलगा वाढीच्या वयातील होता, त्यामुळे काळजीचं कारण नाही असं सांगून डॉक्टरांनी आम्हाला निश्चिंत केलं. पुढे काही दिवसांनी जखमही भरली आणि तुकडा पडलेल्या बोटाचा भागही भरून आला. या प्रसंगात अर्थात **या मुलाच्या आईचंही तेवढंच कौतुक आहे. त्यांनी या अपघाताबद्दल वर्धिनीला कोणताही दोष दिला नाही आणि 'घरीसुद्धा असं घडू शकतं आणि तो वर्धिनीत होता म्हणजे घरीच होता' असं म्हणून वर्धिनीवरचा विश्वास आणि प्रेम व्यक्त केलं.** वर्धिनीच्या रोजच्या संपर्काचा परिणाम काय घडू शकतो त्याचं हे एक उत्तम उदाहरण होते.

वर्धिनी बघायला येणाऱ्या पाहुण्यांच्याबाबत किशाभाऊंच्या मनात नेहमीच 'अतिथिदेवो भव!' असाच भाव असे व तो तसा कृतीतूनही उमटे. एक दिवस पेणच्या प्रा. शांताताई भावे या एका कार्यशाळेसाठी आणखीन काही शिक्षक

सहकाऱ्यांसह पुण्यात आल्या होत्या. वर्धिनीचं काम ऐकून त्यांना माहिती होतं. त्यांचा फोन आला की, कार्यशाळेच्या जेवणाकरता असलेल्या वेळातच काम पहायला येणे शक्य आहे तर येऊ का? नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. कारण वर्धिनीवरच्या प्रेमापोटी त्या येत होत्या. त्या येत असल्याचे मी किशाभाऊंना सांगितलं. त्यावेळी ते घरी जायला निघत होते. मी त्यांना थांबण्याची विनंती केली आणि ते थांबले. थोड्या वेळानं शांताताई आणि त्यांचे सहकारी वर्धिनीत पोहोचले. किशाभाऊंनी त्यांचे स्वागत केलं त्यांचा परिचय करून घेतला. पाच-दहा मिनिटे वर्धिनीच्या कामाविषयी बोलले आणि मला म्हणाले, ''अरे, पाहुण्यांना वर्धिनी दाखव. आजोळचं काम, त्यातील अनुभव, मुलांमधील बदल हे सगळं सांग बरं का. मी जरा काम असल्यानं निघतो आहे.'' पाहुण्यांचा निरोप घेऊन किशाभाऊ घाईनं बाहेर पडले. कार्यशाळेतील जेवण बाजूला ठेवून पाहुणे वर्धिनी पाहायला आले होते त्यामुळे सरांनी अजून थोडा वेळ तरी थांबायला हवं होतं असं मला वाटून गेलं आणि मी थोडा अस्वस्थ झालो. किशाभाऊंच्या सूचनेनुसार सर्व कार्यक्रम पार पडला. आलेले सर्व पाहुणे वर्धिनीच्या प्रयोगावर खूप खूष होते. त्यांची निघायची वेळ झाली त्यामुळे त्यांचा निरोप घेत होतो एवढ्यात वर्गाच्या दारात किशाभाऊ येऊन उभे राहिले. त्यांच्या हातात दोन पुडकी होती. मला म्हणाले, ''मोठ्या पुडक्यात इडल्या आहेत आणि दुसऱ्यात चटणी.'' पाहुण्यांकडे वळून म्हणाले, **''केवळ वर्धिनीचं काम पाहण्यासाठी जेवणाकडे पाठ फिरवून तुम्ही सर्वजण आलात. निदान आमचा नाश्ता तरी घेऊन जा.''** आलेले सर्व अतिथी आणि मी स्वत: अवाक् झालो. आमचे फक्त डोळे बोलत होते. मनातल्या मनात मी पुन्हा अस्वस्थ झालो कारण किशाभाऊंची स्वत:च्या जेवण्याची वेळ कधीच टळून गेली होती.

हृदयावर कोरला गेलेला असाच एक प्रसंग. १९९९ साली किशाभाऊ अमेरिकेला गेले होते. ते पुण्यात परतण्याच्या आदल्याच दिवशी दिवाळी सुटीतील शिबिर सुरू झाले होते. पुण्यात पोहोचताच आंघोळ करून ज्ञानेश पुरंदरे यांच्यासोबत ते शिबिर स्थानी दाखल झाले. सर्वांना खूप आनंद झाला. त्यांनी सर्वांचे क्षेमकुशल

विचारले, हास्यविनोद गप्पा रंगल्या. निघण्यापूर्वी शिबिर व्यवस्थेतील सर्वांना भेटायला आले. त्यावेळी त्या सर्वांची चर्चा चालू होती. कारण जेवण संपलं होतं, पण व्यवस्थेतील काही जणांचे जेवण राहिले होते. दुपारच्या सत्राची वेळ लक्षात घेता चटकन भात पिठले करावं असं बैठकीत ठरलं. ही चर्चा किशाभाऊ ऐकत होते. त्यांच्याकडे लक्ष जाताच चर्चा थांबली. किशाभाऊंनी मला स्कूटरवरून घरी सोडायला सांगितलं. लगेचच त्यांना घेऊन मी निघालो. विमान प्रवासामुळे त्यांचे झोपेचे चक्र बदलले होते आणि किशाभाऊ स्वत: खूप दमलेले होते. गाडीवर बसताच माझ्या पाठीवर डोके टेकवून किशाभाऊ नुसते झोपले नाहीत तर घोरू लागले. त्यांची ती अवस्था बघून मी गाडी आणखीनच काळजीने आणि हळू चालवत नेली. त्यांच्या घराजवळच्या चौकात पोहोचेपर्यंत किशाभाऊ सावरून बसले आणि त्यांनी मला तेथील फळांच्या दुकानाजवळ गाडी घ्यायला सांगितली. दीड-दोन डझन सफरचंदे त्यांनी विकत घेतली आणि आम्ही घरी पोहोचलो. मी त्यांना घराच्या दारात सोडले आणि निरोप घेऊन निघालो. किशाभाऊंनी मला थांबवलं. घरात जाऊन एक पिशवी घेऊन आले आणि म्हणाले, ‘‘या पिशवीत सफरचंदे आहेत आणि आंबा बर्फीही. तुम्हाला फक्त भात पिठल्यावर जेवण भागवायचे आहे. काहीतरी आणखीन आधाराला हवं.’’ या त्यांच्या कृतीवर काही बोलूच शकलो नाही. पण डोळ्यांना मात्र रोखता आलं नाही. तशाच अवस्थेत शिबिरात पोहोचलो. किशाभाऊंची आधारभेट सर्वांसमोर ठेवली. माझ्यासारखीच सर्वांची अवस्था झाली.

किशाभाऊंच्या संबंधातील प्रत्यक्ष अनुभवलेले असे अनेक प्रसंग सांगता येतील. **तत्त्वनिष्ठा आणि त्यानुसार कर्तव्यपालन या विषयात किशाभाऊ कमालीचे आग्रही होते. त्याकरिता ते कुणाचाही आणि कसलाही मुलाहिजा बाळगत नव्हते.** प्रसंगानुसार ते अत्यंत कठोरही असायचे आणि कमालीचे संवेदनाशीलही. परमपूजनीय डॉक्टर हेडगेवारांचा विषय निघाला की कमालीचे भावव्याकुळ होत. समाजसुधारकानं मातेच्या ममतेने समाजाजवळ जावं असं आगरकरांचं सांगणं होतं. किशाभाऊ आगरकरांच्या या सांगण्याचे प्रत्यक्ष प्रमाण होते.

**–कृ. ल. पटवर्धन,**
४२८/२०, शिवाजीनगर,
विद्या विहार कॉलनी,
पुणे ४११ ०१६.
दि. ३.९.२०००

## परि हे तुमचेनि झाले। म्या हे नाही केले।

मा. अध्यक्ष,
स्वरुप वर्धिनी यांसी,

स.न.वि.वि.

गेली काही थोडीशी वर्षे मी 'स्व'-रूप वर्धिनीचे काम करण्याचा थोडासा पण नम्र यत्न केला आहे. अल्पस्वल्प यशही मिळविले असेल. परंतु हे सर्व यशही माझे नाही.

***फोडिले भांडार। धन्याचा हा माल ।।***
***मी तव हमाल। भारवाही ।।***

परंतु आता गेली दीड वर्षे माझ्या मनात असे येते आहे की मी ह्या कामाला सर्वार्थाने खूपच अपुरा पडतो आहे. ह्या सर्वांचे मुख्य कारण शारीरिक श्रम व त्यामुळे मानसिक ताण मला झेपत नाही. म्हणून दीड-दोन वर्षांपासून आपण ह्या कामातून निवृत्त व्हावे असे प्रकर्षाने वाटू लागले होते.

विवेकानंदांनी त्यांच्या शक्तिशाली विचार ह्या पुस्तकात माझ्या विचाराला पुष्टी देणारा विचार मांडला आहे. त्यात ते म्हणतात की, "भारतातील पूर्वीच्या नियमाप्रमाणे प्रत्येक स्त्री पुरुषाने आपल्या आयुष्याच्या अखेरीस सामाजिक जीवनातून पूर्ण निवृत्त व्हावे." म्हणून मला दि. १.१.२००१ पासून निवृत्त होण्याची परवानगी मिळावी अशी नम्र विनंती आहे.

मी माझ्या अल्पशक्तीनुसार, डॉ. हेडगेवार यांनी सांगितल्याप्रमाणे तन-मन-

धनपूर्वक समाजाची सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. ही सेवा करण्याची संधी आपणा सर्वांनी व समाजाने मला दिली आहे आणि माझ्या अनेक दोषांकडे सगळ्या कार्यकर्त्यांनी डोळेझाक करून माझ्याकडून ही सेवा करवून घेतली आहे ह्याबद्दल मी सर्वांचा व समाजाचा सर्वस्वी ऋणी व कृतज्ञ आहे.

आता माझ्या हातांना कंपवात सुरू झाल्यामुळे मला सध्या सहीही नीट करता येत नाही. तेव्हा ह्या सहीतूनही मला कार्याध्यक्षपदाबरोबर मुक्त करावे ही प्रार्थना.

यापुढे माझ्यावाचून कोणतेही काम अडेल असे मला मुळीच वाटत नाही. तरी पण जर आवश्यक असेल आणि आपण आज्ञा दिलीत तर शक्य ती सर्व सेवा करण्याचा मी शिकस्तीचा प्रयत्न करीन.

मी स्वत: काही केले आहे असे मला वाटत नाहीच. वाटूही नये ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

संत ज्ञानेश्वर माऊली देखील म्हणतात की,

***परि हे तुमचेनि झाले । म्या हे नाही केले ।।***
***धर्म कीर्तन सिद्धी गेले । तुम्हा कारणें ।।***

माऊलींच्या पावलांच्या धुळीचीही सर मला नसताना मी असे कसे म्हणू की ''मी केले.''

पुन्हा एकदा सर्वांच्या सहभागाबद्दल धन्यवाद. माझ्या हातून जे काही अल्पस्वल्प परमेश्वराने करवून घेतले त्या परमेश्वरास मी विसरून कसे चालेल? म्हणून त्या सर्वशक्तिमान श्री परमेश्वराच्या कृपेची मला सतत जाण आहे.

श्री समर्थ रामदास म्हणतात,

***सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयांचे ।।***
***परंतु तेथे अधिष्ठान पाहिजे । भगवंताचे ।।***

सदैव आपला
चिरमंगलाकांक्षी,

**(कृ. ल. पटवर्धन)**

# पावन स्मृतीस सादर प्रणाम!



*सौ. लीलाताई व श्री. कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन*



शालांत प्रमाणपत्र परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या अशोक निरफराके या आपल्या अत्यंत लाडक्या विद्यार्थ्यांच्या
कौतुक सोहळ्यात मा. किशाभाऊ (वर्ष १९६४)

## मान्यवरांच्या सहवासातील काही क्षणचित्रे...



ज्येष्ठ समाजसेवक
श्री. अण्णा हजारे
यांच्या समवेत
मा. किशाभाऊ



रा स्व. संघाचे सरसंघचालक
प.पू. बाळासाहेब देवरस
यांचे आपल्या घरी स्वागत
करताना सौ. लीलाताई
आणि मा. किशाभाऊ




शिबिर समारोप कार्यक्रमात
प्राचार्य सत्यरंजन साठे यांचे
स्वागत करताना
मा. किशाभाऊ



रा.स्व. संघाचे सरसंघचालक
प.पू. रज्जुभैया यांच्या
वर्धिनी भेटप्रसंगी
त्यांच्यासमवेत
मा. किशाभाऊ



जे.आर.डी. व थेल्मा
टाटा ट्रस्ट यांनी वर्धिनीच्या
फिरत्या प्रयोगशाळेला
दिलेल्या वाहनाचा
'स्वीकार सोहळा'.
या प्रसंगी डॉ. बानु कोयाजी,
श्री. प्रतापराव पवार
यांच्या समवेत मा. किशाभाऊ



ज्येष्ठ साहित्यिक
डॉ. आनंद यादव यांचे
संक्रांत उत्सवाचे वेळी
स्वागत करताना
मा. किशाभाऊ



ज्येष्ठ शास्त्रज्ञ
डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे
वर्धिनीच्या रौप्यमहोत्सवाचे
कार्यक्रमात स्वागत करताना
अध्यक्ष श्री. जयसिंह मरिवाला,
मा. पुरुषोत्तमभाई श्रॉफ
आणि मा. किशाभाऊ



निवृत्त तुरुंग महानिरिक्षक
श्री. राम बेलवंडी यांचे समवेत
लोणावळा येथील शिबिर समारोप
कार्यक्रमात मा. किशाभाऊ
(वर्ष १९८१)



दै. सकाळचे संपादक
श्री. बाबा मुणगेकर यांचे
समवेत संक्रांत उत्सव
कार्यक्रमात मा. किशाभाऊ.

# विविध पुरस्कार




ज्येष्ठ समाजसेवक मा. नानाजी देशमुख यांचे हस्ते विद्याव्यास पुरस्कार स्वीकारताना मा. किशाभाऊ

रा.स्व. संघ जनकल्याण समिती
'श्री गुरुजी पुरस्कार २००५' (मरणोत्तर)




फाय फाउंडेशन पुरस्कार स्मृतीचिन्ह
(वर्ष १९९६)



## मा. किशाभाऊंच्या अमृतमहोत्सव कार्यक्रमातील क्षणचित्रे



सौ. लीलाताई व
श्री. किशाभाऊ यांना
ओवाळताना वर्धिनीच्या
ज्येष्ठ कार्यकर्त्या
श्रीमती कुंतीताई मुजुमदार



जाहीर कार्यक्रमात
मा. किशाभाऊ यांचा
गौरव करताना
श्री. भिकूजी इदाते
(कार्यवाह रा.स्व.संघ,
महाराष्ट्र)



अमृतमहोत्सवाचे वेळी
झालेली दोन स्नेह्यांची
दिलखुलास भेट
(मा. किशाभाऊ आणि
मा. बापुराव भिशीकर)



अमृतमहोत्सव कार्यक्रमाला
उपस्थित स्नेह्यांच्या समवेत
मा. किशाभाऊ






अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने वर्धकांना
मार्गदर्शन करताना मा. किशाभाऊ

# सामाजिक व सांस्कृतिक भान रुजवणारे किशाभाऊ



बुद्धं सरणं गच्छामि!
(वर्धिनीच्या 'आनंद' पाणपोईचे
उद्‌घाटन करताना
मा. किशाभाऊ)




रक्तदान शिबिरात
रक्तदात्यांना प्रोत्साहन देताना
मा. किशाभाऊ




गणेशोत्सवाच्या जल्लोषात
तरुण कार्यकर्त्यांसमवेत
मा. किशाभाऊ

# विदेश दौरा




शुभास्ते पंथान: ...
ज्येष्ठ प्रचारक
मा. राजाभाऊ भोसले
मा. किशाभाऊंना
विदेश दौऱ्यासाठी
शुभेच्छा देताना




'तुम्ही निश्चिंत मनाने जा!
आम्ही वर्धिनीचे काम
व्यवस्थित सांभाळू !'
अमेरिका दौऱ्यावर
निघालेल्या किशाभाऊंना
रेल्वेस्थानकावर शुभेच्छा
देताना युवक-युवती
कार्यकर्ते.



अमेरिकेतील नेवार्क
विमानतळावरून
बाहेर पडताना किशाभाऊ



आय.डी. आर. एफ. चे प्रमुख विश्वस्त श्री. विनोद प्रकाशजी यांचे अमेरिकेतील घरी ज्ञानेश पुरंदरे या वर्धिनीच्या कार्यकर्त्यासोबत मा. किशाभाऊ.



श्री. शांतीलाल मिस्त्री, सेवा इंटरनॅशनल-यु. के, किशाभाऊंचे स्वागत करताना



कॅनडा येथून वर्धिनीचे काम करायला पुण्यात आलेल्या नीलेश व सोनल काविया या दांपत्यांसोबत मा. किशाभाऊ

# संपर्क – कामाचा प्राण....



निमित्त वाढदिवसाचे,
हेतू संपर्काचा




घरातून किंवा कार्यालयातून... दररोज अनेकांशी संपर्क साधायचा आणि त्या त्या माणसांना वर्धिनीला जोडायचं हे किशाभाऊंचं अत्यंत आवडतं काम!



# व्यवहार आणि विचार याची योग्य सांगड घालणारे किशाभाऊ



कार्यकारिणीचे पदाधिकारी या नात्याने उद्योग व्यवसायातील तज्ज्ञ व्यक्तींचा नेहमीच वर्धिनीला मौलिक सल्ला व मार्गदर्शन मिळत राहिले आहे.



कामाचा मुलभूत विचार ज्यांच्याशी अनेकवेळा सल्लामसलत करून किशाभाऊंनी पक्का केला अशांपैकी मा. र.ज. नरवणे, मा. राजाभाऊ लवळेकर या सहकारी कार्यकर्त्यांच्या सोबत मा. किशाभाऊ

# निवांत क्षणी सौ. लीलाताई समवेत मा. किशाभाऊ



घरात



बागेची देखभाल करताना




बागेतील हिरवळीवर



आता कामाचीही जबाबदारी तरुण कार्यकर्त्यांनी आपल्या खांद्यावर घ्यावी.

नमस्कार देवा तुला आमुचा हा,
करी आमुची मायभूमी महा!



वर्धक/वर्धिका कार्यकर्त्यांनो,
भगवद् गीतेत सांगितल्याप्रमाणे जीर्ण कपडे सोडून द्यावेत,
तसा मी देह सोडून दिला. मी आता आहे चैतन्यरूपात....
पण जिथे आहे तिथून मात्र माझे तुमच्या सर्वांकडे लक्ष आहे.

मी पाहतो आहे
१९७९ साली लावलेल्या वर्धिनीच्या रोपट्याची
वाढ कशी होते आहे?
निगा राखता राखता या रोपट्याची,
संघटना कशी वाढते आहे?

'मैं नहीं तू ही।' हे संघानी मला शिकवलं,
खरंच सांगतो, माझ्या परीनं मी ते जपलं.
आपलं काम वाढवायचं असेल,
समाजाचा विश्वास टिकवायचा असेल,
तर बघा हे सूत्र वापरून,
घ्या स्वत:च त्याची खात्री करून.

रोजच्या कामात आनंद शोधता का?
आपला आनंद वाटता का?
आनंद दिला की वाढतो
हे का मी तुम्हाला सांगायला हवं?
हे ज्याचं त्यालाच उमजायला हवं.

'नव्या कल्पना, नवे उपक्रम
भरपूर काम अन् व्यस्त दिनक्रम'
असा मी जगलो, तुम्हीही तसं जगा
अशा जगण्यात काय मजा असते
अनुभवून तर बघा.

ही सारी धडपड आहे समृद्ध, समर्थ भारतासाठी
मी ही आसुसलेला आहे ते सारं पाहण्यासाठी
या धडपडीला सर्वांची साथ असायलाच हवी
भारतमाता जगद्गुरूच्या स्थानी बसायलाच हवी!